

# गद्यगुच्छ

—न. चिं. केळकर

0152 M72
KEL
196

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन, पुणें २

# ग द्य गु च्छ

अर्थात्

## निवडक गद्यलेखांचा संग्रह


लेखक :

**नरसिंह चिंतामण केळकर**



मॉ ड र्न बु क डे पो प्र का श न

किंमत Rs 20.00

☆

नवीन आवृत्ति
१९६५

☆

सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

SURESH V. RANADE LIBRARY 196

☆

प्रकाशक :
श्री. कमलाबाई भिडे,
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें २.

☆

मुद्रक :
श्री. प्रल्हाद गणेश काळे,
व्यवस्थापक, अजित मुद्रणालय,
१००५ सदाशिव पेठ, पुणें २.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

सुमारें बारा वर्षांपूर्वी " केळकरकृत लेखसंग्रह " या नांवानें माझ्या कांहीं लेखांचें पुस्तक चित्रशाळेनें प्रकाशित केलें होतें. त्याची पहिली आवृत्ति संपून गेली असून तें पुस्तक आज बरींच वर्षें दुर्मिळ झालें होतें. म्हणून त्याची द्वितीयावृत्ति छापून काढावी अशा मजकडे कांहीं सूचना आल्या. त्याचप्रमाणें, अशा लेखसंग्रहाचा दुसरा खंड छापून प्रकाशित करण्याइतकी सामुग्री या दहा-बारा वर्षांत जमलेली असल्याकारणानें त्या जुन्याच पुस्तकाची द्वितीयावृत्ति काढण्यापेक्षां शक्य तर नवीन लेखांचा पूर्वींच्याच नमुन्याप्रमाणें दुसरा खंड प्रसिद्ध करावा अशाहि सूचना कांहीं जणांनीं केल्या. परंतु एवढा मोठा ग्रंथ छापणें हें प्रकाशक व वाचक या दोघांच्याहि दृष्टीनें सोईचें नसतें. म्हणून ' केळकरकृत लेखसंग्रहां 'तील कांहीं जुन्या व त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या कांहीं नव्या लेखांतील निवडक उतारे घेऊन हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, व तें मुंबई युनिव्हर्सिटीनें बी. ए. च्या शिक्षणक्रमांत १९२९ सालच्या परीक्षेस नेमिलें आहे. हें पुस्तक शिक्षणक्रमांत वाचण्यास विद्यार्थ्यांच्या सोईचें व वाङ्मयाविषयक दृष्टीनें इतर वाचकांनाहि पसंत आहे असें दिसून आल्यास अशा निवडक उताऱ्यांचे आणखी कांहीं खंड क्रमशः प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

ता. १५ ऑक्टोबर १९२६. न. चिं. केळकर

निरनिराळ्या विद्यापीठांच्या परीक्षांकरितां हें पुस्तक नेमलेलें असल्यामुळें त्याची ही नवी आवृत्ति आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत.

१-८-१९६५. —प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | ज्ञानाचीं सदावर्तें | १ |
| २. | काव्यदृष्टि | ८ |
| ३. | हास्यरसाचा व्यावहारिक उपयोग | १६ |
| ४. | तोतयाचें बंड | २८ |
| ५. | देशी भाषांचें पुनरुज्जीवन | ४२ |
| ६. | मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया | ४७ |
| ७. | इतिहास व इतिहास-संशोधन | ६१ |
| ८. | मराठेशाही कशानें बुडाली ? | |
| | ब्राह्मणांची जबाबदारी | ६४ |
| | मराठ्यांची जबाबदारी | ६५ |
| | व्यापारी धोरण चुकलें काय ? | ६७ |
| | नाशाचीं खरीं कारणें | ७० |
| ९. | जगद्गुरूंची गादी | ७७ |
| १०. | हीन जाति व त्यांची उन्नति | ८४ |
| ११. | भविष्यकथन | ९२ |
| १२. | सिमल्याचें वर्णन | १०८ |
| १३. | वाङ्मय म्हणजे काय ? | ११८ |
| १४. | नाट्यवस्तुविचार | १३० |
| १५. | चंद्रगुप्त | १४७ |
| १६. | संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन | १५६ |


• • •

# गद्यगुच्छ

## १ : ज्ञानाचीं सदावर्तें

परवां पुणें मराठी-ग्रंथसंग्रहालयाच्या प्रारंभाच्या दिवशीं आपल्या भाषणांत रा. नानासाहेब पावगी यांनीं भरतखंडांतील विद्यापीठांचें आणि ग्रंथसंग्रहांचें केलेलें वर्णन संक्षेपानें पूर्वीं प्रसिद्ध झालेंच आहे. हिंदुस्थानाप्रमाणें प्राचीन काळीं असीरिया, ईजिप्त, ग्रीस, रोम वगैरे राष्ट्रांतहि मोठमोठीं ग्रंथसंग्रहालयें होतीं असें पुराणवस्तुसंशोधकांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. असीरियाच्या राजधानीचें शहर निनव्हें येथें सांपडलेल्या असुरबनीपाल राजाच्या ग्रंथ-संग्रहालयामध्यें एक चौरस फुटापासून एक चौरस इंचापर्यंत मृत्तिकापत्रांवर लिहिलेले हजारों ग्रंथ आहेत; व त्यांपैकीं कांहींवरील लेख इतके बारीक खोदलेले आहेत कीं ते सूक्ष्मदर्शक भिंगाखेरीज वाचतां येत नाहींत! ख्रिस्तापूर्वीं चौदाव्या शतकांत ईजिप्तमध्यें ऑसिमँडिस नांवाच्या राजानें एका देवालयामध्यें एक प्रचंड ग्रंथसंग्रहालय बनविलें होतें; त्यांत हजारों ग्रंथ होते. त्या ग्रंथसंग्रहालयाला 'आत्मरुग्णालय'—आत्म्याला होणाऱ्या रोगांच्या चिकित्सेचा व औषधोपचाराचा दवाखाना—असें अत्यंत मार्मिक नांव दिलें होतें, त्यावरून ज्ञानाचें महत्त्व या जुन्या काळींहि किती मानलें जात असेल याची सहज कल्पना होते. ग्रीसमध्यें ख्रिस्तापूर्वीं ६०० वर्षांच्या काळीं इसिसट्रेसस नामक सरस्वतीभक्तानें मोठालीं ग्रंथसंग्रहालयें केल्याचा दाखला सांपडतो. इराणच्या झर्सीस राजानें ग्रीस देशांतून एक प्रचंड ग्रंथसंग्रह इराणांत नेला; व पुढें अलेक्झांडर यानें दिग्विजय केल्यावर तो अॅथीनियन लोकांस परत मिळाला असें म्हणतात. ईजिप्तमधील टॉलमी नामक राजवंशाची विद्याप्रियता महशूरच आहे. मुसलमानांनीं ईजिप्त जिंकला त्या वेळीं धर्मवेडानें पछाडल्यामुळें त्यांनीं तेथील एक मोठें ग्रंथसंग्रहालय जाळून

आपली अरसिकता जगास जाहीर केली, अशा निंदेचा डंका इतिहास आजवर गाजवीत आहे. तें अलेक्झांड्रिया येथेंच होतें. या शहरांतील दोन ग्रंथसंग्रहालयें मिळून चारपासून सात लक्षांपर्यंत ग्रंथसंख्या होती असें अनुमान झाहे. सिसरो व ॲटिकस या रोमन विद्वानांचीं स्वतःचीं अशीं मोठीं ग्रंथसंग्रहालयें होतीं. जगप्रसिद्ध सीझर यानें रोममध्यें फुकट वाचण्याकरितां सार्वजनिक ग्रंथसंग्रह बनविण्याची योजना केली होती. ख्रिस्ती मध्ययुगांत ग्रंथसंग्रह असावे तसे नव्हते. याचें कारण असें कीं, ख्रिस्ती राष्ट्रांच्या जुन्या काळीं विद्या, ग्रंथलेखन व वाचन या गोष्टी केवळ भटाभिक्षुकांच्या अधीन राहिल्या होत्या. पण आधुनिक काळीं ख्रिस्ती राष्ट्रांनीं हा दोष सर्व धुऊन काढला आहे. लंडन येथील ब्रिटिश म्युझियम, त्याचप्रमाणें बर्लिन, म्यूनिच, शिकागो वगैरे ठिकाणचीं ग्रंथसंग्रहालयें—अर्थात् त्यांतील ग्रंथांचा प्रचंड संग्रह—यांची पद्धतशीर व मार्मिक मांडणी व रचना वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे युरोपियन लोकांच्या विद्याव्यसनित्वाची खरी साक्ष पटते.

आतां इतर कित्येक गोष्टींप्रमाणें पुस्तकालयांसंबंधानेंहि मूळ मर्म विसरलें जाऊन केवळ त्यांच्या बाह्य स्वरूपाची आणि नसत्या महत्त्वाची अतिशयोक्ति होण्याचा संभव असतो, नाहीं असें नाहीं. पुस्तकसंग्रह आणि त्यावरून ओळखली जाणारी समाजाची विद्याप्रियता यांचें प्रमाण नेहमींच सम राहील असें म्हणतां येणार नाहीं. ग्रंथ जमविणें हा एकदां का निवळ हौसेचा किंवा षोकाचा विषय होऊन राहिला म्हणजे मग ग्रंथांवर ग्रंथ जमा होऊं लागतात, वाचनालयांचें उत्पन्न वाढूं लागतें, आणि त्यांचा एकंदर बडेजाव फैलावत जातो. जी गोष्ट समाजाची तीच व्यक्तींची. पुस्तकांचा नाद असणारे सर्वच लोक म्हणजे विद्याव्यसनी असतात असें नाहीं. पुस्तकें विकत घेणें अगर इतर रीतीनें जमविणें तीं वाचण्याकरितां नव्हे तर डोळ्यांसमोर दिसल्यानें बरें वाटतें, अगर कलाकुसरीच्या इतर सामानाप्रमाणें तीं खोलीस किंवा दिवाणखान्यास एक प्रकारची शोभा देतात. म्हणून पुस्तकसंग्रह करणारे कित्येक लोक असतात. अशा ग्रंथसंग्रहांचा उपयोग प्रसंगोपात्त दुसऱ्यास होतो हें ठीकच आहे; पण या बाबतींत वाइटांतून एवढेंच काय

तें चांगलें काढण्यासारखें असतें. पुस्तकें विकत घेण्यास जे पैसे ते खर्च करितात किंवा तीं जमविण्याकरितां जे श्रम ते करितात त्या मानानें त्यांची स्वतःची बहुश्रुतता नसते. मोठमोठ्या ग्रंथसंग्रहालयांतूनहि वर्षानुवर्षे ज्यांना कोळिष्टकें झाडणाऱ्या सफाई कामगारांच्या केरसुणीशिवाय दुसरा कोणताहि स्पर्श झाला नाहीं अशीं मौल्यवान् पुस्तकें हजारों सांपडतील. या दृष्टीनें पाहतां प्रचंड ग्रंथसंग्रहालयांच्या उपयुक्ततेपेक्षां निरुपयुक्तताच अधिक भासमान होते.

दुसऱ्याहि एका दृष्टीनें ग्रंथसंग्रहाविषयीं अनादर उत्पन्न होणें संभवनीय आहे. इतर गोष्टींप्रमाणें ग्रंथांतहि उत्तम, मध्यम व अधम ही वर्गवारी लागतेच. आणि कनिष्ठ दर्जाच्या ग्रंथांची वाढ रानवट झाडाप्रमाणें बेसुमार होणारी असल्यामुळें, अधम ग्रंथांच्या महापुरांतून उत्तम ग्रंथांचें रक्षण कसें होईल याविषयीं मनुष्यास एखादे वेळीं चिंता वाटल्यास नवल नाहीं. मनुष्यप्राणी हा जरी सृष्टींत सर्वोत्कृष्ट मानला तरी त्याची केवळ वृद्धीच होऊं लागली, व त्याबरोबर तितकाच क्षय नसला तर पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यास राहण्यास जागाच मिळणार नाहीं. म्हणून वेळोवेळीं दुष्काळ, रोगराई, लढाया वगैरे ज्या आपत्ति ईश्वर पाठवितो तीं सर्वच खरोखर संकटें नसून संकटरूपानें मनुष्यावर परमेश्वर तो एक उपकारच करितो असें समाधान मानण्याची एक वेदांतील रीत आहे. तोच न्याय ग्रंथांच्या वाढीस लाविला असतां अकल्पित रीतीनें मधूनमधून त्यांचा संहार होतो ही गोष्ट केवळ वावगीच आहे असें म्हणतां येणार नाहीं. खंडोगणती प्रजा होणाऱ्या दरिद्री आईबापांस आपलीं मुलें अधिक वाटलीं तरी त्यांचा संहार त्यांना करवणार नाहीं, त्याचप्रमाणें मिळेल तें पुस्तक जमविण्याची दीक्षा घेऊन ग्रंथसंग्रह करण्यास सिद्ध झालेल्या मनुष्यास आपल्या हातानें कोणत्याहि पुस्तकाचा नाश न करवला तरी, त्यांना सुखासनें पुरवितांना त्याच्या चेहऱ्यावर वीट आल्याची झांक दिसल्याशिवाय राहात नाहीं. पण त्याच्या हातून ग्रंथसंहाराचें जें काम होत नाहीं तें उंदीर, झुरळें व कसरी बऱ्यावाइटाचा विवेक न राखून नित्य: करीतच असतात. जोनाथन स्विफ्ट यानें ' बॅटल ऑफ दी बुक्स ' नांवाच्या आपल्या

विनोदी ग्रंथांत वर्णन केल्याप्रमाणें, नव्या व जुन्या ग्रंथांचीं नेहमीं युद्धें चाललेलीं असून त्यांत विस्मृतिरूप वज्रानें कित्येक नालायक ग्रंथांचा नाश नित्य होत असतो. शिवाय, मुसलमान सरदार उमरा यानें अलेक्झँड्रिया शहरीं चारशें सार्वजनिक स्नानगृहांमध्यें टॉलमी राजांचीं ग्रंथसंग्रहालयें जळणासारखीं वापरून सहा महिनेपर्यंत आपल्या सैन्यास नित्य आंघोळीस ऊन पाणी पुरवून दिवाळी केली, किंवा दुसऱ्या एका मोगल योद्धयानें एका प्रसिद्ध ग्रंथसंग्रहालयांतील पुस्तकें तबेल्यांतून पसरून आपल्या लढाऊ घोड्यांना सुखशय्या करविली, अशाहि अकल्पित गोष्टी ग्रंथसंग्रहालयांनीं होणारा भू-भार हरण करण्यास उपयोगी पडतात.

ग्रंथसंग्रहालयांच्या निंदकांना दुसरेहि कित्येक आक्षेप सकारण घेतां येण्यासारखे असतात. पुस्तकी ज्ञान म्हणजे खरें ज्ञान नव्हे व व्यवहारचातुर्य तर नव्हेंच नव्हे. एरवीं पढतमूर्ख हें नांव देऊन ज्या वर्गाचें वर्णन समर्थांनीं दासबोधांत केलें आहे, तो वर्ग कोठून आला ? " ना दे चित्ता शांती ऐसी विद्या काशाला, " या मराठी सुभाषितावरून, ग्रंथपरिशीलनाचा सुपरिणाम हटकून होतोच असें नाहीं, असें लोकमत पूर्वापार दिसतें. विद्या नसतांना ज्यांच्या अंगीं पिशाचवृत्ति असते ते विद्या शिकतील व त्यांच्या अंगीं विनय न येईल तर ते ब्रह्मसमंधासारखे जाज्वल्य व भयंकर होतील ! तसेंच, खऱ्या बहुश्रुतपणानें मनास जी शीतलता यावी ती नुसत्या पढिकपणानें येतेच असें नाहीं; व खऱ्या विद्वत्तेच्या अभावीं विद्वत्तेचा अहंकार मात्र उत्पन्न होतो. भाराभर पुस्तकें डोळ्यांसमोर असलीं म्हणजे हें वाचूं का तें वाचूं असें होऊन बुद्धि फाटते, अनिश्चितपणा वाढतो आणि वाचनाच्या अभावीं स्वयंभू बुद्धिमत्तेला एकाग्रतेची जोड मिळून जें काम मनुष्याच्या हातून एरवीं झालें असतें तेंहि कित्येक वेळां पढिक मनुष्याच्या हातून होत नाहीं. फाजील अभ्यासक्रमानें मनाला दुबळेपणा येतो याचें समर्पक उदाहरण प्राचीन ग्रीक लोकांनीं दाखवून दिलें आहे. विद्वत्ता आणि पारतंत्र्य यांचें विलक्षण साहचर्य ग्रीक लोकांइतकें दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांत आढळणें कठीण. पुस्तकें वाचून वाचून त्यांनीं आपलें स्वातंत्र्य गमाविलें; आणि ते जोंपर्यंत पुस्तकें वाचीत राहतील तोंपर्यंत ते असेंच पारतंत्र्य भोगतील असें पुष्कळांनीं

भाकीतहि केलें होतें ! गॉथ्स नांवाचे रानटी लढाऊ लोक ग्रीक लोकांना जिंकून अथेन्स शहरांत शिरले. तेव्हां त्या ठिकाणीं त्यांना प्रचंड ग्रंथ- संग्रहालयें आढळलीं. अर्थात् उमरा यानें अलेक्झँड्रिआ येथील ग्रंथ- संग्रहांची वाट लावली, तशीच अथेन्स येथील ग्रंथसंग्रहालयें जाळून उध्वस्त करण्याची ऊर्मि गॉथ्स लोकांच्या मनांत प्रथम आली. पण असें सांगतात कीं, त्यांच्यांतच एक शहाणा सरदार होता तो इतरांस म्हणाला, " छे ! हें ग्रंथभांडार जाळण्यांत तुमची मोठी चूक होईल. हे मिळमिळीत ग्रीक लोक आपले सुखानें ग्रंथवाचनांत गढून गेले आहेत तें काय वाईट ! ते बरे निरुपद्रवी आहेत. त्यांचीं हीं पुस्तकें जाळून त्यांच्या क्षात्रतेजावरची राख विनाकारण कां फुंकतां ? ते पुस्तकें वाचीत राहतील तोंपर्यंत त्यांजवर सुखानें राज्य तरी करितां येईल. त्यांच्या हातचीं पुस्तकें गेलीं म्हणजे त्यांचे रिकामे हात तरवारीकडे धांवतील हें तुम्हांस कसें कळत नाहीं ? "

वरील सर्व आक्षेप जमेस धरिले असतांहि ग्रंथवाचनापासून मनास जो आल्हाद होतो त्यास बाध येऊं शकत नाहीं. जगाच्या उत्पत्तीपासून आज- वर मनुष्यास खरें व निर्मळ सुख ग्रंथवाचनानेंच मिळालेलें आहे. इतर सुखांनीं भरलेला संसार सोडून संन्यास न घेणाऱ्या मनुष्यासहि, त्याचा जितका वेळ निर्विकार व एकाग्र अशा ग्रंथवाचनांत जातो तेवढ्या वेळेपुरता संन्याससुखाचा अनुभव त्याला संसारांतच मिळतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. उलट ज्याचा संसार दुःखाचा होण्याचें त्याच्या कपाळीं लिहिलें असेल त्यालाहि ग्रंथवाचनासारखी समाधानाची दुसरी जागा नाहीं. इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें आढळून येतात कीं, ज्यामध्यें केवळ विद्याव्यासंगाच्या सुखावर विद्याप्रिय अशा बंदिवानांनीं वर्षानुवर्षांचा बंदिवास सुखानें नसला तरी समाधानानें घालविला. गिबन यानें आपल्या इतिहासांत कॉर्डोव येथील खलिफाच्या वैभवाचें वर्णन करितांना याविषयीं एक फार मार्मिक उल्लेख केलेला आहे. या खलिफांपैकीं अबदुल रहिमान नांवाचा एक खलिफा होता. त्यानें ५० वर्षेंपर्यंत राज्यैश्वर्यांत उत्तमोत्तम गोष्टींचें सुख अनुभविलें होतें. या ऐश्वर्याची कल्पना येण्यास ' अरेबियन नाईट्स 'मधील वर्णनाची आठवण करावी एवढें सांगितलें असतां पुरें. हा खलिफा मेल्यावर

त्याच्या खासगी पेटीच्या कप्प्यांत एक कागद सांपडला. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, " सर्व सुखें माझ्यापुढें हात जोडून उभीं असतां राज्यैश्वर्यांत घालविलेल्या ५० वर्षांपैकीं मला खऱ्या सुखाचे दिवस किती गेले हें मीं मोजून पाहिले; पण ते फक्त १४ च भरले! व ज्या ज्या दिवशीं मी विद्यामृताचें पान केलें तेच हे १४ दिवस होत. "

तात्पर्य, जगाच्या सुखाला वैराग्याचें विरजण घालणारें आणि दुःखी रोगाला बरें करणारें औषध म्हटलें म्हणजे एक ग्रंथवाचन होय. कारण ग्रंथामध्यें अशीच कांहीं जादू भरलेली असते. ईश्वराच्या सर्वगुणसंपन्नतेचा पृथ्वीवरील खरा प्रतिनिधि झाला तर एक ग्रंथसंग्रहच होऊं शकेल, मनुष्य होऊं शकणार नाहीं! एखाद्या लहानशाच का होईना, ग्रंथसंग्रहालयामध्यें आपण बसलों असतां वर्तमान व भूत या दोन काळांतील अंतर तोडून टाकतां येतें; व गतकालीं होऊन गेलेल्या कोणत्याहि महानुभाव ज्ञात्या पुरुषाच्या आत्म्याशीं समरस होऊन त्याच्या सहवासांत व संभाषणांत काल घालवितां येतो. अगदीं बसल्या जागीं व न उठतां, वेदांतील ऋचा करितांना ऋषींनीं दिव्य दृष्टीनें जें पाहिलें, भारतादि ग्रंथ लिहितांना आद्य कवींना ज्या विचारांची स्फूर्ति झाली, वेदान्त भाष्य व रसभरित स्तोत्रें लिहितांना जे ओजस्वी उद्गार आद्य शंकराचार्यांच्या लेखणींतून बाहेर पडले, सॉक्रेटिसानें शिष्यांना पढवीत असतांना किंवा वितंडतेस प्रवृत्त झालेल्या वावदुकांशीं वाद करितांना जो निरुत्तर कोटिक्रम केला, सर्व समाजांत विचारक्रांति घडवून आणणाऱ्या ज्या सोप्या व गोड कहाण्या बुद्धानें मुमुक्षु जनांस सांगितल्या, ज्या वाक्पांडित्यानें डिमॉस्थेनिस व सिसरो यांनीं सभा हालविल्या आणि चालत्या राजसत्तेची उलथापालथ केली—या व अशा प्रकारच्या उदात्त गोष्टी आपल्या डोळ्यांपुढें हुकमी आणून ज्याच्या योगानें मनाला क्षणभर तरी उच्च भावनेंत गुरफटून ठेवितां येतें, त्या ग्रंथसंग्रहास परमेश्वराचा प्रतिनिधि म्हटलें असतां फारसें वावगें होणार नाहीं.

जशी भावना तसें फल देणारें ग्रंथाशिवाय दुसरें कोणीहि नाहीं. इतकें असूनहि तुम्ही त्यांना जसें वागवून घ्याल तसें वागण्याइतकी लीनता ग्रंथांच्या अंगीं असते हें वेगळेंच! अहर्निश अष्टौप्रहर तुमच्या सेवेला

अविश्रान्त सादर होणारा ग्रंथासारखा दुसरा सेवक तुम्हांला मिळणार नाहीं! तुम्हीं स्नेही या नात्यानें त्यांना जवळ ओढलें तर ते स्नेह्याप्रमाणें गोड वागतील व सर्वस्वीं निःस्पृह असाच सल्ला देतील. शिष्य या नात्यानें तुम्ही त्यांचा आदर केला तरी मानवी गुरूप्रमाणें ते तुम्हांस न शिणावितां व न सतावितां विद्या देतील. प्रतिपक्षी या नात्यानें तुम्ही त्यांशीं वाद आरंभिला तर तुमच्या जडबुद्धीवर आपली कानस घासून ती सतेज करण्यास किंवा युक्तिवादानें तुम्हांस निरुत्तर करून तुमचा गर्वपरिहार करण्यासहि त्यांची तयारी आहेच. तुमचें अज्ञान कितीहि ढोबळ असलें तरी ते तुम्हांला हंसून खिजवणार नाहींत, किंवा फजीत करून तुमचा पाणउताराहि करणार नाहींत! प्रत्येक मानवी गुरूंत आपल्या प्रिय शिष्यापासूनहि थोडीबहुत विद्या किंवा एखादी तरी गुरुकिल्ली लपवून ठेवण्याची खोड आढळेल. पण ग्रंथाइतका प्रांजळ व निष्कपटी गुरु दुसरा मिळणारच नाहीं. तुम्हीं त्यांजपासून शिकलां तर ते तुमच्या जवळ गुरुदक्षिणा मागणार नाहींत; तुम्ही त्यांजविषयीं गुणग्राहकता दाखविली नाहीं तर ते रंजीस येणार नाहींत; किंवा त्यांचे गुण शिकूनहि तुम्ही कृतघ्न बनलां तरी ते एका शब्दानें तुमची कागाळी करणार नाहींत. जगाच्या इतिहासांत आजवर धर्म, नीति व राजकारण या तिहींच्याहि कल्पनांत मतभेद माजलेला आढळून येतो. परंतु सर्व जगाचें मतैक्य एका बाबतींत आहे; व ती बाब म्हटली म्हणजे ग्रंथ, त्यांचें महत्त्व, व त्यांचा उपयोग हीं होत.

ग्रंथसंग्रहाची रचना कशी करावी, ते सर्वसाधारण असावे किंवा विशिष्ट भाषेचे अगर विषयांचे असावे, वगैरे गोष्टी महत्त्वाच्या आहेत; व यांचा विचार आधुनिक युरोपियन राष्ट्रांनीं जितक्या परमावधीस नेऊन पोहोंचविला आहे तितका तो पूर्वीं कधीं तरी पोहोंचला असेल किंवा नाहीं याची मात्र शंका वाटते. तथापि, ही बाब गौण असून ग्रंथसंग्रहाचा फायदा सर्वसाधारण जनतेस जितक्या सुलभ व बिनखर्ची रीतीनें देतां येईल तितका देण्याची तजवीज करणें ही गोष्ट मात्र अत्यंत महत्त्वाची असून ती जेणेंकरून साध्य होईल तें आज आमचें कर्तव्य असलें पाहिजे. इंग्लंडमध्यें ग्रंथसंग्रहालयें व वाचनालयें यांच्या द्वारानें ज्ञानप्रसार करणें हें विश्वविद्यालयाचें एक अंग

असेंच मानण्यांत येतें. दुर्दैवानें आमच्या इकडे इतर पुष्कळ गोष्टींप्रमाणें या बाबतींतल्या कर्तव्याची जाणीव विश्वविद्यालयास आलेली आहे असें दिसत नाहीं, पण जी गोष्ट विश्वविद्यालयें करीत नाहींत ती खासगी रीतीनें आमची आम्ही करावयास पाहिजे या दृष्टीनें श्री. सयाजीराव गायकवाड यांनीं जो उपक्रम केला आहे त्याचें आम्हांस महत्त्व वाटतें व महाराज सरकारांनीं घालून दिलेलें हें उदाहरण इतरत्र अगदींच फुकट जाणार नाहीं, अशीहि आम्ही आशा करतों.

• • •

## २ : काव्यदृष्टि

परवां माधवराव आळतेकर यांनीं 'कालिदासाची काव्यसृष्टि' या विषयावर व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं चर्चा केली ती ठीकच होती. तथापि विषयाच्या नांवावरून जी अपेक्षा उत्पन्न झाली ती परिपूर्ण झाली नाहीं असें कित्येक उपवक्त्यांनीं बोलून दाखविलें. याचें कारण या काव्य-सृष्टीच्या पर्यालोचनांत एक विशिष्ट व तीहि गौण दृष्टि ठेवण्यांत आली. काव्यें वाचतांना त्यांत हुडकून काढण्यासच कोणी बसेल तर ऐतिहासिक माहिती, सामाजिक स्थितीचें ज्ञान, धर्म व नीति यासंबंधीं कांहीं ध्येयें किंवा कांहीं सिद्धान्त, यांचे कण हातीं लागतील हें खरें, पण काव्यसृष्टीच्या अवलोकनांत काव्यदृष्टि हीच सर्वांत अधिक महत्त्वाची आहे. मुंबईस बॅकबेचा देखावा पाहण्यास जाणाराला तेथें उंसाच्या गंडेऱ्या विकत मिळतात ही तत्संबद्ध गोष्ट समजते. पण समुद्रशोभेचें वर्णन पुष्कळसें सांगितल्यावर मग गंडेऱ्यांची माहितीहि केव्हां सांगितली तर चालेल. एखाद्या प्रसिद्ध नटाचें वेषांतर पाहून आल्यावर त्याच्या नाट्यकौशल्याचें वर्णन हेंच मुख्य व त्याच्या वयाविषयीं अनुमान हें गौण ठरेल. काव्यसृष्टींत काव्यदृष्टीशिवाय प्रवेश करणें म्हणजे जेवावयास जाऊन तोंड विसरण्यासारखें आहे. गुजराथेंत गांव-जेवणास जाणाऱ्या पाहुण्यानें आपणाबरोबर आपल्या

घरचा पाट, पाणी, पापड, पत्रावळ हे घेऊन जावे व यजमानानें मुख्य पक्वान्न वाढावें अशी चाल आहे म्हणतात. पण पाहुणा आपले चार जिन्नस बरोबर नेतो व यजमान एकच देतो असें म्हटलें तरी मेजवानीच्या दृष्टीनें त्या एकाचीच किंमत त्या चारींहून अधिक ठरते. कवीच्या काव्यदृष्टीची किंमत, याच न्यायानें, वाचकानें बरोबर आणलेल्या इतर आगंतुक दृष्टी-पेक्षां अधिक आहे. स्वतः कवीला प्रवृत्त करणारी काव्यदृष्टीच वाचकानेंहि आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कवींनीं सहेतुक लिहिलेलीं काव्यें थोडीं असतात. पोप कवीचे डनशियड, बटलरचें ह्यूडिब्रास, वगैरे काव्यें बोलूनचालून विशिष्ट हेतूनें लिहिलेलीं होत. पण सामान्यतः कवि काव्य लिहितो तें अहेतुक, म्हणजे काव्यस्फूर्तीच्या समाधानाकरितांच लिहितो. एखादा चमत्कारिक प्रसंग किंवा सृष्टींतलें दृश्य किंवा मानवी स्वभावाचित्र यांजवर प्रतिभेची दृष्टि पडल्याबरोबर कवि स्वतः रंगून जातो व इतरांनाहि त्यांत आपणासारखेंच रंगविण्याकरितां तो काव्य लिहितो. वीज यदृच्छेनें कोठें कशी चमकेल याचा जसा नियम नाहीं तसाच काव्यप्रतिभेचा प्रकाश कशावर केव्हां पडेल याचाहि नियम नाहीं. तोंडांतली पाण्याची चूळ आपण जमिनीवर थुंकतों. तिनें एखादे वेळीं यदृच्छेनें एखाद्या उत्कृष्ट आकृतीची रूपरेखा स्पष्ट उमटते. पण फिरून मुद्दाम चूळ भरून तशीच थुंकून तीच आकृति कोणी उमटवूं म्हणेल तर तें होणार नाहीं. कवीची प्रतिभा ही डुकराच्या मुसंडीसारखी एकदां निघाली कीं सरळ जाते. ती वाटेंत कांहींहि आल्यानें थांबत नाहीं, किंवा वाट सोडून वितीवर असलेला पदार्थहि तिला दिसत नाहीं.

प्रतिभाविलासांत रंगण्याकरितां कवीनें लिहिलेल्या काव्यांत ध्येयासारख्या दिसणाऱ्या कांहीं भावना व समाजस्थितीचे किंवा ऐतिहासिक कांहीं उल्लेख येऊं शकतात. पण ते पुष्कळ वेळां इच्छित नसून वर्णनाच्या ओघांत अपरिहार्य असतात. अगदीं सद्यःस्थितीचें समाजचित्र दर्शविणारें ‘ शारदा ’, ‘ हाच मुलाचा बाप ’, असें एखादें नाटक कवि लिहील तर त्यांत तो सहेतुक समाजस्थिति वर्णन करील. पण भारत–रामायणकालीन विषयांवर काव्य नाटक लिहिणारा धड त्या काळची स्थिति बरोबर वर्णन करूं शकत

नाहीं, व स्वतः त्याच्या काळच्या लोकस्थितीचे जे उल्लेख त्याच्या लेखणींतून येतात ते त्याला लिहितांना टाळतां येत नाहींत म्हणूनच येतात. तत्त्वें, ध्येयें, समाजस्थिति या दृष्टीनें, तीन-चार हजार वर्षांपूर्वींचा शकुंतलेचा विषय घेऊन, पांचव्या–सहाव्या शतकांतल्या कालिदासानें लिहिलेलें नाटक विसाव्या शतकांतले वाचक आज आम्ही उकलीत असतां किती घोटाळे किंवा घेड-गुजरी प्रकार होतील हें कोणीं सांगावें ? द्रौपदी ही पांच पतींची स्त्री होती ही गोष्ट खरी; व तिजवरून पांडव हे मूळ तिबेटियन वंशांतले होते असें अनुमान काढतात. पण काव्यदृष्टीनें भारत लिहिणाऱ्या व्यासाला ही विशेष गोष्ट माहीत असली तरी काव्य रंगविण्याच्या कामीं तिचा त्याला कोठें विशेष उपयोग झाला नाहीं. या गोष्टीचें ज्ञान त्याच्या मनाला नुसतें स्पर्श करून गेलेलें आहे.

नैतिक ध्येयें व सिद्धान्त यांची गोष्ट तर अधिकच अवघड. सर्व गायन-ब्रह्माला मूलाधार जरी सप्तस्वर तरी त्यांचीं निरनिराळीं मिश्रणें व आलटापालटी यांनींच गाण्याला रंग येतो. शुद्ध नीतितत्त्वें हीं अशींच पांच-सात ठळक दिसतात, पण नुसत्या त्यांच्या शुद्ध स्वरूपानें जगाच्या व्यवहाराचें काम भागत नाहीं. सत्य, अहिंसा अशा तत्त्वांचा अर्थ परि-स्थितीनें इतका बदलूं शकतो कीं, परवां श्रीशंकराचार्यांनीं एका प्रवचनांत सिद्ध केल्याप्रमाणें दर्शनी असत्य हेंच केव्हां केव्हां वास्तविक सत्य ठरतें. औषधीप्रमाणें नीतितत्त्वाचा परिणाम किंवा श्रेय हें प्रमाण, परिस्थिति व अनुमान यांवरच मुख्यतः अवलंबून असतें. नीतीचा अर्थ सत्कर्मस्वीकार व असत्कर्माचा त्याग असें म्हटलें तरी, चांगलें व वाईट हें झालें तरी त्रैगुण्याच्या पाशांत सांपडलेला मनुष्य आपापल्या मनोधर्माप्रमाणेंच ठरविणार. स्वभावाच्या द्वारानेंच नीतितत्त्वांचा प्रकाश घ्यावयाचा असतो. वागणाराच्या गुणधर्माप्रमाणें पाहणाराचे व बरेवाईट म्हणणाराचे गुण-धर्महि नीतीचें स्वरूप बदलूं शकतात. भीष्माच्या सत्यप्रतिज्ञत्वाचें कौतुक सनातन होय. पण तीं पुराणपवित्र नांवें बदलून आजचीं राव-पंत-साहेब अशीं नांवें घालून, भीष्म व शंतनु यांचेंच कथानक घेऊन कोणी असेंहि नाटक रंगवील कीं, म्हातारपणीं फिरून लग्न करण्याची इच्छा झालेल्या

बापाची अखेर फजिती होते व सात्त्विक कपटाचरणानें मुलगा आपलेंच कार्य साधतो, आणि हेंच बरोबर झालें असें म्हणत प्रेक्षक घरोघर परत जातील. हुंड्याच्या चालीची निंदा करणाऱ्या वरेरकरांच्या नाटकांत बापाचें डबोलें चोरून आपल्या बायकोचा हुंडा भरून द्रव्यलोभी बापाला फजीत करणाऱ्या मुलाला कितीसे लोक वाईट म्हणतात? पण पितृभक्तीचीं हीं दोन चित्रें वेगळीं असतांहि काव्याच्या दृष्टीनें पितृभजक भीष्मचरित्रांतर्गत भारत जसें रंगलेलें आहे तसेंच पितृवंचक मुलाचें चरित्र दाखविणारें हें सामाजिक नाटकहि रंगलेलें आहे. व्यासांना सत्याचें महत्त्व माहीत असतांहि द्रोणवधापूर्वीं धर्माकडून झालेल्या असत्याचरणाचा कडक निषेध त्यांजकडून झालेला नाहीं. मोठ्या लोकांचा प्रमाद मोठा म्हणून त्यांना शिक्षा मोठी हीच गोष्ट जर खरी, तर या पापाबद्दल धर्माची नुसती करांगुलि गळून न पडतां त्याला देहान्त प्रायश्चित्त मिळावें असा आग्रह धरून एखादा कवि नाटक लिहील तर तेंहि रंगू शकेल.

द्रौपदी ही पतिव्रताहि आहे व तापट पाणीदार पत्नीहि आहे. तिनें आपल्या पतीच्या फाजील सात्त्विकपणाचा निषेध तीन-चार प्रकारांनीं केलेला निरनिराळ्या काव्यांत आढळतो. अशा ठिकाणीं, सतीहि पतीवर रागावली असलें तत्त्व नुसतें सांगण्यापेक्षां, पतिव्रता स्त्रीनें केलेला पतीचा निषेध काव्यदृष्टीनें कोणत्या कवीनें कसा खुलविला आहे हें पाहण्यांतच स्वारस्य आहे. हरिश्चंद्र व श्रियाळ—चांगुणा यांच्या चरित्रासंबंधानेंहि दुतर्फी, म्हणजे स्तुतीप्रमाणें निषेधपरहि, नाटकें लिहितां येण्यासारखीं आहेत. मात्र हीं पुराणप्रिय नांवें वगळून व्यावहारिक नांवें घेतलीं पाहिजेत. सांगण्याचा मुद्दा हा कीं, झोंपेंत दिलेलें वचन खरें करण्याच्या इरेस घालून, एखाद्याचें राज्य गिळंकृत करून, त्याचा छळ करण्यास कोणी दुष्ट मनुष्य तयार झाला, किंवा इच्छाभोजन माग असें म्हटल्याबरोबर तुझा मुलगाच मारून शिजवून खायला घाल अशी एखादी विपरीत मागणी कोणा अतिथीनें केली, तर त्याची इच्छा तृप्त न करतां त्याची फटफजिती करणें हेंच अधिक श्रेयस्कर कसें होईल हें, नांवें बदलून एखाद्या लाक्षणिक विनोदी नाटकांत वर्णितां येण्यासारखें आहे. कृष्णचरित्र जर काव्यांत वर्णन करावयाचें

तर, अंतिम न्यायाकरितां का होईना पण पदोपदीं केलेल्या कपटचारित्रांचेंच वर्णन करावें लागेल. पण साध्य चांगलें असलें तरी वाईट साधन उपयोगांत आणावें कीं नाहीं हा वादग्रस्त मुद्दा शिल्लकच उरतो; व कवि झाला म्हणून तो त्याचा अखेर निकाल लावूं शकत नाहीं. या सर्व उदाहरणांवरून हेंच दिसतें कीं, कवीचें खरें काम उत्कर्षाला पोंचलेल्या त्रिगुणात्मक स्वभावाचें रसपूर्ण व चमत्कृतिजनक वर्णन करणें हेंच मुख्यतः असून, त्याचा कलाविलास यांतच असतो. कलेच्या मागें जाऊन तिचा हेतु किंवा तिजवरून निघणारे पण वादग्रस्त अनेकतर्फी नैतिक सिद्धान्त किंवा ध्येयें हुडकीत बसण्यांत अर्थ नाहीं.

चित्रकला, शिल्पकला या कला म्हणूनच उपभोगण्याच्या असतात. त्यांतून तात्पर्यें काढीत बसणें चूक होईल. ताजमहालची इमारत बादशहानें आवडत्या राणीचें स्मारक या हेतूनें बांधली असेल. पण ताजमहालाची सुंदर आकृति अमुक प्रकारची योजण्यांत कसला नैतिक हेतु असणार ? सुंदर वस्तूंचें वर्णन सुंदर एवढें म्हणण्यानेंच संपतें. ती सुंदर कां व कशी हें सांगणें कठीण; निदान तें एखाद्या नैतिक सिद्धान्ताच्या आधारावरून सांगणें कठीण. भक्तिसाधनाचा हेतु मोक्ष असें म्हणतां येतें. पण मोक्षाचा हेतु मोक्षच. तसेंच कलारंजनाचा हेतु रंजनच, त्यापलीकडे जातां येत नाहीं. कलाविलास हा सविकल्प समाधीचा एक प्रकार असून त्या समाधीपर्यंत मजल गेली म्हणजे त्यापलीकडे जातां येत नाहीं. ‘ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ’— असेंच येथेंहि घडतें. कवीबरोबर आपणहि रंगण्याचा प्रयत्न करतों. समजा, द्रौपदीवस्त्रहरणाचें चित्र काढलेलें असतां चित्रकारानें दुःशासनाचा चेहरा पडका व नेभळट काढला तर दुःशासनाकडून होणारी वस्त्रहरणाची कृति आपण निंद्य मानीत असतांहि, चेहऱ्यांत यावी तितकी क्रूरता आली नाहीं म्हणून चित्रकाराला दोषच देऊं.

कालिदासाचीं काव्यें घेतलीं तर मेघदूतांत केवळ कल्पनाविलास आहे. त्यांत ध्येय किंवा नैतिक सिद्धान्त असा कांहीं नाहीं, ऋतुसंहाराची एकंदर भाषा पाहिली म्हणजे तींतून निघणारी परिस्थिति उपदेशिण्यासारखी नाहीं. तींत केवळ स्वैर वर्णन आहे. शाकुंतल, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र या

तीनहि नाटकांत हिंदुसमाजांतील बहुपत्नीकत्वाच्या चालीचा उल्लेख आहे; पण या चालींचें समर्थन करण्याचा किंवा उलट निषेधहि करण्याचा कालिदासाचा हेतु आहे असें म्हणवत नाहीं. दुष्यन्ताहून विक्रम व विक्रमाहून अग्निमित्र वाईट दाखविले आहेत. शाकुंतल हें प्रौढविवाहाचें मंडन करतें कीं खंडण करतें हें सांगणें कठीण. विक्रम राणीच्या प्रत्यक्ष पायां पडतो, व असाध्य रोग्याला वाटेल तें खाण्यास देण्याला सांगून वैद्य त्याला सोडून जातो तशी विक्रमाची राणी त्याला झिडकारून जाते. मालविकाग्निमित्रांत आधींच्या एक सोडून दोन राण्या आहेत. हीं सर्व नाटकें आनंदपर्यवसायीहि दाखविलीं आहेत. यावरून कालिदासाला या राजांचा निषेध अभिप्रेत नाहीं. वडील पत्नीनें पतीचें दुसरें लग्न आपण होऊन आनंदानें करवून द्यावें, किंवा पतीनें घरीं आणलेल्या सवतीस प्रेमानें वागवावें, ही गोष्ट फक्त हिंदु-समाजांत आढळणें शक्य आहे. खरेशास्त्री यांच्या अगदीं अलीकडच्या नाटकांतहि हा प्रकार निरपवादबुद्धीनें दाखविलेला आहे. पाश्चात्य रंगभूमीवर असलें नाटक पाहावयास सांपडणार नाहीं. पहिली बायको नवऱ्याचा किंवा दुसऱ्या बायकोचा खून करते असेंच कदाचित् पाहावयास सांपडेल. पण विशिष्ट सामाजिक चालींचा उल्लेख म्हणून कालिदासानें हा केलेला नाहीं. शाकुंतलांतील धीवर, ‘ जगांतील सर्व धंदे चांगले केले तर सारखेंच सन्मान्य होत; धंद्यानें माणुसकीला कमीपणा येत नाहीं, ’ असें म्हणतो. पण यावरून स्वतः कालिदास हा मनानें ‘ डेमोक्रॅट ’ होता असें अनुमान काढणें धाडसाचें होईल. याचें कारण हेंच कीं, कवि किंवा नाटककार हा शंकराचार्यांप्रमाणें वाटेल त्या भूमिकेंत ऐच्छिक परकायाप्रवेश करून तिचा उत्कर्षच रंगवितो. चांगली ती अतिशय चांगली दाखवितो, वाईट ती अतिशय वाईट दाखवितो; पण इतकें वैचित्र्य स्वेच्छेनें निर्माण करतो कीं, त्यांत त्याची स्वतःची आवडनिवड कळणें कठीण होतें. विचित्र स्वभावाचीं विचित्र चित्रें निर्माण करण्यांतच त्याचें मुख्य कलाकौशल्य आहे. तात्पर्य, त्रिगुणाचा विश्वप्रपंच अवघ्या बावन्न वर्णांच्या उलटापालटीनें बनलेल्या शब्दांत कवि वर्णन करूं शकतो, इतरांना तें साधत नाहीं, हेंच कवींचें वैशिष्ट्य. सात रंगांचीं शेंकडों मिश्रणें चितारी बनवितो, तीं आपल्या काव्यबुद्धि–बळावर. I mix my colours with brains ( मी

चित्रांच्या रंगांत माझा मेंदू कालवितों. ) हें एका मोठ्या चितार्‍याचें उत्तर प्रसिद्धच आहे.

शेक्स्‌पिअरचें उदाहरण घेतलें तरी हेंच दिसून येईल. त्यानेंहि शेंकडों भूमिका रंगविल्या आहेत. पण त्यांतून त्याला कोणती स्तुत्य व कोणती निंद्य वाटली हें सांगतां येणें कठीण. हॅम्लेट हा ज्ञानी मूर्ख, ऑथेल्लो हा शूर मूर्ख! गटे हा हॅम्लेटला उदार तरुणाचा उत्कृष्ट नमुना म्हणतो, पण दुसरे त्याला 'अति शहाणा बैल रिकामा' असें म्हणतात. ऑथेल्लोइतका भोळा माणूस काय कामाचा? पण दोघेहि वृत्तीनें खरे वीरच होत. दोन राजे, लिअर व मॅक्बेथ. एकाच्या दुःखाचें कारण लहरीपणा तर दुसर्‍याचें दुःखकारण महत्त्वाकांक्षा. दोन उमराव, एक सीझर व दुसरा कोरिओलेनेस. दोघेहि दुर्दम, पण एक अहंकारानें गेला व दुसरा जग तुच्छ मानण्यानें गेला. सिंबेलाईन हा प्रापंचिक सुखी; प्रास्पेरो हा तत्त्वज्ञानाच्या आनंदानें सुखी. दुष्टांच्या जोडींत आयागो हा प्रतिकारदुष्ट व तिसरा रिचर्ड हा उपजत-दुष्ट. शायलॉकला दुष्ट असें म्हणण्यांत येतें, पण त्याच्या भूमिकेचा अर्थ पुष्कळांनीं असा केला आहे कीं, खिस्ती लोकांनीं ज्यू लोकांचा जो अमानुष छळ केला त्यामुळें दुष्ट बनलेल्या ज्यूचें एक उदाहरण शायलॉक होय, व मर्चंट ऑफ व्हेनिस नाटकाला 'ए प्ली फॉर टॉलरेशन' असें नांव एकानें दिलें आहे. जॅक्विअस हा तत्त्वज्ञानी विदूषक, क्लाऊन हा आनंदी विदूषक व फॉलस्टाफ हा पाजी विदूषक—अशा तीन विनोदमूर्ति शेक्स्‌पिअरनें रंगविल्या आहेत. चाणाक्ष स्त्रियांपैकीं पोर्शिया ही शहाणी, रोझॅलिन्ड ही प्रेमळ व बिॲट्रिस ही अल्लड चिमखडा अशी दाखविली आहे. तसेंच दुःखी स्त्रियांत डेस्डेमोना ही पतिव्रता; ऑफेलिया ही भोळवट कुमारी दाखविली आहे.

तात्पर्य, या व इतर अनेक भूमिका लक्षांत घेतां वैचित्र्य रंगविणें हाच शेक्स्‌पिअरचा मुख्य व प्रत्यक्ष हेतु; ध्येय सांगणें हा हेतु नव्हे असें वाटतें. डॉ. जॉन्सन यानें तर असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, शेक्स्‌पिअर हा आपल्या नाटकांत भूमिकावर्णनाची सोय पाहतो, मग त्यानें सद्‌गुणांची गैरसोय झाली तरी चालेल. वाचकाचें रंजन झालें किंवा नाहीं हें तो पाहतो; तो

वाचनापासून काय बोध घेईल हें पाहात नाहीं. भाषणांत जेथें जेवढा संबद्ध युक्तिवाद होईल त्यांतून जेवढी नीति प्रगट होईल तेवढीच. पण कवि स्वतः होऊन सद्गुणी व दुर्गुणी पात्रांत सुखदुःखांची न्याय्य वांटणी करीत नाहीं. वाइटाला उघड वाईट किंवा चांगल्याला उघड चांगलें असेंहि त्यानें म्हटल्याचें दिसत नाहीं. भूमिकावर्णनाच्या भरांत जें ज्याला मिळेल तें मिळेल.

सामान्यतः चांगल्या ध्येयांची कल्पना सर्वांना सारखीच असते, पण तत्त्वज्ञानी ती स्वतंत्र रीतीनें सांगूं शकतो. पण समजून सांगणें व मनाला पटविणें या गोष्टींना काव्यदृष्टीच असली पाहिजे. ज्ञानाच्या चार प्रमाणांत उपमानप्रमाणाचा जितका उपयोग जगांत होतो तितका दुसरा कशाचा होत नाहीं. सर्व ज्ञानाचा उगम साधर्म्य किंवा वैधर्म्य यांच्या दर्शनापासून आहे. सर्व अलंकारशास्त्र साधर्म्य व वैधर्म्य या तत्त्वावरच रचलें आहे. जेथें गोष्ट समजून सांगावयाची तेथें अलंकाराच्या मदतीशिवाय कोणाचें पाऊलहि पुढें पडणार नाहीं. जेथें नुसतें शुद्ध तत्त्वज्ञान सांगावयाचें तेथेंहि काव्यबुद्धीचा आश्रय करावा लागतो; मग जेथें बोलून चालून कलाविलासाच्या दृष्टीनेंच कवि काव्य-नाटक लिहिण्यास बसला तेथें काव्यदृष्टि हीच मुख्य ठरेल यांत काय संशय? ज्ञानेश्वरींतील उपमा काढून टाकून बाकीचा नुसता ग्रंथ वाचला तर त्यांतील सत्य किंवा उपदेश आहे तोच उरेल; पण ज्ञानेश्वर देखील उपमा-दृष्टान्त देतात तेव्हां काव्यदृष्टीच पत्करून स्वतः रंगतात म्हणूनच दुसऱ्यास रंगवूं शकतात. अमृतानुभवांत तर उपमादृष्टान्ताविषयींचें हें विधान मनावर जास्त ठसतें. कारण त्यांतील विषय अति गहन व उपमा—दृष्टान्तांना क्षेत्र थोडें असतांहि मुख्य भर व स्वारस्य त्यांतच आढळेल.

कालिदासानें सर्व शास्त्रांतील हीं उपमानें घेऊन तीं आपल्या कामास लावलीं आहेत. प्रणव, प्राक्तन, स्वाहा, स्वधा, श्रुतिस्मृति, श्रद्धा, शब्दशक्ति, चतुर्थाग्नि, धर्मगति, उत्सर्ग—अपवाद वगैरे सर्व प्रकारच्या शास्त्रांतील उपमानें त्यानें घेतलीं; पण या ठिकाणीं त्यांना शास्त्राच्या दृष्टीनें महत्त्व नसून त्यांच्या समर्पकतेमुळें कालिदासाच्या काव्यदृष्टीलाच महत्त्व अधिक. श्रीमान्

यजमानाच्या देवडीवरच्या सशस्त्र अरबांनीं चोर पळवून लावले तर यजमानानें स्वतःच्या मिशीवर पीळ काय म्हणून द्यावा ?

• • •

## ३ : हास्यरसाचा व्यावहारिक उपयोग

आतांपर्यंत झालेल्या विवेचनावरून व आमच्या एकंदर लिहिण्याच्या रोखावरून, आम्हांवर एक जबरदस्त आरोप येण्याचा संभव आहे, हें आम्ही पूर्णपणें जाणून आहों. तो आरोप असा कीं, हास्यरसास आम्ही वाजवीपेक्षां अधिक महत्त्व देतों. आमच्या आक्षेपकांच्या मतें आम्ही हास्यरसास मूर्धाभिषिक्त करून त्याला रस–वर्गांत राजपदावर स्थापिलें आहे; व असें झालें म्हणजे प्रौढ व गंभीर विचार, किंवा रसभरित सुंदर काव्यें यांस या दुनियेंत अनाथ व निराधार करून टाकल्यासारखें होणार ! कोणी म्हणतील कीं, हास्यरसास फाजिल महत्त्व देऊन आम्ही चेष्टेखोरपणाचा नवा बाजारच बसवूं पाहात आहों; व हा बाजार उघडल्यानें सभ्यपणास कायमचीच रजा मिळेल. कोणी विचारतील—“ कायहो, हें आयुष्य केवळ थट्टामस्करी करून घालविण्याकरितांच आम्हांस मिळालेलें आहे कीं काय, कीं तें आम्हीं हंसण्याखिदळण्यांतच घालवावें ? विनोदाची संवय लागली कीं आवेश, गांभीर्य, भक्ति, इत्यादि सद्‌गुणांस आम्हांस पारखें व्हावें लागणार; व ज्याच्या योगानें जगांत प्रगति संभवते ते हे वरील गुण नाहींसे झाल्यावर मग कसें चालणार ? ’ आक्षेप विचार करण्यासारखा आहे, तेव्हां त्याचा आपण शांतपणें विचार करूं.

‘ सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् ’—हें नीतिवचन कोणास संमत नाहीं ? खरें बोलावयाचें झालें तरी तें दुसऱ्यास रुचेल किंवा गोड लागेल अशाच रीतीनें बोलावें हें तर ठीकच आहे. परंतु वचन सत्य असून, रुचेल असें बोलून वरतीं जर तें हास्योत्पादकहि असेल तर दुधांत

साखर पडल्यासारखें होणार नाहीं काय ? परंतु हें तत्त्व जितकें सयुक्तिक भासतें तितकें तें व्यवहार्य झालेलें आढळून येत नाहीं, कारण जगांत हास्याविरुद्ध युक्तिवाद व आचरण करणारे लोक पुष्कळ आढळून येतात. प्रथमतः निरनिराळ्या मनुष्यव्यक्तींची मुखचर्या कशी असते हें साधारणतः सूक्ष्मदृष्टीनें पाहणारास असें दिसून येईल कीं, कित्येकांची चर्याच मुळीं हास्यरसास प्रतिकूल असते. अशा लोकांच्या नुसत्या चेहऱ्याकडेच पाहून खुशाल एकदम सांगावें कीं या लोकांचा व हंसण्याचा नेहमीं बारावा बृहस्पति आहे. आपल्यांत एक म्हणच अशी आहे कीं, "मिया रोते क्यों !" तर म्हणाले, " सूरत ही वैसी. " अंतरंग व मुखचर्या यांमध्यें कधीं काळीं मेळ किंवा मुकाबला पडणार नाहीं, हें संभवनीय आहे. तथापि, साधारण नियम असा आहे कीं, मनुष्याच्या स्वभावाच्या व अंतरंगांतील विचारसरणीच्या भांडाराची किल्ली मुखचर्येंत सांपडावयाचीच व या किल्लीच्या साहाय्यानें जगांतील हास्यशत्रु निमेशिमे तेव्हांच ओळखून काढितां येतात. अशी मुखचर्या असणारांची दुसरी एक मौज अशी आहे कीं, यदाकदाचित् हिंवाळ्यांत पालवी फुटल्याप्रमाणें त्यांच्या रुक्ष मनांत हास्यरसाची क्वचित् उत्पत्ति झालीच तर त्याच्या योगानें त्यांच्या चेहऱ्यावर मोहकता किंवा सौम्यता न येऊन उलट तो अधिकच भेसूर व कठोर असा वाटूं लागतो. अशा लोकांशीं गांठ पडणें म्हणजे एक प्रकारचें दुर्भाग्यच होय. दुसरे कित्येक लोक असे असतात कीं, ते चेहऱ्यावरून सौम्य व आनंदी दिसतात व केवळ विनोदाचे ते शत्रूच असतील असें सकृद्दर्शनीं वाटत नाहीं, परंतु हास्यविनोदाचें त्यांस वस्तुतः वावडें असतें. म्हणजे स्वतः ते बहुधा कधीं हास्यविनोदाच्या भानगडींत पडत नाहींत, इतकेंच नव्हे, तर यदाकदाचित् त्यांच्या कर्णपुटावर हास्याचा यत्किंचित् ध्वनि आला कीं, लहान मुलाच्या कानीं अवचित मेघगर्जना पडल्याप्रमाणें ते कावरेबावरे होतात. त्यांच्या अंतःकरणांतील सौजन्यक्षीरांत हा विनोद म्हणजे एखाद्या मिठाच्या खड्याप्रमाणें पडून तें नासून जाऊन त्याची कालवाकालव होते. चार चौघां मंडळींत हंसणें–खिदळणें झालेलें पाहून त्यांना पंचमहापातकांत भर पडल्यासारखी भीति वाटते; व जगांतील सर्व चातुर्य, सर्व विचारीपणा, सर्व तत्त्वज्ञान

हें ज्यावरील रेषा कधींहि पालटावयाची नाहीं अशा गंभीर व निश्चल चेहऱ्यांतच सांठविलें आहे, अशी त्यांची समजूत असते. यामुळे उत्तम प्रकारच्या हास्यरसाच्या सुखाची जोड करून देणारा एखादा विनोदाचा प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला तरी, शिकारीवर सोडलेल्या कुत्र्यांच्या कानांप्रमाणें त्यांची मनोवृत्ति ताठच राहते. दुसरे कित्येक असे असतात कीं, त्यांस करुणरसच हास्यरसाच्या ठिकाणीं वाटतो. अशा लोकांच्या अंगीं नुकतेंच वर वर्णन केलेल्या लोकांच्या अंगीं नसणारा एक गुण असतो. तो सहृदयता हा होय. म्हणजे हीं तिसऱ्या प्रतीचीं माणसें अंतःकरणानें प्रेमळ असतात, परंतु त्यांचें प्रेम सर्व करुणरसासच अर्पण केलेलें असतें. यांच्या समजुतीनें हें सर्व जग दुःखमयच असतें. करुणरसात्मक वस्तुघटना हा यांच्या मतें सृष्टि-नियम असून आनंदस्थानें हीं ते अपवादादाखल मानितात. हास्यविनोद करणें म्हणजे सृष्टिनियमांच्या विरुद्ध जाणें असा त्यांचा ग्रह झालेला असतो. कामधंद्यामध्यें विनोदास जागा मिळूं शकत नाहीं, व कामधंदा करणें हा तर जीविताचा मुख्य हेतु होय. यास्तव थट्टामस्करी करणें ती केवळ पोरांबाळांनीं करावी असें त्यांचें मत असतें. मन मोकळें करून हंसणें हें तर ते बहुधा अर्धवेड्या किंवा पूर्णवेड्या लोकांवरच सोंपवितात. थट्टा व अक्कल या दोन जणूं काय सख्ख्या बहिणी आहेत, व म्हणून त्या उभयतांशीं एकाच वेळीं विवाहसंबंध ठेवणें म्हणजे अनीतिमय होय असें त्यांस वाटतें. शहाणपणाचा एक वेळ स्वीकार केला म्हणजे मग त्यावरील प्रीति कायम राहावी याकरितां ते विनोदास मार्गांतून हांकून देतात व त्याचप्रमाणें विनोदावर प्रीति करणारा कोणी दिसल्यास त्यास शहाणपणाची ओळखहि नसलीच पाहिजे असा सिद्धान्त ते ठोकून देतात. तुम्ही वाटेल तें करा, त्यांच्या हातून विनोद म्हणून घडणेंच नाहीं. दुसरे कित्येक असा युक्तिवाद करितात कीं, हास्याची उत्पत्ति ज्या अर्थीं असंबद्धतेपासून आहे, व असंबद्धता हा गुण नसून तिरस्करणीय दोषच आहे, त्या अर्थीं विनोदास उत्तेजन देणें म्हणजे बुद्धिवैकल्यास उत्तेजन दिल्यासारखेंच होय.

आतां वर जे इतके विनोदशत्रूंचे निरनिराळे प्रकार सांगितले, त्यांपैकीं कांहीं कांहीं प्रकारच्या शत्रूंच्या नावडीची आवड करण्यास आम्ही

असमर्थ आहों हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. कारण ब्रह्मदेवच मुळीं ज्यावर कोपला त्यास मनुष्यानें साहाय्य कोठवर करावें ? ज्यास ईश्वरानें घ्राणेंद्रिय दिलें नाहीं त्याची जरी कींव आली तरी त्यास सुवासाचें सुख कोण कसें प्राप्त करून देईल ? ज्याप्रमाणें सुगंधाचें इंद्रिय नाक आहे, त्याचप्रमाणें विनोदाचें इंद्रिय मन आहे. विनोदग्रहणाची शक्ति ज्याची नाहींशी झाली असेल त्याच्यापुढें प्रत्यक्ष मूर्तिमंत विनोद जरी येऊन अवतरला तरी काय होणार ? परंतु जे दुसऱ्या एका प्रकारचे विनोदशत्रु वर सांगितले आहेत, म्हणजे ज्यांचें विनोदग्रहणाचें इंद्रिय शाबूत आहे, परंतु युक्तीच्या बाजूनें पाहतां ज्यास विनोद हा दोषमय दिसतो, अशांना मात्र थोडेंबहुत साहाय्य करितां येणें शक्य आहे. वर जी असंबद्धता म्हणून सांगितली ती वास्तविक नेहमीं दोषरूपच असते असें नाहीं. प्रचारांत 'असंबद्धता' या शब्दास थोडीशी गौणता आहे हें खरें. परंतु कोणत्याहि प्रकारचे अपवादास्पद विकार मनांत न येतां केवळ गमतीनें असंबद्धतेशीं व्यवहार करितां येणें शक्य आहे. एवढेंच नव्हे, तर आणखी असेंहि म्हणतां येईल कीं, असा व्यवहार करणें ही बुद्धीच्या एका भागाची किंवा प्रकारची अवश्य करमणूकच होय. जगांतील वस्तुजातांत जेथें असेल नसेल तेथून संबद्धता व संवादित्व हुडकून काढणें हें जसें बुद्धीस भूषणावह आहे, त्याचप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं असंबद्धता किंवा विसंवादित्व दिसेल, त्या त्या ठिकाणीं तें हुडकून काढणें हें बुद्धिशक्तीस तितकेंच भूषणावह आहे. संवादित्व असणें हा जसा वस्तुजाताचा गुण आहे, बुद्धीचा नाहीं, त्याचप्रमाणें विसंवादित्व हा फार झाला तर वस्तुजाताचा दोष आहे असें म्हणतां येईल. तो बुद्धीचा दोष नव्हे. ज्या ठिकाणीं हें विसंवादित्व किंवा ही असंबद्धता असूनहि तिचें अभिज्ञान करण्यानें शारीरिक किंवा मानसिक दुःख होत नाहीं; किंवा एखाद्या मनुष्याबद्दल तिटकारा उत्पन्न होत नाहीं, किंवा आपल्या नीतिबुद्धीस धक्का पोहोंचत नाहीं, अशा ठिकाणीं असंबद्धतेचें ज्ञान हें निःसंशय आनंददायक झालेंच पाहिजे. शाई हा पदार्थ स्वच्छ नाहीं हें खरें आहे; परंतु तिचा उपयोग लिहिण्याकडे करणें हें जसें दोषास्पद होत नाहीं, त्याचप्रमाणें असंबद्धता ही स्वतः सदोष असली तरी तिला व्यवहार्य करणें हेंहि तसेंच

दोषास्पद होऊं शकत नाहीं. म्हणजे असंबद्धतेच्या गुणदोषांचा विचार फक्त योजकाचा हेतु किंवा त्या योजनेपासून होणारे परिणाम हे लक्षांत घेऊनच करावयास पाहिजे.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, नेहमींच कोटया, थट्टामस्करी किंवा विनोद करण्याची संवय असणें हें चांगलें नव्हे. कारण तिच्या योगानें स्वभावास एकदेशीयता येते व एकदेशीयता हा दोष असून शिवाय असाहि आहे कीं, तो ज्या ज्या गुणांशीं संबद्ध असेल त्यांची माती करितो; व विनोद हा गुण झाला तरी तोहि या नियमास अनुसरूनच असणार. मनुष्यस्वभावांत भारदस्तपणा व आवेश हे दोन्हीहि मुळांशीं असले पाहिजेत ही गोष्ट निर्विवाद आहे. विनोदाचें बेसुमार सेवन केल्यानें या दोहोंस धक्का बसण्याचा संभव असतो. जी जी वस्तु म्हणून सांपडेल तिची चेष्टाच करीत गेलें तर सर्वच थट्टा होणार. विनोद असो वा नसो, आपलें मुख्य लक्ष जगांतील उदात्त व शुद्ध अशाच गोष्टीकडे रोखलेलें पाहिजे. तसेंच थट्टामस्करी केल्याबद्दल किंवा विनोदाबद्दल जरी आपणांस तिरस्कार वाटला नाहीं, तरी केवळ तिरस्कारार्ह अशाच कांहीं गोष्टी जगांत आहेत; त्यांच्या संबधानें मनांत नेहमीं तिरस्कारच बाळगला पाहिजे. जगांत असंबद्धतेचेहि प्रकार असे पुष्कळ आहेत कीं, ते पाहून हंसें कधींच येणार नाहीं, तर फक्त वाईटच वाटेल. अर्थात् अशा गोष्टीच्या संबंधांत विनोदास अवकाश नसून आवेश व भारदस्तपणा याच गुणांचा तेथें आश्रय करावा लागेल. जे लोक विनोदी म्हणून आपल्यास दिसतात त्यांपैकीं कित्येक असे असतात कीं, त्यांस जगांतील प्रत्येक गोष्ट तुच्छ वाटते व यांत काय आहे, त्यांत काय आहे, असें ते करीत सुटतात. अशा लोकांना जगांत वंद्य किंवा पवित्र असें कांहींच नसतें. परंतु अशा लोकांनीं केलेल्या विनोदास विनोद ही संज्ञाच देतां येत नाहीं. अशांच्या विनोदापासून एखाद्या रोगाप्रमाणें दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या दरबारांत ज्याप्रमाणें खुषमस्कऱ्या चतुर भाषण बोलत असतांहि मुख्य स्थानावर राजा आरूढ असतो व लोक इतर आपआपल्या दर्जाप्रमाणें अदबीनें बसलेले असतात; त्याचप्रमाणें विनोदाचें काम चालू असतांहि मनुष्याच्या मानसिक दरबारांत उदात्तपणा, विचारीपणा किंवा

सत्यप्रियता यांपैकीं एक ना एक तरी सद्‌गुण मनःप्रवृत्तीवर आपला अम्मल चालवीत असला पाहिजे. व्यवहारांत आढळून येणारे कित्येक विनोदी लोक स्वभावतः पाहिले तर केव्हां मूर्ख तर केव्हां दुष्ट, केव्हां हेवेखोर तर केव्हां पोकळडौली असे असतात. अशा लोकांकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, एका विनोदाच्या पायीं जर इतके वर सांगितलेले दुर्गुण आपल्यावर हक्क सांगूं लागतील तर तो विनोदच नको. कारण विनोद ही चीज जरी इष्ट व प्रिय आहे, तरी तिला किती किंमत द्यावी. याविषयीं कांहीं तरी सीमा असलीच पाहिजे. परंतु वरील सर्व कारणांमुळें जितकी सूट घालावयास पाहिजे तितकी घालूनहि शेवटीं विनोदाचें मूल्य म्हणून कांहीं थोडेंतरी शिल्लक राहतेंच. कारण ज्या कांहीं विवक्षित गोष्टींत विनोद आपल्यास नको आहे अशा गोष्टी एकंदरीनें थोड्या असून ज्या गोष्टींत आपल्यास विनोद हवा आहे अशा गोष्टी अधिक भरतील. या संबंधानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, विनोदाची गणमैत्री पुष्कळ गोष्टींशीं जुळते; जुळत नाहीं अशी फार थोड्यांशींच. सद्‌गुणाशीं विनोदाचा सहवास होईल तेथें तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें त्यास गोडी येईल किंवा स्फटिकावर सूर्यकिरण पडल्याप्रमाणें त्याच्या जोडीस उज्ज्वलता अगर देदीप्यता येईल. शहाणा तत्त्ववेत्ता, शूर वीर, सहृदय विद्वान्, व्यवहारचतुर पंडित, सदसद्विवेकी, इत्यादि प्रकारच्या लोकांबद्दल आपल्या मनामध्यें आदर तर असतोच; परंतु वरील लोकांपैकीं प्रत्येकाच्या अंगीं जर सुदैवानें विनोदीपणाचीहि भर पडलेली असली तर आमच्या आदरबुद्धींत एक प्रकारच्या गोड प्रेमाचीहि भर पडते. म्हणजे नुसती आदरबुद्धि असल्यानें जे लोक आपणांस केवळ परकें किंवा दूरतः सेव्य असे वाटतात, तेच वरील प्रेम उत्पन्न झालें असतां आपणांशीं एकजीव होऊन त्यांचे सद्‌गुण आपणांमध्यें संक्रमित होतात.

हास्य व विनोद यांच्या उपभोगाचा दोन तऱ्हांनीं विचार करतां येईल. एक समाजदृष्ट्या व दुसरा व्यक्तिदृष्ट्या. पैकीं समाजासंबंधानें पाहतां ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, समाज ही कोणी एक व्यक्ति असून तिला मन आहे असें नाहीं. परंतु ज्याप्रमाणें व्यक्तीच्या बुद्धीला व नैतिक कल्पनांना वाढ आहे, त्याचप्रमाणें एकंदर समाजाच्या बुद्धीला व नैतिक कल्पनांनाहि वाढ

असते. अर्थात् ज्यांच्या योगानें या दोनहि बाबतींत समाज अधिक सुशिक्षित होईल, त्या गोष्टींनीं समाजास फायदा होईल. हास्यविनोद वगैरेंचा उपयोग व्यक्तीपेक्षां कदाचित् समाजासच कांहीं बाबतींत अधिक आहे. एका व्यक्तीच्या मनाचा कल बहुधा एकाच विशिष्ट बाजूचा असतो, त्याला शिक्षण बहुधा एकाच दिशेचें असतें व त्याचे विचारहि बहुधा एकांगी असतात. समाजाची गोष्ट तशी नाहीं, म्हणजे समाजाची वाढ अनेक अंगांनीं व्हावयाची असते. म्हणून त्यास शिक्षणहि अनेक अंगांनीं मिळावें लागतें. हें अनेकांगी शिक्षण मिळण्यास समाजाच्या हास्यविनोदप्रियतेचा मोठाच उपयोग होतो. एखादें सुभाषित एखाद्या व्यक्तीनें एकस्थानेंच वाचलें किंवा ऐकिलें तर त्यापासून होणाऱ्या फायद्यापेक्षां तेंच दहा लोकांनीं एकत्र वाचलें किंवा ऐकिलें असतां जो फायदा यथाप्रमाण व्हावा त्याहूनहि तो अधिक होतो. व्यक्तीस नुसतें शिक्षण मिळतें; परंतु दहा व्यक्तींनीं मिळून तोच सुभाषितास्वाद घेतला तर प्रत्येक व्यक्तीस मिळावयाचें तें शिक्षण मिळून वरतीं दहा लोकांच्या मनाचा तात्पुरता कां होईना परंतु मिलाफ होऊन संघशक्तीहि उत्पन्न होते. म्हणून कोणतेंहि सुभाषित कसें काय आहे याचा विचार कर्तव्य असतां व्यक्तीच्या मनावर त्याचा काय परिणाम होईल हें पाहण्यापेक्षां समाजाच्या मनावर त्याचा काय परिणाम होईल हें आधीं पाहिलें पाहिजे. हास्यविनोदशीलता हा एक सामाजिक गुण आहे. संपर्कानें एकापासून दुसऱ्यापर्यंत व दुसऱ्यापासून तिसऱ्यापर्यंत असा त्याचा प्रसार होतो. सामाजिक हास्यविनोदापासून सामाजिक सुस्वभाव, सामाजिक सद्गुण व समाजहितदृष्टि यांच्या वृद्धीस मदत होते.

आतां हास्यविनोदापासून व्यक्तीला होणाऱ्या फायद्यांकडे वळूं. हास्यक्रियेचा शरीरावर वैद्यकदृष्ट्या फायदेशीर परिणाम होतो ही गोष्ट प्रथमतः ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. हास्याचा परिणाम शरीरप्रकृतीवर चांगला होतो. ज्याला वैद्यकाची माहिती नाहीं असा मनुष्यहि एकदम सांगूं शकेल कीं, हंसण्यापासून अंगांतील शिरांस एक प्रकारचा मोकळेपणा वाटतो. हास्य स्फुट नसतें त्या वेळीं श्वासोच्छ्वासाची क्रिया संथपणें चालत असते. तिच्यामध्यें हंसण्यानें एकदम व्यत्यय येतो हें खरें; परंतु त्या व्यत्ययाचा परिणाम श्वासोच्छ्वासाच्या इंद्रियांवर व शरीरांतील रक्तप्रवाहावर चांगला असाच होतो. हास्यामुळें वक्ष-

कपाटावर एकामागून एक असे अनेक आघात होतात. या प्रत्येक आघाताच्या वेळीं रक्तवाहिन्यांतील रक्त काळजांत जाण्यास प्रतिबंध होतो. बराच वेळ मनुष्य हंसत असला म्हणजे त्याचें डोकें व मान तांबूस होतात. याचें कारण वरील प्रतिबंधच होय. तसेंच हास्यक्रियेच्या मधून मधून जो खोल असा श्वासोच्छ्वास घेतला जातो, त्याच्या योगानें फुप्फुसांत हवा शिरून तीं फुगतात आणि त्याचा परिणाम असा होतो कीं, वाहिन्यांतील रक्त काळजा-कडे घालविलें जातें. काळजाकडे रक्त अधिक जोरानें जाणें व त्यास प्रतिबंध होणें या दोन क्रिया एकामागून एक आलटून पालटून अशा झाल्यानें रक्तांत प्राणवायूची मिसळ अधिक होते, व प्रवाहहि जोरानें चालतो. हे सर्व प्रत्यक्ष परिणाम होत. यांशिवाय दुसरे अप्रत्यक्ष परिणामहि होऊं शकतात. मोकळ्या मनानें मनुष्यास हंसें आलें म्हणजे रक्ताचा मेंदूवरील दाब कमी पडतो. रागावलेल्या मुलास कांहीं चेष्टा करून हंसवितात, याचें कारण तरी हेंच कीं, हंसें फुटल्याबरोबर मेंदूकडील रक्त मोकळें होऊन मनोवृत्ति फुलते. एकंदर शरीरप्रकृतीवर हास्याचे होणारे सुपरिणाम अर्थातच इतके त्वरित होऊं शकत नाहींत. परंतु ते होतात याबद्दल कोणास क्वचितच शंका असेल. इंग्रजींत Laugh and grow fat अशी एक म्हण आहे. तिजवरून इंग्रज लोकांत याबद्दल काय समजूत आहे ती व्यक्त होते.

(1) When man smiles and much more when he laughs he adds a fragment to his life. — (Sterne)

(2) Laughter makes good blood.—(Italian proverb)

ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्टॉटल याच्या वेळेपासून आजपर्यंत, हंसण्याच्या योगानें फुप्फुसें बळकट होतात व शरीरप्रकृतीच्या निरोगीपणास हास्य हें एक साधन आहे असें सर्व इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते म्हणत आले आहेत. रस्त्यांत गर्दी वगैरे बरीच जमून जाण्यायेण्यास प्रतिबंध झाला असतां पोलिसानें सोटा उगारून "चला, लोक, गर्दी मोडा" असें म्हटल्यानें ज्याप्रमाणें जमलेल्या समाजांत खळबळ सुरू होते, त्याचप्रमाणें मेंदूवर किंवा मनावर ताण पडला असला किंवा कांहीं काळजी वाटून उद्विग्नता आली असली तर खळखळून हंसें आलें म्हणजे एकदम मोकळेपणा वाटूं लागतो. शरीरावरहि तसाच परिणाम घडतो. कारण बहुधा मोकळ्या हंसण्यानें हातपाय वगैरे अंगाच्या

भागांसहि चलन मिळतें. मात्र ‘अति सर्वत्र वर्जयेत्,’ या म्हणीप्रमाणें हंसण्याच्या कामांतहि अतिशयत्वानें शरीरप्रकृतीवर वाईट परिणाम होण्याचा संभव असतो हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. औषधाप्रमाणें हास्याचीहि पथ्यकर व अपथ्यकर अशीं प्रमाणें असतात, व निरनिराळ्या प्रकृतींत हास्यरूपी औषध हें निरनिराळ्या प्रमाणांनींच विहित आहे.

हास्यविनोद ही देणगी दैविक आहे व तिचा उपयोग आध्यात्मिक किंवा पारमार्थिक रीतीनेंहि करितां येणें शक्य आहे. विनोद ही वस्तुस्थितीवर टीका करण्याची एक रीति आहे; व विनोद करणारा मनुष्य तात्त्विक विचारांत जितका मुरलेला असेल तितका त्याच्या विनोदाला म्हणजे टीकेला अधिक किंमत येईल. विनोदशीलता अंगीं येण्यास मन विकसित असावें लागतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. परंतु केवळ सांसारिक मनुष्याचा विनोद व तत्त्वज्ञाचा विनोद यांमध्यें अर्थातच पुष्कळ फरक पडेल. एकंदर जीविताविषयीं आपली कल्पना काय आहे, हें ठरलें म्हणजे विनोदाला जीवितक्रमामध्यें कोणतें स्थान देतां येईल हें आपणांस ठरवितां येतें. तत्त्वज्ञानानें मनुष्याला वस्तुमात्रांतील अविनाशी कोणचें हें ठरवितां येतें. वस्तुस्थितीचें स्वरूप व तिचा खरा अर्थ याचा विवेक करितां येतो; व याच कामांत हास्यविनोदाची मदत होऊं शकते. तत्त्वज्ञानी मनुष्य आपल्या तत्त्वज्ञानरूपी पंखाच्या साहाय्यानें भरारी मारून वर गेला म्हणजे मग लोकसमाजाचीं मतें व त्याचीं मतें यांमध्यें फरक पडतो. जग असावें कसें व असतें कसें, या दोन कल्पनांमधील अंतर त्याच्या दृष्टीनें लोकदृष्टीपेक्षां अधिकाधिक होत जातें; मोठ्या अशा मानलेल्या गोष्टी लहान दिसूं लागतात; कित्येक लहान अशा दिसणाऱ्या गोष्टींचें महत्त्व लोक मानितात त्यापेक्षां तें अधिक आहे असें वाटूं लागतें; जे पदार्थ म्हणून दिसतात त्या निव्वळ छाया आहेत, असें वाटतें; अर्थात् जनसमूहाची दृष्टि व तत्त्वज्ञाची दृष्टि यांमध्यें फरक पडतो. विषमता दाखविणारें हें तत्त्वज्ञान हास्यप्रवण असावें, असें सकृद्दर्शनीं म्हणावें लागतें; व तें खरेंहि आहे. आतां कांहीं कांहीं प्रकारच्या तत्त्वज्ञानपद्धतींत हास्यविनोदाला फाटा दिलेला असतो, व कांहीं तत्त्ववेत्ते मुळींच विनोदी नव्हते असेंहि आपणांस आढळून येतें. याचें कारण

मात्र असें कीं, तत्त्वज्ञानी बनल्यावरहि मनुष्यमात्रासंबंधानें जितकें प्रेम ठेवावयास पाहिजे तितकें त्या पद्धतींत व तत्त्ववेत्त्यांमध्यें राहिलेलें नव्हतें व मनुष्यजातिविषयगत प्रेम मनांत असल्याशिवाय विनोद होणें शक्य नाहीं इतकेंच काय तें. परंतु मनांत तत्त्वज्ञान एका बाजूनें शिरलें म्हणजे लगेच दुसऱ्या बाजूनें हास्यविनोदानें निघून गेलेंच पाहिजे असें नाहीं.

विनोद हें गंभीर व खेळकर अशा दोन परस्परविरुद्ध वृत्तींचें मिश्रण आहे; व संसाराची कोणतीहि उपपत्ति घेतली तरी ती समर्पक रीतीनें सर्वांशीं लागू पडत नाहीं. या गोष्टीमुळेंच तत्त्वज्ञानी हा विनोदी बनण्याचा संभव उत्पन्न होतो. आनंदवाद किंवा सदाशावाद ( Optimism ) घेतला तर त्याच्याशीं संसारांत प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या दुःखांचा मेळ चांगलासा घालतां येत नाहीं; म्हणजे ज्यास मनुष्यमात्राबद्दल खरी कळकळ व सहानुभूति आहे अशा मनुष्यास जर सांगितलें कीं, सकृद्दर्शनीं जीं दुःखें म्हणून दिसतात तीं दुःखें नसून जीविताच्या किंवा जगाच्या आनंदरूपी होणाऱ्या पर्यवसानाचीं साधनें आहेत तर तें त्यांस फारसें पटावयाचें नाहीं. परंतु अशा रीतीनें आनंदवाद किंवा सदाशावाद ज्यास सर्वांशीं संमत नाहीं असा मनुष्य जर विनोदी असेल तर तो निराशावादी किंवा दुःखवादी—( Pessimist ) हि बनणार नाहीं. फक्त संसार हा दैवाचा मनुष्यांशीं एक प्रकारचा खेळ आहे असा विचार त्याच्या मनांत येईल; व तसें झालें म्हणजे अर्थातच गंभीर व गमतीच्या अशा विचारांचें मिश्रण होऊन त्यास विनोदप्रतीति होईल व हंसू येईल. त्याला स्वस्वरूपाच्या अज्ञेयत्वाबद्दल निव्वळ खेद न वाटतां तो आपल्याशीं बहुधा असें म्हणेल कीं, " हें सर्व गौडबंगाल दिसतें. कोणाचीहि उपपत्ति घेतली तरी ती पुरत नाहीं व सर्वांशीं लागू पडत नाहीं. तेव्हां जाईना का ? उगाच उपपत्ति रचीत बसविण्याचे श्रम कशाला घ्या ? आहे या स्थितीचें मनन केलें म्हणजे गम्मत व हास्यानंद होतो तेवढा आपला खरा."

आध्यात्मिक किंवा पारमार्थिक विचार व विनोद यांचा वरीलप्रमाणें संबंध आहे. परंतु तोहि बाजूस ठेवून आपण विचार करूं लागलों तरी जगांतील नीति वाढविण्यास विनोदाचा अप्रत्यक्षरीत्या उपयोग होतो, हें सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास कळून येईल. अनीतीचें आविष्करण करण्यास

विनोदासारखें दुसरें कोणतेंच साधन समर्थ नाहीं. अनीतीची निंदा केवळ रागानें केली असतां ती उलटून एखाद्या बेफाम घोड्याप्रमाणें उपायी येण्याचा संभव असतो. परंतु विनोदाच्या मऊ अशा शकालेनें अनीतीच्या सदोष दृष्टींत अंजन फिरलें असतां ती हळू हळू निवळूं लागते. खुद्द विनोदी स्वभावाला तुम्ही सद्‌गुणांच्या यादींत घाला किंवा न घाला, परंतु त्याच्या हातून जो नैतिक उपयोग होतो, त्याबद्दल वाद नाहीं. विनोदाला सद्‌गुण म्हणण्यासंबंधानेंहि कांहीं हरकत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. ज्याच्यापासून मनुष्याला स्वतःइतकें सुख होण्याचा संभव आहे व ज्याच्या हातून दुसऱ्याची इतकी सुधारणा होणें शक्य आहे, त्यास सद्‌गुण कां म्हणूं नये हें आम्हांस कळत नाहीं. मनुष्याच्या मनांत पापबुद्धि किंवा कित्येक दुष्ट व निंद्य विचार असूनहि त्याला एक प्रकारचें हंसूं येईल हें मागें एका ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. परंतु अशा प्रकारचें दोषी हास्य वगळलें असतां इतर प्रकारचें म्हणजे निर्दोष हास्य ज्यांस येतें ते खरोखर धन्य होत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, ज्या मनुष्यास आयुष्यांत एकदां तरी खळखळून व मनसोक्त हंसूं आलें असेल तो मनुष्य अगदीं टाकाऊ असणें कधींहि शक्य नाहीं.

" No man who has once wholly and heartily laughed can be altogether irreclaimably bad. In cheerful souls there is no evil. "

— *Carlyle.*

त्याच्यांत कांहींना कांहीं तरी चांगले गुण असणें शक्य आहे. निदान इतकें तरी कबूल करावें लागेल कीं, विनोदास सद्‌गुण म्हटलें किंवा न म्हटलें तरी तो असल्याशिवाय कोणताहि मनुष्य, मग तो इतर रीतीनें कितीहि सद्‌गुणी असो, पूर्णतेस पोंचला असें म्हणतां यावयाचें नाहीं. सद्‌गुणांस सुस्वभावाची जोड असल्यावांचून चालावयाचें नाहीं व विनोदशीलता हा सुस्वभावाचा सर्वांत मुख्य घटक आहे. कारणाशिवाय दुसऱ्यास न दुखविणें, त्यास खूष ठेवण्याचा योग्य प्रयत्न करणें व त्याजविषयीं एक तऱ्हेचा कृपाळूपणा मनांत

वागविणें, या आपल्या स्वभावगुणांनीं विनोदी मनुष्य स्वतःच्या व दुसऱ्याच्या सुखास व आनंदास कारणीभूत होतो. मनुष्यकृत दुःखांधःकार घालविण्यास मनुष्यकृत विनोदासारखें दुसरें कोणतेंहि तेज प्रभावी होऊं शकत नाहीं. कोट्या करणारा मनुष्य हा मनुष्यजातीचा एक श्रेष्ठ उपकारकर्ता आहे असें मानावें लागतें. शुद्ध भावानें केलेला विनोद हा एक प्रकारचा स्निग्ध असा गिलावा आहे. त्याच्या योगानें स्नेह्यांतील स्नेह आणि मानवी कुटुंबांतील मनुष्यांचें परस्पर प्रेम हें बळकट होतें. केवळ एकमेकांबद्दल आदर बाळगणाऱ्या स्नेह्यांचा स्नेह, आदर असूनहि ज्यामध्यें विनोदशीलता आहे अशा स्नेह्यांमधील स्नेहापेक्षां कमी रम्य, कमी सुखकर व कमी टिकाऊ असतो. त्याचप्रमाणें असें एखादें कुटुंब घ्या कीं ज्यांतील माणसें आपापल्या नात्याचे संबंध मनांत आणून परस्परांशीं वागतात; व दुसरें एक कुटुंब असें घ्या कीं त्यांतील मनुष्य हा नात्याचा संबंध न विसरतां मित्रत्वाच्या नात्यानें हंसूनखेळून व्यवहार करितात–या दोन कुटुंबांपैकीं अधिक सुखप्राप्ति कोणाला बरें होईल? कित्येक कुटुंबांत मुलग्यास मुलें झालीं तरी तो आपल्या बापापुढें उभाहि राहात नाहीं, किंवा वानप्रस्थाश्रमास योग्य झालेल्या नवराबायकोचें मनोगत दिवसां परस्परांस कळावयाचें झालें, तर त्यांना कोर्टातल्याप्रमाणें एखादा दुभाष्या लागतो; व यांतच काय तें खरें बालबोध वळण आहे अशा समजुतीनें आपल्या घरच्या या फाजील मर्यादेचा अभिमान बाळगणारीं व विनोदशत्रु अशीं कित्येक कुटुंबें अद्यापिहि आढळून येतात. याच्या उलट समजा कीं एखाद्या कुटुंबांत भाऊभाऊ, नवराबायको, आईबाप व मुलें, हीं सर्व परस्पर मिळून मिसळून नेहमीं बोलतात, चालतात, बसतात, उठतात; जो तो आपाल्या बुद्धिशक्तीप्रमाणें युक्तिवाद, कोटया व विनोद करितो व दुसरा–मग तो लहान असो किंवा वडीलधारा असो–आपल्या बुद्धिशक्तीप्रमाणें त्या युक्तिवादास, त्या कोटयांस व त्या विनोदास संवादी असें प्रत्युत्तर देतो; व सर्वजण मिळून सर्वजणांची हास्यविनोदद्वारें करमणूक करितात; अशी स्थिति असेल तर त्या कुटुंबांत पृथ्वीवरच स्वर्गसुखाचा अवतार झाला आहे असें मानण्यास काय हरकत आहे? 'A good laugh is sunrise in a house' असें आंग्लकवि टेनिसन यानें म्हटलें आहे व तें अगदीं

यथार्थ आहे. शिक्षणशालांचीहि अशीच गोष्ट आहे. शिक्षक व छात्रगण यांनीं मिळून विनोद केला म्हणजे गुरुशिष्यांच्या नात्यास रजाच मिळाली असें मानण्याचें कारण नाहीं. एवढेंच नव्हे तर जो गुरु विद्वान् असून विनोदीहि असतो, तोच शिष्यवर्गास विशेष प्रिय व मान्य होतो.

• • •

## ४ : तोतयाचें बंड

### अंक ३ रा–प्रवेश २ रा

( **स्थळ**–पार्वतीबाईंचा दिवाणखाना. पार्वतीबाई बसल्या आहेत; जवळ विठाई पाय चेपते आहे. )

**पार्वतीबाई**:—जो जो ऐकावा तो मेला चमत्कारच. हैबती तुझ्यापुढं येऊन उभा राहिला म्हणतेस ?

**विठाई**:—होय बाईसाहेब. तेव्हां एकदम माझं भान ठिकाणावरनं गेलं. मी बेशुद्ध पडलें. लोक गोळा झाले शेजारचे. त्यांनीं मला सावध केलं आणि मग पाहतात तों कुठंच कुणी नाहीं. मला वाटलं लोकांना भिऊन कुठं तरी निघून जाणं झालं असेल. नाहीं तर भुताटकी म्हणायची !

**पार्वती०**:—होय विठाई, हे दिवसच असे आहेत. मनुष्याला देवानं आयुष्य दिलं तरी तें पुरं भोगायला लोकांना भ्यावं लागतं. त्यांना चमत्कारिक वाटेल तर जिवंत राहतांसुद्धां कामा नये कुणाला.

**विठाई**:—म्हणूनच मीं मनांत म्हटलं कीं लोकांना भिऊन जाणं झालं असेल त्या दिवशीं; पण दुसरे दिवशीं तरी रात्रींच्या वेळीं आदल्या दिवसासारखं यायचं होईल. दुसऱ्या दिवशीं कांहीं मी भ्यालें नसतें आणि ओरडलें नसतें. इतकंच काय पण मी दार उघडं ठेवून वाट बघत बसलें होतें तीन प्रहर रात्रपर्यंत; पण आदल्या दिवशीं दिसला तेवढाच चमत्कार !

तेव्हांपासून मन कसं उदास झालं आहे. कांहीं सुचत नाहीं. आणि मेलं डोळ्याचं पाणीहि खळत नाहीं. ( रडण्याचे खोटे हुंदके देते. )

**पार्वती० :**—उगी, विठे, उगी ! अग, पाणी न खळून कसं होईल ? आणि न खळायला पाणी तरी इतकं येणार कुठलं रात्रंदिवस डोळ्यांना ? दुःखाला झालं तरी कांहीं सीमा आहे ना ? माझंच पाहतीस ना तूं ? रडलें रडलें, दहा वर्षं रडलें. पण झाला का कांहीं उपयोग ? आतां काय मन झालं आहे घट्ट ! पण विठे, मला वाटतं ही कांहीं भुताटकी नव्हे खास. हैबती खरोखरच जिवंत होऊन आला असला पाहिजे. दक्षिणेंत जिवंत परत आल्यावर त्यानं पाहिलं असेल कीं, ज्याच्या त्याच्यावर तोतयाचा आळ येतो. मग कशाला व्हा प्रगट ! कैदेंतच पडायला कीं नाहीं ? पण त्यानं जेव्हां ऐकलं कीं इकडची सुटका रत्नागिरीस होऊन सगळ्यांनीं ओळखलं—बाकी म्हणून कांहीं राहिली नाहीं—तेव्हां त्यानं केला असेल धीर पुण्यांत येण्याचा. मी सांगतें विठे, तुझा नवरा पुन्हां लवकरच येऊन भेटेल; आणि हे तुझ्यावर झाले तरी रामचंद्र नाईकांचेच उपकार बरं !

( रामचंद्र नाईक प्रवेश करतो. )

नाईक, या. तुम्हांला शंभर वर्षं आयुष्य आहे !

**राम० :**—( नमस्कार करून दूर बसतो. ) नको नको, सरकार. तेवढं शंभर वर्षं आयुष्य नको अशी परमेश्वराजवळ दोन्ही हात कोंपरापासून जोडून प्रार्थना आहे.

**पार्वती० :**—( हंसून ) कां नाईक, नको कां म्हणतां ? ज्याला हवं त्याला आयुष्य मिळत नाहीं आणि ज्याला मिळतं ते नको म्हणतात ! हा काय बरं चमत्कार ?

**राम० :**—बाईसाहेब, आयुष्य मिळतं, पण तें सुखाचं मिळत नाहीं ! म्हणून नकोसं वाटतं. एरवीं अमर व्हावं अशी कुणाला नाहीं इच्छा होणार ? भरभक्कम आयुष्य घेऊन पुष्कळ दिवस जगलं तर धिंडवडेच करून घ्यायचे कीं नाहीं !

**पार्वती० :**—नाईक, तुम्ही म्हणतां तसं माझं मात्र झालं आहे खरं. तिकडचंहि तसंच झालं. पानपताहून जिवंत राहून येणं होतं काय आणि

बारा वर्षं घरच्या घरीं कैदेंत जातात काय ? आतां पेशव्यांच्या घराण्यांत कैद अशी थोड्यांनाच चुकली म्हणा. पण कैदकैदेंत झालं तरी अंतर असतं; पण म्हणतें आमचं एक मेलं कसंहि असो, पण तुम्हांला आयुष्याची खंती कां यावी ?

**राम० :**—खंती इतक्याचकरतां, कीं जें होऊं नये तें हातून घडलं. धन्याला कैदेंत ठेवणाऱ्या माझे प्राण दोन वर्षांपूर्वींच जाते तर असलं घोर पातक तरी हातून घडलं नसतं !

**पार्वती० :**—नाईक, असं कां बरं म्हणतां ? तुमच्या पापाची तुमच्याच हातून निष्कृति झाल्यावर तुम्हांला वाईट वाटण्याचं खरोखर कारण उरलं नाहीं. शिवाय असं पाहा, कीं तुमच्यासारखा निश्चयी, स्वामिभक्त किल्लेदार रत्नागिरीला नसता तर आज इतक्या वर्षांनीं तरी स्वारीच्या पायांतील बिडी निघाली तीहि निघाली नसती ! तुमचे माझ्यावर किती उपकार झाले म्हणून सांगूं ! तुम्ही मला चुडेदान दिलंत. मी खरोखर तुमच्या पायांवर डोईच ठेविली पाहिजे !

( नाईकांच्या पायां पडावयास जाते. तो उठून छेः छेः
बाईसाहेब, हें काय हें ? असें म्हणतो. इतक्यांत
नाना फडणीस प्रवेश करितो. )

**नाना० :**—कोण ? नाईक ? (रामचंद्र नाईक नमस्कार करतो; तो न घेतां नाना पाठ फिरवितो.) तुम्ही पुण्यास केव्हां आलां ? तुम्हांला रत्नागिरी सोडायला परवानगी कोणीं दिली ?

**पार्वती० :**—नाना, तुम्ही केव्हां आलां ? तुम्ही उभे कां ? बसा.

( सर्व बसतात. )

**नाना० :**—आतां इतक्यांतच आलों. तब्बेत आज विशेष बिघडली आहे वाटतं ! मला कळतं तर मी आधींच आलों असतों याहून.

**पार्वती० :**—तुम्ही आलां असतां, पण म्हटलं थोड्या वेळांत तुम्हांला पुष्कळ काम करून गडावर परत जायचं. गर्दींत असणार ! म्हणून नाहीं आधीं बोलावलं, इतकंच. कुटुंबाचं क्रियाकर्मांतर काल्च संपलं ना ?

नाना० :—( निःश्वास टाकून ) होय. तिचा माझा ऋणानुबंध काल सुटला खरा !

पार्वती०:—नाना, तुमच्या कुटुंबासारखा स्वभाव मिळायचा नाहीं ! तुम्हांला मोठं दुःख झालं, नाना ! त्या इथं असतांना त्यांची मला मोठी करमणूक होती. तुमचं धोरण संभाळून त्यांतल्यात्यांत माझ्याशीं त्या मोठ्या मोकळ्या मनानं वागत.

नाना० :—( स्वगत ) या बोलण्यांत किती नाजूक खोंच आहे, हें ज्याचं त्यालाच कळणार. ( उघड ) ती मोकळ्या मनाची तर खरीच, पण तिनें संभाळण्यासारखं असं माझं धोरण म्हणून मात्र कांहींच नव्हतं. मीहि बाईसाहेबांशीं होईल तितक्या मोकळ्या मनानंच वागत असतों. मग बाई-साहेबांना कसंहि वाटो !

पार्वती० :--मला काय वाटायचं नाना ? मी का म्हणतें आहें तुम्ही मोकळ्या मनानं वागत नाहीं म्हणून ? पण त्यांतल्यात्यांत इतकंच कीं, पुरुषांना मोकळेपणानं वागतांना राज्यकारभाराचीं अनेक अडचणींचीं धोरणं संभाळून वागावं लागतं ! बायकांना ती राजकारणाची उपाधि कांहींच मागं नसते. म्हणून त्यांना भाबडेपणानं वागतां येतं. त्यांचा मोकळेपणा दिसायला अधिक असला म्हणून त्यांत त्यांचा म्हणजे कांहीं विशेष गुण आहे असें नाहीं हो मी म्हणत ! राजकारण कठीण आहे, हें आम्हां बायकांना झालं तरी कळत का नाहीं ?

नाना० :--( स्वगत ) आजचा रोख जरा वेगळाच दिसतो आहे; पण त्याला भितां कामा नये. ( उघड ) राजकारण कठीण असेल कदाचित्, पण ईश्वरकृपेनं राजकारणांत झालं तरी सत्याला सोडावं लागत नाहीं फारसं. खोटं कसं आणि किती टिकणार ?

पार्वती०:--बरोबरच आहे; खोटं कसं चालेल ! पण खरंसुद्धां सगळंच घेऊन चालत नाहीं हो ! सोन्याची झाली म्हणून सुरी कांहीं उरांत घालून घेतां येत नाहीं. तसंच खऱ्याचंहि आहे. खरं हें चांगलं, पण त्यानं इतर गोष्टींना बाध येत असेल तर तें दूरच ठेवलं पाहिजे !

**नाना०**:—तसं नव्हे बाईसाहेब. खरं काय हें निश्चित झाल्यावर मग पंचाईत नसते कसली ! पण पुष्कळ वेळां होतं काय, कीं खरं काय हेंच ठरत नाहीं. जें आपल्या मनाला बरं तेंच खरं म्हणून घेऊन चालायची मनुष्याची प्रवृत्ति असते. आणि विशेषतः कांहीं कांहीं प्रकारच्या दुःखांत तर इष्टचिंतन इतकं मनाशीं जखडून बसतं, कीं खऱ्याखोट्याचा विवेक करण्याची बुद्धि असली तरी ती नष्ट होऊन जाते. आणि जें मनाला बरं, तेंच जगांतलं खरं असं वाटूं लागतं. आतां विवेक-भ्रष्टतेची ही स्थिति खाजगी व्यवहारांतसुद्धां बाधक होते, तर ती राजकारणांत विशेष बाधक होईल यांत काय नवल ? स्त्रिया अधिक प्रेमळ, मोकळ्या मनाच्या दिसल्या तर हा त्यांचा गुण नाहीं म्हणून आपण आतांच म्हणालां तेंच थोडें बदलून मी म्हणतों कीं, पुरुष जरी केव्हां केव्हां निष्ठुर किंवा मुग्ध स्वभावाचे दिसले तरी हा व्यक्तिशः त्यांचा दोष नसतो.

**राम०**:—( स्वगत ) ही मध्यें बोलण्याची संधि बरी दिसते. केव्हां तरी एकदां चकमक झडायची खरी. मग पार्वतीबाईसाहेबांच्या समोर झडलेलीच बरी. मला त्यांच्याकडून थोडा पाठिंबा तरी मिळेल. ( उघड ) आपणां उभयतांच्या बोलण्यांत मी बोलावं असं नाहीं. पण एक शब्द बोलायची परवानगी घेतोंच. मनाला भासतं तेंच डोळ्यांना खरं दिसतं हें तर ठीकच आहे. पण दुसऱ्याच्या का होईना, पण डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या खऱ्याचा संशय घ्यायला तरी कांहीं सीमा आहेच कीं नाहीं ?

**नाना०**:—नाईक, तुम्ही मध्यें बोललां नव्हतां तेंच बरं. पण आतां बोललांत तेंच पुरतं बोला ! कोणतं खरं ? आणि त्याचा संशय घेण्याची सीमा कोणीं पोंचविली ? मी आतां तुम्हांला उघडच विचारतों. तोतयाच्या पायांतल्या बिड्या काढून तुम्ही मात्र सत्याला जागलां आणि आम्हीं मात्र त्याला इतके दिवस कैदेंत ठेवून असत्याचरण केलं आणि बाईसाहेबांचं व्यर्थ वैर साधलं, असंच कीं नाहीं तुमचं म्हणणं ?

**राम०**:—नाहीं, मी तसं म्हणत नाहीं. पण आपलं सांगितलं ! आपण म्हणतां तसंच पूर्वीं माझंहि म्हणणं होतं खरं. पण शेंकडों लोकांनीं समक्ष येऊन आपली खात्री करून घेतली; अखेर निर्वाणीचे शब्द बोलून

भाऊसाहेबांनीं तुरुंगाच्या दगडावर डोकं फोडून घेण्याचा आणि किल्ल्यावरून समुद्रांत उडी टाकण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मग मीं मनाशीं निर्धार केला कीं हातून आपलीच काय गुन्हेगारी होईल ती होवो, पण सरकारस्वारीला यापुढं बंदिवासांत ठेवणं हें ईश्वराच्या घरीं पाप होईल. म्हणून मग आज्ञेचं उल्लंघन मोठ्या कष्टानं केलं !

**नाना** :—नाईक, तुम्हांला शरम नाहीं वाटत असलीं कांगावखोर मायावी भाषणं बोलायला ? तुम्ही भाऊसाहेबांना पानपतला जाण्याच्या आधीं पाहिलें होतें काय ?

**राम०** :—होय. पाहिलें होतें !

**नाना** :—मग तोतया प्रथम रत्नागिरीस तुमच्या कैदेंत आला तेव्हांच त्याला ओळखून तुम्हीं त्याच्या पायांतल्या बिड्या कां नाहीं काढल्या ?

**राम०** :—माझी एकदम खात्री होईना ! शिवाय सरकारचा हुकूम तोडायला एकदम मन घेईना !

**नाना** :—तोतयाला प्रथम पाहतांच तुमची खात्री झाली नाहीं, याचा अर्थ, हल्लीं खात्री झाली आहे ती लोकांच्या सांगण्यावरून असाच कीं नाहीं ? आणि पूर्वीं आमचा हुकूम तोडायला तुमची छाती होत नव्हती ती आतां झाली, याचा अर्थ, दुसऱ्या कोणाचं तरी तुम्हांला पाठबळ मिळालं आहे म्हणून, असाच कीं नाहीं ?

**पार्वती०** :—नाना, मला तुम्ही मनांत काय वाटेल तें समजा. पण तिकडच्या पायांतल्या बिड्या काढायला रामचंद्र नाईकांना माझं पाठबळ मिळालं असा जर तुमचा म्हणण्याचा रोख असेल तर तो मात्र बरोबर नाहीं, एवढंच मी सांगतें. मला तुमच्या राजकारणांत पडायचं नाहीं; आणि मला जर अशी ढवळाढवळ खरोखर करायचीच असती मनांतनं, तर मीं पूर्वींच नसती का केली ? आणि पुण्यांत या वाड्यांत तरी कां राहिलें असतें तुमच्या अशा नजरकैदेंत? आमच्या आनंदीबाईसारखं वागायचं मीं मनांत आणलं असतं तर मला वाड्यांतून बाहेर पडायला माझा कोण हात धरणार होतं ?

**नाना** :—बाईसाहेब ! नाईकांना आपलं पाठबळ मिळालं असं मी

मुळींच म्हणत नाहीं. त्यांना पाठबळ मिळालं आहे तें आमच्या शत्रूचं. हैदरखान, करवीरकर, मोरोबा आणि दादासाहेब इतक्यांच्या जोरावर जेव्हां दौलतगीरानं तळी उचलली, तेव्हां नाईकांना दयेचा पान्हा फुटला हें आपणहि लक्षांत घेतलं पाहिजे ! नाईकांनीं आरंभिलेला हा खेळ सर्व बंडाचा आहे ! दयाधर्माचं हें निव्वळ सोंग-ढोंग आहे. ( वळून ) किल्लेदार नेमतात ते हुकुमाची तामिली करायला नेमतात; दयाधर्माची नसती उठाठेव करायला नेमीत नाहींत. तोतया कांहीं आजकालचा कैदेंत नाहीं. आज बारा वर्षे कैदेंत आहे. या अवधींत या कृत्याच्या पापपुण्याचा भार ज्यांनीं आपल्या माथ्यावर वाहिला ते तो यापुढंहि वाहायला समर्थ आहेत, समजलां ? शेषाचा भार हलका करायला सरड्यानं धांवण्याचं कारण नाहीं. लांडे कारभार करून त्यांना मोठं प्रतिष्ठित नांव दिल्यानं गुन्हेगारी कमी होत नसते. उलट ती वाढते मात्र. समजलां नाईक ! तोतयाला मोकळा सोडून, कोंकणांत बंड उभारून आपण होऊन इकडं आल्यानं तुमच्या धाडसी सत्यप्रियतेचा पगडा माझ्यावर बसेल अशी जर तुमची समजूत असेल तर ती मात्र साफ चुकीची आहे. उंदीर सर्पाच्या बिळांत न पकडतां आपण होऊन गेला, म्हणून तो धर्मात्मा मानला जाऊन सुटत नसतो. पहा त्याची प्रचीति ! कोण आहे रे बाहेर ! चला, आंत या. पकडा या हरामखोराला ! आणि घाला याच्या हातापायांत बेड्या माझ्या देखत आत्तां ! ( शिपाई येतात व रामचंद्र नाईकास बिड्या घालतात ). ( पार्वतीबाईस उद्देशून ) बाईसाहेब, असले प्रकार आपल्या डोळ्यांपुढं व्हावे याबद्दल मला फार वाईट वाटतं; पण आपल्या समजुतीप्रमाणं मी खऱ्याखुऱ्या भाऊसाहेबांना बारा वर्षे कैदेंत ठेवलं त्या मानानं हा आपला उपमर्द म्हणजे कांहींच नाहीं ! मी आपल्याला निक्षून प्रतिज्ञेनें सांगतों कीं, लवकरच हे नाईक, त्यांची कारस्थानी बायको आणि त्यांचा आगलाव्या मुलगा यांचीं कृष्णकारस्थानं पत्त्या-मुद्द्यासुद्धां आपल्या नजरेला घालीन म्हणजे मग आत्तांच्या निष्ठुरतेचं आपणांला कांहींच वाटणार नाहीं. कोण आहे रे तिकडे ? जा; या नाईकांना घेऊन कोतवालाच्या स्वाधीन करा. त्याला म्हणावं यांना कैदेंत ठेवा; पण नीट खायला प्यायला द्या. म्हणावं त्याचे हाल करूं नका.

**राम०**:--ठीक आहे. पण अखेर सत्याचाच जय होईल हें लक्षांत ठेवा.

( शिपाई नाईकास घेऊन जातात. )

**नाना**:--बाईसाहेब, गोष्टी या थराला आल्या तेव्हां आज थोडंसं या बाबतींत आपल्याशीं बोलण्याचा मीं निश्चय केला आहे. आपली परवानगी असेल तर बोलतों.

**पार्वती०**:--नाना, खुशाल बोला! त्याला माझी परवानगी कशाला पाहिजे? आणि परवानगी देणारी मी कोण! माझ्या भेटीला आलेल्या नाईकांना खुद्द माझ्या दिवाणखान्यांत तुम्ही हातकड्या-पायकड्या-घातल्या, त्याला जर तुम्हांला माझी परवानगी लागली नाहीं, तर मला दोन अधिक उणीं उत्तरं तुमच्या मनांत बोलायचीं असलीं तर त्याला माझ्या परवानगीची वाट तुम्हांला थोडीच पाहावी लागणार आहे? बोला, खुशाल बोला! मी ऐकायला तयार आहे. मीं सगळ्या गोष्टींना मन कसं दगडासारखं घट्ट केलं आहे! माझ्या या हतभागी डोळ्यांनीं या शनिवारवाड्यांत कांहीं अनिष्ट पाहायचं बाकी ठेवलेलं नाहीं! नारायणाचा खून करून गारद्यांनीं त्याच्या प्रेताचे तुकडे, रस्त्यांत मेलेल्या बिनवारशी कुत्र्याप्रमाणं ओढीत आणून सदरेवर टाकले, आणि दादासाहेबांनीं त्याच सदरेवर गादीवर बसून नारायणाच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाळाला लावून घेतला हें ज्या डोळ्यांनीं पाहिलं, त्यांना रामचंद्र नाईकासारख्या नोकराला कैद केल्याचं पाहण्यांत काय विशेष आहे? बाकी माझ्यावरचा राग तुम्हीं त्यांच्यावर काढावा हें कांहीं बरं नाहीं.

**नाना**:--आपले हे शब्द काळजाला कसे घरे पाडतात, तें काय सांगूं! बाईसाहेब, मला पुष्कळ वेळां असं मनांत येतं कीं, सकृद्दर्शनीं आपणाशीं इतकं निष्ठुर आचरण पावलोपावलीं करण्याचा प्रसंग येण्यापेक्षां मला मरण आलं असतं तरी पुरवतं! पण मरण हें कोणाच्या हातचं नाहीं.

**पार्वती०**:--नाना, मरण हातचं असतं तर मी तरी अशी ही विटंबना करून घ्यायला कशाला जगलें असतें? मला जगून राज्यकारभार थोडाच करायचा आहे! तसंच ज्यांच्या आशेवर आणि ज्यांच्या जिवाकरितां

म्हणून जगायचं ते जिवंत होऊन आले तरी त्यांची वाट काय लागणार हें दिसतंच आहे उघड ! मग मला जगून काय करायचं आहे, नाना !

**नाना०**:— ( डोळ्यांना पाणी आणून ) शिवशिव ! बाईसाहेब ! खरेखुरे भाऊसाहेब जिवंत असते तर ते मला नको का होते ! मीं अधिकाराची क्षुद्र हांव धरून त्यांना कैदेंत ठेवलं असतं असं आपल्या मनांत चुकून तरी कसं येतं ? हा नाना इतका नीच अधम झाला काय ? मी लहान असतांना पोटच्या मुलाप्रमाणं माझ्यावर प्रेम कोणीं केलं ? भाऊसाहेबांनींच ना ! मला माधवरावसाहेबांबरोबर आस्थेनं शिक्षण कोणीं दिलं ? 'हा नाना पुढं मोठा होईल' म्हणून मला शाबासकी देऊन ममतेनं पाठीवरून हात कोणीं फिरविला ? पानपतच्या स्वारीवर निघतांना मुद्दाम हौसेनं विश्वासरावांबरोबर मला कोणीं मागून घेतलं ? वाटेंत नर्मदा-तीरावर मी आजारी पडून अत्यवस्थ झालों असतां, "काकी, तुम्ही घाबरूं नका" असं माझ्या मातुश्रीला आश्वासन देतांना, स्वतःच प्रेमामुळं घाबरून जाऊन डोळ्यांला पाणी कोणीं आणलं ? आपल्या हातानं मला औषधपाणी दिलं ? केवळ माझ्याकरितां लष्कराचे मुक्काम जवळ जवळ करवून माझी बरदास्त कोणीं ठेविली ? आणि एखादे वेळीं लष्कराला लांब मजल मारावीच लागली तर माझ्या औषधपाण्याकरितां मुद्दाम मागं राहून मला आपल्या-बरोबर बंदोबस्तानं घोड्यावर घालून घेऊन जिवाचं रान करून घेऊन लष्कर गांठायचे श्रम-सायास कोणीं केले ? बाईसाहेब ! पानपतच्या युद्धप्रसंगाच्या दिवशीं सकाळीं जिव्हाळ्याच्या मंडळींना एकत्र जमवून स्वतःविषयीं निर्वाणीचे उद्गार काढून "जगूनवांचून जे कोणी परत जातील त्यांचं रक्षण करण्याचं काम हा नाना करील" असं म्हणून सद्गदित होऊन माझ्याकडं बोट कोणीं दाखविलं ? भाऊसाहेबांनींच ना ? बाईसाहेब, आपल्या हत्तीला लागून राहिलेल्या हत्तीवर जेव्हां गोळी लागून विश्वासराव ठार झाले तेव्हां हत्तीवरून उतरून घोड्याच्या रिकिबींत पाय ठेवतांना "नाना, मी चाललों ! आतां तूंच संभाळ !" अशी दुःखपूर्ण आरोळी कोणीं मारली ? भाऊसाहे-बांनींच ना ? त्या वीराला, त्या महात्म्याला, पित्यासमान आणि गुरुसमान असणाऱ्या माझ्या त्या धन्याला——तो केवळ पानपताहून जगूनवांचून परत

आला, येवढ्या आरोपावरून--मी जन्मभर कैदेंत टाकीन आणि त्याच्या खरेपणाबद्दल कोणी शंका काढली येवढ्याकरितां त्यांचा मी छळ करीन, इतका अधम निमकहराम हा नाना आहे असं का वाटतं आपल्याला ? बाईसाहेब, आपल्याला आणखी आठवणी म्हणून कोणकोणत्या करून देऊं ? भाऊसाहेब, गर्दीत शिरले असं पाहून आपण शोक करूं लागलां; मी जवळच होतों. तेव्हां माझ्या मातुश्रींनं आपलं सांत्वन करतांना " हा नाना आजपासून तुमचा मुलगा झाला असं समजा. त्याच्याकडं पाहून तरी कांहीं भलतंसलतं करूं नका " असं विनवलं तें आपणाला स्मरतं का ?

**पार्वती०** :--होय नाना, मला तें चांगलं स्मरतं. मी तें कसं विसरेन ?

**नाना०** :--मग हें जर खरं तर मग मी इतका कृतघ्न, उलटया काळजाचा मांग आहें असं आपण कसं मानतां ? आपल्या मनांत क्षणभर तरी असं कसं येत नाहीं कीं भाऊसाहेबांना कैदेंत ठेवून मला काय लाभ होणार ? भाऊसाहेब जिवंत असते तर, मी कारभार करतों हें पाहून त्यांना उलटं बरंच वाटलं असतं ! आपल्या हातानं लावलेल्या झाडाला फळ आलेलं पाहून कोणाला बरं वाटणार नाहीं ? एवढंच नव्हे, तर गृहकलहांत त्यांनीं माझीच बाजू घेतली असती. फार काय, पण भाऊसाहेबांचा मला आधार असता तर नारायणरावांचा खून न होता, आणि रघुनाथराव दादांच्यामुळं आज दौलतीवर ओढवलेले अनर्थ ओढवले नसते. त्यांच्या इतकं दौलतींत नसलं तरी घराण्यांत वडील कोण होतं ? त्यांचा अनुभवाचा फायदा कुणाला नको होता ? त्यांच्या तलवारीचा पराक्रम पाहण्याला कुणाला हौस वाटली नसती ? त्यांच्या कृपाछत्राच्या शीतल छायेखालीं बसून पडतील तीं दोन कामंधामं करून त्यांना खूष ठेवण्याला कुणाला प्रेम वाटलं नसतं ?

**पार्वती०** :--नाना, तुमचे शब्द मला पटतात. पण-( गहिंवरून ) मी तरी काय करूं ? स्वारी जिवंत आहे अशीं स्वप्नं मला कां पडतात ? " मुली, तुझ्या सौभाग्याला धक्का लागलेला नाहीं " अशा शब्दांनीं माझी मनोदेवता मला नित्य आशीर्वाद कां देते ? जो कोणी अतीत-अभ्यागत गोसावी बैरागी भेटतो तो माझ्या आशेच्या अंकुरावर प्रेमपूर्ण शब्दांच्या अमृताचं सिंचन कां करितो ?

नाना :--बाईसाहेब, कसूर माफ असावी. पण मी सांगतों कीं असल्या आशीर्वादांवर जाणं व्यवहाराला धरून नाहीं. उदार श्रीमंताच्या दानपूर्ण हस्ताकडे पाहून प्रत्येकजण खोटेंच बोलतो असं मी तरी कसं म्हणूं ? सर्व जगाच्या डोक्यावर आपमतलबी असा शेरा मी कसा मारूं ? पण आपल्या दुःखपूर्ण मुद्रेकडं पाहून विशेषतः आपणा स्वतःला आशा वाटते म्हणून गोड बोलणारेच पुष्कळ ! पण बाईसाहेब, असल्या गोष्टी कुठं होत असतात का ?

पार्वती० :--नाना, असं कां बरं म्हणतां ? तुमची आई गिलच्यांच्या कैदेंत जिवंत आहे अशा बातमीवर तुमचा स्वतःचा विश्वास बसला होता ना ? आणि तिला सोडविण्याकरितां माळव्यांत हिंगण्यांना पत्रं लिहून 'माझं सर्वस्व देतों पण आईचा शोध लावून तिला सोडवा,' अशी प्रार्थना तुम्हींच केली होती ना !

नाना :--होय. पण पुढं पत्ता लागेना तेव्हां त्या गोष्टीचा नाद मीं नाहीं का सोडला ?

पार्वती० :--मग काय, पानपतच्या लढाईतून कुणीच का जिवंत सुटून आलं नसेल ?

नाना :--बाईसाहेब, आपण आणि मीच स्वतः जर पानपताहून जिवंत परत आलों तर कोणीच जिवंत परत आला नाहीं असं मी कसं म्हणेन ? पण कोण आला नि कोण न आला याचा निर्णय पुढं एक दोन वर्षांतच झाला पाहिजे होता.

पार्वती० :--तुम्ही हा निर्णय दोन वर्षांत व्हायला पाहिजे होता असं म्हणतां; मी तेवढं मात्र म्हणत नाहीं. कुणी सांगावें कुणावर कशी परिस्थिति आली असेल ती ? फार काय सांगूं ? माझी कुणबीण विठी; तिचा नवरा हैबती निंबाळकर पुण्यांत प्रगट होऊन तिला भेटला ! आणि ही गोष्ट कांहीं लांबची नाहीं. नुकती परवां घडली ! आणि शनिवारवाड्यापासून हांकेच्या आंतल्या अंबरखान्यांतच ना ! ती गोष्ट तुमच्याहि कानांवर आलीच असेल. मग तुम्ही विश्वास ठेवा अगर न ठेवा. तो तुमच्या मनाचा धर्म आहे !

नाना :--होय, ती गोष्ट मीं ऐकली आहे. पण त्याजबरोबर हेंहि ऐकलं

आहे कीं, हैबती एकदां त्याच्या बायकोला दिसला पण तो दुसऱ्या कुणीहि पाहिला नाहीं. फार काय पण तिलाहि तो फिरून दिसला नाहीं. ती थट्टा नसेल कशावरून ?

**पार्वती०**:—बरं. हैबतीचं असो ! पण रत्नागिरीस नाईकांनीं कैदेतून सोडले हें जर खरें नव्हतें तर मग इतके सरदार अन् मानकरी, खात्री करून घेतल्याशिवाय त्यांना कसे जाऊन मिळाले असते ? हैदरखानासारख्या शत्रूचं मी नाहीं बोलत ! पण प्रत्यक्ष माझा दादा ! त्याला नसेल का कांहींच सत्याची चाड ? त्याचंहि पत्र मला आलं. तो कशाला खोटं लिहील ! शिवाय, ज्यांनीं आपल्या हातानं त्यांच्या पायांतली बिडी काढली ते रामचंद्र नाईक स्वतः आपण होऊन आले सांगायला ! तुम्हांला दुखवून त्यांना काय बरं मिळणार आहे ? नाईक आपल्या घराण्याचे जुने अभिमानी आहेत हें मीं तुम्हांला सांगायला पाहिजे असं नाहीं. माधवराव मरणाच्या दारीं टेकला; पर्ण कर्जदार येऊन दाराशीं बसल्यानं त्याचा प्राण जातां जाईना. कष्ट होऊं लागले. तेव्हां नाईकांनींच नाहीं का आपण स्वतः कर्जरोखे लिहून देऊन माधवरावाला सोडविलं ? अशीं हीं मातबर माणसं ! तीं सर्व म्हणतात तें खोटं, आणि नाना—बोलले तर राग येऊं देऊं नका, पण सांगतें—तुम्ही मात्र म्हणतां तेवढं खरं; असंच ना ?

**नाना**:—आपला युक्तिवाद बरोबर आहे. पण बाईसाहेब ! आमच्या सरदार-दरकदारांची गोष्ट कशाला सांगतां ? आमच्या सरदारांसारखे हराम-खोर अलम दुनियेंत सांपडणार नाहींत ! त्यांच्या घरबुडवेपणामुळं तर गोष्टी या थराला आल्या. रघुनाथरावदादा आग्यावेताळ; आणि त्याच्या हातून सांडलेल्या रक्तमांसावर तहानभूक भागविणारीं पिशाच्चं म्हणजे आमचे हे सरदार लोक ! यांना कलहाशिवाय दुसरं कांहीं प्रिय नाहीं. पुरंदरचा तह होऊन मोठं कारस्थान बंद पडलं, तेव्हां यांनीं काढलं उकरून हें ठेवणींतलं फर्माशीचं कारस्थान. तोतयाकडे गेलेल्या सरदारांची काय मोठी लायकी आणि अब्रू म्हणून मला त्यांचा दाखला देतां ? कोणी कसंहि म्हणो, स्वतः आपल्या डोळ्यांनीं तोतयाला पाहून तो खोटा अशी खात्री करून घेतल्यावर

मी जर केवळ दुसऱ्याच्या अभिप्रायामुळं तोतया खरा मानूं लागलों तर धन्यच म्हणायची माझी !

**पार्वती०**:--फिरून म्हणतें, नाना, राग येऊं देऊं नका. पण याचंच नांव अभिमान !

**नाना**:--पण ही कांहीं लहानसहान बाब नव्हे कीं जींत मीं आपलं मत बाजूला ठेवून दुसऱ्याला खूष करण्याकरितां त्याच्या म्हणण्याप्रमाणं करावं! मग त्याला अभिमानाचं स्वरूप आलं तरी त्याची मला चिंता नाहीं.

**पार्वती०**:--असंच जर आहे तर मग हा वादविवाद काढलांत तरी कशाला ?

**नाना**:--बाईसाहेब, तुमच्या-माझ्यांतला हा विरोध कांहींसा बिनतोड आहे खरा; परंतु माझं मत बाजूला ठेवावयाला फक्त आपण स्वतः तोतया पाहून खात्री करून खरा ठरविला असतात तरच गोष्ट निराळी !

**पार्वती०**:--या गोष्टीला मीं कधीं नाहीं म्हटलं होतं बरं ! आठवण करून सांगा, नाना. माधवराव होता तो तुमच्यासारखाच मताचा अभिमानी-कर्ता पेशवा ! मी त्याच्या पुढं काय बोलूं ? नारायणाच्या कारकीर्दीचा तसा शेवट झाला ! रघुनाथरावदादा वडील; त्यांनीं गोष्ट मनावर घ्यायची. पण त्यांना झाली मुलीच्या लग्नाची घाई. त्यांना असं होऊन गेलं कीं अभद्रदर्शन, कपाळकरंटी मी, लग्नाच्या शुभ-मंगल प्रसंगाच्या आधीं माझी धिंडका घरांतून जाईल तर बरं; आणि घरांत ठेवावयाचीच झाली तर क्षेत्राला पाठवून तीर्थविधि करवून तरी आणावी ! त्यांच्या त्या खऱ्याखुऱ्या लगीनघाईपुढं माझं गाऱ्हाणं कोण आणणार मनाला ? मीं तेव्हांच सांगितलं कीं तोतया पुण्याला आणा; चार-चौघांसमक्ष परीक्षा होऊं द्या; त्याचा फडशा करा; मग आहेच बसलेली मी वैधव्याच्या दारांत. सारंच खोटं ठरलं तर मग मी नाहीं म्हणून तरी काय होणार ? मग तेव्हां तसं कां नाहीं झालं ? संशयाचं मूळच खणून निघालं असतं म्हणजे मग कशाला पडला असता हा इतका गोंधळ !

**नाना**:--आपण म्हणतां तें खरें आहे. पण-पण-(स्वगत) तोतया

बाईच्या दृष्टीस घालण्यांत काय अडचणी आहेत हें उघड बोलून काय उपयोग ! असो, तूर्त कशाला बोला ?

**पार्वती०**:––नाना, कां ? शंका कसली आली ?

**नाना**:––नाहीं. मीं म्हटलं तेंहि झालं असतं. पण आतां बोलून काय उपयोग ? कारण इच्छा असली तरी तें हातीं राहिलेलं नाहीं. आतां लढाई-पर्यंत मजल आलेली आहे; आपल्या होय नाहीं म्हणण्यावर आम्ही सर्व तंटा तोडायला तयार आहों अशी कबुली दिली तरी माझं कोण ऐकणार ? बोरघाटांत लवकरच लढाई जुंपेल असा रंग दिसतो. तोतयाचा जय होऊन तो आपल्याच पायानं पुण्याला आला तर आपल्या इच्छेप्रमाणं सरळच होईल.

**पार्वती०**:––आणि तुमचा जय झाला तर ?

**नाना**:––तर मी असं परमेश्वरस्मरण करून वचन देतों कीं आपला स्वतःचा अभिप्राय बाजूस सारून, मी प्रथम त्याला आपल्या नजरेला घालीन आणि मगच त्याचं काय पारिपत्य व्हायचं असेल तें होईल.

**पार्वती०**:––इतकं झालं तरी मी पुष्कळ म्हणतें !

**नाना**:––आपण दीन वचन बोललां म्हणजे मला फार दुःख होतं. आपला अधिकार मला काय वाटेल ती आज्ञा करण्याचा आहे; पण या एका बाबतींत आपल्याला अप्रिय अशा रीतीनं वागायचं माझ्या नशीबांत आलं आहे खरं; तथापि, आपणाला अप्रिय असं वागवतांनाहि ' ईश्वरा, मी सत्य स्मरूनच वागत आहे ' अशी आळवण केल्याशिवाय मीं केव्हांहि पुढं पाऊल टाकलेलं नाहीं. बरं मी येतों आतां.

**पार्वती०**:––( डोळ्यांला पाणी आणून ) ऋणानुबंध असेल तसं घडेल. मीहि कधीं तुमच्या कारभाराला आडकाठी आणण्याच्या बुद्धीनं वागलें नाहीं यालाहि ईश्वरच साक्ष.

( नाना व पार्वतीबाई जातात. )

• • •

# ५ : देशी भाषांचें पुनरुज्जीवन

गेल्या पन्नास वर्षांतील शिक्षणाचा प्रसार व त्यापासून झालेले परिणाम हे लक्षांत घेतले म्हणजे, यापुढें इंग्रजी भाषेची वाढ पूर्वीसारखी न होतां लवकरच ती खुंटेल; अर्थात् आपल्या योग्य मर्यादेपर्यंत जाऊन थांबेल असें दिसतें. शिक्षणामुळें स्वाभिमानबुद्धि उत्पन्न झाल्याकारणानें देशी भाषांच्या उत्कर्षाविषयींची स्वाभाविक बुद्धि सुशिक्षित लोकांच्या मनांत प्रगट होऊन त्यांचें लक्ष व त्यांचे परिश्रम इंग्रजी भाषेकडून थोडेंबहुत कमी पडतील; एवढेंच नव्हे तर इंग्रजी व देशी यांच्या सरहद्दीवरील झगड्यांत ते देशी भाषांचा पक्ष धरून इंग्रजीचें पाऊल थोडेंबहुत मागें हटविण्याचा प्रयत्न करतील, हें उघड आहे. गेल्या पांच वर्षांत एकीकडे इंग्रजी शिकणाऱ्या मुलांची संख्या वाढली, हिंदुस्थानांत येणाऱ्या इंग्रजी पुस्तकांची संख्या वाढली, एकंदरीनें इंग्रजी भाषेचें ज्ञान असणाऱ्या लोकांची संख्या वाढली व इंग्रजी भाषेच्या द्वारानें देशी भाषेंत येणाऱ्या ज्ञानभांडाराची किंमत वाढली हें खरें; पण असें असतांहि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूस, इंग्रजी व्याख्यानें देण्याची व इंग्रजी लेख लिहिण्याची सुशिक्षित लोकांची इच्छा किंचित् कमी झाली, व देशी भाषांतून लेख लिहिणें व भाषणें करणें, नवीन शब्दकोश रचणें व प्रेमामुळें अगर जरूरीमुळें संग्रहित कराव्या लागणाऱ्या विदेशी कल्पनांना होतां होईतों देशी पेहेराव देऊन देशी भावनेचा आणि संस्काराचा उजळा देऊन घेण्याची प्रवृत्ति वाढली, हीहि गोष्ट विसरतां कामा नये.

सन १८९४ सालीं कै. रा. ब. रानडे यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें मराठी भाषेच्यातर्फे जें सुंदर व पोक्त विचारांनीं भरलेलें भाषण केलें त्यामध्यें ते असें म्हणाले कीं, मराठी भाषेचा प्रश्न हा होमरूलच्या प्रश्नासारखा आहे. म्हणजे ज्याप्रमाणें इंग्रज लोकांच्या हाताखालीं कांहीं दिवस राजकीय शिक्षण मिळाल्यामुळें हिंदी लोकांना दिवसेंदिवस आपलीं कामें आपणच करण्याची इच्छा व पात्रता उत्पन्न झाली, त्याचप्रमाणें इंग्रजी भाषाशिक्षणाचे कांहीं दिवस गेल्यामुळें त्यांचें स्वभाषेविषयींचें प्रेम अधिक जागृत झालें.

इंग्रजी भाषा शिकल्यानें मराठी भाषेचें प्रेम वाढलें असें म्हणणें हें कांहीं अंशीं विरोधाभासाचें एक उदाहरण आहे; परंतु तो अर्थांतच आभास होय. कारण, प्रत्यक्ष स्वराज्य असतां स्वभाषेचा उत्कर्ष म्हणून कांहीं करण्याची जी बुद्धि आपणामध्यें पूर्वीं, म्हणजे उदाहरणार्थ, पेशवाईत जागृत झालेली नव्हती ती आज इंग्रजी राज्यांत उत्पन्न झाली आहे. याचा अर्थ पेशवाईत महाराष्ट्रीयांस मराठी भाषा आवडत नव्हती अगर दुसरी एखादी आवडत होती असा नव्हे; तर मराठी भाषेवर—मराठी राष्ट्रीयत्वाच्या मुख्य साधनावर—-आज एक प्रकारचें संकट आल्यामुळें तिच्या रक्षणाविषयींच्या आपल्या प्रयत्नास जागरूकता येऊन तिजविषयींचें आपलें प्रेम अधिक व्यक्त झालें आहे, इतकाच अर्थ घ्यावयाचा. याच गोष्टीला प्रत्यंतरादाखल दुसरेंहि असें एक उदाहरण देतां येईल कीं, पूर्वीं पेशवाईमध्यें शिवाजीचा उत्सव महाराष्ट्रांत करीत असल्याचें कोणीं ऐकलें नाहीं. तो उत्सव महाराष्ट्रांत महाराष्ट्रीयांस करावासा वाटतो. याचाहि अर्थ नानासाहेब व माधवराव पेशव्यांस शिवाजी महाराजांची योग्यता कळत नव्हती असा नव्हे; तर आजच्या घटकेच्या महाराष्ट्रीयांना शिवाजी महाराजांची योग्यता ध्यानांत ठेवण्याची तेव्हांपेक्षांहि अधिक जरूरी आहे हाच अर्थ ग्राह्य होय. ज्याप्रमाणें प्रत्यक्ष स्वराज्यांत होमरूलची अशी चळवळ होऊं शकत नाहीं, परराज्यांत अशा चळवळीच्या नांवाला कांहीं औचित्य असतें; त्याचप्रमाणें इंग्रजी भाषेचें गंडांतर दृष्टीपुढें उभें राहिल्यामुळें देशी भाषांच्या सुधारणेविषयीं हिंदी लोकांच्या मनांतून स्वाभाविकच उमाळा आला. शिवाय दुसरेंहि एक कारण आहे. तें हें कीं, इंग्रजी भाषेच्या संसर्गामुळें हिंदी ग्रंथसंग्रह व वाङ्मय फैलावलें आहे, व यामुळें पेशवाईत दीडशें वर्षांत मराठी भाषेची जी वाढ दिसून आली नाहीं ती गेल्या अवघ्या पन्नास वर्षांत दिसून आली, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

पण देशी भाषांचा उत्कर्ष म्हणजे इंग्रजीची हटकून पीछेहाट असेंहि नाहीं; आणि इंग्रजी व देशी भाषा यांच्या सकृद्दर्शनीं दिसणाऱ्या विरोधाचा विचार करतांना अगर त्यावर मत देतांना जी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती हीच. एकाच म्यानांत एकाच वेळीं एकाहून अधिक सुऱ्या ठेवतां येत नाहींत असें

जरी असलें, तरी प्रसंगाप्रमाणें निरनिराळ्या वेळीं एकाच म्यानांत निरनिराळ्या सुऱ्या ठेवतां येतात. मनुष्याचें मन व भाषा यांचीहि गोष्ट कांहीं अंशीं अशीच आहे. मनुष्यास एकच भाषा येणें शक्य असतें किंवा एक चांगली आल्यामुळें अगर सरावांत ठेवल्यानें दुसऱ्या एखाद्या भाषेस हटकून अपाय झाला पाहिजे अगर गौणत्व आलें पाहिजे ही गोष्ट जर अनिवार्य असती, तर भाषांच्या प्रश्नास लढाईचेंच स्वरूप आलें असतें. पण वस्तुतः तशी स्थिति मुळींच नाहीं. एखाद्या मनुष्यास इंग्रजी चांगलें येत असलें म्हणून त्याच्या देशी भाषेचें ज्ञान कमी होतें अगर त्याला देशी भाषा लिहितां अगर बोलतां येतच नाहीं, असें होत असतें तर गोष्ट वेगळी. परंतु एक भाषा नेहमीं दुसऱ्या भाषेस उपकारकच होते. इंग्रजी चांगलें आल्यामुळें ज्यास मराठी चांगलें येत नाहीं अगर मराठी चांगलें आल्यामुळें ज्यास इंग्रजी चांगलें येत नाहीं असा मनुष्य सांपडणें शक्यच नाहीं, हें कोणीहि सांगूं शकेल. ज्याला मूळ भाषा-ग्रहण-शक्तिच कमी त्याला केवळ एकच भाषा शिकून तरी तींत कितीसें गहन नैपुण्य मिळणार? उलटपक्षीं, ज्याच्या मनाला भाषासंस्कार व वाङ्मयाची गोडी जातीचीच आहे त्याला अनेक भाषांचें ज्ञान हें केव्हांहि अपकारक न होतां उलट उपकारकच होतें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें हिंदुस्थानांत आज कोणती एक भाषा जिवंत उरणार असा प्रश्नच मुळीं उद्भवत नाहीं, असें आम्हांस वाटतें. समाजाच्या कार्यक्षमतेप्रमाणें त्याला अनेक भाषांची जरूरीच असते. निदान आजच्या स्थितींतील हिंदी समाजास तरी तशी गरज आहे, यांत शंका नाहीं. आपण महाराष्ट्राचेंच उदाहरण घेऊं. आजच्या महाराष्ट्रीयांस एकच काय पण चार भाषांचीहि गरज आहे, हें सप्रमाण सिद्ध करतां येतें.

मराठी भाषा ही अर्थात् महाराष्ट्रीयांची जन्मभाषा असल्यामुळें तिचें महत्त्व वर्णन करण्याचें कारणच नाहीं. परंतु संस्कृत भाषा सर्वस्वीं काढून घेतली तर मराठी भाषा मुळीं उरणेंच शक्य नाहीं. अप्रबुद्ध, अडाणी, अशिक्षित लोकांना संस्कृत भाषेचें प्रत्यक्ष ज्ञान नसतें, हें खरें; परंतु त्यांचा सर्व पूर्वेतिहास, त्यांचा धर्म, त्यांच्या दंतकथा व ते तोंडानें गुणगुणतात तीं गाणीं, तात्पर्य, अशिक्षित मनुष्याला केवळ सहज असें जें शिक्षण असतें

तें सर्व संस्कृताच्या द्वारें आलेलें असल्यामुळें संस्कृत मराठीपासून विलग करणें शक्य नाहीं. ज्यांना आपण सुशिक्षित म्हणतों त्यांच्या संस्कृतीचा तर बराच भाग संस्कृत भाषेंतून येतो, हें उघड आहे. वेद, उपनिषदें, काव्यें, नाटकें, इतिहास, पुराणें, दर्शनें व शास्त्रें या सर्वांमधून झिरपून आलेल्या संस्कृतीच्या प्रवाहांची एक नदी बनलेली असते. अर्थात् हीं उगमस्थानें सर्व आटलीं तर त्यांच्या संस्कृतीचा प्रवाहहि अवर्षणानंतर उन्हाळ्यांत वाहणाऱ्या नदीच्या जलरेखेप्रमाणें, अतिसूक्ष्म असेल हें अगदीं उघड आहे. शिवाय पाश्चिमात्य शास्त्रें, तत्त्वज्ञान वगैरेंचें ज्ञान झालेल्या मनुष्यासहि तें ज्ञान देशी कल्पनांच्या सांच्यांतून संग्रहीत झालेलें असलें तरच मनःप्रकृतीस मानवतें. औषध इंग्रजी असलें तरी अनुपान देशीच लागतें; एरवीं तें गुणकारी होत नाहीं. तात्पर्य, संस्कृत ही जरी एका अर्थानें मृत भाषा असली तरी आमच्या देशी भाषांस जिवंत ठेवण्याइतका सजीवपणा तिच्या अंगीं आहे.

परंतु आजच्या स्थितींत केवळ मराठी व संस्कृत या दोन भाषांनींहि चालणार नाहीं. कारण महाराष्ट्रांतील समाजाच्या अंगांत व उपांगांत चालणाऱ्या व्यवहाराचा इंग्रजीशीं नित्य इतका निकट संबंध येतो कीं, इंग्रजी भाषेचें ज्ञान नसणारा मनुष्य जात्या कितीहि बुद्धिमान असला तरी पाण्याबाहेर काढलेल्या माशाप्रमाणें त्यास तडफडावें लागतें; अथवा झोपेंतून उठलेला मनुष्य एकदम उन्हाकडे पाहून जसा गांगरून जाऊन अस्वस्थ होतो, तशीच स्थिति आज निवळ मराठी जाणणारांचीहि होते. देशांतील बराचसा राज्यकारभार, व्यापार, कलाकौशल्य अगर एखादा उद्योगधंदा चांगला करावयाचा असल्यास आज इंग्रजीशिवाय त्याचें अडणारच. तसेंच ज्या कोणाला केवळ कूपमंडूकवृत्तीनेंच राहावयाचें नसेल, जगांतल्या निरनिराळ्या देशांत पैदा झालेलें उत्कृष्ट ज्ञान संपादन करावयाचें असेल, त्यालाहि इंग्रजी शिकल्याशिवाय गत्यंतर नाहीं; किंबहुना एका अँग्लो-इंडियन पत्रानें म्हटल्याप्रमाणें आज महाराष्ट्रांत पेशवाई असती तरी 'न वदेत् यावनीं भाषाम्—' या वचनावर रूढीचा हरताळ फासून राज्यकर्त्यांनीं व प्रजेनें विश्वसंस्कृतीच्या अपेक्षेनें इंग्रजीचा अभ्यास थोडाबहुत तरी चालू केला असता, असेंहि मानण्यास जपान व चीन यांच्या उदाहरणांवरून बरीच जागा आहे.

पण मराठी, संस्कृत व इंग्रजी या तिहींनींहि आज महाराष्ट्रीयांचें काम भागत नाहीं. कारण नवीन परिस्थितीमुळें सर्व हिंदुस्थान देश–पूर्वी आपला होताच तो – आतां आपलाच असा वाटूं लागला आहे. प्रांताप्रांतांतील दळणवळण वाढलेलें असून निरनिराळ्या शाखेच्या लोकांना परस्परांचे आचारविचार समजण्याची आकांक्षा उत्पन्न झाली आहे; अर्थात् सर्व हिंदुस्थानची मिळून एकच नसली तरी प्रांतानिहाय निरनिराळी का होईना, परंतु दुसरी म्हणून भाषा एक लागणारच. ह्या दुसऱ्या भाषेचें स्थान हिंदी, बंगाली किंवा मराठी घेणार हा मुद्दा जितका वादग्रस्त तितकाच गौणहि आहे; पण सर गुरुदास बानर्जी यांनीं राष्ट्रीय शिक्षणावरील आपल्या पुस्तकांत अंदाज केल्याप्रमाणें कालांतरानें दरएक प्रांतांत दोन दोन देशी भाषा चालू राहतील. बंगाल्यामध्यें बंगाली व उर्दू, संयुक्त-वायव्य प्रांतांत व पंजाबांत हिंदी आणि उर्दू, मुंबई इलाख्यांत मराठी आणि गुजराथी, आणि मद्रास इलाख्यांत तामील व तेलगू याच मुख्य देशी भाषा प्रचलित राहतील. आजच्या घटकेला हिंदी भाषेचा प्रसार जास्त आहे; परंतु तिजमधील वाङ्मय फार कमी आहे. बंगाली भाषा बोलणारे लोक फक्त चारच कोटी असले तरी वाङ्मयाच्या दृष्टीनें पाहतां ती भाषा हिंदुस्थानांतील सर्व भाषांच्या अग्रस्थानीं आज आहे. मराठी पुस्तकांचीं बंगालींत जितकीं भाषांतरें होतात त्यापेक्षां बंगाली पुस्तकांचीं मराठींत अधिक भाषांतरें होतात गुजराथी भाषा व्यापार-धंद्यास अधिक उपयोगी असली तरी इतिहास व राजकारण या दोहोंच्या दृष्टीनें मराठी हीच अधिक मान्य आहे. अशा रीतीनें कोणांत कांहीं, तर कोणांत कांहीं गुण असल्यामुळें, मॉडर्न रिव्ह्यूतील एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें, देशी भाषांमध्यें आजच्या घटकेस एक प्रकारची शर्यतच लागून राहिलेली आहे. ही शर्यत कोणती भाषा जिंकणार हा प्रश्न मनोरंजक असला तरी प्रस्तुत आपणांस गौणच आहे. कारण यापुढें कित्येक शतकेंपर्यंत एक जन्मभाषा, एक संस्कृत भाषा, एक दुय्यम देशी भाषा आणि सर्व जगाशीं व्यवहार करण्याकरितां इंग्रजी ही चौथी भाषा अशा चार भाषा प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास प्रायः येतील. परंतु सांगण्याचा मुख्य मुद्दा हा कीं, इंग्रजी भाषेला कितीहि राजकीय महत्त्व असलें तरी, टाइम्सनें म्हटल्याप्रमाणें,

इंग्रजी भाषा ही सर्व हिंदी जनतेची आवडीची अशी भाषा होईल हें शक्य नाहीं; व एखाद्या देशी भाषेला नामशेष करून तिचें स्थान इंग्रजी भाषा बळकावील हें तर मुळीं स्वप्नांतहि आणण्याचें कारण नाहीं. इंग्रजी भाषेची उपयुक्तता कितीहि असली तरी तिच्या विस्ताराला कांहीं स्वाभाविक मर्यादा तर आहेच; परंतु वर एके ठिकाणीं दर्शविल्याप्रमाणें देशांतील राज्यकारभारा-संबंधानेंहि तिची वाढ बेसुमार होणें शक्य नाहीं, ही गोष्ट पायोनियरसारख्या अँग्लो-इंडियन पत्रकारांना देखील आतां कळूं लागली आहे.

• • •

# ६ : मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया

" No scheme of Self-Government, however, benevolently or generously it may be bestowed upon us will ever make us a self-governing nation if we have no respect for the languages our mothers speak. "

—M. K. Gandhi.

' कोणी कितीहि परोपकारबुद्धीनें किंवा औदार्यबुद्धीनें कशाहि उत्तम घटनेचें स्वराज्य आम्हांस दिलें तरी आमच्या माता जी भाषा बोलतात तिजविषयीं आमच्या मनांत आदरबुद्धि नसल्यास आम्ही खरे स्वराज्यभोगी होणार नाहीं. '

— महात्मा गांधी.

मुंबई येथें गेल्या आठवड्यांत भरलेली प्रांतिक शिक्षण—परिषद बऱ्याच अंशांनीं यशस्वी झाली असें म्हणतां येईल. ती सरकारनें किंवा मुंबई युनि-व्हर्सिटीनें भरविलेली नव्हती ही गोष्ट खरी; तथापि तिचें अध्यक्षस्थान मुंबई हायकोर्टाचे एक वेळचे ॲक्टिंग चीफ जस्टिस व मुंबई युनिव्हार्सिटीचे सरकार-कडून दोनदां नेमणूक झालेले व्हाइस-चॅन्सेलर सर नारायण चंदावरकर यांनीं स्वीकारलें होतें; आणि इलाख्यांतील दुय्यम प्रतीच्या व उच्च शिक्षणसंस्थांतून अगर अशा संस्थांबाहेर राहूनहि शिक्षणाकडे मोठ्या

आवडीनें लक्ष पुरविणारे असे अनेक नामांकित गृहस्थ व स्त्रियाहि हजर होत्या. परिषदेस सरकारी विद्याखात्याचे अधिकारी किंवा नोकर आले नव्हते ही गोष्ट खरी; परंतु ते हजर न राहण्याला मुख्यतः दोन कारणें होतीं. एक असें कीं, सरकारी विद्याखात्याला शिक्षणाच्या कामीं खाजगी रीतीनें झालेला कोणताहि प्रयत्न – मग तो केवळ चर्चात्मक का असेना– फारसा आवडत नाहीं. लोककल्याणाच्या विचाराचा सर्व मक्ता आपणाकडे आहे अशी सरकारनें आपली भावना करून घेतलेली असते, तेव्हां सरकार-रूपी शरीराचे अवयवभूत असे जे विद्याधिकारी तेहि अशा भावनेचे अंशभागी झाले असल्यास त्यांत नवल नाहीं. पण त्यांतूनहि कांहीं विद्या-धिकारी अशा भावनेपासून मुक्त असले तरी आपल्या नोकरपेशाची सरकारी शिस्त त्यांना आड येते, व सदर शिक्षण–परिषदेसारख्या सभांना त्यांना हजर राहतां येत नाहीं. सरकारी अधिकारी किंवा नोकर हजर नसल्यामुळें या परिषदेस एकांगीपणाचें स्वरूप सकृद्दर्शनीं येण्यासारखें होतें. परंतु कित्येक बाबींवर परिषदेंत जो कसून व कडाक्याचा वादविवाद झाला, त्यावरून पाहतां तेथें कोणतेंहि एककल्लीपणाचें मत प्रभावी झालें नसून, परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांना संकीर्ण विचाराचें स्वरूप सहजच आलेलें आहे. हे ठराव लोकमतनिदर्शक असले तरी सरकारवर ते कोणत्याहि रीतीनें बंधक होऊं शकत नाहींत. फार काय पण या बाबतींत मुंबई युनिव्हर्सिटी देखील सर्वस्वीं स्वतंत्र असल्यानें परिषदेचे ठराव मानणें अगर न मानणें हें सेनेटच्या मर्जीवर अवलंबून आहे. पण हे ठराव म्हणजे हुकूम नसले तरी विचारपूर्वक केलेल्या शिफारशी या नात्यानें त्यांना बरीच किंमत आहे. एवढेंच नव्हे तर, सरकारनें किंवा युनिव्हर्सिटीनें त्या आज ताबडतोब धुडकावून लावल्या तरी पुढेंमागें केव्हां तरी शिफारशींतील सूचना अंमलांत आल्यावांचून राहणार नाहींत, अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. एरवीं लोकमत जें सर्वत्र विखुरलेलें असतें तें अशा परिषदांनीं एकीकृत होतें, आणि सरकारी विद्याखातें किंवा निमसरकारी युनिव्हर्सिटी यांच्यावर हल्ला चढविण्यापूर्वीं लोकमताच्या सेनेची तयारी बाहेर कशी काय आहे याचा पुढाऱ्यांना अंदाज घेतां येतो.

शिक्षण–परिषदेचें काम आटपण्यापूर्वींच गेल्या अंकीं आम्हीं आशा प्रदर्शित केल्याप्रमाणें देशी भाषांसंबंधानें दोन महत्त्वाचे ठराव परिषदेनें बहुमतानें कां होईना, पण मंजूर केले. पैकीं एक ठराव मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला देशी भाषेंतून देण्यास विद्यार्थ्यांना मोकळीक असावी, असा होता. या विषयावर दुमत झालें. तथापि बहुमतानें मंजूर केलेला ठराव अध्यक्षांनीं आढेवेढे न घेतां परिषदेचा निकाल म्हणून ग्राह्य मानला. दुसरा महत्त्वाचा ठराव भाषावार युनिव्हर्सिटया स्थापण्या-संबंधाचा होता, तोहि बहुमतानें मंजूर झाला असता; तथापि, अध्यक्षांना शिक्षणव्यवस्थेंतील ही राज्यक्रांतीच होय असें वाटल्यावरून त्यांनीं या प्रश्नाचा निकाल निदान लांबणीवर पडावा या हेतूनें त्याच्या विचाराकरितां पोटकमिटी नेमणें अधिक प्रशस्त असें ठरविलें व मूळ सूचना करणारांनींहि तडजोडीदाखल ही उपसूचना मान्य केली. तथापि परभाषेच्या मरणाला फार तर पोटकमिटीची ही एक रात्र आडवी येईल, याहून अधिक कांहीं होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. कारण मातृभाषेला एकंदर शिक्षणाच्या कार्यांत कोणतें स्थान असावें याविषयीं एकंदर लोकमताचें तोंडच आतां फिरल्या-सारखें झालेलें असून भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापणें ही जी या विषयांतील अंतिम सुधारणा ती केव्हां ना केव्हां तरी अंमलांत आलीच पाहिजे असा तज्ज्ञांचा समज झालेला आहे, व तो यथार्थ आहे असें आम्हांसहि वाटतें. कर्मधर्मसंयोगानें मुंबईच्या 'टाइम्स' पत्रानें सदर शिक्षण-परिषदेवर लेख लिहितांना इतर गोष्टींची उपेक्षा करून आम्हीं ज्या दोन गोष्टी इष्ट म्हणून मागील लेखांत उल्लेखिल्या होत्या त्याच दोन गोष्टींस 'टाइम्स' पत्रानें नेमका आक्षेप घेतला आहे. ज्या दोन गोष्टी आम्हांस इष्ट वाटाव्या त्याच नेमक्या 'टाइम्स'ला अनिष्ट वाटाव्या याचा अर्थ 'टाइम्स'ला हिंदी लोकांचें शिक्षणदृष्टया अहित व्हावेंसें वाटतें असा आम्ही करीत नाहीं, तर एकाच विषयाकडे स्वकीय व परकीय हे पाहात असतां त्यांच्या दृष्टीमध्यें स्वभावतःच इतका मोठा फरक पडत असतो, इतकाच त्याचा आम्ही अर्थ करितों. देशी भाषांसंबंधानें आमची जी दृष्टि तीच उद्यां इंग्लंडमध्यें कोणत्या भाषेच्याद्वारें शिक्षण द्यावें असा प्रश्न निघाला असतां टाइम्स-

कारांचीहि होईल. म्हणजे उदाहरणार्थ, आम्ही जसें महाराष्ट्रांतील मुलांना मराठीच्या द्वारें शिक्षण मिळालेंच पाहिजे असें म्हणतों, तसेंच ‘ टाइम्स ’-कारहि इंग्रज मुलांना इंग्रजीच्या द्वारें शिक्षण मिळालें पाहिजे असेंच म्हणतील; फ्रेंच किंवा जर्मन भाषेंतून मिळावें असें केव्हांहि म्हणणार नाहींत. फार काय पण एखाद्या विषयावर जर्मन किंवा फ्रेंच भाषेंतील ग्रंथ उत्तम आहेत असें ठरलें तरी ‘ टाइम्स ’कार इंग्रजी भाषेचा आग्रह सोडणार नाहींत. पण हिंदुस्थानाविषयीं बोलणें निघालें म्हणजे मात्र हिंदुस्थानांत मातृभाषा म्हणून कांहींएक चीज आहे किंवा नाहीं अशी माहिती नसल्याप्रमाणेंच ते बरळूं लागतात. हिंदुस्थानांत आज इंग्रजांचें राज्य आहे व उद्यांहि राहील अशी दृढ समजूत असली तरी राज्यकर्त्यांची भाषा झाली म्हणून शिक्षणांत तिला किती महत्त्व किंवा कोणतें स्थान द्यावयाचें याविषयीं ‘ टाइम्स ’-कारासारख्या लोकांना सामान्य तारतम्यहि राहात नाहीं, म्हणूनच त्यांच्या बोलण्याला बोलणें असें न म्हणतां बरळणें असेंच नाइलाजानें म्हणावें लागतें. भाषेसारख्या गोष्टीचा इतका अभिमान धरून तिच्या द्वाराशिवाय इतर द्वारानें हिंदी लोकांचें शिक्षण होऊं नये किंवा होणारच नाहीं असा जेव्हां ते आग्रह धरतात तेव्हां त्यांचें हें गाढ बुद्धिमांद्य पाहून हंसू आल्याशिवाय राहातच नाहीं. या लोकांची एकंदर विचारसरणी पाहिली तर ती अशी दिसते कीं, हिंदी मुलांना शक्य तर पाळण्यांतलीं गाणींसुद्धां त्यांच्या आयांनीं इंग्रजी भाषेंतून म्हणावीं; धूळपाटीवर अक्षरें घालून द्यावयाचीं तीं ‘ अ, आ, इ, ई ’ हीं घालून न देतां ‘ ए, बी, सी, डी, ’ हींच जर घालून देतां आलीं तर फार बहार होईल, व हिंदुस्थानांतील शिक्षणाचा सर्व प्रश्न अत्यंत समाधानकारक रीतीनें कायमचा सुटेल ! दुर्दैव इंग्रजांचें कीं, हिंदी आया व दाया या अद्यापि घरांत इंग्रजी बोलूं लागल्या नाहींत व गांवठी तात्या पंतोजी इंग्रजीशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहींसे झाले नाहींत. पण हें दुर्दैव कायमचें टिकेल अशी भीति त्यांना असेलसें वाटत नाहीं. आज प्राथमिक शिक्षणांत देशी भाषांना जो थारा मिळालेला आहे तो त्यांनीं केवळ नाइलाजानें म्हणून दिलेला आहे. प्राथमिक शिक्षणहि इंग्रजी भाषेंतून देण्याची तरफदारी करण्यास ते कचरले नसते. पण प्राथमिक शिक्षण

इंग्रजींतून देण्याइतके इंग्रजी शिकलेले शिक्षक त्यांना आज मिळूं शकत नाहींत म्हणूनच नाइलाज. पण पांचपन्नास वर्षांनीं ही अडचण दूर होऊन धूळपाटीवर इंग्रजी अक्षरें दिसणार नाहींत अशी त्यांची निराशा झालेली नाहीं, हें त्यांच्या मनोभूमींत किंचित् खोल प्रवेश करून पाहणारास तेव्हांच दिसून येईल. प्राथमिक शिक्षण देशी भाषेंतून दिलें जातें तें ती पद्धति स्वाभाविक म्हणून नव्हे, तर ती पद्धति नाहींशी करण्यास शिक्षकांचें वैपुल्य नाहीं म्हणूनच होय, अशी त्यांची विचारसरणी उघड उघड दिसते !

अशी विचारसरणी असल्याबद्दल आम्ही इंग्रजांस दोष देत नाहीं; पण त्यांना दोष न दिला तरी राष्ट्राच्या दृष्टीनें आमचें म्हणून कांहीं पाहणें आहेच कीं नाहीं ? हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य झालें म्हणून हिंदी लोकांना जसें डोक्यावर उभें राहून चालतां येणार नाहीं, तसेंच परकी भाषेंतून प्राथमिक काय, दुय्यम काय, पण उच्च शिक्षणहि निरंतर देऊन चालणार नाहीं, हीच आमची दृष्टि असली पाहिजे; मात्र ती आमच्यांतील कित्येक सुजाण म्हणविणारांनाहि अद्याप लाभलेली नाहीं एवढ्याचेंच राहून राहून वाईट वाटतें. शिक्षकांच्या अभावामुळें प्राथमिक शिक्षण आज इंग्रजींतून न देणें हें जसें इंग्रजांना अपरिहार्य वाटतें, तितकेंच अत्युच्च शिक्षण देशी भाषांतील ग्रंथाभावामुळें आज इंग्रजींतून देणें अपरिहाय आहे असें आम्हांस वाटतें. तरी पण इंग्रजी शिक्षण फैलावून प्राथमिक शिक्षणहि देणारे शिक्षक इंग्रजी पढलेले मिळावे हा जसा इंग्रजांचा प्रयत्न मनांतून सुरू आहे, तसाच उच्चतम शिक्षण देण्याचे ग्रंथहि देशी भाषांतच पैदा व्हावे असा आमचाहि प्रयत्न आहे. अर्थात् हे दोन प्रयत्न सर्वस्वीं परस्परविरोधी अशा दिशांनीं चाललेले असून त्यांची एकवाक्यता होणें मुळींच संभवनीय नाहीं. एक पश्चिमेकडे तोंड करून चाललेला तर दुसरा पूर्वेकडे तोंड करून चाललेला अशी वास्तविक स्थिति असतां जणूं काय हे दोघेहि एकाच दिशेनें चाललेले, आहेत असा आजवर कित्येकांना खराखुरा भ्रम झाला व कित्येकांनीं तो तसा करून घेतला. पण हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ असाच निरंतर चालणें अशक्य होतें; व मुंबईच्या शिक्षण-परिषदेंत देशी भाषाभिमान्यांनीं आपलें मनोगत स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखविल्यामुळें या विरोधी विचारसरणीची धडक किंवा

टक्कर होऊन, आजवर झोंपेंत चालणारे हे लोक खाडकन् जागे झाले व हिंदी लोकांची शिक्षणाच्या बाबतींतील खरी राष्ट्रीय आकांक्षा काय आहे हें या झोंपाळूंना आतां पुरें स्पष्ट दिसून आलें, हा या शिक्षण-परिषदेचा आमच्या मतें सर्वांत मोठा फायदा झालेला आहे. प्रस्तुत अग्रलेखाच्या शिरोभागीं महात्मा गांधी यांच्या उद्गारांचें जें अवतरण आम्हीं घेतलें आहे तें वाचकांनीं या ठिकाणीं फिरून एक वेळ वाचल्यास ही आकांक्षा कशा प्रकारची आहे हें त्यांना कळून येईल. थोड्या दिवसांपूर्वीं रंगून येथील एक बॅरिस्टर पी. जे. मेहता, एम्. डी. यांनीं ‘ व्हर्न्याक्युलर्स ॲज मीडिया ऑफ इन्स्ट्रक्शन इन् इंडियन स्कूल्स अँड कॉलेजेस् ’ या नांवाचें एक लहानसें पुस्तक लिहिलेलें आहे, व त्या पुस्तकाला गांधी यांनीं जी प्रस्तावना जोडली आहे तींतील तें शेवटचें वाक्य आहे. सदरहू इंग्रजी पुस्तक देशी भाषाभिमानी लोकांनीं मिळवून अवश्य वाचावें अशी आमची त्यांस शिफारस आहे.

सदर प्रस्तावनेंत गांधी यांनीं फार थोडक्यांत अतिशय उत्कृष्ट तऱ्हेनें देशी भाषाभिमान्यांचें म्हणणें मांडलेलें आहे; त्यांत त्यांनीं दोनच पण अत्यंत समर्पक अशीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यावरून हिंदुस्थानांत इंग्रजी भाषेच्या द्वारें शिक्षण द्यावें असें म्हणणारे लोक अद्वितीय अशा अजागळ कोटींत पडतात हें दिसून येईल. पहिलें उदाहरण ज्यू लोकांचें. ज्यू लोकांना स्वतःचा असा देश नाहीं. जगाच्या अनेक व दूरदूरच्या भागांत आज शेंकडों वर्षें ते कायमची वसाहत करून राहिलेले आहेत; व त्या त्या देशांचे नागरिक बनलेले आहेत आणि फिरून ज्यू लोकांचा म्हणून एखादा स्वतंत्र देश होईल अशी आशाहि त्यांना करणें शक्य नाहीं. अर्थात् ज्या देशांत ते कायम राहिले त्या देशांत प्रचलित असलेली भाषाच त्यांनीं मातृभाषा मानली असती तरीहि नवल वाटलें नसतें. परंतु हिंदुस्थानांत हिंदी लोकांचा जो परस्पर नित्य संबंध येतो, तसा संबंध येण्याचा संभवहि नसतां केवळ सर्व जगभर पसरलेल्या ज्यू लोकांना परस्पर नैमित्तिक व्यवहार करतां यावा म्हणून त्यांनीं आपल्या ‘ यिडिश ’ नामक मातृभाषेस सर्व भाषांत उच्च स्थान देऊन तिच्यांतूनच ते मुलांना शिक्षण देतात. ज्या देशांत ते राहतात त्या देशाची भाषा त्यांना येत नाहीं असें नाहीं, उत्तम येतें. तथापि पर-

भाषेंतील ग्रंथ वाचून त्यांच्या आत्म्याचें खरें खरें समाधान होत नाहीं. म्हणून इतर लोकांनीं गोधडीवजा ठरवलेल्या व अवमानलेल्या पण ज्यू लोकांना मातृस्थानीं असलेल्या 'यिडिश' भाषेस त्यांनीं संस्कार देऊन व ग्रंथसमृद्ध करून एक-दोन पिढ्यांतच नांवारूपास आणलें आहे. जगभर पसरलेल्या व म्हणून कायमचा वियोग पावलेल्या ज्यू लोकांची ही स्थिति, तर हजारों वर्षें एकत्र राहून, हजारों बंधनांनीं एक गठ्ठा बनलेल्या हिंदी, बंगाली, मराठी, कानडी, गुजराथी, तामील, तेलगू वगैरे प्राचीन व परिणत भाषा बोलणाऱ्या लोकांनीं आपापल्या भाषांच्या द्वारेंच शिक्षण—मग तें कितीहि उच्च कोटींतलें असो—मिळविण्याची आकांक्षा धरल्यास त्यांस नांव कसें ठेवतां येईल ?

दुसरें उदाहरण दक्षिण आफ्रिकेचें. तेथील डच लोकांची 'टाल' नामक भाषा व इंग्रजांची इंग्रजी भाषा यांचें द्वंद्व आज कित्येक वर्षें चालू आहे; व तेथेंहि बोअर लोकांच्या मातृभाषाभिमानाचा विजय होऊन इंग्रजीलाच हार खावी लागली. हीं उदाहरणें देऊन गांधी यांनीं असें म्हटलें आहे कीं, "देशी भाषांवरून ज्यांचा विश्वास उडाला त्यांचा स्वतः आपल्यावरूनच विश्वास उडाला असें म्हटलें पाहिजे. देशी भाषेवरील अप्रीति हें राष्ट्रीय अधोगतीचें लक्षण होय." पण सुदैवानें ही अधोगति हिंदी लोकांना येण्याची पूर्वीं केव्हां भीति असली तरी, आज तरी ती खास नाहीं, तिनें निश्चयानें उलट खाल्ली आहे, असें मुंबई येथील शिक्षण-परिषदेवरून आम्हांला म्हणण्यास हरकत नाहीं. देशी भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापल्या जाव्या या तत्त्वाचा सदर परिषदेंत मान्यतेनें व स्पष्टतेनें उघड उच्चार झाल्यामुळें देशी भाषांच्या स्वराज्याचें निशाणच या परिषदेंत रोवलें गेलें असें आम्ही म्हणतों. अर्थात् या निशाणाभोंवतीं यापुढें अनेक युद्धें होतील; तथापि अखेर देशी भाषांचाच विजय होणार हें सांगण्याला कोणी ज्योतिषी किंवा भविष्यवादी नको.

[ २ ]

सदरहू विषयावर गेल्या अंकीं आम्हीं जे विचार प्रदर्शित केले होते, त्यांचा आणखीहि कांहीं दृष्टींनीं विचार करणें अवश्य आहे. मुंबई येथें

भरलेल्या शिक्षण-परिषदेंत देशी भाषांचा विषय चर्चेस निघून भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापल्या जाव्या अशी सूचना पुढें येऊन ती बहुमतानें मंजूर होण्याचा रंग दिसला, तेव्हां परिषदेचे तात्पुरते अध्यक्ष मि० भाभा ह्यांनीं " ही तर शिक्षणांतील राज्यक्रांतीच म्हणावयाची " अशा अर्थाचे उद्गार काढले असें म्हणतात. याच विषयासंबंधानें नंतर मुंबईच्या ' टाइम्स ' पत्रानें अशाच अर्थाची टीका करून वरतीं असेंहि म्हटलें कीं, ह्या विषयाच्या चर्चेंत देशी भाषांच्या अभिमान्यांनीं म्हणजे पर्यायतः मराठीच्या अभिमान्यांनीं हुल्लड किंवा दंगल करून गर्दी-मारामारींत आपलें काम साधून घेतलें. शिक्षण-परिषदेचा हा ठराव युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें मंजूर होऊन त्याला सरकारची मान्यता मिळून भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापन होईपर्यंत डोळे पांढरे होतील. आजच्या परतंत्रतेमुळें राष्ट्राची अशी स्थिति असतां शंभर वर्षांपूर्वींची मराठा कॉन्‌फिडरसी–अर्थात् महत्त्वाकांक्षी मराठे सरदारांचा संघ–फिरून निर्माण झाली असून तिनें आपल्या जुन्या लुटारू-पणाच्या स्वाऱ्यांना जणूं काय फिरून प्रारंभ केला आहे अशा तऱ्हेचे उद्गार एकदम मनांत उत्पन्न झालेल्या भीतीमुळें कां होईना, पण शहाण्या-सुर्त्या लोकांनीं काढलेले ऐकून कोणाला हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं ? राजकीय सुधारणांप्रमाणें शिक्षणविषयक सुधारणाहि हल्लींच्या परतंत्र स्थितींत मंद पावलांनींच चालत जाणार व ती अखेर पुरी अंमलांत येईपर्यंत तिच्या उपयुक्ततेचें शिक्षण तिला आज विरोध करणारांनाहि अखेर मिळणार याविषयीं आम्हांस शंका नाहीं. पण एखाद्या यक्षिणीच्या कांडीनें चमत्कार घडून आल्याप्रमाणें ही सुधारणा आज ताबडतोब घडून आली असें घेऊन चाललें तरी त्यांत वावगें तें काय आहे, याचा विचार प्रतिपक्षीयांनीं शांत मनानें करावा अशी आमची त्यांस विनंति आहे.

या बाबतींत प्रथम एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे ती ही कीं, देशी भाषांना स्वराज्य पाहिजे आहे ह्याचा अर्थ त्यांना फक्त आपल्यापुरती स्वतंत्रता पाहिजे आहे. एका देशी भाषेनें दुसऱ्या देशी भाषेच्या प्रांतावर स्वारी करून परकीयांचा मुलूख आपल्या हस्तगत करावा अशी कोणत्याहि देशी भाषेची इच्छा आज नाहीं व तशी इच्छा जर खरोखर कोणा देशी

भाषेची असेल तर इतर भाषाभिमान्यांनीं तिला विरोध करावा हें स्वाभाविक आहे. पण एका देशी भाषेनें दुसरीवर स्वारी करण्याचा हा प्रश्न नसून सर्व देशी भाषांनीं मिळून एका परकी भाषेविरुद्ध संघ करून आपापलें अंतःस्वातंत्र्य मिळविण्याचाच हा प्रयत्न आहे. मुंबई इलाख्यांत मुख्य देशी भाषा मराठी असल्यामुळें इतर भाषांचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना सहजच अशी शंका येते कीं, देशी भाषांच्या स्वराज्याच्या नांवाखालीं मराठे लोक सर्व इलाखाभर आपल्याच भाषेचें स्तोम माजवूं पाहात आहेत व वर्चस्व स्थापूं पाहात आहेत; पण अशा लोकांना आम्ही प्रांजलपणें व प्रामाणिकपणें असें आश्वासन देतों कीं, भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापणें किंवा देशी भाषांतून शिक्षण देणें ह्या सुधारणांची तरफदारी करितांना ज्यांची मातृभाषा मराठी नाहीं अशा एकाहि मनुष्यावर मराठी शिकण्याची अप्रत्यक्ष कां होईना पण सक्ति व्हावी अशी आमची बिलकूल इच्छा नाहीं. किंबहुना, आम्ही जेव्हां मराठीची बाजू पुढें मांडतों, तेव्हां उपलक्षणानें कानडी, गुजराथी, सिंधी वगैरे भाषांचीहि बाजू गर्भित रीतीनें पुढें मांडीत असतों. मराठीचे पुरस्कर्ते युनिव्हर्सिटींत किंवा लोकमतप्रदर्शक वर्तमानपत्राच्या मुलुखांत प्रमुख आहेत ह्या गोष्टीचा आमच्या कानडी, गुजराथी, सिंधी वगैरे बंधूंनीं विषाद न मानतां उलट आनंदच मानला पाहिजे; कारण ह्या इतर भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या लहान असल्यामुळें त्यांच्याकडूनच ह्या मोठ्या सुधारणांची तरफदारी होण्यास सुरुवात झाली असती तर युनिव्हर्सिटीनें किंवा सरकारनें या प्रश्नाची उपेक्षा किंबहुना उपहास केला असता. पण मराठी भाषा बोलणाऱ्या दोन कोटि लोकांच्या तर्फे हा प्रश्न मांडण्यांत आला असतां त्यांचीहि वासलात वरीलप्रमाणें लावण्याची सरकारची छाती होणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. मराठ्यांकडे म्हणजे मराठीच्या अभिमान्यांकडे या चळवळीचें धुरीणत्व येत असलें तरी तिचा हेतु इतर देशी भाषांचा आपल्या बरोबरीनें हक्क सांगण्याचा आहे व या चळवळीस फळ मिळाल्यास मराठीप्रमाणें इतर भाषांनाहि तें मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. 'मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया' अशी आमची समजूत असल्यामुळेंच कर्नाटक कॉलेजसारख्या

कर्नाटकाकरितां स्वतंत्र संस्था निघाल्यास आम्ही त्यांचें अभिनंदन करितों व राजकीय स्वराज्याच्या चळवळींत सर्वस्वीं एक असतां कानडी वाङ्मयाचा अभ्यास व प्रसार करणाऱ्या साहित्यसंस्था निघाल्यास या त्याच्या स्वतंत्रपणाच्या बाण्याचें आम्हांस केव्हांहि कौतुकच वाटतें. अशाच दृष्टीनें बडोदें, ग्वाल्हेर व इंदूर ह्या संस्थानांचे राज्यकर्ते मराठे असले तरी संस्थानांतील प्रजा मुख्यतः इतर भाषा बोलणारी असल्यामुळें त्यांनीं सरकारी दप्तराची भाषा गुजराथी किंवा हिंदी केल्यास आम्हांला मनांतून त्याचें बिलकूल वाईट वाटत नाहीं. मराठी मुलुखाच्या सरहद्दीला लागलेल्या व एकवार मराठीच्या अंमलाखालीं असलेल्या मुलुखांतील आमच्या बंधुवर्गाविषयीं आमची मनःस्थिति अशा प्रकारें निर्मळ असल्यामुळें सिंध वगैरे प्रांतांतील आमच्या बांधवांना आमच्या देशी भाषेच्या पुरस्काराच्या हेतूविषयीं यत्किंचित्‌हि अंदेशा येण्याचें कारण नाहीं हें सांगणें नकोच.

पण देशी भाषांच्या या वादांत ज्यांना स्वतःची म्हणून भाषा आहे अशांचें समाधान वरील विचारसरणीनें थोडेंबहुत करितां येईल. पण हल्लीं सरकारदरबारीं किंवा युनिव्हर्सिटींत दुर्दैवानें अशा लोकांचें वर्चस्व आहे कीं, त्यांना हिंदुस्थानांतील कोणत्याहि देशी भाषेचा अभिमान नाहीं व त्यांना आगंतुक कारणांनीं इंग्रजीसारख्या परभाषेचा भलताच अभिमान उत्पन्न झालेला आहे. आजपर्यंत ज्या कारणाकरितां राजकीय चळवळीच्या प्रगतीस मुंबई शहराचा जाच आम्हांला भासत होता तींच कारणें या देशी भाषेच्या सुधारणेच्या प्रगतीस अद्यापि आड येत आहेत असें कष्टानें म्हणावें लागतें. यांत दोष असला तर माणसापेक्षां परिस्थितीचाच अधिक आहे हें आम्ही जाणत नाहीं असें नाहीं. पण दोष कोणाचाहि असला तरी असला जाच दूर व्हावा याविषयीं आम्हांस झगडणें सारखेंच प्राप्त आहे, व केवळ हाच झगडा करण्याकरितां शिक्षण-परिषदेंत मराठी भाषेच्या अभिमान्यांनीं पुढाकार घेतलेला होता. मुंबई शहर हें मुंबई इलाख्याचाच नव्हे तर एका अर्थानें सर्व हिंदुस्थानच्या राजधानीचें शहर आहे व तेथील कारखानदारी, श्रीमंती, व्यापार वगैरे गोष्टी या राजधानीस अनुरूप अशा व सर्व हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीच्या आहेत ही गोष्ट आम्ही आनंदानें कबूल करितों.

पण एवंगुणविशिष्ट अशा या शहरास राष्ट्रीय भावनेच्या दृष्टीनें शुद्ध बकाली असें कंगाल नांव देण्याशिवाय गत्यंतर नाहीं याचें आम्हांस वाईट वाटतें. मुंबईतील सत्ता ही मुंबईतील लोकसंख्येच्या मानानें पाहतां सर्वस्वीं व्यस्त प्रमाणांत असलेली आढळून येईल. मुंबईतील शेंकडा सत्तर इतकी लोकसंख्या मराठ्यांची आहे. त्याच्या खालोखाल नंबर गुजराथी व हिंदुस्थानी भाषा बोलणारांचा लागेल, व एका अर्थानें मुंबईच्या वातावरणांत दगडी कोळशाच्या धुराच्या बरोबरीनें इंग्रजी भाषा मिसळल्याचा भास होत असला तरी ज्याची मातृभाषा खरोखरी इंग्रजी आहे अशा लोकवस्तीचा नंबर सर्वांत खालीं लागेल यांत शंका नाहीं. असें असतां मुंबई शहरांत पाहावें तों अभिमान सर्व इंग्रजी भाषेविषयीं! मातृभाषा म्हणून कांहीं पदार्थ आहे किंवा मुंबई शहराबाहेर मुंबई इलाखा म्हणून कांहीं आहे अशी कल्पनाहि येथील प्रस्थप्राय बनलेल्या लोकांच्या स्वप्नांतहि कधीं येत नाहीं व त्यामुळेंच सर्व शिक्षणविषयक सुधारणांची या शहरीं गळचेपी होते. पण त्यांतल्या त्यांत विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, आपल्या धंद्याच्या निमित्तानें मुंबई शहरीं वास्तव्य घडलेल्या मराठी, गुजराथी, कानडी वगैरे लोकांनाहि इंग्रजी भाषेचा अंमल कोणत्या बाबतींत किती चालावा याचा विवेक राहात नाहीं. व्यापार व राज्यकारभार या बाबीपुरता इंग्रजी भाषा अवश्य असली तरी शिक्षणाच्या कामीं किंवा घरींदारींहि इंग्रजीचें वर्चस्व असण्याचें कारण नाहीं; हा सूक्ष्म विचार केवळ धंदेवाईक लोकांना आपल्या धंद्याच्या गर्दींत दिसून न आला तरी शिक्षकवर्ग व राष्ट्रीय भावनेच्या दृष्टीनें विचार करणारे लोक यांना अशी डोळेझांक करतां येणें शक्य नाहीं; म्हणून मुंबई शहरीं मातृभाषांच्या स्वराज्याचें निशाण रोवण्याचें काम अत्यंत अवघड असलें तरी त्या कामास खरा प्रारंभ येथेंच झाला पाहिजे, व तसा प्रारंभ शिक्षण-परिषदेंत झाला याबद्दल आम्हांस समाधान वाटतें. मुंबई शहराची परिस्थिति विशेष प्रकारची असल्यामुळें फार तर इतकें म्हणतां येईल कीं, मुंबई इलाख्यांत महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, सिंध हे जसे भाषेच्या दृष्टीनें स्वतंत्र पोटप्रांत होतात, तसाच मुंबई शहर हाहि एक स्वतंत्र पोटप्रांत असावा व वर सांगितल्याप्रमाणें मुंबई शहरीं इंग्रजी मातृभाषा असणारांची संख्या सर्वांत थोडी असली तरी इंग्रजीच्या अभिमान्यांचे

सर्व चोचले पुरविण्याला किंवा इंग्रजीला मनसोक्त धुडगूस घालण्याला मुंबई शहर हें मोकळेंच सोडून देण्यास सर्व लोकांनीं तयार व्हावें. पण सर्व इलाखा म्हणजे कांहीं मुंबई शहर नव्हे. ह्या दृष्टीनें, विद्येचें आदिपीठ जी युनिव्हर्सिटी तिचें संस्थान मुंबई शहरीं असलें तरी तिचें धोरण व तिचा कारभार मुंबई शहराच्या तंत्रानें न चालतां इलाख्याच्या तंत्रानेंच चालला पाहिजे, हा हक्क किंवा तो बजावण्याचा आग्रह आम्ही केव्हांहि सोडणार नाहीं.

मातृभाषाविषयक सुधारणासंबंधानें लिहितांना मुंबईच्या एका प्रमुख इंग्रजी पत्रानें असें ध्वनित केलें आहे कीं, देशी भाषांतून शिक्षण देणें, परीक्षा घेणें व भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापन करणें या कल्पना दिसण्यांत जरी मोहक दिसल्या तरी त्या अव्यवहार्य म्हणून तरी त्याज्य होत. या बाबतींत या पत्राकडून इतकी सौम्य भाषा वापरली गेली याचेंहि कारण झालें तरी शिक्षणपरिषदेंत मातृभाषाभिमान्यांनीं विशेष जोर धरून या अंध आक्षेपकांच्या डोळ्यांवर सत्य तत्त्वाचा प्रकाश बराचसा पाडला हेंच होय. पण टीकेची भाषा सौम्य असली तरी म्हणून विरोधाची अढी मोडलेली आहे असें घेऊन चालणें शहाणपणाचें होणार नाहीं. मातृभाषांच्या प्रगतीच्या मार्गांत अव्यवहार्य असें अगडबंब नांव घेऊन जे किल्लेकोट उभारण्यांत येतात त्यांच्यावर कसून हल्ला करून ते वेळींच जमीनदोस्त करून टाकले पाहिजेत. स्वराज्याच्या मागणीच्या मार्गांतहि संभावितपणानें विरोध करूं इच्छिणारे लोक हाच अव्यवहार्यतेचा अडथळा आणीत असतात ही गोष्ट आतां प्रसिद्धच आहे. पण कोणतीहि सुधारणा व्यवहार्य किंवा अव्यवहार्य हें ठरणें तिच्या पुरस्कर्त्यांच्या उद्योगावर व जोरकसपणावरच अखेर अवलंबून असतें, हें जसें स्वराज्याच्या चळवळींत आतां बरेंचसें प्रत्ययास आलें आहे, तसेंच या शिक्षणाविषयक सुधारणेच्या कामींहि तें आपणांस प्रत्ययास आणून देतां येईल. मात्र देशभाषांची ही चळवळ कांहीं प्रमुख लोकांनीं स्वतःच तिला वाहून घेऊन नेटानें करीत राहिलें पाहिजे. मुंबई युनिव्हर्सिटी ही इलाख्यांतील लोकांकरितां आहे, लोक कांहीं या युनिव्हर्सिटीकरितां नाहींत हें जें या विषयांतील आद्यतत्त्व तें युनिव्हर्सिटीच्या दारावर लिहून ठेविलें पाहिजे व तें तेथें सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यास सोयीनें परवानगी न मिळेल तर पूर्वी युरोपांत

ल्यूथरनें पोपला धाब्यावर बसवून आपल्या धर्मविषयक सुधारणांचीं अक्षरें वेशीवर जशीं खिळे ठोकून चढविलीं तशींच आमच्या शिक्षणसुधारकांनींहि तीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या दारावर निश्चयाचे खिळे ठोकून चढविलीं पाहिजेत. मातृभाषेच्या द्वारें सर्व प्रकारचा शिक्षण-व्यवहार करणें ही गोष्ट कदाचित् थोडीबहुत खर्चाची असेल किंवा या सुधारणेमुळें युनिव्हर्सिटीच्या कचेरीचा कारभार थोडाबहुत वाढेल ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. पण सर्व राष्ट्रीयत्वाच्या मुळाशीं असलेल्या अशा हिंदी भाषांचा विचार करीत असतां ५।५० हजार रुपये खर्च अधिक लागेल किंवा युनिव्हर्सिटीच्या कचेरींत १०।५ कारकून अधिक ठेवावे लागतील, किंवा १०।२० परीक्षक आणि १००।५० शिक्षक अधिक नेमावे लागतील, अशा पोरकट सबबींवर ही सुधारणा आम्हीं मागें पडूं दिली तर त्यांत सरकारच्या शहाणपणापेक्षां आमच्या पुरुषार्थाचीच परीक्षा अधिक होणार आहे. असले प्रश्न जगांत आज पहिल्यानें हिंदुस्थानांत उत्पन्न झाले आहेत असें नाहीं. राजाची भाषा एक व प्रजेची भाषा दुसरीच अशा प्रकारची भानगड यापूर्वीं कमींत कमी १०।५ देशांत तरी उपस्थित झालेली होती व त्या प्रत्येक ठिकाणीं अखेर मातृ-भाषांच्या पुरस्काराचाच जय झाला ही गोष्ट मुंबईतील धेंडांनीं व सरकारनेंहि लक्षांत वागविली पाहिजे. येथील फर्ग्युसन कॉलेजांतील एक प्रोफेसर व शिक्षाविचार-मंडळाचे अध्यक्ष रा. विश्वनाथ बळवंत नाईक, एम्. ए. ह्यांनीं ह्या विषयावर एक निबंध लिहून नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यांत या वाद-ग्रस्त प्रश्नाचा निकाल इतर देशांतून लोकांनीं कसा लावून घेतला ह्याची साधार माहिती दिलेली आहे, ती या प्रश्नाचा विचार करणारांनीं एकवार अवश्य वाचावी अशी आमची शिफारस आहे. जी स्थिति आज इंग्रजी अंमलामुळें हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे, तीच पूर्वी रशियन अंमलाखालीं फिनलंडांत, ऑस्ट्रियन अंमलाखालीं हंगेरींत, ब्रिटिश अंमलाखालीं कानडा व दक्षिण आफ्रिका यांमध्यें उत्पन्न झाली होती. पण त्या त्या ठिकाणीं प्राथमिक शिक्षणापासून वरिष्ठ शिक्षणापर्यंत सर्व व्यवहार प्रजाजनांच्या मातृभाषेंतूनच झाला पाहिजे असा निकाल होऊन तो अंमलांतहि आलेला आहे. दक्षिण आफ्रिकेंत या प्रश्नावर रणें माजून त्या वादाला राजकीय स्वरूप प्राप्त

झालें होतें. पण १८८२ सालापासून पुढें १०।५ वर्षे डच लोकांनीं जी जोराची चळवळ केली तीमुळें सरकारी कमिशन नेमण्यापर्यंत पाळी येऊन अखेर डच भाषेच्या वतीनेंच निकाल लागला व कमिशननें असा अभिप्राय दिला कीं प्रजा या नात्यानें मुलांना योग्य शिक्षण म्हणजे ज्ञान कोणतें द्यावें हें ठरविण्याचा आधिकार आपला आहे असा जरी सरकारास हक्क सांगतां आला तरी आपल्या मुलांना कोणत्या भाषेच्या द्वारें शिक्षण मिळावें हें ठरविण्याचा हक्क सर्वस्वीं आईबापांनाच असला पाहिजे. सदर कमिशननें असाहि अभिप्राय दिला आहे कीं, परभाषेच्या द्वारें शिक्षण देण्यानें कोणत्याहि विषयांत पूर्णता अशी येत नाहीं, व विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर विनाकारण दाब पडून वरतीं त्यांच्या बुद्धिमत्तेची मात्र हानि होते; म्हणून कोणत्याहि शाळेंत डचमधून शिकवावें किंवा इंग्रजींतून शिकवावें हें ठरविण्याचा अधिकार शाळाखात्याला बिलकूल असूं नये. हंगेरीमध्यें हा वाद अशाच रीतीनें संपून तेथें कित्येक शाळांतून दोन दोन काय, पण तीन तीन भाषांतूनहि शिक्षण देण्यांत येतें. दोन भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा १६०० असून तीन भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा कमींत कमी १०० आहेत. हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशाचा नामनिर्देश एका शब्दाने होतो. एवढ्यामुळें सर्व देशांत एकच भाषा चालावी अशी भ्रामक कल्पना कित्येकांच्या डोक्यांत येते. पण हिंदुस्थानांतील एकेक पोटप्रांत एवढा मोठा आहे कीं, तो युरोपांतील दोन दोन, तीन तीन स्वतंत्र देशांहूनहि मोठा भरू शकेल ही वस्तुस्थिति मात्र त्यांच्या लक्षांत येत नाहीं. मुंबई इलाख्यांतील मराठी तर राहोच पण गुजराथी, कानडी वगैरे भाषा बोलणाऱ्यांची संख्या एवढी मोठी आहे कीं, त्या प्रत्येकाकरितां एकेक स्वतंत्र. युनिव्हर्सिटी काढली तर हवी; असें असतां एकस्या मुंबई शहरांतील बकाली वस्तीच्या आग्रहामुळें त्याच्या मातृभाषा दडपून टाकून त्यांना परकी भाषेंतून शिक्षणव्यवहार करावयास लावणें ही राष्ट्रीय दृष्ट्या जुलुमाची परमावधि होय. हा भाषाविषयक प्रश्न वर सांगितलेल्या देशांतून स्वराज्याकांक्षेच्या जोरावरच सोडविण्यांत आला व त्याच आकांक्षेच्या जोरावर आपण तो येथेंहि सोडवूं अशी उमेद आम्हांला खचित वाटते.

● ● ●

# ७ : इतिहास व इतिहास-संशोधन

" मी स्वतः कोणी मोठा इतिहासकार किंवा इतिहाससंशोधक नाहीं. तथापि, या विषयाची मला विशेष आवड आहे. ज्या संस्थेच्या वाढदिवसानिमित्त आजचें व्याख्यान आहे तिचा जन्म १० वर्षांपूर्वी झाला. त्याहिपूर्वी ३०।३५ वर्षें इतिहास-संशोधनास सुरवात झालेली असून या अवधींत या विषयाची जी मेहनत-मशागत झाली तिचेंच फळ प्रस्तुत संस्था हें होय. इतिहास-संशोधनावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप आहेत. एक म्हणतो, नवा इतिहास बनवितां येत नसला म्हणजे जुन्याची आठवण होते ! पण शनवारचा वाडा बांधतां आला नाहीं म्हणून त्याचे पाये उकरून जुनी मांडणी-मोडणी दाखविणें हेंहि एक काम आहे. हल्लींहि इतिहास बनत नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. आज घडत असलेल्या इतिहासाचेंहि पन्नास वर्षांनीं चीज होईल. सरकारी पब्लिक वर्क्स-खात्याप्रमाणें एकीकडे नवी इमारत बांधणें व दुसरीकडे जुन्या इमारतींची रिपेरी करणें हीं दोनहि कामें बरोबर चाललीं पाहिजेत. ऐश्वर्यसंपन्न जिवंत राष्ट्रेंहि आपल्या जुन्या इतिहासाचें संशोधन करितात. जगांत आज आपल्या डोळ्यांदेखत नवा इतिहास कर्तेपणानें घडविण्याचें श्रेय इंग्लंडइतकें दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रास लाभत नाहीं. तथापि, इंग्लंडचे लोक अद्यापि इंग्रजी इतिहासाचें संशोधन करितात. ब्रिटिश म्युझियममधील जुनींपुराणीं हजारों हस्तलिखितें, सनदा, शिक्के वगैरे पाहिले म्हणजे मनुष्य थक्क होऊन जातो. नेबूरनें रोमन इतिहासाचें संशोधन व मॅक्समुल्लर प्रभृतींनीं वैदिक इतिहासाचें संशोधन केलें त्याला स्वदेशाचा अभिमान हेंहि कारण नव्हतें. आणि खरोखरच हा निःस्वार्थी आनंद आहे. संशोधकाला हर्ष, अमर्ष, खेद हे मुळींच नसतात. त्याला पानपतच्या पराभवाचीं पत्रें सांपडोत, नारायणरावाच्या वधाचीं सांपडोत किंवा सवाई माधवरावाच्या रंगपंचमीच्या विलासाचीं सांपडोत, त्याला तीं सर्वच सारखींच प्रिय असतात. मनुष्य निःस्वार्थी असून उत्साही असला म्हणजेच त्याला विक्षिप्त म्हणूं लागतात. संशोधक हा मोठा ' रोमँटिक ' प्राणी आहे. कित्येक इतिहास-संशोधक स्वतःस या उत्साहभरांत हास्यास्पदहि करून घेतात, नाहीं

असें नाहीं. याचें उत्कृष्ट वर्णन ' पिक्विक पेपर्स ' नामक इंग्रजी कादंबरींत आहे. एका खुळ्यानें एक शिल्पलेख आणला, त्याचीं सतरा संशोधकांनीं सतरा पाठांतरें बनविलीं तरी त्यांतून कांहींच अर्थ निघेना, तेव्हां पन्नास विद्वान् सभासदांकडून त्यावर पन्नास निबंध लिहिले जाऊन तुंबळ रणें माजलीं; व शेवटीं अकल्पित रीतीनें असें उघडकीस आलें कीं, यांतील दगड तेवढा फार प्राचीन—सर्वच दगड प्राचीन असतात—पण त्यावरील लेख मात्र अगदीं ताजा ! मला वाटतें विश्वगुणादर्शकाराच्या हातीं ' संशोधक ' सांपडता तर त्यानें खालच्या दोन श्लोकांतल्याप्रमाणें त्याची स्तुतिगर्भनिंदा केली असती.

" उद्ध्वस्तवर्णरुचिचित्रकलापहर्म्यः
  विच्छिन्नलेखनपुराणशिलासनस्थः ।
दुष्कीटभुक्तशतपत्रपटोत्तरीयः
  निर्मूल्यनाणकगणैः परिपूर्णकोशः ।
नष्टाधिकारपरिहासितगर्वमुद्रः
  संदेहवृत्तिवशबृंहणयन्त्रदृष्टिः ।
श्रद्धावितर्कपरिचारकवेष्टितांगः
  संशोधकः खलु प्रशास्ति विशून्यराज्यम् ॥ "

यांत वर्णन केल्याप्रमाणें या संशोधक—महाराजांचा वाडा रंग उडून गेलेल्या चित्रांनीं भूषित असतो. त्यांचें सिंहासन म्हणजे पुसट लेख असलेला जुना दगड, त्यांचीं राजवस्त्रें म्हणजे कसरीनें खाल्लेलें जुनाट कागदपत्र ! त्यांच्याहि खजिन्यांत नाणीं भरलेलीं असतात, पण बाजारांत एकहि चालत नाहीं. मन संशयानें ग्रासल्यामुळें डोळ्यांला नेहमीं Magnifying glass लागून राहिलेला. आसपास अंधश्रद्धा व तर्कवितर्क यांचा गराडा. अशा शून्य राज्यांत राज्य करणाऱ्या या राजाची मुद्रा म्हणजे शिक्कामोर्तबहि आहे; पण त्यांच्या आज्ञापत्रानें बोटभर जमीनहि कुणाला दिली जात नाहीं आणि सैन्यदळच काय पण एखाद्या झाडाचें दळ म्हणजे पानहि तो हालवूं शकत नाहीं. मार्क ट्वेनच्या Prince and Pauper या कथानकांतील तोतया

राजपुत्राला राजवाड्यांतल्या जड शिक्कामोर्तबाचा उपयोग बदाम फोडून खाण्याला तरी झाला. आमच्या संशोधकाला मिळालेल्या शिक्क्यानें आज्ञापत्र चालत नाहीं व त्यानें तो बदामहि फोडणार नाहीं !

हा सर्व विनोद झाला पण तो स्तुत्यर्थ आहे. अर्थात् जी त्यांची थट्टा म्हणून दिसते ती सर्व निःस्वार्थी व शुद्ध ज्ञानाभिलाषी इतिहाससंशोधकाची निर्भेळ स्तुतीच आहे. संशोधक हा एक कृमि आहे. पण तो भक्षक कृमि नसून रक्षक कृमि आहे. संशोधक हे काळाचे शत्रु होत. काळ मोकळा सोडला तर तो क्षणशः व कणशः सर्व नाश करीत असतो. पण संशोधक हे काळाच्या चाळणीचीं भोकें शक्य तितकीं निरुंद करीत असतात. इतिहास-संशोधनानें राष्ट्रस्मृतीचा तंतु अखंड राहतो व स्मृतिपरंपरा ही आनंद उत्पन्न करणारी असून व्यवहारालाहि उपयोगी असते. संशोधन करून इतिहास रचण्याचा फायदा कित्येकांस समजत नाहीं. इतिहासाचा तरी उपयोग काय ? तो वाचून मनुष्य शहाणा होतो या म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. Knowledge comes but Wisdom lingers. ( ज्ञान धांवतें पण शहाणपण रांगतें ) हीच म्हण खरी. इतिहासज्ञानानें खरोखरच मनुष्य शहाणा होता ' तर ( History repeats itself ) इतिहासाची पुनरावृत्तिच होतेच ही म्हण पडली नसती. पुनरावृत्ति होते याचा अर्थ पूर्वी ज्या स्थितींत मनुष्य जसा वागला त्या स्थितींत तो तसाच फिरून वागणार; मग इतिहास वाचून तरी काय करावयाचें आहे ? एका अर्थानें हें खरें आहे. पण इतिहासाला व्यावहारिक ( Applied ) ज्ञान न म्हणतां शुद्ध ( Pure ) ज्ञान म्हटलें तरी त्याचें संशोधन अनिर्वाह्यच ठरतें. संशोधनाच्या परिसानें जुनें व नवें यांचें क्षणांत मधुर मीलन होतें. ययातीप्रमाणें जुना काळ हा नव्या काळापासून तारुण्य घेतो, व पुरूप्रमाणें नवी पिढी आपल्या गत इतिहासा-पासून वार्धक्याचें ऐश्वर्य मिळवितें. संशोधन हें कधींहि फुकट जात नाहीं. त्याच्या आधारानें बनविलेले सिद्धान्त पुढें-मागें खोटें ठरोत; परंतु पुराव्याचें साधन या दृष्टीनें संशोधित द्रव्य नित्य आहे. शेवटीं संशोधकांना एकच सूचना करावयाची ती ही कीं, त्यांनीं निर्विकार मनानें सत्यान्वेषणाचीच दृष्टि ठेवली पाहिजे व साधनें मिळवितांनाहि महत्त्वाचीं कोणतीं व टाकाऊ

कोणतीं, दुर्मिळ कोणतीं व सुलभ कोणतीं याचा विवेक ठेवला पाहिजे. Archæology आणि Architecture किंवा Antiquity व Art या जोड्या केवळ समानार्थक शब्दांच्या असें मानलें जाऊं नये. कालानें होणारा नाश टाळणें हें जसें अवश्य, तसेंच क्षुद्र गोष्टींचा नित्य नाश करीत राहणें हेंहि अवश्य आहे. मृतांनींच जर जगाची सर्व जागा अडविली तर जित्यांनीं जावें कुठें ?

• • •

# ८ : मराठेशाही कशानें बुडाली ?

## ब्राह्मणांची जबाबदारी

मराठेशाही बुडविल्याचा दोष दुसऱ्या बाजीरावावर सहजच येतो, व त्या दोषास धनी होण्याइतकी त्याची लायकीहि होती यांत शंका नाहीं; पण एक तर एका रावबाजीशिवाय ज्याला सामान्यतः नादान म्हणतां येईल असा कदाचित् नारायणरावाखेरीज पेशवाईंत दुसरा पुरुषच झाला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. सवाई माधवराव अल्प वयांत वारला, व त्याच्या नांवानें राज्यकारभार चालत असला तरी तो सर्व नाना फडणवीस चालवीत असे. अर्थात् राज्यरक्षणाच्या दृष्टीनें सवाई माधवरावाच्या कारकीर्दीस नांव ठेवण्यास जागा उरत नाहीं. रघुनाथराव स्त्रैण होता तरी तलवारबहाद्दर होता व या दृष्टीनें राज्यरक्षणास त्याचा उपयोगच झाला असता, या सर्वांवरून निदान एवढें खास म्हणतां येईल कीं, सतराशें चौदापासून सतराशें नव्याण्णवपर्यंत मराठी राज्याची चढतीच कमान होती, व खर्ड्याच्या लढाईपर्यंत मराठी दौलतीचा जो डौल होता तो तसाच पुढें टिकता तर मराठी राज्य बुडण्याचें कांहींच कारण नव्हतें. मराठ्यांच्या राज्यांत ब्राह्मण पेशवे हे जसे उदयास आले व मराठ्यांनीं त्यांस उदयास आणलें, तसेंच ब्राह्मण पेशव्यांच्या अमदानींत

त्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड यांसारखे मराठे सरदार उदयास आणले. मराठी राज्य टिकविण्याची जबाबदारी एकट्या पेशव्यांवरच होती असें म्हणतां येत नाहीं. पेशवे, रास्ते, पटवर्धन या ब्राह्मण सरदारांइतकीच सातारकर महाराजांवर व शिंदे, होळकर, गायकवाड या मराठे सरदारांवरहि ती होती. साताऱ्च्या दरबारांत पेशव्यांस वरिष्ठ मान होता तो माधवराव पेशव्यांपर्यंत त्यांच्या कर्तबगारीमुळें सकारणच होता. शाहूमहाराज कधींहि पेशव्यांच्या कैदेंत नव्हते, व त्यांच्यामागून आलेल्या साताऱ्च्या गादीच्या धन्यास कैद झाली असल्यास तीहि त्यांच्या नादानपणामुळें सकारण होती. साताऱ्च्या गादीचा अभिमान शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे ब्राह्मणेतर सरदारांस होता किंवा नव्हता यांपैकीं एक कांहीं तरी निश्चित म्हटलें पाहिजे. त्यांना हा अभिमान नव्हता म्हटलें म्हणजे पेशव्यांवरील दोषारोपांचा सर्वच ग्रंथ आटोपला. उलटपक्षीं त्यांना हा अभिमान होता असें म्हटलें तर त्यांना पेशव्यांस बाजूस ठेवून व सातारकर महाराजांचें नांव पुढें करून राज्यकारभार चालविण्याचा उद्योग करण्यास नको कोणी म्हटलें होतें ?

## मराठ्यांची जबाबदारी

पण शिंदे, होळकर व गायकवाड यांच्या मनांत साताऱ्च्या गादीचा विशेष अभिमान धरण्याचें कधीं आलें असें कागदपत्रांवरून दिसत नाहीं. शिंदे-होळकरांनीं मुलूख मिळविला तो सर्व उत्तर हिंदुस्थानांत व तेथें त्यांनीं स्वतंत्र होऊन राज्यें स्थापण्याचा प्रयत्न केला. शिंद्यांनीं तर सालबाईच्या तहाच्या वेळीं स्वतःस स्वतंत्र संस्थानिक बनवून पेशवे किंवा सातारकर महाराज यांपैकीं कोणाचाच मुलाजा ठेवला नाहीं. यावर कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, शिंदे, होळकर व गायकवाड हे मूळ पेशव्यांच्या अमदानींत प्रत्यक्ष उदयास आले, त्यांच्या घराण्यांतील मूळ पुरुषांस पेशव्यांनींच हातांशीं धरून प्रथम सरदार बनविलें, यामुळें त्यांना पेशवे हेच आपले धनी असें वाटे, व एका अर्थानें हें खरेंहि आहे. राणोजी शिंद्यानें पहिल्या बाजीरावाचे जोडे उरावर संभाळून व इमानाची परीक्षा देऊन सरदारी मिळविली आणि त्याचा

मुलगा महादजी यानेंहि उत्तर हिंदुस्थानांत पराक्रम करून दिगंत कीर्ति मिळविली, तरीहि तो पेशव्यांच्या चरणपादुकांना विसरला नाहीं; व सवाई-माधवरावास दिल्लीच्या बादशहाकडून आणलेलीं वकीलमुतालकीचीं वस्त्रें ज्या हातानें अर्पण करून पेशवाईच्या ऐश्वर्यांत भर घातली, त्याच हातानें त्यानें सवाई माधवरावांचे जोडे उचलले ! शिंद्यांच्या दौलतीच्या भूषणांत पेशव्यांचे जोडे राखून ठेवण्यांत आले होते असें ग्रँट डफ म्हणतो ! पण महादजीच्या वेळेपर्यंत शिंद्यांनीं पेशव्यांच्या गादीशीं जें इमान राखलें तें पुढें दौलतराव शिंद्यानें कितपत पाळलें ? दुसरा बाजीराव नादान म्हणून आपल्या धन्याला प्रतिबंधांत ठेवण्याचा हक्क जर शिंदे–होळकरांस पोहोंचत होता तर पेशवे किंवा फडणवीस यांनाहि सातारकर महाराज नादान वाटल्यास त्यांनाहि प्रतिबंधांत ठेवण्याचा हक्क कां पोहोंचूं नये ? साताराचे राजे शिवाजीमहाराजांचे वंशज या नात्यानेंच पाहावयाचे, तर शिंद्यांनीं कोल्हापुरकरांवर फौज कां न्यावी ? कोल्हापुरकर झाले तरी शिवाजीचे वंशजच होते. तात्पर्य, इमान हें कोणत्याहि एखाद्या तत्त्वाच्या कसोटीस लावून त्यावरून निमकहरामपणा ठरवावयाचा; तर मराठे सरदार हे पेशवे व फडणवीस यांच्याइतकेच दोषी किंवा निर्दोषी, म्हणावे तसे, सारखेच ठरतील, शिंदे व होळकर यांनीं इंग्रजांशीं शेवटीं जे तह केले त्यांत त्यांनीं साताऱ्च्या गादीची किंवा सर्व-साधारणरीत्या शिवाजीच्या वंशजांची आठवण ठेवली होती असें दिसत नाहीं. सर्व गोष्टींतली गोष्ट ही कीं, पेशवाई बुडाल्यानंतर छोटेंसें का होईना, पण इंग्रजांनीं सातारकर महाराजांस स्वतंत्र राज्य दिलें होतें तें तरी सातार-करांनीं कोठें टिकविलें ? पेशवाईच्या नाशानंतर अवघ्या ३० वर्षांत हेंहि राज्य बुडालेंच कीं नाहीं ? बरें, इंग्रज सर्वच बुडवावयास निघाले होते असें म्हणावें तर शिवाजीच्या वंशजांचें एक राज्य अद्याप कोल्हापुरास व पेशव्यांचे सरदार शिंदे-होळकर यांचीं राज्यें उत्तर हिंदुस्थानांत अद्यापि जिवंत आहेत ! या सर्व गोष्टींचा विचार करतां मराठेशाही बुडण्यास अमुक एकच पुरुष किंवा अमुक एकच घराणें अथवा जात कारणीभूत झाली असें म्हणतां येत नाहीं. इंग्रजी सत्तेचा पूर आला म्हणून कोणत्या तरी निमित्तानें त्या पुरांत मराठी राज्यें वाहून गेलीं; व पुरांत झालें तरी सर्वच झाडें उन्मळून पडतात

असें नाहीं, कांहीं टिकताताहि. या न्यायानें वर दर्शविल्याप्रमाणें कांहीं मराठी राज्यें अद्यापि टिकून आहेत.

मराठी पातशाही बुडविली असा आरोप करून ब्राह्मणांना दोष देणारे जसे कांहीं असमंजस लोक आढळतात; तसेच पेशवाईच्या अखेर इंग्रजांशीं परस्पर राजकारण करून आपली बंधमुक्तता करूं पाहण्याचा प्रयत्न केल्याचा दोषारोप सातारच्या दरबारावर करून पेशवाई बुडविण्यास त्यांनीं मदत केली असें म्हणणारे असमंजस लोकहि कांहीं आढळतात. पेशवे नोकर व सातारकर महाराज धनी हें नातें लक्षांत घेतां पेशव्यांनीं त्यांना कैदेंत ठेवणें अयोग्य होतें असें एका दृष्टीनें म्हणतां तरी येईल; पण आपणांस कैदेंत टाकणाऱ्या नोकराविरुद्ध व तीहि स्वतःच्या बंधमुक्ततेकरितां इंग्रजांपाशीं दाद मागण्यानें सातारकर धन्यास बेइमानीचें लांछन कसें लागूं शकतें हें समजणें कठीण आहे.

## व्यापारी धोरण चुकलें काय ?

इंग्रज लोक हिंदुस्थानांत प्रथम व्यापारी वेषानें आले व नंतर हळू हळू त्यांनीं राज्य स्थापन केलें. या गोष्टीस अनुलक्षून पुष्कळांस कदाचित् असा प्रश्न सुचत असेल कीं, " मराठ्यांची मूळ चूक हीच झाली नाहीं काय कीं, त्यांनीं इंग्रजांना आपल्या देशांत व्यापाराची परवानगी दिली ? " पण असला प्रश्न समंजसपणाचा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आजचे विचार जुन्या काळाला लावण्याची चूक मनुष्य नेहमीं करीत असतो. ज्या वेळीं इंग्रज लोक व्यापार करण्यास प्रथम हिंदुस्थानांत आले, त्या वेळीं हे आपल्या देशांत न आलेले बरे असें वाटण्यास कांहींच कारण नव्हतें. पुढें हे लोक आपणांस भारी होऊन आपलें राज्य घेतील असें दुःस्वप्न मराठ्यांना त्या वेळीं पडलें नाहीं. कारण, त्यांच्या वेळच्या व त्यांना माहीत असलेल्या जगाच्या पूर्वीच्या इतिहासांत हातांमध्यें प्रथम तागडी घेऊन येऊन मागाहून तख्त बळकावल्याचें उदाहरण घडलेलें नव्हतें. वैश्यवृत्ति व क्षात्रवृत्ति या वेगळ्या आहेत, त्यांची अदलाबदल होऊं शकत नाहीं, किंबहुना वर्ण हा वृत्तिनिष्ठ असल्यामुळें वृत्तिसंकर म्हणजे तो एक वर्णसंकरच, अर्थात् पाप

होय; व हें पाप कोणी म्हणजे परके लोकहि करीत नसतात, असें चातुर्वर्ण्यावर विश्वास ठेवणाऱ्या हिंदी लोकांस वाटलें असल्यास नवल नाहीं ! महाराष्ट्र देशांत मारवाडी वगैरे वैश्यवृत्तीचे लोक अनेक झाले व त्यांनीं व्यापाराकरितां देशान्तरहि केलें; पण त्यांच्यांपैकीं कोणी राज्याची आकांक्षा धरल्याचा अनुभव नव्हता. मोगल वगैरे यवन इकडे येऊन त्यांनीं राज्यें स्थापिलीं ही गोष्ट खरी; पण ते उघड उघड जेते म्हणूनच आले, व्यापारी म्हणून आले नव्हते. अर्थात् व्यापाऱ्याची जात वेगळी व राज्य करणारांची जात वेगळी, तिची अदलाबदल होऊं शकत नाहीं, असाच त्या वेळच्या मराठ्यांचा विश्वास असावा असें वाटतें; आणि तसा तो असल्यास चूक म्हणतां येणार नाहीं !

आपल्या हातांतून तागडी गळून पडली केव्हां, तलवार तेथें आली केव्हां व आपल्या बुडाखालीं तख्त बसलें केव्हां. हें स्वतः इंग्रजांचें इंग्रजांनाच जर कळलें नाहीं, सर्व प्रकार जर त्यांनाहि स्वप्नसाक्षात्काराप्रमाणें झोंपेंतच झाला, तर मराठ्यांना तरी टोपीकर पहिल्यानें डोळ्यांस दिसतांच हे पुढें आपलें राज्य घेणार असें कसें वाटावें? व त्यांना आपल्या राज्यांत राहूं देण्यास प्रतिबंध करण्याची बुद्धि त्यांना कशी व्हावी ? उलटपक्षीं, ते आपल्या राज्यांत आले तर बरें असेंच वाटलें असावें. ‘ स्वदेशी ’ चा मंत्र मनुष्याला फक्त प्रसंगविशेषींच म्हणजे आपत्तीच्या किंवा विपत्तीच्या विशेष प्रसंगींच आठवतो, सुस्थितींत आठवत नाहीं, हें प्रसिद्धच आहे. मूर्तिमंत समंध पुढें येऊन उभा राहिला म्हणजे मग तोंडांत रामनाम येतें ! हिंदी लोकांना बंगालच्या फाळणीनंतर ‘ स्वदेशी ’ आठवली व इंग्रजांना ती सांप्रतच्या महायुद्धानंतर आठवली ! इंग्रज हिंदुस्थानांत आले तेव्हां हिंदी लोक सुस्थितींत होते, तेव्हां आजच्या अर्थानें ‘ स्वदेशी ’ कशी सुचणार ? मनुष्य हा स्वभावतः विलासप्रियच असतो. सांपत्तिक सुस्थिति असली म्हणजे विलासबुद्धि सहजच बळावते. शिवाय असा कोणताहि देश नाहीं कीं ज्याला सर्व प्रकारच्या कारागिरीचा किंवा कलाकौशल्याचा मक्ता ईश्वरानें दिला आहे. म्हणूनच चैनीचे, विलासाचे पदार्थ मिळतील तेथून आपपरभाव न ठेवतां मनुष्यास विकत घ्यावे लागतात. एरवीं चैन किंवा विलासबुद्धि पुरी होत नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रज हेच कांहीं पहिले विदेशी व्यापारी आले नव्हते. त्यांच्यापूर्वीं पोर्तुगीज, त्यांच्यापूर्वीं

डच, त्यांच्यापूर्वीं यवन असे अनेक परकीय लोक इकडे व्यापाराकरितां येत असून परदेशी माल विकत घेण्याचा परिपाठ इकडे सर्रास पडलेला होता. बरें, मराठे कांहीं एकच सर्वसत्ताधारी नव्हते. त्यांचा मुलूख आधींच थोडा, त्याला समुद्रकिनाऱ्याची एकच पट्टी व या पट्टींत इंग्रजांचा व्यापार थोडा होता. त्यांचा व्यापाराचा भर मराठ्यांच्या हातीं नसलेल्या मुलुखांतच विशेष होता, व या इतर मुलुखांत ते आधींच इतके बळावले होते कीं, मराठ्यांनीं त्यांना आपल्या मुलुखांत येऊं न दिल्यानें हिंदुस्थानांतून त्यांना आपला गाशा गुंडाळावा लागता अशी स्थिति नव्हती. तात्पर्य, इंग्रजांच्या व्यापाराला प्रतिबंध करून त्यांना सुरुवातीस आपल्या राज्यांत बहिष्कार घालणें हें त्या वेळीं स्वाभाविक किंवा शक्य नव्हतें.

पण याच्याहि पलीकडे जाऊन असें म्हणतां येईल कीं, इंग्रज व्यापाऱ्यांस प्रतिबंध न करतां त्यांना उत्तेजन व सवलती देऊन आपल्या राज्यांत बोलावणें हेंच अधिक स्वाभाविक असून त्या वेळच्या मराठयांना इष्टहि वाटलें असलें पाहिजे. व्यापारी म्हटला कीं, तो आपणांकडे ओढावा; त्यापासून त्याचा फायदा असला तरी आपलाहि आहे, हें मनुष्यमात्राला उपजत-बुद्धीचें अर्थशास्त्रच शिकवितें. घरीं चालत आलेला सौदागर घालवून दिला असें जगाच्या चारित्रांतील कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासांत आढळणार नाहीं. आपल्या कारागिरास उत्तेजन देणें वेगळें व परकी व्यापाऱ्यावर बहिष्कार घालणें वेगळें. किंबहुना स्वदेशी कारागिरांचें चीज व फैलाव होण्यास परकी व्यापाऱ्यांची मदत घेणेंच जरूर असतें. आपला कारागिरीचा माल परदेशांत गेला तरच त्याला भारी किंमत येते; कारण त्याची अपूर्वाई तेथेंच विशेष. तसेंच आयात मालावरील जकातीचें उत्पन्नहि बरेंच असतें, तें सुखासुखीं कोण गमावणार ? या नियमास अनुसरून त्या काळीं परक्या व्यापाऱ्यांची हिंदुस्थानांत चहा होत असे. कारण त्यांच्या हातून कोट्यवधि रुपयांचा देशी कारागिरीचा माल परदेशास जाऊन त्याच्या मोबदला मौल्यवान् सोनें, रुपें, वगैरे रूपानें हिंदुस्थानांत येई; शिवाय इकडे पैदा न होणारे उपयुक्त व चैनीचे असेहि अनेक जिन्नस त्यांच्या मार्फत मिळत; अशा प्रकारें त्यांच्यापासून दुहेरी फायदा होई तो कोण टाकून देणार ? व तो

टाकावयाचा कां, तर हे व्यापारी पुढें-मागें शिरजोर व सत्ताधीश होऊन आपला व्यापार बुडावितील आणि आपलें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेतील म्हणून ? आमच्या पूर्वजांना भावी सर्व इतिहास करपुतळींत दिसणाऱ्या भविष्याप्रमाणें कोणी दाखविला असता, तर त्यांनीं व्यापारी पेशाच्या इंग्रजांचें उंटाचें पिल्लूं तेव्हांच घरांत घुसूं दिलें नसतें ! पण तसें भविष्यचित्र त्यांना दिसलें नाहीं, व तें जर दिसलें नाहीं तर त्यांना परकी व्यापाऱ्यांवर बहिष्कार न घातल्याबद्दल दोषहि देतां येत नाहीं. " कां न सदन बांधावें, कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ? " हाच न्याय या कामीं लागू पडतो. शिवाय इंग्रज व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांत राज्य स्थापणें हें घरांत घूस शिरण्याइतकेंहि स्वाभाविक मानतां येत नाहीं. तो केवळ दैवगतीचा फेरा होय; पण ती तत्कालीन मराठ्यांच्या व्यापारी धोरणाची चूक नव्हे.

## नाशाचीं खरीं कारणें

इंग्रजांना आपल्या राज्यांत व्यापार करण्याची परवानगी दिल्यानें किंवा केवळ प्रसंगविशेषीं त्यांची मदत घेतल्यानेंच मराठ्यांचें राज्य गेलें असें म्हणवत नाहीं. या दोन गोष्टी करून देखील राज्य राहिलें असतें; पण राज्य जाण्याचीं खरीं कारणें आमच्या मतें मुख्य अशीं दोनच आहेत. पहिलें, मराठ्यांमधील सवत्या सुभ्याची आवड आणि जुटीचा, शिस्तीचा व राष्ट्राभिमानाचा अभाव; आणि दुसरें, कवायिती लष्कर आणि सुधारलेली युद्धसामग्री यांचा अभाव. पहिल्या कारणासंबंधानें इतकेंच सांगितलें असतां पुरें होईल कीं, रघुनाथराव किंवा गायकवाड यांनीं घरच्या भांडणांत इंग्रजांचा हात शिरूं दिल्यानंतरहि जरी मराठे उमजते व एक होते तरी इंग्रजांचें कांहीं चाललें नसतें; पण एकजुटीनें व एकदिलानें काम करण्याची मराठ्यांना संवयच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. इंग्रजांशीं लढला नाहीं असा वास्तविक एकहि मराठा सरदार नाहीं; पण ते सर्व मराठे सरदार मिळून—फार काय ? दोघे दोघे, तिघे तिघे असे मिळून देखील—एकदम इंग्रजांविरुद्ध लढले नाहींत; व याच गोष्टीचा इंग्रजांस सर्वांत फायदा झाला. राघोबाच्या कलहाच्या वेळीं पेशवे, शिंदे व होळकर हे सर्व एकजुटीनें वागले

म्हणून इंग्रजांचें त्यांच्याविरुद्ध कांहीं चाललें नाहीं. वडगांवास त्यांना मराठ्यांस शरण येऊन अपमानास्पद तह करावा लागला; व तो तह अपमानास्पद म्हणून मोडून फिरून जरी त्यांनीं युद्धाला आरंभ केला तरी शेवटीं त्यांना हार खावी लागलीच. आणि ' जो इंग्रजांना शरण येऊन पाठीस पडला, त्याला अभय देणें हेंच इंग्रजांचें ब्रीद ' अशी जी अभिमानाची भाषा प्रथम ते बोलत होते ती सोडून देऊन रघुनाथरावाला त्यांना अखेर नाना फडणविसांच्या स्वाधीन करावेंच लागलें. तसेंच ज्या निजामांचें मराठ्यांपासून संरक्षण करण्याचा विडा इंग्रजांनीं उचलला होता व ज्याच्या साहाय्यामुळें त्यांना टिपूचा पाडाव करितां आला, त्या निजामावर मराठ्यांनीं १७९६ त स्वारी केली, तेव्हां इंग्रजांना हालचाल न करितां निमूटपणें बसावें लागलें. याचें कारण, सर्व मराठे तेव्हां एक होते, त्यांच्यांत फाटाफूट झाली नव्हती हेंच होय ! पुढें बाजीराव गादीवर बसण्याचा प्रश्न निघाला तेव्हांहि शिंदे व होळकर एकविचारानें वागते, तर बाजीरावाची इंग्रजांकडे जाण्याची छाती झाली नसती. ते म्हणतील त्याला गादीवर बसवितें. कारण, नाना फडणविसाजवळ शहाणपण असलें तरी लष्करी सामर्थ्य नव्हतें; आणि बाजीरावास पदच्युत केल्यानें तो जरी इंग्रजांकडे गेला असता, तरी वसईचा तह होता ना. इंग्रजांना रघुनाथरावाचा पक्ष धरल्याचा परिणाम माहीत होता, म्हणून त्यांनीं बाजीरावास पाठीशीं घातलाचा नसता; व घातला असता तरी शिंदे-होळकरांच्या एकजुटीपुढें त्यांचें कांहीं एक चाललें नसतें. बरें, वसईचा तह नापसंत पडून व आपल्या हातचा पेशवा इंग्रजांनीं स्वतःच्या हाताखालीं घातला या रागावर शिंदे-होळकर हे दोघेहि इंग्रजांशीं लढले. त्यांचें इतर भांडण कांहींहि असो, पण वसईचा तह फिरवून पेशवा मराठ्यांच्या हातीं ठेवावयाचा इतक्यापुरती तरी त्यांची एकवाक्यता होती. अर्थात् दोघेहि मिळून इंग्रजांशीं लढते तर वसईचा तह दुरुस्त झाला असता; पण आधीं शिंदा लढून पुरा पराभूत झाल्यावर मग होळकरास लढण्याची हौस आली. अर्थात् एकेकट्याशीं निरनिराळें लढायला सांपडल्यानें इंग्रजांची सोय झाली. शिंद्यांचा पराभव कसा होतो ही मौज पाहात होळकर बसला होता. बरें, शिंद्याचा पराभव झालेला

पाहून बोध घेऊन गप्प बसावें, तेंहि नाहीं ! एकट्यानेंच लढाईस सुरुवात करून त्यानें विनाकारण आपला नाश मात्र करून घेतला. हीच संधि फिरून १८१७–१८ सालीं आली होती. इंग्रजांनीं आपल्यावर इतके उपकार केले, सर्वांनीं आपला पक्ष सोडला असतांहि आपणांस पाठीशीं घालून राज्यावर बसविलें, आपल्या बापाला न कां मिळेना—पण आपणाला तरी इंग्रजांनीं गादी दिली, व अशा ना अशा रीतीनें आपला पूर्वीचा शब्द खरा केला. ही गोष्ट लक्षांत ठेवून बाजीरावानें इंग्रजांविरुद्ध लढण्यास तयार होऊं नव्हते, पण वसईच्या तहाची लाज किंवा इंग्रजांचा जाच वाटून तो लढाईस तयार झाला. तेव्हां शिंदे-होळकरांच्या दृष्टीनें फिरून १८०२ ची स्थिति प्राप्त झाली. तेव्हां तरी त्यांनीं पुढें जोडीनें येऊन बाजीरावास साहाय्य करावयाचें होतें, पण तेंहि केलें नाहीं व बाजीराव शरण आल्यावर होळकरानें एकट्यानेंच फिरून हातपाय हलवून ते अधिक जखडून मात्र घेतले ! पण इंग्रजांचें वर्चस्व मराठी राज्यांतून कमी व्हावें अशी शिंदे, होळकर व भोसले यांच्या मनांतून इच्छा असली तरी तींत बरीचशी भेसळ होती. इंग्रजांबरोबरच आपणांखेरीज इतर मराठे सरदारांचें वर्चस्व कमी झालें तर हवें—इंग्रजांच्या हातून तें घडून आल्यानें इंग्रज मधल्यामध्यें प्रबळ झाले तरी तें चालेल—अशी प्रत्येकाच्या मनांत गुप्त भावना असल्यानें कोणाचें कांहींच साधलें नाहीं. इतरांचा तर नाश झालाच, पण अखेर त्यांचा स्वतःचाहि नाश झाल्याशिवाय राहिला नाहीं !

मराठ्यांतील दूरदर्शी मुत्सद्द्यांना इंग्रजांचें धोरण दिसत नव्हतें किंवा त्यांच्या मुत्सद्दीगिरीचे डावपेंच कळत नव्हते असें नाहीं; पण त्यांना त्यांच्याशीं टक्कर देतां आली नाहीं हीच गोष्ट खरी. मोगलांची पातशाही औरंगजेबाच्या मरणाबरोबरच ढासळली आणि साम्राज्यसत्तेच्या बुद्धिबळाचा डाव हिंदुस्थानच्या प्रचंड पटावर एका बाजूनें इंग्रज व दुसऱ्या बाजूनें मराठे खेळावयास बसले होते. दोघांचीं मोहरीं प्रथम सारखींच व त्या मोहऱ्यांचीं पदेंहि सारखींच होतीं. दोघांनाहि आपल्या मोहऱ्यांकडून सर्व पट आक्रमावयाचा होता व दुसऱ्याचीं मोहरीं होतील तितकीं निकामी करून डावांतून काढून टाकावयाचीं होतीं. डावांत कोणकोणतें मोहरें कोणत्या

हेतूनें पुढें टाकतो याची कल्पना एकमेकांस अगदींच नसते असें नाहीं; पण सुरुवातीस उभयपक्षीं खेळणारे गडी समबल असतांहि दुसरा पाहात असतां त्याच्या बुद्धीस आकलन न होणारे, किंवा आकलन करितां येत असूनहि प्रतिकार करितां न येण्यासारखे डाव टाकणें यांतच काय तें 'बुद्धिबल' असतें. जेथें बुद्धिबल एकापेक्षां दुसऱ्यास अधिक असतें, तेथेंच कांहीं तरी प्यादी–मातेसारखा डाव होतो. साम्राज्यपटावरचा डाव मराठ्यांना खेळावयास मुळींच येत नव्हता असें नाहीं. इंग्रज दाक्षिण–हिंदुस्थानांत जितके घुसले त्यापेक्षां पुष्कळच अधिक मराठे उत्तर हिंदुस्थानांत घुसले होते. पण नाक्याचीं घरें घेऊन बसण्यांत इंग्रजांनीं अधिक शहाणपणा दाखविला; व शेवटीं मोहऱ्यांच्या गर्दी–मारामारीची वेळ आली तेव्हां मराठ्यांचीं मोठमोठीं मोहरीं बिनजोरी सांपडून मारलीं गेलीं !

इंग्रज व्यापारांतून निघून राजकारणांत पडले ही गोष्ट मराठ्यांना १७६५ च्या सुमारासच दिसून आली होती. तसेंच त्यांचा प्रयत्न हिंदी राजे-रजवाड्यांच्या भांडणांत पडून आपला फायदा करून घ्यावयाचा आहे हेंहि त्यांना लवकरच दिसून आलें. पण उतरणीवर उभें असतां भरला गाडा अंगावर आलेला जसा सांवरून धरतां येत नाहीं, तसेंच मराठ्यांचें इंग्रजां-संबंधीं झालें. इंग्रजांना इमानी असें कोणीच मानलें नाहीं. सर्व मराठे त्यांना मनांत बेमान समजत. "इंग्रजांचें मानस आहे कीं, हैदरखान, श्रीमंत व नबाब, तिघांच्याहि दौलता घ्याव्या. त्यांस कोणेहि प्रकारें एकाशीं शकटभेद करून एकास खालीं पाडावें, असें करतां एक राहील त्यास आपण शेवटीं गुंडाळावें." असलें हें इंग्रजांचें धोरणहि पुण्याच्या दरबारास विदित होतें; पण असें असतांहि पेशव्यांनीं टिपूविरुद्ध इंग्रजांस मदत दिलीच कीं नाहीं ?

'बळी तो कान पिळी' हीच दृष्टि ठेवली तर मराठेशाहीचा शेवट इंग्रजांच्या हातून झाला याबद्दल त्याला दोष लावितां येत नाहीं. इंग्रज हिंदुस्थानांत कांहीं मोक्षसाधनाकरितां आले नव्हते. त्यांना व्यापार करून संपत्ति मिळवा-वयाची होती; आणि व्यापार करतां करतां त्यांना जर राज्यहि मिळालें तर तें त्यांनीं कां घेऊं नये ? राजसत्तेच्या बळावर व्यापार वृद्धिंगत करतां येतो हा नियमच आहे. शिवाय राज्य म्हणून मिळालेल्या मुलुखापासून प्रत्यक्ष

वसूल मिळतो तो वेगळाच. या दृष्टीनें पाहतां ज्यांनीं आपला हात चालवून नवें राज्य मिळविलें त्यांना दोष न देतां, ज्यांनीं हातीं असलेलें राज्य गमावलें त्यांनाच दोष दिला पाहिजे. एकदां राज्य मिळविण्याच्या मागें मनुष्य लागला म्हणजे मग न्यायान्यायाचा सूक्ष्म विवेक तो करीत बसत नाहीं. मराठ्यांना तरी उत्तर हिंदुस्थानांत राज्य संपादण्याचा काय हक्क होता? त्यांनीं दक्षिणेंत मोगलांच्या हातून जुनें स्वराज्य परत मिळविलें येथपर्यंत न्यायाची बाजू ठीक होती; पण साम्राज्यसत्ता स्थापण्याच्या नादीं लागून जेव्हां त्यांनीं उत्तर-हिंदुस्थानांत धुमाकूळ माजविला, तेव्हां न्याय कोठें राहिला होता? मोगलां-कडून सनद मिळाल्यानें मराठ्यांना रजपुतांवर तरवार चालविण्यास जितका न्याय्य हक्क प्राप्त झाला असेल, तितकाच मोगलांचे दिवाण म्हणून साधेल त्या प्रयत्नानें दक्षिणेंतील मराठी राज्यें जिंकण्याचें मोगलांचें उरलेलें काम पुरें करण्याचा हक्क इंग्रजांनाहि मिळाला होता, असा युक्तिवाद कोणी लढविला तर त्याला उत्तर देणें कठीण जाईल. केवळ सामर्थ्य व महत्त्वाकांक्षा यांच्या दृष्टीनें बोलावयाचें तर—मराठ्यांचें राज्य इंग्रजांनीं घेतल्याबद्दल त्यांचा राग न येतां हातचें राज्य गमावण्याचा जो नादानपणा मराठ्यांनीं दाखविला त्याचा मात्र राग येतो खरा.

मराठ्यांच्या मानानें इंग्रजांना राज्य मिळविण्याला किती तरी अधिक अडचणी होत्या हें कोणीहि कबूल करील. इंग्रज सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानांत आले; मराठे आपल्या देशांत आपल्या घरींच होते. इंग्रजांना सर्व मुलूख परका होता; त्यांना मुद्दाम प्रत्यक्ष प्रवास करून माहिती मिळवून नकाशे काढल्याशिवाय त्या मुलुखाचा परिचय होणें शक्य नव्हतें; मराठ्यांना सर्व मुलूख खडान्‌खडा माहीत होता. ज्या अवघड वाटा, दऱ्या, खोरीं, जंगलें मराठ्यांच्या नित्य पायाखालचीं तीं हुडकून काढणें व त्यांतून फिरणें हें इंग्रजांना जवळ जवळ अशक्य होतें. इंग्रजांचा पायच मराठी मुलुखाला लावूं देऊं नये असा मराठ्यांनीं प्रथम निर्धार केला असता, तर इंग्रजांच्या सत्तेचें बीज इकडे रुजलें नसतें; मग त्याचा एवढा मोठा प्रचंड वृक्ष होण्याचें तर दूरच! विलायती मालच मुळीं आपणांस नको असें मराठ्यांनीं प्रथमपासून ठरविलें असतें म्हणजे इंग्रज व्यापार कसचा करिते?

निदान त्यांच्या व्यापारावर जबरदस्त जकाती बसविल्या असत्या तरी व्यापार किफायतशीर होत नाहीं असें पाहून त्यांनीं लवकरच गाशा गुंडाळला असता. इंग्रज व्यापारी पदरीं फौज ठेवूं लागले असें आढळून येतांच तरी ते सावध कां झाले नाहींत ? इंग्रजी सत्तेच्या उंटाचें पिल्लूं त्यांच्या डोळ्यांसमोर वाढत होतें तें त्यांना कां दिसूं नये ? आणि दिसल्या-बरोबर त्यांनीं त्याला घरांतून घालवून देण्याचा प्रयत्न कां करूं नये ? इंग्रजांच्या जवळ बंदुका, तोफा वगैरे लष्करी सरंजाम जमत चाललेला पाहून मराठ्यांनींहि ताबडतोब असा सरंजाम आपला आपण तयार करण्याचे कारखाने कां काढूं नये ? हत्यारांचा कायदा तेव्हां खचित नव्हता ! युरोपियन राष्ट्रें हिंदी लोकांस हत्यारें विकण्यास एका पायावर तयार होतीं, व इंग्रजांशिवाय इतर अनेक युरोपियन लोक मराठ्यांच्या पदरीं नोकर म्हणून राहून त्यांचें सैन्य कवाईत शिकून तयार करण्यास व तोफा-बंदुकांचे कारखाने काढून चालविण्यास तयार होते. इंग्रज सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानास आले तसें त्यांचें उदाहरण पाहून धाडस करून मरा-ठ्यांना युरोपास जाऊन हिंदुस्थानांत उपलब्ध नसणाऱ्या विद्या शिकण्यास, स्नेही मिळविण्यास व व्यापार संपादण्यास नको कोणीं म्हटलें होतें ? इंग्रजांच्या मनांत राज्यलोभ कितीहि प्रबळ असता तरी त्यांच्या पदरीं लष्करभरतीला हिंदी लोकच मिळाले नसते तर ते काय करणार होते ? इंग्रज जर इंग्रजां-विरुद्ध लढण्याला मराठ्यांना मिळाले नाहींत, तर मराठे तरी मराठ्यांविरुद्ध लढण्याला इंग्रजांना कां मिळावे ?

इंग्रजांच्या फौजेंत शेंकडा विसांहून अधिक इंग्रज शिपाई केव्हांहि नव्हते ; शेंकडा ऐंशी हिंदीच होते. इंग्रजांना एकमेकांविषयीं आपलेपणा वाटत होता—तसा हिंदी लोकांविषयीं हिंदी लोकांना, निदान हिंदूंविषयीं हिंदूंना, त्यांतूनहि निदान मराठ्यांविषयीं तरी मराठ्यांना, कां वाटूं नये ? पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, मराठ्यांच्या भांडणांत जर मराठ्यांनीं आपण होऊन इंग्रजांना घेतलें नसतें, तर नसतें भांडण उकरून काढून किंवा विनाकारण म्हणजे केवळ विजिगीषेनें मराठ्यांच्या राज्यावर स्वारी करून त्यांचें राज्य जिंकण्यास इंग्रजांना आणखी तीनचारशें वर्षेंहि कदाचित् पुरलीं नसतीं ! उत्तर हिंदु-

स्थान मोगलांनीं वेडेपणामुळें इंग्रजांना दिलें असें जरी घेऊन चाललें, तरी अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत यमुना नदीच्या दक्षिणेस इंग्रजांचा एक वीतभर देखील मुलूख नव्हता. येऊन जाऊन पश्चिमाकिनाऱ्यावर एक मुंबई, सुरत वगैरे ठाणीं आणि पूर्वकिनाऱ्यावर थोडासा मुलूख इतकाच काय तो त्यांच्या हातीं होता. असें असतां टिपूविरुद्ध मदत करून इंग्रजांना शेंकडों मैलांचा मुलूख कोणीं मिळवून दिला? मराठ्यांनींच ना? निजाम व मद्रास इलाख्यांतील मुसलमान यांनीं इंग्रजांस घरांत घेतल्याचें आपण एक वेळ सोडून देऊं; पण उत्तरेस यमुना नदी, ईशान्येस कटक, संबळपूर; पूर्वेस पूर्वसमुद्र, आग्नेयीस कावेरी नदी, दक्षिणेस म्हैसूर, नैर्ऋत्येस मलबार, पश्चिमेस पश्चिमसमुद्र व वायव्येस राजपुताना, एवढ्या प्रचंड क्षेत्रांत अगदीं अठराव्या शतकाच्या मध्यभागापर्यंत इंग्रजांना पाय ठेवण्यास तरी जागा काय होती? अशी स्थिति असतां त्यांना आपल्या भांडणांत न्यायाधीश किंवा मदतीस म्हणून मराठ्यांनीं कां घेतलें?

या प्रचंड मुलुखांत सर्व मराठ्यांचें राज्य होतें. सर्व मुलूख एकाच छत्रपतीखालीं होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले आणि पटवर्धन वगैरे मराठे ब्राह्मण सरदार औपचारिकरीत्या कां होईना, पण एकाच राजाचा अम्मल मानीत होते. ते सर्व एकाच दौलतीचे आधारस्तंभ असून दौलत कां ढांसळली तर ती सर्वांच्याच अंगावर कोसळून पडणार अशी भीति असतां व ती सांवरून धरली तर त्यांत सर्वांचेंच कल्याण व सर्वांचीच कीर्ति हें माहीत असतां, मराठ्यांनीं आपल्या राज्यांत इंग्रजांचा प्रवेश कां होऊं दिला? एखादा इंग्रजाकडे गेला असतां बाकीचे सर्व जरी मिळून वागते तरी सर्व बंदोबस्त झाला असता, इंग्रजांना मुंबई, मद्रास, कलकत्ता अशा दूरदूरच्या तीन ठिकाणांहून कारस्थान करावें लागे. मराठे सरदार यापेक्षां एकमेकांच्या पुष्कळच जवळ होते. मराठे जर एकमतानें वागते, तर इंग्रजांचें नुसतें टपालहि या मुलखांतून फिरूं शकलें नसतें. ते एकमतानें वागते, तर इंग्रजांना मुळीं सैन्यच मिळालें नसतें; त्यांनीं परक्या लोकांचें सैन्य जमविलें असतें, तरी त्यांचा प्रवेश मराठी मुलुखांत झाला नसता; प्रवेश झाला असता तरी त्याला रसद मिळाली नसती व छापे

पडून सैन्य कापून निघालें असतें! कलकत्त्याहून मुंबईकडे किंवा मद्रासेहून मुंबईकडे इंग्रजांचें सैन्य यावयाचें तें समुद्रमार्गानें फारसें कधीं आलें नाहीं. जहाजाचा एवढा मोठा काफिला त्यांच्याजवळ कधींच नव्हता. त्यांच्या सैन्याच्या सर्व हालचाली मराठ्यांच्या मुलुखांतून खुशाल होत व मराठे त्या होऊं देत! पण तेच सर्व मराठे एकविचारानें वागते, तर इंग्रजांचें सैन्य काय पण चिटोरेंसुद्धां मराठ्यांच्या मुलुखांतून जाऊं शकलें नसतें. असें झालें असतें तर इंग्रज मराठ्यांचें राज्य घेण्याच्या भानगडींत न पडतां, राज्य मिळविण्याच्या भानगडींत आपण पडूं नये असें म्हणणारा ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांत जो एक पक्ष होता त्याचाच विजय झालेला दिसला असता. पण इंग्रजांनीं मराठ्यांच्याच साहाय्यानें मराठ्यांस जिंकलें! त्यांनीं थोडासा विलायती माल व पुष्कळशी अक्कल यांच्या भांडवलावर हिंदुस्थानचा व्यापार व हिंदुस्थानचें सर्व राज्य मिळविलें! त्यांनीं मोगलासारख्या जीर्ण झालेल्या राज्यावरच घाला घातला असें नाहीं; तर तरतरीत, नव्या दमाच्या महत्त्वाकांक्षी व उदयोन्मुख अशा मराठ्यांचेंहि राज्य जिंकून घेतले तें फक्त दोन गोष्टींच्या जोरावर; एक स्वतःची अक्कल व हिंमत, आणि दुसरी अदूरदृष्टि व आपापसांतली फूट!

• • •

## ९ : जगद्गुरूंची गादी

आचार्यपीठाची पूर्वपरंपरा उज्ज्वल व अभिमानास्पद आहे; परिस्थितीमुळें येणारा कमजास्तपणा किंवा होणारा चढउतार लक्षांत घेतला तरी ह्या संस्थेची परंपरा पुढें सतत चालावी अशी लोकांस मनापासून इच्छा आहे; आणि अशा प्रकारची आकांक्षा सफळ होणें ही गोष्ट इतिहास व युक्तिवाद या दोहोंनाहि धरून असल्याची मनास खात्री पटते. आजमित्तीस गादीची स्थिति खालावलेली दिसण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. ज्या धर्मसंस्थेच्या आत्म्यास व्यावहारिक उपाधींचा दोष जडत गेल्यामुळें गादीच्या अधिकारास निर्जीव-

पणा व कर्तव्यबुद्धीस मलिनता येते, तिच्या शिष्यवर्गाचा अगत्यवादहि कांहींसा शिथिल पडावा हें स्वाभाविक व अपरिहार्य होय. जशी राष्ट्राच्या सांसारिक इतिहासांत, तशीं त्याच्या धार्मिक इतिहासांतहि युगांतरें होत असतात. तथापि बाह्य स्वरूप जरी निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या स्वरूपाचें भासलें, तरी जरेंतूनच फिरून तारुण्य मिळविण्याची धर्मबुद्धीस जी अलौकिक शक्ति आहे तिच्यामुळें तिचा कायम नाश असा केव्हांहि होत नाहीं. प्रकाश व उष्णता यांची गति आंदोलनाकृति म्हणजे लाटाकृति असल्याचें भौतिकशास्त्रानें सिद्ध झालेलें आहे; आणि धर्मबुद्धिहि उष्णता व प्रकाश यांच्याप्रमाणेंच चित्-शक्तीची एक कला असल्यामुळें तिचीहि गति आंदोलनात्मक असावी, असें अनुमान सयुक्तिकच होईल. धार्मिक भावना ही प्रवाहप्रतित असली तरी नदीच्या धबधब्याप्रमाणें प्रतिक्षणीं उत्तरकालीं अधिकाधिक अधोगति पावणारीच असते असें नाहीं. धर्मबुद्धीच्या ऱ्हासाची तक्रार आजकालची का आहे? प्रत्येक युगांत व प्रत्येक पोटयुगांत जुन्या पिढीनें नव्या पिढीविषयीं अशीच तक्रार केलेली आढळते; पण एक तर ऐतिहासिकदृष्ट्या धर्मबुद्धीच्या सतत अधोगतीची तक्रार खोटी ठरते. शिवाय परमेश्वरास जर न्यायी म्हणावयाचें तर, खऱ्या धर्मबुद्धीचा सर्व सांठा कोणा एका जुन्या काळीं विशिष्ट पिढी-पुरताच निर्माण करून त्याच्या उपभोगाचा मक्ता त्या युगांतील लोकांसच देवानें दिला होता; आणि मृत्युपत्रानें वारसाईचा हक्क समूळ रद्द करणाऱ्या श्रीमंत पण स्वेच्छाचारी बापाच्या अभागी मुलाप्रमाणें—आमच्या या नवीन पिढीच्या वांट्यास—धर्मबुद्धीच्या दैवी संपत्तीचा एक अंशहि न आल्यामुळें तिला भीक मागत उपाशी फिरणें भाग पडलें आहे, असें म्हणणें सर्वस्वीं अप्रयोजकपणाचें होईल.

ईश्वरविषयक आदरबुद्धीच्या खालोखाल गुरुविषयक आदर येतो, पण तोहि ईश्वरविषयक पूज्यबुद्धीप्रमाणें नित्य व सनातन आहे. गुरुमाहात्म्य-वर्णनांत साधुसंतांनीं क्वचित् प्रसंगीं गुरूस परमेश्वराच्याहि वर नेऊन बसविलेलें आढळतें. चरित्रवर्णनकार नेहमीं करितात तशा प्रकारचीच जरी ही एक अतिशयोक्ति असली तरी, ईश्वरास मिळणारा मान व उपचार मनुष्यमात्र गुरूस आजवर देत आले आहेत यांत शंका नाहीं. आपल्या अंगचे दोष व

अपूर्वता यांमुळेंच दुसऱ्याच्या अंगचे गुण व सापेक्ष पूर्णता यांजविषयीं मनुष्यास आदर वाटतो म्हणून म्हणा, किंवा जगांत जें जें विभूतिमत् सत्त्व निर्माण होतें त्याच्या अंगीं सामान्य जनांस अंकित ठेवून त्यांजकडून सेवा घेण्याची शक्ति स्वभावसिद्धच असते म्हणून म्हणा, सेव्यसेवक भाव हाच सर्व व्यवहारास अधिष्ठानभूत होऊन राहिला आहे. याच्यामुळेंच राजे निर्माण होऊन अधिकार चालवितात; आणि धर्मगुरु हे पीठें व परंपरा स्थापित करूं शकतात. पण या दोहोंत राजपरंपरेपेक्षां आचार्यपरंपरा हीच अधिक टिकाऊ आहे असें आढळून येतें, व मानवी धर्मबुद्धीवरील सतत अधोगतीचा आरोप खोटा ठरविण्यास हा एक उत्कृष्ट पुरावा आहे. क्षात्रतेज किती झालें तरी भौतिक उपाधीवरच अवलंबून राहतें व म्हणून तें ब्रह्मतेजाहून अधिक डळमळीत असतें. धर्मगुरूंच्या गादीचा पाया मुख्यतः मनुष्यमात्राच्या अंतःकरणांत असतो; आणि भौतिक उपाधी त्याला अवश्य नसतात; इतकेंच नव्हे तर त्यांच्या योगानें धर्मपीठाच्या सुवर्णास हिणकसाचा डाग लागतो. दोहोंच्या सापेक्ष कमी अधिक टिकाऊपणाचें हेंच कारण होय. युरोपांत ख्रिस्तानंतर सुमारें ४० वर्षांनीं पीटर यानें जें धर्मपीठ रोम येथें स्थापित केलें त्याच्या एकोणीसशें वर्षांच्या इतिहासांत उत्कर्षापकर्षाचीं, चढउताराचीं, भलेबुरेपणाचीं दहावीस युगांतरें होऊन गेलीं, तरी तें पीठ व त्याची परंपरा अद्यापि कायम आहे. उलट रोमच्या राजधानींत त्याच अवधींत किती निरनिराळीं राजकुलें होऊन गेलीं याची गणती करणेंच बहुधा कठीण. गेल्या ५०–६० वर्षांत प्रॉटेस्टंट धर्मपंथानें कांहीं विशेष दिग्विजय केलेला नाहीं; आणि या ५०–६० वर्षांपूर्वीं या ख्रिस्ती धर्मगुरूसंबंधानें लिहितांना मेकॉले यानें असें जोरानें प्रतिपादिलें आहे कीं, रोमन कॅथलिक चर्च म्हणजे रोम येथील धर्मगुरूंचा संप्रदाय क्षीण झालेला नसून उलट तो सतेज व पुष्टच झाल्यासारखा दिसतो. तीच गोष्ट आमच्या धर्मगुरूंच्या गादीची आहे. आद्य शंकराचार्यांनीं मठाची स्थापना केल्यास जवळ जवळ १२०० वर्षें झालीं ! या अवधींत राजकीय सत्तेच्या वाळूचे प्रचंड पर्वत दैवगतीच्या झंझावातानें इकडचे तिकडे करून टाकले; पण भरतखंडाच्या चार कोपऱ्यांत, केवळ सुईच्या अग्रावरील मातीप्रमाणें अल्पाधार अशा अधिष्ठानावर, त्या

महात्म्यानें रोवलेले आचार्यमठाचे हे अंकुर १२०० वर्षांच्या वावटळास न जुमानतां व त्यांना तोंड देऊनहि अद्याप जिवंत राहिले आहेत; आणि ते यथाकालीं पल्लवितहि होतात. या १२०० वर्षांत लहानसहान राजकुलें तर राहोतच; परंतु हिंदु, मुसलमान व आंग्ल अशा तीन प्रचंड व सर्व भरत-भूमीस आक्रमिणाऱ्या राजक्रांत्या होऊन गेल्या. राज्यैश्वर्यांचे उल्कापात तर नित्य चाललेच होते; परंतु राजसत्तेचे सूर्य-चंद्रहि नाहींसे झाले ! तथापि, श्रीशंकराचार्यांनीं स्थापिलेल्या मठांच्या मशाली, मिणमिण कां होईनात, पण अजून पूर्वींच्या त्याच पाजळत व प्रकाश देत आहेत ! हा कांहीं अंशीं लोकोत्तर चमत्कार नव्हे काय ? व या चमत्कारास धर्मबुद्धीच्या नित्यत्वा-खेरीज दुसरें कारण कोणतें असणार ? या मठांनीं फौजा बाळगिल्या नाहींत, लढाऊ जहाजें बांधिलीं नाहींत, स्वाऱ्या-लढाया केल्या नाहींत, तहनामे गुंफले नाहींत, फार काय पण पेढ्याहि वसाविल्या नाहींत ! तथापि मठांची परंपरा केव्हांहि नष्ट झाली नाहीं !

पण धर्मपीठाच्या चिरस्थायित्वासंबंधानें रोमच्या गादीपासून जसा आपणांस बोध मिळेल, तसाच धर्मपीठांविषयीं अश्रद्धा उत्पन्न होण्यास किंवा त्यांची उपयुक्तता आणि लोकप्रियता वास्तविक आहे याहूनहि अधिक असावी; तशी ती नसण्यास– काय काय कारणें घडूं शकतात, याचाहि बोध आपणांस मिळण्यासारखा असून तो घेणें आजच्या काळीं जरूर आहे. रोमची गादी स्थापित झाली तेव्हां ख्रिस्ती धर्मगुरूंच्या अंगीं जें वैराग्य व जो करारीपणा होता तो पुढें फार काळ टिकला नाहीं. तिसऱ्या–चौथ्या शतकांत ख्रिस्ती धर्मांचा छळ होण्याचें थांबलें. पण हा छळ थांबून स्वस्थता व शांतता येतांच पोपची गादी हें एक संस्थानच बनूं लागलें. धर्मगुरूंना नुसत्या धार्मिक सत्ते-चीच नव्हे तर ऐहिक संपत्ति व बडेजाव यांचीहि हांव सुटली. धर्मदंडाचा मार राजदंडापेक्षांहि अधिक लागण्याचा तो जुना काळ असल्यानें, पोप-लोकांनीं बहिष्काराचा उपयोग मनमुराद केला, आणि राजकारणांतील शिर-जोरपणाची हौस फेडून घेतली. पारमार्थिक कल्याणाच्या भांडारखान्याच्या किल्ल्या कमरेस लावून त्यांचें समाधान झालें नाहीं. पराक्रमी चक्रवर्ती राजांनीं दिग्विजय केला तरी धर्मगुरूंच्या वरदहस्तानें आपल्या अंगाला अभ्यंगस्नान

घडल्याशिवाय व मस्तकावर मुकुट चढल्याशिवाय आपण खरे कृतकृत्य होत नाहीं अशा प्रकारची भावना भोळे किंवा कपटी क्षत्रिय राजे दाखवीत गेल्यानें धर्मगुरूंना सहजच अहंकार उत्पन्न झाला. पृथ्वीवरील ईश्वराचे आपण प्रतिनिधि आहों, अशा आढ्यतेच्या भावनेनें राजेलोकांस पृथ्वीचीहि वांटणी करून देण्याचा अधिकार त्यांनीं आपल्या हातीं घेतला. शास्त्रीय ज्ञानाचा प्रदेश खालसा करण्याकरितां त्यावर त्यांनीं स्वारी केली. खगोलस्थ ग्रहांनीं कोणत्या कक्षेंत कसें फिरावें याविषयीं आमचा परवाना काढला पाहिजे, असा हुकूम जरी पोप महाराजांनीं कधीं फर्मावित्याचें ऐकिवांत नाहीं, तरी सूर्य पृथ्वीभोंवतीं न फिरतां पृथ्वीच सूर्याभोंवतीं फिरते असें मत प्रतिपादन करण्याबद्दल त्यांनीं ग्यालिलियोस तुरुंगवास घडविला हें तरी निर्विवाद आहे. सरहद्दीबाहेरच्या प्रांतांत इतकी ढवळाढवळ करणारांनीं स्वराज्यांत नुसता धुमाकूळ माजवून दिल्यास त्यांत काय आश्चर्य ? ख्रिस्त हा ईश्वराचा मानसपुत्र, आणि रोमच्या गादीचा पहिला अधिकारी ख्रिस्ताचा पट्टशिष्य; तेव्हां परंपरेच्या साखळीच्या एका टोंकास ईश्वर व दुसऱ्या टोंकास आपण स्वतः असा युक्तिवाद त्यांनीं केल्यास नवल कोणतें ? मोक्षाचा मक्ता तर त्यांना ईश्वरी सनदेनेंच मिळालेला होता. अर्थात् त्यांनीं मोक्षपदवीच्या पायऱ्या आणि चलनी नाण्यांचें कोष्टक यांचा मेळ घालून दिला. पोपच्या तिजोरींत मोहरा पडल्याबरोबर ' पेनी इन दि स्लॉट ' यंत्राप्रमाणें, स्वर्गद्वारकपाटाशीं दिव्य घंटानाद व्हावा व तेथून मुक्तीचा परवाना सुटून पापी आत्म्याच्या ओंजळींत येऊन अचूक पडावा अशी कांहीं विलक्षण तारायंत्राची योजना पोपमहाराजांनीं केली होती ! पापापासून मुक्तता होणारांना ही सोय ठीकच होती. पण पुण्यवान्, निरुपद्रवी शिष्यवर्गाच्या मागचीहि धर्मगुरूंची उपाधि सुटत नसे. बायबलाचें देशी भाषेंत नुसतें भाषांतर करणारासहि देहान्त शिक्षा व अधोगतीचा दंड होत असे; आणि धर्मवेड्या माथेफिरूंनीं पोपास विरोध करणाऱ्या प्रबळ राजांचा खून केला असतां हे धर्मगुरु तें अवतारकृत्य मानीत व अशा कृत्यांच्या अभिनंदनार्थ देवळांचीं शिखरें पाजळीत ! कित्येक पोप तर धर्मशास्त्रापेक्षां कामशास्त्रांतच अधिक प्रवीण होते असें म्हणतात; आणि मध्ययुगांतील युरोपच्या इतिहासांत, कोणा एका पोप महाराजांच्या गुप्त संततीनें केलेल्या

अमानुष कृत्यांसारखीं भयंकर व क्रान्तिकारक कृत्यें रेनॉल्डच्या कादंबऱ्यांतहि वाचावयास सांपडत नाहींत !

पोपमहाराजांच्या गादीचे तुकडेहि होण्याच्या वेळा आल्या होत्या. अकराव्या शतकांत कांहीं दिवसपर्यंत एका पोपचे तीन पोप झाले होते; व चौदाव्या शतकाच्या अखेरीस सुमारें ४० वर्षेंपर्यंत रोम येथें एक गादी व ॲव्हिगनॉन येथें एक गादी असे प्रत्यक्ष दोन तुकडे पडून, शिष्यवर्गांना शुभाशीर्वाद देण्याचें गादीचें काम बाजूस राहून या दोन धर्मगुरूंनीं परस्परांवर शिव्याशाप व बहिष्कार यांची नुसती धुळवड चालविली होती. पूर्वीं पोपमहाराज जसें आपलें वर्चस्व कायम राहण्याकरितां राजेलोकांत कलागती लावून देत, त्याचप्रमाणें युरोपांतील राजेलोकांनींहि कांहीं काळ धर्मगुरूंच्या या दोन शकलांचे झुंज लावून दिले होते. एका पोपच्या बाजूस इंग्लंड, जर्मनी, इटली, हंगेरी वगैरे राष्ट्रें असून, तोतया धर्मगुरूंच्या बाजूस फ्रान्स, स्पेन, स्कॉटलंड वगैरे राष्ट्रें होतीं. पण अखेर पंधराव्या शतकाच्या प्रारंभीं पिसा येथें सर्वराष्ट्रीय ख्रिस्ती परिषद भरून तिनें दोघांहि धर्मगुरूंना पदच्युत केलें आणि नवीनच एक पोप निवडून गादी पुढें चालविली, म्हणून ती टिकली. या भांडणाच्या काळांत ' दोघे कुत्रे एकाच हाडाकरितां भांडतात, तसे हे दोन पोप अधिकाराकरितां भांडत होते ', असें ख्रिस्ती ग्रंथकारांनींच वर्णन केलें आहे. पण स्वत: धर्मगुरु व त्यांचे असत् शिष्य यांच्या अंगीं समंजसपणा राहिला नाहीं असें पाहून समाज जातीनें मध्यें पडला; आणि पोप निवडण्यास नवीन मतदारसंघ व नियम यांची रचना त्यांनीं केली, यामुळें गादी बचावली. एकोणिसाव्या शतकाअखेरीपर्यंत राजकीय अधिकाराची पोपमहाराजांची हांव समूळ नष्ट झाली नव्हती; आणि इटालियन राष्ट्रांस स्वातंत्र्य व स्वराज्य मिळण्याच्या बाबतींत रोमच्या धर्मपीठाकडून कांहीं थोडा अडथळा झाला नाहीं ! पण त्यानंतर अलीकडे या धर्मपीठाची ऐहिक व राजकीय सत्तेची बहुतेक सर्व उपाधि परेच्छेनें कां होईना-पण नष्ट झाल्यामुळें गादीशीं विरोध करण्याचीं कारणें लोपलीं; आणि गादीविषयीं ख्रिस्ती समाजामध्यें पूर्वींहून थोडासा अधिकच अगत्यवाद उत्पन्न झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत !

ऐहिक गोष्टीविषयीं सर्वस्वीं वैराग्य दाखवून केवळ समाजाच्या पारमार्थिक कल्याणवृद्धीकडे धर्मगुरु लक्ष घालूं लागल्यास त्यांच्या हातीं केवढी प्रचंड सत्ता आपोआप येते, हें युरोपांतील पोपच्या गादीप्रमाणें आपल्याकडील धर्मपीठांच्या उदाहरणांवरूनहि कळून येण्यासारखें आहे. साधुसंतांसारखे फटिंग लोक समाजास जितका अधिक दूर लोटतील तितका समाज आपण होऊन अधिक जवळ येतो, हें नेहमींच आढळतें. तसेंच खुद्द आद्य श्रीशंकराचार्यांना सर्व भरतखंड वश होऊन मठसंस्थापना करतां आली ती वैराग्यपूर्ण अशा कडकडीत संन्यासाच्या बळावरच. सुदैवानें ख्रिस्ती धर्मपीठापेक्षां आमच्या धर्मगुरूंच्या मठांस राजकीय उपाधीची जोड एकंदरीनें कमी झाली असल्यामुळें त्यांच्या परंपरेच्या इतिहासप्रवाहांत रोमच्या गादीच्या इतिहासाहून गढूळपणा कमी आहे. गेल्या १२०० वर्षांत, म्हणजे आद्य श्रीशंकराचार्यांनीं दिग्विजय करून मठांची संस्थापना केल्यापासून दरम्यान माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य यांसारखे केवळ सर्वज्ञ व प्रतिशंकराचार्यच असे उज्ज्वल कीर्तीचे आचार्य होऊन गेले आहेत; आणि ऐहिक उपाधींत न गुरफटतां केवळ सद्धर्मप्रवर्तनावर नजर ठेवून चालल्यास हे मठ व या गाद्या पुढेंहि शेंकडों वर्षें टिकतील आणि मधून मधून तरी अलौकिक व्यक्ती गादीवर येऊन पूर्वींची उज्ज्वल परंपरा कायम ठेवतील, अशी अभिमानपूर्ण उमेद बाळगण्यास हरकत नाहीं. कोणत्याहि धर्मांतील मनुष्यास ईश्वरापाशीं जाण्यास धर्मगुरूची मध्यस्थी नको असली तरी, समाजामध्यें विशिष्ट धार्मिक आचार व विचार कोणत्याहि नियमांनीं कां होईनात, परंतु चालू राहण्यास एखादी मध्यवर्ती सुव्यवस्थित घटना असल्याशिवाय भागत नाहीं. थिऑसफिकल पंथ झाला तरी त्यास सोसायटी, प्रेसिडेन्ट, सभासद या गोष्टी लागतातच. आर्यसमाजानें तर हें घटनेचें तत्त्व कबूल करून यशस्वीहि करून दाखविलें आहे. प्रार्थनासमाजास सुद्धां घटनेची आवश्यकता भासते, व सर्व परंपरा सोडून देणाऱ्या ब्रह्मसमाजासहि अध्यक्ष, प्रचारक वगैरे सर्व सोंगें लागतातच. समाजाच्या धार्मिक व सामाजिक आचारविचारांत यथाकाल योग्य सुधारणा होणें इष्ट असतें; पण त्या घडवून आणण्याच्या सुधारकी दृष्टीनेंहि धर्मपीठांची आवश्यकता आहेच आहे. कोणच्या म्हणून धर्माचारांचें कसलेंच बंधन न मानतांहि

समाजांत मनुष्य नांदूं शकतो, नाहीं असें नाहीं. पण हें वर्णन लागू पडणाऱ्या व्यक्ती केव्हांहि फारच थोड्या असतात. बहुजनसमाजास नियमबद्धता प्रायः आवडते आणि ज्याच्यावर आपली श्रद्धा आहे असा कोणी तरी मार्गदर्शक असल्याशिवाय त्याचें चालत नाहीं. या दृष्टीनें पाहतां, ऐहिक उपाधींचा संसर्ग तोडून टाकून धर्म व विद्या यांच्याच केवळ परिपोषाकडे लक्ष घालणें हें जसें आमच्या धर्मपीठांचें आजचें कर्तव्य आहे, तसेंच हीं धर्मपीठें संभाळून ठेवणें व त्यांची परंपरा अखंड चालू देणें हेंहि समाजाचें कर्तव्य आहे. शांकरदिग्विजयांतील कथा सर्वांस माहीत आहेच. शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या वादानंतर श्रीशारदेनें कांहीं सांसारिक सवाल टाकल्यावरून आचार्यांनीं अमरक राजाच्या मृत शरीरांत प्रवेश केला तेव्हां तो पवित्र आत्मा फिरून स्वदेहांत प्रविष्ट व्हावा म्हणून आचार्यांच्या मृत शरीराचें रक्षण शिष्यांनीं जसें आस्थेनें केलें, तसेंच पुढील आशेवर भिस्त ठेवून आचार्यांच्या पीठांचें रक्षण करणें हें आजच्या शिष्यसमाजाचें कर्तव्य आहे यांत शंका नाहीं. संस्था राहिल्यास तिची सुधारणा होईल व तिजकडून चांगलें कार्य होईल, अशी आशा तरी बाळगतां येईल.

• • •

## १० : हीन जाति व त्यांची उन्नति

हीन जातींच्या उन्नतीच्या प्रश्नांसंबंधानें निवळ तात्त्विक विवेचनाचा फारसा उपयोग होत नाहीं. तात्त्विक विवेचनास आम्ही कमी किंमत देतों असें नाहीं. परंतु आज तात्त्विक वाद निघाला असतां पुष्कळ लोक या भेदभावाचें समर्थनच करूं इच्छितील; व कित्येक थोड्या लोकांनीं हा भेदभाव समर्थनाई नाहीं असें उत्तर दिलें, तरी त्या नुसत्या उत्तराचा फारसा व्यावहारिक उपयोग नाहीं. रणांगणांतील युद्धाप्रमाणें वादांतहि धर्मसमजुतींवर तोंडासमोरून हल्ला करणें कधींहि श्रेयस्कर होत नाहीं; बाजूनें हल्ला चढवून प्रतिपक्षाला तोंड फिरवावें लागेल. असें केल्यानें यश मिळण्याचा अधिक

संभव असतो. धर्मशरीराचे पाय म्हटले म्हणजे रूढ आचार हेच होत; आणि पायच फितुर झाले म्हणजे ते नेतील तिकडे देहास जावें लागतें. अर्थात् स्पृश्यास्पृश्यविचार करतांना या बाबतींतील धर्मसमजूत पालटण्याचा वाद माजवीत न बसतां हा भेदभाव आचारांत नाहींसा होण्याची रूढि कशी पडेल, याचाच विचार अधिक अगत्याचा आहे. रूढि लोकसंमत व्यवहाराच्या पुनःपुनरुक्तीचा परिणाम आहे. अस्पृश्य मानलेल्या जातींस इतर जातींनीं स्पृश्य करण्यास त्या दोहोंमधील व्यवहार वाढला पाहिजे; व व्यवहारसंबंध वाढण्यास अनुयोगी, प्रतियोगीभूत ज्या व्यक्ति त्यांची परस्पर आकर्षणशक्ति वाढली पाहिजे. अर्थात् ही आकर्षणशक्ति कशी वाढेल या प्रश्नाचें जें उत्तर तेंच, हा स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा कसा होईल या प्रश्नाचेंहि आहे असें समजावें.

हीं आकर्षणकारणें अमुक एकाच प्रकारचीं असतात असें नाहीं, हें निरनिराळीं उदाहरणें देऊन दाखवितां येण्यासारखें आहे. सौंदर्य, स्वच्छता, बुद्धिमत्ता, सत्ता, संपत्ति, सच्छील, धार्मिकपणा, मान्यता व व्यावहारिक उपयुक्तता हीं या आकर्षक कारणांचीं उपलक्षणात्मक उदाहरणें म्हणून देण्यास हरकत नाहीं. शरीरसौंदर्य हें आकर्षकतेचें कारण होऊन कृत्रिम भेदभावाच्या मर्यादा नाहींशा करण्यास कारणीभूत कसें होतें याचें उदाहरण पुराणांतरीं मत्स्यगंधेचें होय. ही मासे मारणाऱ्या व मासे खाणाऱ्या कोळ्याची कन्या; परंतु ती अप्रतिम लावण्यवती असल्यामुळें क्षत्रिय राजाच्या राणीपदास योग्य झाली. दुसरें एक चमत्कारिक उदाहरण रावबहादूर चिंतामणराव वैद्य यांनीं प्रसिद्ध केलेल्या ‘ बंडाच्या इतिहासा ’च्या पुस्तकांत दिलेलें वाचकांस आढळून येईल. झांशी येथील एका दशग्रंथी विद्वान् ब्राह्मणास अत्यंत नीच मानलेल्या अशा एका जातींत उत्पन्न झालेल्या पद्मिनीगुणविशिष्ट स्त्रीसंबंधानें अनिवार मोह उत्पन्न होऊन त्यानें तिला स्त्रीप्रमाणें घरांत वागविल्याबद्दलची हकीकत सदरहू पुस्तकांत दिलेली आहे. हीं उदाहरणें देण्यांत, एखाद्या अलौकिक शरीरगुणाच्या अंगींहि धर्मबंधनाहून अधिक बळ कसें येऊं शकतें, व यामुळें स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा कसा होऊं शकतो, हें फक्त तात्त्विक रीत्या सुचविण्याहून दुसरा हेतु नाहीं. राज-

सत्तेच्या अंगीं स्पृश्यास्पृश्य भेद समूळ नष्ट करण्याचें नसलें तरी तो पुष्कळसा शिथिल करण्याचें सामर्थ्य आहे, यांत शंका नाहीं. महाराचा स्पर्श झाला असतां स्नान करणारे सर्वच कर्मठ लोक गव्हर्नरसाहेबांचा हस्तस्पर्श झाल्यावर स्नान करतील असें नाहीं. संपत्ति ही वाटेल तें करूं शकते; व अस्पृश्य मानलेल्या जातींतील एखाद्या मनुष्यावर लक्ष्मीची जर कृपा भरपूर झाली, तर त्याला सामाजिक अपमानाचें दुःख फारसें सोसावें लागत नाहीं. धार्मिकपणा अंगीं असल्यास अस्पृश्य मानलेल्या व्यक्तीचा आपल्यास स्पर्श होणें हा एक आपल्यावर अनुग्रहच आहे, असेंहि उच्च वर्णांतील लोकांस वाटणें संभाव्य आहे, हें चोखामेळा व रोहिदास या दोन संतांच्या उदाहरणांवरून कबूल करावें लागेल. मनुष्याच्या अंगीं मान्यता इतर अनेक प्रकारांनींहि येऊं शकते. समजा, एखादा अंत्यज उद्यां माठा कवि निर्माण झाला, अगर त्याच्या अंगीं कल्पकतेचा विकास होऊन इकडील सृष्टि तिकडे करण्यासारखा त्यानें एखादा शोध लाविला किंवा यंत्र निर्माण केलें तर त्याजवरील निव्वळ अस्पृश्यतेचें लांछन फार दिवस टिकणार नाहीं, हें म्हणणें कोणासहि संमत होईल. एवढा मोटा अलौकिक गुण बाजूस राहो, पण साधारण सुशिक्षणाच्या अंगींहि मान्यता उत्पन्न करून देण्याची शक्ति पुष्कळच आहे. याचा अनुभव आपणांस नेहमीं येतो. एखादा अशिक्षित अंत्यज दाराशीं आला असतां त्यास आपण दाराशींच उभा करितों. परंतु तोच सुशिक्षित अंत्यज असला तर त्यास आपण घरांत घेऊन खुर्ची देतों.

सुशिक्षणाचा असाच कांहीं विलक्षण प्रभाव असतो कीं, त्याच्या योगानें उच्चनीच व लहानथोर हे सर्व कृत्रिम भाव लोपून जातात, व मनुष्यामनुष्यांमध्यें एक प्रकारचा बंधुभाव उत्पन्न होतो. शिवाय सुशिक्षित मनुष्य सहसा अस्वच्छ राहात नाहीं; त्याजमध्यें बुद्धीचा विकास व विद्येचें तेज निर्माण होतें, व त्याची उपयुक्तताहि वाढते. अर्थात् एका सुशिक्षणानें इतकीं सर्व आकर्षण-कारणें उत्पन्न होतात. यास्तव अयोग्य स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा करावयाचा असेल तर अंत्यज जातीचें सुशिक्षण वाढणें हाच मुख्य व खरा उपाय आहे. अस्पृश्यता जाऊन स्पृश्यता येण्यानेंचसें काय, पण अन्य रीतीनेंहि त्यांची सामाजिक व सांपत्तिक स्थिति सुधारण्यास विद्या हीच उपयोगी

पडणारी आहे; म्हणून अस्पृश्य मानलेल्या जातींनीं व त्यांच्या पुरस्कर्त्यांना शिक्षणावरच मुख्य भिस्त टाकली पाहिजे. कारण शिक्षण, सत्ता, संपत्ति अगर इतर कोणताहि विशेष गुण अंगीं नसतां अस्पृश्य जातीस जवळ घ्या असें म्हणणें यांत जरी मोठासा गुन्हा नसला तरी तें फारसें शक्य नाहीं. कारण हा प्रश्न किरकोळ एक-दोन किंवा थोडयाशा व्यक्तींचा नसून सर्व समाजाचा आहे. केवळ दांडगाईनें स्पृश्यास्पृश्य भेद मोडून दाखविणें हें समाजांतील फक्त दहापांच तत्त्वज्ञानी अगर पांचपंचवीस बाडग्या लोकांस शक्य आहे; परंतु एकंदर समाजांतील बहुमतानें जोंपर्यंत कोणतीहि सुधारणा स्वीकृत केली जात नाहीं, तोंपर्यंत ती रूढ होत नाहीं. तोंपर्यंत या दहा-पांच तत्त्वज्ञान्यांनीं हा भेद मोडला व त्यांस लोकांनीं विशेष नांवें ठेविलीं नाहींत तरी त्यांस समाजबाह्य होऊन राहावें लागतें. ज्यांस आम्हीं बाडगे हें नांव दिलें आहे, त्यांच्या उपद्व्यापानें तर तत्त्वज्ञान्यांच्या खटपटीपेक्षां केव्हांहि कमीच फलप्राप्ति होणार; कारण समाज त्यांस बाडगे मानणार. एवढेंच नव्हे तर त्यांनीं केलेल्या कृत्यांचें समर्थन करण्याचें धैर्य त्यांच्या स्वतःच्या अंगीं नसल्यामुळें ते आपलें कृत्य उघडपणें कबूल करण्यास कचरणार; व त्यांच्या कृत्याबद्दल गवगवा झाला असतां ते आपल्यास प्रायश्चित्त वगैरे घेऊन आपल्या कृतीचें आपणच खंडण करणार; व सर्वांत वाईट गोष्ट असते ती ही कीं, ज्यांना आम्हीं बाडगे ही संज्ञा दिली आहे, त्यांच्या कृत्यांस उदात्त असा कोणताहि मूळ हेतु नसून केवळ सुखाची लालसा हाच त्यांचा हेतु असतो ! स्पृश्यास्पृश्य भेद हा अयुक्तिक आहे, हें सिद्ध करण्याकरितांच केवळ तो भेद जो मोडून दाखवितो, त्याची गोष्ट वेगळी; त्याला तत्त्ववेत्ता म्हणण्यास तरी हरकत नाहीं. परंतु केवळ सौख्याच्या लालुचीनें जे तसें करितात त्यांनीं तत्त्वज्ञानाचा कितीहि आव आणिला तरी तो व्यर्थ होय.

तात्पर्य, बहुजनसमाजानें स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा करावा अशी जर इच्छा असेल तर अस्पृश्य मानिलेल्या जातींमध्यें वर वर्णन केलेले गुण आले पाहिजेत. ते गुण येईपर्यंत, हा भेदभाव मोडत नाहीं, असा गवगवा करणें फुकट आहे. विशेषतः तोंपर्यंत अस्पृश्य मानिलेल्या जातींनीं स्वतः स्पृश्यास्पृश्यतेचा वाद काढणें श्रेयस्कर नाहीं हा भेदभाव आजकालचा नाहीं,

तर शेंकडों वर्षांच्या संस्कारपरंपरेनें तो दृढ झालेला आहे; व तो नाहींसा होण्यासहि कदाचित् शेंकडों वर्षें लागतील, असें म्हणणें वावगें नाहीं. लाट उठण्यास जितका वेळ लागतो, तितकाच ती लाट उठल्यावर खालीं बसण्यास लागतो. भांडें तापण्यास जितका उशीर लागतो, तितकाच तापलेलें भांडें निवण्यास लागतो, हीहि अनुभवसिद्ध गोष्ट आहे. शिवाय, दुसरें असें कीं, अस्पृश्य मानलेल्या जातीसुद्धां अशा प्रकारच्या भेदभावापासून स्वतः सर्वस्वीं अलिप्त असतात असेंहि नाहीं. ज्यांना कोणतीच गोष्ट अस्पृश्य अशी नाहीं, त्या लोकांनीं सर्वच गोष्टींसंबंधानें स्पृश्यास्पृश्य भेदभाव नाहींसा करून टाकावा, असें म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. 'वरच्यास हात व खालच्यास लाथ' हा प्रकार मध्यम जातीमध्यें दिसून येतो. ज्यांना वरची म्हणून एखादी जात अगर वर्ग असतो, त्यांस आपला समावेश त्या वरिष्ठ वर्गांत होण्याविषयीं जितकी उत्कंठा असते तितकी आपल्या खालच्या वर्गास आपणांमध्यें समाविष्ट करून घेण्याबद्दल असते काय, याचा ज्याचा त्यानें आपल्या मनामध्यें विचार करून पाहावा. सर्व मजले मोडून एकच मजला व्हावा, असें प्रतिपादन करण्याची व त्या प्रतिपादनाप्रमाणें आचरण करण्याची जोंपर्यंत आपल्या स्वतःच्या मनाची तयारी झालेली नाहीं, तोंपर्यंत विश्वबंधुत्वाच्या गोष्टी दुसऱ्यांशीं वायफळ बोलण्यांत व वरिष्ठ वर्गास ते आपमतलबी म्हणून नांवें ठेवण्यांत अर्थ तो कोणता? मराठे लोक ब्राह्मणांस नांवें ठेवतील; परंतु अंत्यजाच्या पंक्तीस बसण्याची स्वतः मराठ्यांची तयारी नसते. महार लोक ब्राह्मण व मराठे या दोघांसहि नांवें ठेवतील; परंतु ते स्वतः धेड वगैरे लोकांच्या हातचें पाणीहि घेत नाहींत, असें म्हणतात. धेडांना अस्पृश्य अशी कोणतीच जात नसेल तर त्यांना मात्र वरील आक्षेप न लागतां आपल्याहून वरच्या सर्व जातींस नांवें ठेवितां येतील! परंतु केवळ विश्वकुटुंबियत्वाच्या उदार बुद्धीनें ते तसें करितात, असें कोणीहि म्हणणार नाहीं.

स्पृश्यास्पृश्यतेचा विचार करतांना अंत्यज जातीचे लोक कोणते धंदे करतात, हेंहि साधारणतः पाहणें जरूर आहे. विश्वकुटुंबियत्वाच्या कितीहि गोष्टी सांगितल्या तरी गंध्याचा धंदा व खाटकाचा धंदा, हे दोन्हीहि धंदे

सारखेच मानावे अगर दोन्ही धंदे करणारांच्या अंगीं समाजाकर्षक शक्ति सारखीच आहे, असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. कित्येक लोक असा युक्तिवाद करितात कीं, अंत्यज लोक जे धंदे करतात ते जर कोणीतरी केलेच पाहिजेत, तर अंत्यजांनींच ते केले तर काय वावगें ? व ते तसें करीत असतांहि त्यांना स्पृश्य मानण्यास काय हरकत आहे ? आमच्या समजुतीनें हा युक्तिवाद बरोबर नाहीं. कृतज्ञतेनें स्वच्छतेची जागा भरून येऊं शकत नाहीं; व आपल्या पोटाकरितां अस्वच्छ धंदा करणारां-बद्दल कृतज्ञताहि पण वाटत नाहीं. तसेंच हे अस्वच्छ धंदे केवळ सांपत्तिक अडचणीमुळें ते करितात असेंहि म्हणणें बरोबर नाहीं. इतर–म्हणजे असले धंदे न करणारे–लोक उपाशी मरतात असें थोडेंच आहे ? अंत्यज लोकां-इतकेच अशिक्षित असून त्यांच्याहून अधिक स्वच्छ धंदे करून पोटास मिळविणारे लोक किती तरी आहेत ! वरिष्ठ वर्गांनीं धर्म या नांवाखालीं मोडणाऱ्या कोत्या समजुती व मिथ्या अहंकारबुद्धि सोडून देऊन अस्पृश्य मानिलेल्या वर्गांबद्दल सहानुभूति व प्रेम बाळगलें पाहिजे, यांत तर शंका नाहीं; परंतु अंत्यजवर्गानेंहि वरिष्ठ वर्गास आपल्या पदवीस ओढूं अशी हांव धरण्यापेक्षां स्वच्छता, शिक्षण वगैरे गुणांनीं आपण त्यांच्या बरोबरीचे होऊं अशी महत्त्वाकांक्षा बाळगणें अधिक श्रेयस्कर होईल. अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा बाळगून त्याप्रमाणें जेव्हां त्यांच्या हातून वर्तन घडून येऊं लागेल त्या वेळीं वरिष्ठ वर्गाच्या कोत्या समजुतीबद्दल त्यांस नांवें ठेवण्याचा हक्क आपोआपच प्राप्त होईल.

दुसरीहि एक गोष्ट अस्पृश्य मानलेल्या जातींच्या पुढाऱ्यांनीं आमच्या मतें लक्षांत ठेवावयास पाहिजे ती ही कीं, आजच्या स्थितींत हजारों अंत्यज लोक खिस्ती धर्म स्वीकारतात, ही गोष्ट हिंदु पुढाऱ्यांच्या डोक्यावर हाणून, ‘ तुम्ही यापुढें आमची उपेक्षा कराल तर आणखीहि हजारों लोक हिंदुधर्म सोडून जातील, ’ असें दटावतात. परंतु हें बरोबर नाहीं. धर्मांतरामुळें हिंदु-समाजाची फार हानि होत आहे यांत शंका नाहीं; व हिंदुसमाजाच्या पुढाऱ्यांचे अद्यापिहि डोळे न उघडतील तर ती अशीच होत जाईल, हीहि गोष्ट निर्विवाद आहे. तथापि, ज्यांना शिक्षण नाहीं अशा लोकांच्या हातून

ऐहिक फायद्याच्या हेतूनें धर्मांतर झालें तर त्यांना फारसें नांव ठेवतां येणार नाहीं; परंतु अस्पृश्य जातींचे पुढारी या नात्यानें जे बोलूं इच्छितात, त्यांना तरी ऐहिक फायद्याकरितां धर्मांतर करण्यामध्यें कमीपणा किती आहे हें कळावें अशी लोकांची अपेक्षा असते. अंत्यज लोकांनीं धर्मांतर करणें हें हिंदु-समाजावर आपल्या दुःस्थितीबद्दल सूड घेण्याचा उत्तम उपाय या दृष्टीनें कदाचित् समर्थनीय होईल. परंतु जर ते हिंदुसमाजांतील अवयव असे स्वतःस म्हणवून घेतात व हिंदुधर्माचा आपणांस अभिमान आहे असें म्हण-तात, तर केवळ ऐहिक फायद्याकरितां धर्मांतर करणें हें लांछनास्पद आहे, असें त्यांस कबूल करावें लागेल. शिवाय हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, केवळ धर्मांतर केल्यानें खिस्ती समाजांत अंत्यज लोकांस विशेष मान मिळतो असें नाहीं. धर्मांतर केल्याबरोबर धर्मदीक्षा देणारा पाद्री अंत्यजास आपली मुलगी विवाहास देण्यास तयार होईल तर कदाचित् गोष्ट वेगळी; परंतु तशी वस्तु-स्थिति नाहीं. खिस्ती समाजांतहि खरी मान्यता मिळण्यास सुशिक्षित किंवा मान्यतेचीं वर सांगितलेलीं इतर कारणें असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. उलटपक्षीं, हें सुशिक्षण अंगीं आल्यास ती मान्यता त्यांस हिंदुसमाजांत आजहि मिळण्यास कांहीं प्रत्यवाय आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अकोला येथें एका सुशिक्षित अंत्यजानें शाळा काढली आहे. तेथें लो० टिळक हे दोन वर्षांपूर्वीं मोठ्या खुषीनें पानसुपारीस गेले होते. तसेंच थोड्या दिवसांपूर्वीं वऱ्हाडांतील मोहप्पा गांवचे एक सुशिक्षित महार गृहस्थ पुण्यास आले. त्या वेळीं त्यांचें व्याख्यान सार्वजनिक सभेनें आपल्या मार्फत आपल्या दिवाण-खान्यांत करविलें असून, ते अगर इतर वक्ते यांजमध्यें कोणत्याहि बाबतींत यत्किंचित्‌हि फरक करण्यांत आलेला नव्हता. सदरहू प्रसंगीं कित्येक महार लोक श्रोतृवृंदांत येऊन नेहमींच्या श्रोतृवृन्दाच्या जागीं बसलेले होते; व व्याख्यानानंतर एक-दोघां महार गृहस्थांचीं भाषणेंहि झालीं! सन १९०८ च्या मे महिन्यांत पुणें शहरांत मद्यपाननिषेधाची चळवळ झाली; त्या वेळीं पिकेटिंगच्या खटल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणाचा निषेध करण्या-करितां रेमार्केटांत जी जाहीर सभा भरली तिजमध्यें लष्कराच्या एका महार गृहस्थाची वक्ता या नात्यानें योजना करण्यांत आली होती. शिवाय सर्व-

साधारणपणें असेंहि म्हणतां येईल कीं, सुशिक्षित असा कोणताहि अंत्यज आजकाल कोणाहि समंजस हिंदु गृहस्थाच्या घरीं नेला असतां त्यास घरच्या बैठकीवर बसवून घेऊन अगर खुर्ची देऊन संभाषण करण्यास तो माघार घेणार नाहीं.

वास्तविक काल हा सर्व जातींना व वर्गांना समान पदवीस आणून पोंचविण्यास समर्थ आहेच. कारण गेल्या पन्नास वर्षांत सामाजिक व धार्मिक चालीरीतींत आपोआप बराच फरक पडलेला आहे. खरें म्हटलें तर ह्या अवधींत कोणी नवीन स्मृतिकार उत्पन्न होऊन त्यानें स्पर्शास्पर्शाचीं बंधनें जीं आज इतकीं शिथिल झालीं आहेत, तीं तशीं करण्यास अनुज्ञा दिली आहे, असें मुळींच नाहीं. तथापि फरक मात्र पुष्कळच पडलेला आहे यांत शंका नाहीं. परंतु हें सांगून सर्व हवाला कालावरच द्यावा असें म्हणण्याचा आमचा मुळींच हेतु नाहीं. आम्ही असेंच म्हणतों कीं, हरतऱ्हेच्या सुधारणा प्रत्येक व्यक्तीनें आपली जबाबदारी ओळखून घडवून आणून काळास आपल्या कृतीनें कलाटणी दिली पाहिजे. समाजांतील ‘ व्यक्तिस्वातंत्र्य ’ व ‘ व्यक्तिकर्तृत्व ’ हीं दोन्हीं वगळलीं असतां, ‘ काल ’ म्हणून बहुधा कांहींच राहात नाहीं. कालास कोणतीहि गोष्ट करणें इष्ट असलें तरी व्यक्तिसत्तेच्या अधीन तो सर्वस्वीं आहे. काल येतो हें खरें, परंतु व्यक्तींनीं आणल्याशिवाय तो येऊं शकत नाहीं. पण वरिष्ठ जातींच्या लोकांस स्पृश्यास्पृश्य भेदाच्या कामीं त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देणें हें जितकें जरूर आहे, तितकेंच अंत्यज जातींनाहि त्यांच्या उन्नतिमार्गाची खरी दिशा कोणती व ती दिशा लावण्यास वरिष्ठ वर्गांच्या प्रेमबुद्धीची अपेक्षा न धरतांहि त्यांनीं काय केलें पाहिजे, याविषयीं त्यांना उपदेश करणें जरूर आहे.

• • •

## ११ : भविष्यकथन

भोंदूंनीं फसवावें आणि दुधखुळ्यांनीं फसावें, असले जे अनेक प्रकार जगांत आहेत, त्यांतलाच एक प्रकार ‘ भविष्यकथन ’ हा होय. वास्तविक भूतकाल हा भविष्यकाळाइतकाच समृद्ध आहे. तथापि, एखादें ऐतिहासिक सत्य पूर्वी माहीत नसलेलें असें, जरी कोणी खात्रीलायक पुराव्यानिशीं सिद्ध करून दिलें, तरी त्यामुळें कित्येकांस जो आनंद होणार नाहीं, तो भविष्यकाळची एखादी साधी गोष्ट सांगितली असतांहि होतो; मग ती खरी न ठरली तरी चालेल. बाजारांत नेहमीं उधारीचा प्रकार असा असतो कीं, माल आधीं कांहीं दिवस गिऱ्हाइकानें ताब्यांत घ्यायचा व त्याचे पैसे दुकानदारास मागाहून द्यायचे. पण अर्धवट धर्मबुद्धीनें मांडलेल्या तामसी श्रद्धेच्या बाजारांत सर्व सट्टयाचाच व्यापार चालतो. म्हणजे विश्वासाचे दाम आज पटवावयाचे, आणि वायद्यांवर खरेदी केलेलें भविष्य-कथन पुढें कधीं काळीं खरें ठरेल म्हणून वाट पाहात बसावयाचें, आणि तें खरें न ठरलें तरी काय हरकत ? विश्वासाचे दाम भविष्यवाद्याला तोंपर्यंत फुकट वापरायला मिळतातच. शिवाय भविष्य खोटें ठरलें तरी हे दाम सहसा कोणी परत मागत नाहीं व कोणी देतहि नाहीं. कारण श्रद्धाळू मनुष्य अशा बाबतींत मोठा दिलदार व उदार असतो ! भविष्य-कथन खोटें ठरलें तरी पुष्कळ वेळां त्याचा दोष भविष्यवाद्याच्या माथ्यावर न लादतां आपल्या नशिबाला बोल लावून स्वतःच्या डोक्यावर घेण्यास तो तयार असतो. ‘ भविष्य आयत्या वेळीं खोटें ठरलें तरी काय हरकत ? कारण तें प्रथम सांगितलें तेव्हां तरी खरें होतेंच कीं नाहीं ? पुढें खरें न ठरलें तर आपलें नशीब ! त्याला भविष्यवादी काय करणार ? ’ रोग बरा झाला तर आपल्या औषधानें, बरा न झाला तर रोग्याच्या कुपथ्यानें, असा जो दुहेरी पेंच ‘ कलिविडंबना ’त वर्णन केलेला वैद्य रोग्याला घालतो, तोच भविष्यवादी आपल्या ताब्यांत आलेल्या दुधखुळ्या लोकांनाहि घालतो. किंबहुना, ते लोक तसला पेंच आपण होऊन आपणांवर करून घेतात, असेंहि म्हणतां येईल. हा अलौकिक

उधारीचा प्रकार जगाच्या प्रारंभापासून सुरू आहे. भविष्यवाद्यांचा कुलक्षय होण्याची भीति कधींच नाहीं; कारण त्यांचे पोशिंदे जे श्रद्धाळू लोक त्यांचाहि कुलक्षय कधीं होत नाहीं. जगाच्या उत्पत्तीपासून या दोन्ही कुळांची परंपरा अखंड चालू आहे. कालमानाप्रमाणें त्या त्या पिढीचे पुरुष जरी नूतन पोषाख व पेहराव धारण करितात, तरी आंतून त्यांची शरीररचना व त्याचा रंग हीं कायमच असतात.

भविष्यकथनाच्या अंगाला इतकें जें सोनें लागलें आहे, त्याचें कारण काय? हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. वर्तमानकाळ तर बोलून चालून रुक्ष व नीरस; त्यांत अद्‌भुतत्व असें कोणास कांहींच वाटत नाहीं. पण भूतकाला-बद्दलहि मनुष्यमात्राला भविष्याइतकें प्रेम वाटत नाहीं, ही जराशी चमत्कारिक पण अनुभवसिद्ध गोष्ट आहे. मनुष्याचें तोंड नेहमीं पाहावें तों पुढच्या काळाकडे फिरलेलें! आगगाडींत आपण बसलों असतां मागें किंवा पुढें वाटेल त्या बाजूस तोंड करून बसण्याची सोय असते. शिवाय पुढच्या बाजूस तोंड करून बसलों असतां जो भूभाग व देखावा केवळ क्षणभर आधीं पाहावयास आपणांस सांपडणार, तोच क्षणभर उशिरां कां होईना, पण मागें तोंड वळवून बसलों असतांहि पाहावयास सांपडणारच. असें असतां शेंकडा नव्याण्णव मनुष्यें पुढच्या बाजूस तोंड वळवून बसलेलींच आढळून येतील. या चमत्काराचें एक कारण असें असावें कीं, आपण मागें तोंड वळवून बसलों असतां, जरी तो भूभाग व देखावा डोळ्यांपुढून जातो, तरी तो हातांतून निसटून पळून गेल्यासारखा वाटतो. म्हणजे त्याच्या दर्शनानें आपल्या बलसंपन्नतेची भावना मनांत न येतां, कमकुवतपणाची भावनाच येते. देखावा निघून जातो. त्याला अटकाव करून धरून ठेवण्याची शक्ति आपणांत नाहीं याचें आपणांस नकळत वाईट वाटतें. पण तेंच पुढच्या बाजूस तोंड करून बसलों असतां, व दूर असलेला देखावा हळूहळू आपल्या डोळ्यांपुढें येत असतां त्याचें आपण आक्रमण केलें—तो आपण हस्तगत केला—अशी अभिमानाची भावना मनांत येत असावी. भूतकाळ हा भूतकाळ; तो आपल्या पायांशीं मरून पडलेला; अर्थात् मेलेल्याला मारण्यांत किंवा काबीज करण्यांत कसला पुरुषार्थ? भविष्यकाळ हें श्वापद मात्र भयंकर

असून तें अंधाऱ्या दरींत बसून राहिलेलें असतें. त्याला जर आपणांला हुसकून काढून जिंकतां आलें तर तो मात्र पुरुषार्थ खरा असें मनुष्याला वाटतें. तात्पर्य, अशा रीतीनें पराक्रमाची आकांक्षा हें एक कारण होय.

दुसरेंहि एक कारण आहे; तें हें कीं, मनुष्य ज्ञानाच्या बाबतींत नेहमीं अतृप्त असतो. नुसती क्षितिजापलीकडेहि आपली दृष्टि जात नाहीं, जाग्यावर उभें राहून आपणांस सगळें जग दिसत नाहीं, ही परमेश्वराविरुद्ध मनुष्यमात्राची एक कायमचीच तक्रार आहे. तथापि, भविष्यज्ञानाची आवड ही केवळ ज्ञानसंग्रहाच्या सात्त्विक भावनेनें मनुष्य धरीत असेल, तर तिला कोणी नांवें ठेवणार नाहीं. पण ज्ञानवृद्धीची ही लालसा बहुशः सात्त्विक नसते. कारण, भविष्यकाळ सोडून दिला तरी वर्तमानकाळीं कोणाहि मनुष्याच्या कक्षेंत, किंवा कक्षेबाहेर पण जवळच, ज्ञानभांडार इतकें खच्चून भरलेलें असतें कीं, त्यानें हा जन्मच काय पण पुढचे अनेक जन्म घालविले तरी तें सर्व त्याला संपादितां येणार नाहीं. असें असतां केवळ एका क्षणानंतर घडून येणारी गोष्ट जर क्षणभर आधीं त्याला समजण्यासारखी असेल, तर तिच्या करितां तो हें सर्व ज्ञानभांडार बाजूला सारील. बरें, क्षणभर आधीं कळलेल्या गोष्टीचा हटकून फायदा करून घेईल, इतका तो खरा विचारी असेल तरीहि चालेल; परंतु भविष्यज्ञानाला हपापलेलीं मनुष्यें सहसा इतकीं विचारी असलेलीं आढळत नाहींत. त्यांना भविष्यज्ञानाची गोडी वाटते ती ज्ञानाकरितां नव्हे, तर एक क्षणानंतर कळणारी गोष्ट आगाऊ कळली एवढ्याचकरितां. चमत्कार किंवा अद्‌भुतपणा एवढ्याचाच त्यांना आनंद ! उठल्या सुटल्या ज्योतिष्यापुढें पत्रिका टाकून किंवा हात पसरून भविष्यकथनाची याचना करणाऱ्या शंभर लोकांपैकीं एक मनुष्य तरी ज्योतिषापासून होणाऱ्या भविष्यज्ञानामुळें सन्मार्गास लागलेला सांपडेल कीं नाहीं, याची शंकाच वाटते. पण लहान मुलांना समोर दिसणाऱ्या जिनसांपेक्षां तोच जिन्नस कुलुपांत असला तर अधिक हवासा वाटतो; किंवा बायबलांत सांगितल्याप्रमाणें मनुष्याच्या आद्य जनक–जननींना ज्ञानवृक्षाचें फळ खाण्याचा प्रतिबंध झाला म्हणूनच तें खाण्याची इच्छा त्यांना अनिवार झाली; तोच प्रकार भविष्यज्ञानाकरितां हपापलेल्या लोकांचा असतो. भविष्यज्ञान हें सहसा

होऊं शकत नाहीं; सामान्य नियमांच्या बंधनामुळें हें अप्राप्य किंवा प्रतिषिद्ध, एवढ्याचकरितां तें मिळवावें असा त्यांस मोह पडतो. निसर्गदेवतेनें घालून दिलेली मर्यादा ओलांडणें किंवा नियम मोडणें यांतच विशेष पराक्रम आहे, अशी मनुष्याची कदाचित् बुद्धि असेल; किंवा त्याच्या बुद्धींत असली महत्त्वाकांक्षाहि नसून केवळ अनपेक्षितांची अपेक्षा करणें किंवा अनुभव घेणें इतकी पोरकटच कल्पना त्याची असूं शकेल. हजारों लहान मुलांना फटाकडीचा झालेला बार ऐकून मौज वाटते; पण त्या आवाजाचें कार्यकारण हुडकून काढण्याकडे एकाचेंहि मन वेधत नाहीं. आवाज ऐकल्यापासून झालेला त्याचा आनंद वांझोटा असतो तो जिज्ञासेला प्रसवत नाहीं. त्या आनंदाची उत्पत्ति व लय हीं समकालीन असतात. याच्या उलट, फटाकडीचा आवाज ऐकल्यामुळें ज्याची जिज्ञासा जागृत झाली असा एखादा मुलगा आढळला, तर त्याबरोबर हेंहि आढळून येईल कीं, त्या प्रौढबुद्धीच्या मुलाला तो आवाज ऐकून होणारा आनंद इतर पोरकट पोरांच्या आनंदासारखा नसतो. खऱ्या जिज्ञासेशिवाय भविष्यज्ञानाची आवड धरणें पोरकटपणाचें आहे; उलट, जिज्ञासा प्रेरित मनुष्याला भविष्यकथनाचा पोरकट आनंदहि होत नाहीं, व त्याचा त्याला चाळाहि लागत नाहीं.

भविष्यकथनाचा खेळ सर्व देशांत सर्व काळीं अनेक प्रकारचे लोक खेळत आले आहेत. पण भविष्यकथनाची म्हणून जीं उदाहरणें आढळतात, तीं एक काल्पनिक तरी असतात, किंवा खरीं असल्यास त्यांत अद्भुतता असें मुळांत फार थोडें असतें; म्हणजे तीं फक्त विशिष्ट अनुमानें असून अनुमानांच्या रीतीप्रमाणेंच खरीं ठरलेलीं असतात. पैकीं पहिल्या प्रकारचीं म्हणजे काल्पनिक भविष्यकथनेंच फार. अशांना मुळांत कांहींच आधार नसतो; पण विवक्षित गोष्टी घडून आल्यानंतर मग त्यासंबंधानें पूर्वीं भविष्यें झालीं होतीं अशी भाविक लोक आपल्या व दुसऱ्याच्या मनाची समजूत करीत बसतात. भारत-भागवतांत सुवर्णयुगें व प्रलय यांविषयीं भविष्यें ठिकाठिकाणीं आढळतात. ज्याचें पूर्वीं भविष्य झालें नव्हतें, म्हणजे ज्याचें भविष्य झाल्याविषयीं लोक मागाहून बोलूं लागले नाहींत असा एकहि अवतार सांपडणार नाहीं! रामचरित्राचें भविष्य

शब्दशः आगाऊच झालें होतें ! खिस्ताचें भविष्य त्याच्या जन्माच्या पूर्वीं झालें होतें कीं नाहीं कोणीं सांगावें ? पण खिस्तानंतर झालेल्या बायबलांत मात्र त्याचा उल्लेख हटकून सांपडतो. कलंकीपुराण, गर्गसंहिता व भविष्य-पुराण यांत भविष्येंच भविष्यें सांगितलीं आहेत ! पण त्या त्या वेळीं जिवंत असून जुन्या भविष्यांचे उल्लेख पाहून त्यांबरहुकूम ज्यास अनुभव येईल तो खरा ! हिंदु लोकांच्या 'कलंकी' प्रमाणें ज्यू लोकांचा 'मेसाया' अद्याप यावयाचा आहे; आणि ज्या वेळीं खिस्त फिरून जन्माला येणार, त्या वेळीं अनंत भूतकाळ व अनंत भविष्यकाळ यांतले सर्व मनुष्यप्राणी आपापल्या थडग्यांतून उठून देवाच्या सिंहासनापुढें उभे राहणार असें भविष्य आहे ! असलें भविष्य अर्थात् खोटें ठरण्याचा संभव नाहीं; कारण खोटें ठरण्याचा प्रसंग जग बुडेल तेव्हां ! संतुष्ट मनानें दिलेला आशीर्वाद किंवा संतापानें दिलेला शाप हा केव्हां केव्हां केवळ काकतालीयन्यायानें खरा होतो व फुलाबोलास गांठ पडून मूळच्या उद्गारांना भविष्यकथनाचें स्वरूप येतें ! अशा तऱ्हेचीं भविष्यें तर कित्येक सांपडतील. रासमालेमध्यें असलीं भविष्यकथनें अनेक आहेत. दिल्लीच्या बादशहानें शीख धर्मगुरु तेखबहादुर याचा छळ केला, तेव्हां त्यानें मोगल पातशाही नष्ट होऊन इंग्रज येतील असें भविष्य केल्याचें आतां सांगतात ! पण तेंच जर खरें मानावयाचें तर 'Akbar's dream' या काव्यांत टेनिसन कवीनें इंग्रज येण्याविषयीं अकबरच्या वेळचें म्हणून काव्यपूर्ण भविष्य लिहिलें, तेंहि गंभीरपणानें खरें कां मानूं नये ?

याचप्रमाणें व्हर्जिलच्या 'इलिअड काव्यांतील' "Over every shore the house of Aeneas shall reign" या वाक्यावरून रोमन बादशाहीचें भविष्य. तसेंच सेनेका याच्या नाटकांतील "There shall come a time in later ages when ocean shall relax his chains and a vast continent appear, and a pilot shall find new worlds and Thule shall be no more earth 's bound" या एका वाक्यावरून अमेरिकेचा शोध लावण्याचें भविष्य झालें होतें, असें कित्येक भाविक लोक म्हणतात. पण अशा रीतीनें काव्यांतील तुटक शब्द घेऊन त्यांचीं भविष्यें बनवूं लागल्यास

वाटेल तीं भविष्यें सिद्ध करितां येतील ! असल्या भविष्यांची उपपत्ति काकतालीयन्यायानेंच ठरविली पाहिजे. कारण भविष्यगर्भ असे इतर शेंकडों-हजारों उद्गार फुकट जातात, तेव्हां त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं व जेव्हां एखादी गोष्ट कशी तरी इकडून तिकडून जुळवून दाखवितां येते तेव्हां मात्र तिच्या बोकांडीं बसून तिला ' भविष्यकथन ' असें गंभीर नांव देतात ! भविष्यांची दुसरी एक उपपत्ति अशी लावितां येते कीं, कल्पनेची मजल अनुभवापुढें नेहमीं कांहीं थोडी तरी असतेच; आणि प्रतिभाशाली मनुष्य रेम्याडोक्या मनुष्याच्यापेक्षां पुढें जाऊन, घडून येणाऱ्या गोष्टींसंबंधानें सहजच अधिक चतुराईनें तर्क करितो; व यामुळें त्याच्या उद्गारांतून भावी वृत्तान्ताचें रूप किंचित् पुसट पुसट प्रतिबिंबित होणें शक्य असतें. पण चतुराईचा तर्क किंवा ' Intelligent anticipation ' याहून अधिक अलौकिक किंवा दिव्य असें स्वरूप त्याला देतां येत नाहीं. ज्याला गृहीतार्थानें ' भविष्यकथन ' हें नांव दिलें पाहिजे, असले चमत्कार क्वचित् होतात असें घेऊन चालून त्यासंबंधानें ही वरील कैफियत आम्हीं दिली आहे. पण अनुभवी, चतुर, दूरदर्शी व प्रतिभासंपन्न अशा लौकिक व्यक्तींना अनुमानाच्या रूपानें करितां येणार नाहींत, अशीं मुळीं भविष्यकथनेंच नसतात, असेंच आमचें म्हणणें आहे; व जीं जीं भविष्यकथनाचीं उदाहरणें म्हणून देण्यांत येतात किंवा येतील, त्या घडलेल्या खऱ्या गोष्टी असल्या तरी, वरील वर्णनाखालींच आल्या पाहिजेत.

' भविष्यकथन ' या शब्दानें जरी अद्‌भुत भावना मनांत उत्पन्न होते, तरी तें एक प्रकारचें अनुमानच आहे; व अनुमान हें ज्ञानाचेंच एक नेहेमींचेंच साधन होय. ज्ञानाचे दोन प्रकार असतात—प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. इंद्रियार्थ-सन्निकर्षानें होणारे तें प्रत्यक्ष; पण असें ज्ञान फार थोडें व थोडा वेळ टिकणारें असतें. आतां स्मृतिजन्य ज्ञानाचाहि प्रत्यक्ष ज्ञानामध्यें समावेश करतां येईल; कारण स्मृति हा ज्ञानेन्द्रियांच्या धर्माचाच एक परिणाम आहे. परंतु प्रत्यक्ष व स्मृतिजन्य दोन्हींमिळून होणारी ज्ञानाची भरती आपल्या एकंदर अनुमानजन्य ज्ञानाच्या भरतीपेक्षां कमीच असते. उपमिति व शाब्द असे प्रमाणांचे आणखी दोन प्रकार मानण्यांत येतात. पण त्या दोहोंचाहि अंतर्भाव अनुमानांतच केला पाहिजे. कारण, उपमानांत म्हणजे दाखला

देतांना आपण कित्येक मूलभूत गोष्टी म्हणून गृहीत घेतों, व त्यांवरून झालें तरी अनुमानच काढतों. शब्दप्रमाणांतील आप्तवचन झालें तरी पुष्कळ वेळाच्या अनुभवानेंच तें खरें वाटत गेल्यामुळें, आप्तवचनाची यथार्थता आपण अनुमानितच करितों. असो. अनुमान म्हटलें म्हणजे त्याची रीत येथून तेथून सारखीच; व ज्या गोष्टी आपण अनुमानाच्या मार्गानें न जातांहि आपणांस समजतात असें वाटतें, त्यांचेंहि ज्ञान खरोखर अनुमानाच्या साहाय्यानेंच झालेलें असतें. अनुमान करण्याची नित्य संवय लागल्यानें केवळ पाटीवर आंकडे मोडून सोडविलेल्या उदाहरणाप्रमाणें अनुमानाची कृति आपणांस दर वेळेस करावी लागत नाहीं. पण तेवढ्यानें अनुमानाची म्हणून कांहीं कृतीच करावयाची नसते, असें मात्र होत नाहीं. ज्याची स्मृति धड असते तो तोंडानें हिशेब करितो; व ज्याची धड नतसे त्याला आंकड्यांचा सर्व तपशील मांडावा लागतो.

पण आंकडे प्रत्यक्ष मांडले किंवा न मांडले तरी रीतीचा कांहीं तरी कारभार करूनच उदाहरण सोडवावयाचें असतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. तोंडानें उदाहरण सोडविणारा मनुष्य रीतीशिवाय सोडवितो, आणि पाठीवर आंकडे मोडणारा मनुष्य मात्र तें रीतीनें सोडवितो असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण, दोघांसहि उदाहरण सोडविण्यास रीत ही अवश्य व अनिर्वाह्यच आहे. आणि कोणाचीहि रीत म्हणजे अनुमानपरंपरेपेक्षां दुसरें कांहीं एक नाहीं. स्मृतीप्रमाणें कमीअधिक बुद्धीमुळेंहि फरक पडतो. तथापि बुद्धिमान् मुलाला अनुमानपरंपरेची स्फूर्ति लवकर झाली म्हणून त्याचें झालें तरी अनुमानपरंपरेशिवाय चालतें असें म्हणतां येत नाहीं. बुद्धिबळें मध्यम खेळणाराला दोन डाव टाकून होणारा तिसरा डाव आधीं दिसतो; पण तोच खेळणारा निष्णात असेल तर पांच–सातहि डाव आधीं लक्षांत घेऊन त्या धोरणानें तो मोहोरीं चालवितो. पण असा भेद असला तरी मधल्या डावांच्या पायऱ्यांवरूनच दोघांनाहि जाणें भाग आहे. सदरेवरून माडी चढण्याचा मार्ग एक म्हणजे जिना हाच; त्यावरून चढणारें मूल असेल, तर दोन पायांच्या भरतीला दोन हात लावून, चार चार पायांनीं प्रत्येक पायरी चढेल; प्रौढ मुलगा असेल तर तो एका पायरीवर एक पाय तर दुसरीवर

दुसरा पाय असा चढेल, तर एका पायरीआड एक पायरी ओलांडून उड्या मारीतहि त्याला जिना चढतां येईल. पण सोपानपरंपरा हा त्याला कांहीं चुकणार नाहीं. अनुमान म्हणजे तीहि अशी एक सोपान-परंपराच असते.

मनुष्याचा अनुभव व बुद्धि जितकी जास्त, त्या मानानें त्याला अनुमान-सोपानाच्या पायऱ्या—म्हणजे मुख्य अनुमानांतील कांहीं कांहीं पोट-अनुमानें—उड्या मारून ओलांडितां येतील. परंतु अनुमान—सोपानावरूनच सिद्धान्ताकडे गेलें पाहिजे हें त्याला टाळतां येत नाहीं. अनभव किंवा बुद्धि विशेष असली तर मनुष्याला पोट-अनुमानांच्या पुरचुंड्या बांधून नेहमीं तयार ठेवितां येतात, इतकेंच. गणितशास्त्रांत असे ' फॉर्म्युले ' तयार असतात, किंवा महिन्यावरून दिवसांचे पगार आकारण्याची अथवा इंजिनियर खात्यांत इमारती बांधण्याच्या कामीं लाकूड—लोखंड वगैरेंवर पडणारा भार व त्यामानानें त्यांचीं रुंदीजाडीचीं मापें ठरविणारीं कोष्टकें असतात, तशीं अनुमानविषयांतील कोष्टकें अनुभव व बुद्धि यांच्या योगानें मनुष्याच्या डोक्यांत तयार होऊन राहतात; आणि मग त्यांच्या साहाय्यानें कोणत्याहि प्रश्नास मनुष्याला कमीजास्त जलदीनें उत्तरें देतां येतात. पुष्कळ गोष्टी मनुष्य हा अंगच्या उपजत—बुद्धीनें करितो असें म्हणतात; परंतु, उपजत—बुद्धि अशी फार थोडी असते; व जी असते तिचेंहि पृथक्करण केलें असतां, तो त्याच्या स्वतःच्या अनुमानांचा परिणाम नसला तरी ज्यांच्या शरीरापासून तो निर्माण झाला, त्या एक अगर अनेक पिढ्यांच्या मातापितरांनीं आपापल्या जन्मांत मिळविलेल्या अनुमानजन्य ज्ञानाचा परिणाम होय, असें दाखवितां येतें. सहजस्फूर्तीचेंहि स्वरूप असेंच आहे. चकमक झडल्याबरोबर ठिणगी पडली किंवा बटन दाबल्याबरोबर विजेचा दिवा लागला, तरी त्या ठिणगीचा व त्या ज्योतीचाहि एक रासायनिक वृत्तान्त म्हणून असतोच. या चमत्काराचा कार्यकारणभाव, त्याचे नियम व तो चमत्कार उत्पन्न होण्यास लागणारी पूर्वतयारी यांचा वृत्तान्त इतका मोठा असतो, कीं तो घडून येण्यास जशीं कित्येक वर्षेंहि लागलीं असतील तसा तो समजून घेण्यास कित्येक तासहि लागतील.

इतका प्रपंच करण्याचें कारण हेंच कीं, ‘भविष्यकथन’ हें नांव जरी प्रायः गहनार्थप्रतिपादक आहे, तरी ती वस्तु केवळ ‘अनुमान’ या सदराखालींच पडेल. अनुमान हें नीरस व तर्करुक्ष नांव दिल्यामुळें भविष्यकथनाचें स्वारस्य, त्याची सर्व रम्यता आम्ही काढून टाकतों, असा कदाचित् आक्षेप आमच्यावर येईल. परंतु तो आक्षेप सोसूनहि यथार्थ वस्तुरूपदर्शन करविलेंच पाहिजे. भविष्यकथन हें केवळ दिव्यस्फुरणाचें कार्य आहे, असें गौरवयुक्त शब्दांनीं त्याचें वर्णन कोणी वाटेल तर करो; पण भविष्यकथनास केवळ अनुमानाखालीं ओढणाराला आपल्या पदरीं नास्तिकपणाच पत्करावा लागेल असें नाहीं. कारण याच स्फुरणांतील दिव्य तेज तेवढें ईश्वरी चित्कलेंतून आलें असें मानण्यास काय कारण ? व हें तेज जर चित्कलेंतून आलें, तर भविष्यकथन सोडून वर्तमानकालीं होणाऱ्या इतर लोकोत्तर मानसिक स्फुरणाचे जे प्रकार आपणांस दिसतात, त्यांनाहि कारण ईश्वरी चित्कलाच असें कां मानूं नये ? ईश्वर मनुष्याला चित्कला उसनी देत असेल, तर ती भविष्यकालासंबंधीं सवा हात गप्पा मारण्यापुरतीच देतो असें का मानावयाचें ? वर्तमानकालींहि बुद्धीचे किंवा मानसिक स्फुरणाचे चमत्कार आपणांस दिसत असतां, त्यांना मात्र लौकिक गोष्टी हें नांव देऊन त्यांची योग्यता आपण कमी कां करावी ? जें वर्तमान तेवढें लौकिक व जें भविष्य तेवढें अलौकिक; जें प्रस्तुत तेवढें मानुष व जें अप्रस्तुत तें सारें दिव्य; असलें वर्गीकरण अन्यायमूलक नव्हे काय ? तें करणारांनीं भगवद्गीतेंत सांगितलेल्या ‘विभूतिपूजना’च्या सिद्धान्ताचें मर्मच जाणलें नाहीं असें म्हणावें लागतें.

स्वतः बुद्धि हीच मुळीं जर ईश्वरदत्त आहे, तर वर्तमानकालीं किंबहुना आपल्या डोळ्यांदेखत घडणाऱ्या तिच्या अनेक साक्षात्कारांनाहि आपण दिव्य चमत्कार कां म्हणूं नये ? ज्याच्या डोक्यांतून लोकोत्तर उज्ज्वल काव्य निघतें, ज्याच्या हातानें अलौकिक सुंदर चित्र निर्माण होतें, ज्याची बुद्धि सराफकांट्यावर किंवा शेअरबाजारांत इतकी प्रभावशाली होते, कीं त्याच्या पुढें सर्व प्रतिपक्षी कोलमडून जाऊन त्यालाच तेवढें अव्याहत यश मिळतें—त्या सर्वांच्या मनःस्फुरणाला दिव्यच कां म्हणूं नये ? व आमच्या या युक्तिवादानें चिच्छक्तीची व्याप्ति जगात अशी अधिक सिद्ध झाली, तर आम्ही

नास्तिक न ठरतां उलट अधिक आस्तिकच ठरत नाहीं काय ? अमुक इतक्या इयत्तेपलीकडे मनःस्फुरण गेलें म्हणजे त्याला दिव्य किंवा ईश्वरी असें नांव द्यावयाचें, तर आमच्या कवीला, आमच्या चितार्‍याला व आमच्या यशस्वी सट्टेवाल्यालाहि तुमच्या भविष्यवाद्याप्रमाणें चित्कलेचे अंशभागी मानून त्यांना तें गौरव तुम्ही देणार नाहीं, तर तुमच्या भविष्यवाद्यालाहि तें मिळणार नाहीं ! ईश्वरी कृपेची वांटणी मनुष्यमात्रांत इतक्या सढळ हातानें करावयाची कीं नाहीं—कारण तशी केल्यानें त्या कृपेची दुर्मिळता जाऊन तिची योग्यता कमी झालीशी तुम्हांला वाटेल, हें तुम्ही वाटेल तसें ठरवा. पण वांटणीचा प्रश्न उपस्थित झाला असतां, न्यायाचा आग्रह आम्ही सोडणार नाहीं, इतकेंच काय तें आमचें येऊन जाऊन म्हणणें.

'पुढें काय ?' हा प्रश्न बहुधा प्रत्येक मनुष्याच्या पुढें उभा असतोच. उन्हांत चालणार्‍या मनुष्याला ज्याप्रमाणें आपल्या सावलीच्या टोंकाला केव्हांहि गांठतां येत नाहीं, त्याप्रमाणें 'पुढें काय ?' या प्रश्नाच्या समाप्तीलाहि तो केव्हांच गांठूं शकत नाहीं. हिमालय पर्वतावर चढणार्‍या प्रवाशानें एक शिखर ओलांडलें कीं दुसरें शिखर त्यामागें उभें असलेलें त्याला दिसतें; व तो तेंहि चढून गेला कीं तिसरें ! क्षितिजावर पृथ्वी आणि आकाश एक-मेकांस चिकटून पृथ्वीची सीमा पोंचली असें वाटतें. पण तेथें एखादी खूण ठेवून त्याच क्षितिजप्रदेशावर आपण जावें, तों फिरून क्षितिज पहिल्या-इतकेंच दूर दिसतें. 'पुढें काय ?' या प्रश्नाचें उत्तर वास्तविक 'अनंत' असेंच आहे. हें सर्व अनंतच्या अनंत मनुष्याच्या हस्तगत झाल्यास तें त्याला हवेंसेंच वाटेल; कारण खुद्द ईश्वराशीं समव्याप्ति लाभली, तर ती कुणाला नको ? आतां मनुष्यमात्र महत्त्वाकांक्षी असला तरी ही समव्याप्ति अशक्य कोटींतली म्हणून सोडून देण्यास तो तयार असतो. तथापि भविष्या-वरचा सर्व हक्क मात्र सोडून देण्यास तो तयार नसतो. इतकेंच नव्हे, तर आपापल्या शक्तीप्रमाणें भविष्याचा कांहीं थोडा तरी प्रांत हस्तगत केल्याशिवाय त्याला चैनच पडत नाहीं. हावरा शेतकरी जसा आपलें कुंपण थोडें तरी शेजारच्या शेतकर्‍याच्या हद्दीमध्यें ढकलून त्याची निदान हात दोन हात जागा तरी बळकावतोच, किंवा एखादा लोभी सम्राट्

आपल्या राज्याच्या सरहद्दीवरचा प्रांत एकदम खालसा करण्यास नच मिळाला; तरी त्यावर आपलें कोरडें वर्चस्व ( Sphere of influence ) तरी प्रस्थापित करूं पाहतो, त्याप्रमाणें मनुष्यालाहि भविष्याच्या दुर्भेद्य प्रांतांत चंचुप्रवेश केल्याशिवाय समाधानच वाटत नाहीं.

एका अर्थानें त्याचें हें करणें बरोबरहि असतें. कारण ' वर्तमानकाळा ' चा विस्तार फारच संकुचित म्हणजे क्षणमात्र असतो. तेवढ्यावर त्याचें कसें भागणार ? काळ हा डमरूसारखा किंवा एखाद्या वाळूच्या घड्याळासारखा आहे. या घड्याळांत दोन बाजूला दोन मोठे समान आकाराचे पारदर्शक फुगे असतात. त्यांतला एक भूतकाळ व दुसरा भविष्यकाळ. भूतकाळाच्या फुग्यांतले क्षणरूपी वाळूचे कण भविष्यकाळाच्या फुग्यांत हळूहळू पडत असतात; व युगाची कल्पना आपण ध्यानांत घेतली तर, तास भरला म्हणजे पहारेकरी जसा भरलेला फुगा वर व रिता फुगा खालीं करून वाळूचें घड्याळ उलटें टांगून ठेवतो, त्याप्रमाणें युगांतराच्या प्रारंभीं लीलाप्रिय परमेश्वरहि हें कालाचें घड्याळ पुनःप्रवृत्तीकरितां उलटें टांगून ठेवतो ही कल्पनाहि चांगली शोभेल. पण ही दुसरी कल्पना पटण्यासारखी असली किंवा नसली, तरी भूतकाळ व भविष्यकाळ हे वाळूच्या घड्याळांतील फुग्याप्रमाणें असून वर्तमानकाळ हा फक्त त्या दोहोंना सांधणाऱ्या बारीक छिद्रासारखा असतो यांत शंका नाहीं. त्या छिद्रांतून एका वेळीं एकच वाळूचा कण खालीं पडूं शकतो व ज्याला आपण वर्तमानकाळ म्हणतों, तो वास्तविक इतकाच स्वल्पप्रमाण असतो. म्हणून, मनुष्याला केवळ वर्तमानकाळावरच नजर पुरवून चालत नाहीं. भविष्यकाळावरहि थोडी तरी नजर पुरवावी लागतेच. उचललें तें पाऊल भूतकाळांतून व टाकायचें तें पाऊल भविष्य काळांत, आणि दरम्यानची जी संधि ती वर्तमानकाळ. अशी स्थिति असल्यामुळें मनुष्यानें भविष्याची थोडी-बहुत उठाठेव केली, तर ती अगदींच वावगी नव्हे. तथापि भविष्यकाळा-विषयीं मनुष्यानें उठाठेव करावी, ती कितपत आणि कशी करावी हाच मुख्य प्रश्न आहे.

केवळ संसारी मनुष्य घेतला तर त्याला ' पुढें काय ? ' हा प्रश्न बराच महत्त्वाचा असतो; कारण संसारांत आजची तयारी काल व उद्यांची तयारी

आज करावी लागते. 'श्वःकार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकम्। न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम्।' अशी नीतिच आहे. उद्यांची तरतूद आज करून ठेवणाराला 'पुढें काय' हा प्रश्न अडचणीचा वाटत नाहीं, कारण तो त्याच्यापुढें भयप्रद रीतीनें उपस्थित होत नाहीं; व झालाच तर त्याचें उत्तर देण्याची त्याची तयारी असते! पण जे दूरदर्शी नसतात, त्यांना हा प्रश्न फार भयप्रद होतो; आणि म्हणून ते तो प्रश्न सुचला तरी टाळूं लागतात. पावसाळ्याकरितां धान्याचे कण वारुळांत सांठवून ठेवणाऱ्या मुंग्या, बाहेर धो धो पाऊस पडत असतां आपल्या घरांत सुखानें राहतात; आणि त्या त्या दिवसापुरता मध मिळाला कीं तेवढा खाऊन टाकून, उन्हाळ्यांत चैनीनें दिवस काढणाऱ्या माशा पावसाळ्यांत उपाशी मरतात. हा साधा दाखला संसारी मनुष्याला नेहमीं लावतां येण्यासारखा आहे. यामुळें संसारी मनुष्य 'पुढें काय?' या प्रश्नाचा नेहमीं जितका विचार करील व तो सोडविण्याची तयारी ठेवील तितकें चांगलेंच. असो. जी गोष्ट खाजगी व धाकट्या संसाराची तीच सार्वजनिक व मोठ्या संसाराची. संस्था चालविणारांना उद्यांची तजवीज आजच्यापेक्षांहि आधीं पाहावी लागते. एक पोट भरणें किंवा एका शरीराला कपडालत्ता पुरविणें, हें कुणालाहि फारसें कठीण जात नाहीं. पण संस्था ही व्यक्तीपेक्षां ज्या मानानें मोठी त्या मानानें तिच्या तरतुदीची काळजीहि मोठी व संस्थेचे चालक खाजगी व्यक्तीपेक्षां अधिक दूरदर्शी असावे लागतात ते याचकरितां. तात्पर्य, या दृष्टीनें भविष्याच्या तोंडावरचा पडदा दूर सारून आंत नजर फेकणें हें सर्वथा समर्थनीय आहे, एवढेंच नव्हें, तर तें एक कर्तव्यहि आहे.

भविष्यकथनाचा दुसराहि एक समर्थनीय प्रकार आहे; व तो असा कीं, पोटापाण्याचा सांसारिक प्रश्न कांहीं एक नसतां, समाजाच्या भावी स्थितीविषयीं शक्याशक्य निर्णय करून अनुमान ठरविणें, कोणती गोष्ट अधिक संभवनीय आहे व कोणती कमी संभवनीय आहे याचा तपास करणें. अशीं अनुमानें करीत बसणें हा रिकामा खेळसा वाटला तरी त्यापासून बुद्धीला जें एक प्रकारचें वळण किंवा शिक्षण मिळतें, तें फारच उपयोगी असतें. कारण, जगांत दोन दोन शक्ति नेहमीं वावरत असतात—

एक स्वेच्छा-शक्ति व दुसरी परेच्छा-शक्ति, या दोहोंच्या खेचाखेचींत जो मध्यम मार्ग निघतो तोच नियतिमार्ग–तीच परात्परेच्छा. या मध्यम मार्गाचें वळण कसकसें जाण्याचा संभव आहे याचा अंदाज करण्यास समाजधुरीण अशा मनुष्यानें शिकलें पाहिजे. आकाशांत दिसणाऱ्या तेजोराशीवर कोणाला चिमूटभर तांदूळ शिजवून भात करून खातां येत नाहीं, किंवा चहाला लागणारें पेलाभर पाणीहि तापवितां येत नाहीं; तथापि समुद्रावर सफर करणाऱ्या नावाड्याला लक्षावधि कोसांवरून दिसणाऱ्या तारकांचा उपयोग मार्ग बिनचूक दाखविण्याला होतो, व तो त्यानें करून घेतलाच पाहिजे. याच न्यायानें समाजाला कांहीं तरी विवक्षित ध्येय योजून तिकडे जावयाचें असतें, व त्याकरितां भविष्यकाळाची उठाठेव केल्याशिवाय त्याला गत्यंतर नाहीं. म्हणून सामाजिक व राष्ट्रीय स्थितीविषयीं भविष्यकथन करण्याचा प्रयत्न करणें हें अत्यंत हितावह होय.

कारण, आपल्या मनाची गोष्ट खरी; पण ती कितपत साधेल हें पाहणें अगदीं जरूर असतें. मला मनांतून राजा व्हावेंसें वाटत असेल; पण खरोखर मी राजा न होतां पाणक्याच होणार नाहीं कशावरून? किंवा राज्यपदाची महत्त्वाकांक्षा धरून मीं इच्छाशक्ति खूप प्रबळ केली तर माझा पाणक्येपणा चुकेल; आणि राज्यपद न मिळालेंच, तर निदान प्रधानपद तरी मला कां मिळणार नाहीं? अर्थात् माझ्या इच्छाशक्तीचा मार्ग तोच कांहीं नियतिमार्ग नव्हे. म्हणून मनांत इच्छा धरायची ती धरून जर मला माझें वास्तविक भविष्य ठरवितां आलें तर तें इष्टच आहे. पत्ते खेळावयास बसलेल्या प्रत्येक मुलाला प्रत्येक डावांत आपला कोट व्हावा अशी इच्छा असते; पण त्याच्या इच्छेप्रमाणें दर डावीं निकाल कसा लागणार? कारण पत्त्यांचीं पानें चौघां गड्यांमध्यें सरसनिरस अशीं वांटून जातात, व यामुळें एकाचेच सर्व हात होणें अशक्य असतें. अशा स्थितींत स्वतःची इच्छा कितीहि असली तरी पानांची वांटणी लक्षांत घेऊन जास्तींत जास्त किती हात आपणांला करितां येतील, याचा अंदाज करून जो 'सवाल' टाकील व तितके हात करून दाखवील–हात कमी भरून बाजू अंगावर येणार नाहीं–त्याचेंच भविष्यकथन खरें ठरेल. तसाच कोणताहि समाज घ्या. त्यामध्यें मतवैचित्र्य किती तरी

असतें ! अर्थात् त्यांतील सर्व घटकांच्या मताप्रमाणेंच समाजाचें भविष्य कसें सिद्ध होणार ?

प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणें समाजस्थिति एकेक दिवस तरी राहावी असें समजा–जर ईश्वराकडून ठरविण्यांत आलें, तर वर्षभर रोज एक एक नवाच रंग कसा होईल तो पहा ! एक दिवस, पाळण्यांतल्या पोरांना बाशिंगें बांधतां येत नाहींत म्हणून पाळण्यालाच बाशिंगें बांधून झालेले बालविवाह दृष्टीस पडतील, तर दुसरे दिवशीं, 'म्हातारपणीं झालें तरी तांब्याभर पाणी द्यायला कोणी सत्तेचें मनुष्य नको काय ?' अशी सबब सांगून नववधू-संपादनाची लालसा धरणारे थेरडे, अंगावर लपवलेली सुपारी हुडकून काढण्याचा खेळ आपल्या नवोढांशीं खेळताहेत असें दिसेल ! आपल्या मृतपतीची धडधड पेटणारी चिता हाच आपला खरा मोक्षमार्ग असें मानून तिजमध्यें आनंदानें प्रवेश करणाऱ्या साध्वी, किंवा जिवंतपणीं अनेक सुखोपचारसहित आपला हात ज्यावर फिरला तो प्रियपतीचा मृदु देह निष्ठुर अग्नि भाजीत आहे, असें पाहून त्याजवर आपली कोमल देहलता पसरून ज्वाळा शमवूं पाहणाऱ्या प्रेमशूर सतीच जिकडे तिकडे देहसार्थक करीत आहेत, असें आज दिसेल; आणि उद्यां पाहावें तों, साठीच्या जवळ आल्यानें नाठी बुद्धि झालेल्या प्रौढ कामिनी, स्वैर पुनर्विवाहप्रसंगीं विडया तोडण्याकरितां नव्या करकरीत अशा दांतांच्या कवळ्या जबडयांत बसवूं पाहात आहेत, किंवा आपल्या कोमल-तरुण पतिमुखाच्या लावण्यश्रीची छटा नीट दिसावी म्हणून, सावधान म्हणण्याच्या वेळीं नाकावर चष्मा चढविण्याची सावधगिरी ठेवीत आहेत असें दिसेल ! आज पाहावें तों, मृग-चर्मावर बसून पवित्र चमसानें वेदिमुखांत गोरस ओतून श्रौताग्नि किंवा स्मार्ताग्नि प्रदीप्त करणाऱ्या अग्निहोत्र्यांच्या वषट्काराचा किंवा स्वाहाकाराचा गंभीर ध्वनि जिकडे तिकडे ऐकूं येईल. उद्यां मृगचर्माचे बूट पायांत चढवून, वेत्रासनाधिष्ठित होऊन, आधीं स्फटिक चमसांतून आधुनिक सोमरसाचें पान झाल्यामुळें प्रदीप्त झालेला जठराग्नि पुढें लागलींच दुसऱ्या एका प्रकारच्या गोरसाचा स्वाहाकार करून शमवीत आहेत; आणि त्या प्रमाद-प्रमोदाच्या भरांत नोकर–लोकांवर शेलक्या अपशब्दांचा किंवा स्वतः एकमेकांवर

लाडक्या उपनामांचा वर्षाव करीत असल्याचा गोंगाट ऐकूं येईल ! आज पाहावें तों पहिल्या तारखेस झडणाऱ्या चांदरातीनें स्वर्ग लाभल्याचें सुख मानणाऱ्या खर्डेघाशांच्या आनंदाच्या खाकी रंगांत सर्व हिंदुस्थानचा नकाशा रंगलेला दिसेल; तर उद्यां अर्धोज्ज्वल स्वराज्यवाद्यांच्या हेतूप्रमाणें युनियन जॅक आणि जरीपटका यांच्या चिन्हांनीं त्याच नकाशाचा सर्व भूमिका पट निर्मित केला आहे, व त्यावर सर्वत्र भगव्या रंगाची छटा पसरली आहे असें आढळून येईल. आज निर्जन वनांत गाईच्या शेणानें सारविलेल्या साध्या गवताच्या झोंपडींत आसनावर बसून व मांडीवर भूर्ज किंवा तमालपत्र घेऊन शिंपल्यांतील लाख्या शाईनें धर्मसिंधूच्या पोथ्या लिहिणारे दरिद्री विद्वान् चहूंकडे दिसतील, तर उद्यां गजबजलेल्या शहरांत लोहप्रासादाच्या दहाव्या मजल्यावर बसून शेंकडों मैल दूर असणाऱ्या आपल्या कारखान्याच्या सुपरिंटेंडेंटला टेलिफोननें दैनंदिन आज्ञा सोडणारे लाखोपति, किंवा हजारों मैलांवर परदेशांतील आपल्या मुनिमाला सोन्या-चांदीचा बाजारचा बाजार खरेदी करण्याची इशारत बिनतारी तारायंत्रानें देणारे नवकोट नारायण चहूंकडे डोळ्यांला दिसूं लागतील ! पण या सर्व कल्पना झाल्या. यांतील एकहि सर्वस्वीं खरी ठरण्याचा संभव नाहीं.

आपल्या मनांत असतें एक आणि होत असतें भलतेंच, असा सगळ्या जगाचा सर्वकाळचा अनुभव असतो. आतां असें आहे म्हणून मनुष्यमात्रानें इच्छा करण्याचें किंवा मनोरथ बांधण्याचें सोडावें असें नाहीं. भवितव्यतेच्या बाजारांत आपण उभें असतां सर्वांत अधिक उंची माल सर्वांत कमी किंमतीस मागण्याला आपणांस हरकत नाहीं; किंबहुना तसा तो मागण्याचा आपणांस हक्कच असतो. तथापि, भारी पदार्थ हलक्या किंमतीस मागण्याचा हक्क जरी आपणांस असला तरी दुकानदार कोणता पदार्थ अखेर किती किंमतीपर्यंत सोडील याचाहि संभव आपणांस अजमावतां यावयास पाहिजे. नाहीं तर एकहि सौदा न पटतां चिकार भरलेल्या बाजारांतून रिकाम्या हातानें पण निष्फळ इच्छेचें जड ओझें मात्र मनांत बांधून, आपणांस घरीं परत यावें लागेल ! शक्याशक्यतेचा व संभवासंभवाचा विचार हाच जगाच्या व्यवहारांत खरा उपयोगी असतो. उज्ज्वल इच्छा आपण मनांत बाळगूं नये असें नाहीं.

हिंदुस्थानांत शेंकडों वर्षांपूर्वी आलेल्या पारशांनीं इराणांतून आणलेला आपला पवित्र अग्नि जसा आग्यारींतून अद्यापि एकसारखा कधींहि विझूं न देतां प्रज्वलित ठेवलेला आहे, तसेंच मनुष्यमात्रानें ध्येयरूप आपल्या आकांक्षेचें अग्निहोत्र कधींहि विझूं देऊं नये. तथापि, रोजच्या भाजीचे बटाटे आग्यारींतल्या किंवा अग्निहोत्राच्या विस्तवावरच भाजून घेण्याच्या आग्रहाला मूर्खपणाचें स्वरूप येतें हेंहि विसरतां कामा नये. समुद्रावर होकायंत्र जवळ नसतां नावेंतून प्रवास करणाऱ्या खलाशाला रात्रीं दर्शन देणाऱ्या दिव्य तेजोराशीचा उपयोग मार्गदर्शनापुरतां झाला तरी तो कांहीं थोडा नाहीं. त्याला भातपिठलें करून सकाळ–संध्याकाळची भूक भागवावयाची असेल तर नावेवर फांद्या किंवा कोळसे यांचा परसा पेटवूनच त्यानें आपलें काम भागवून घेतलें पाहिजे.

तात्पर्य, मनुष्यानें भविष्यकथनाच्या उद्योगांत पडावें, पण तें बालिश आनंदानें पडूं नये. म्हणजे, कोणत्याहि भावी गोष्टीचें ज्ञान अनुमान-परंपरेनेंच सिद्ध करतां येईल असें समजावें व तसें करण्यास शिकावें. दिव्य किंवा अद्भुत चमत्कारांच्या भानगडींत न पडतां, केवळ मनष्यासहि लोकोत्तर असें बरेंच करण्याची शक्ति असते; आणि केवळ मनुष्यपणाचा अभिमान धरला तरीहि मनुष्यास तो पुरेसा आहे. ईश्वराच्या सिंहासनाच्या खुरालाच त्याला हात घालावयाला पाहिजे असें नाहीं. असला विचार भविष्यकथनाचें कल्पनारम्यत्व कदाचित् नाहींसें करील, पण भविष्यकथनाचा कस तरी त्यामुळें सत्याच्या कसोटीवर अधिक लागेल !

• • •

## १२ : सिमल्याचें वर्णन

दिल्ली आणि सिमला यांतील अंतर जमीन-अस्मानाचें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्ली समुद्राच्या सपाटीपासून सुमारें तीनशें फूट उंच असेल, तर सिमला सात हजार फूट उंच भरेल. सिमल्यावर चढलेल्याला झालें तरी आकाश ठेंगणें होतें असें थोडेंच आहे? पण हिमालय म्हटला म्हणजे पृथ्वी-वरच्या कोणाहि मनुष्याला जरा आदरानेंच बोलावें लागतें. समुद्राच्या सपाटी-पासून तडक एकदम सात हजार फूट उंच चढणें हें आधुनिक वैमानिकालाहि थोडें अवघडच जाईल. 'सिमल्याची टेकडी' हें 'नगाधिराज हिमालया'चें एक लहानसें बछडें आहे; तथापि हें बछडें आपल्या वाडिलांचें नांव कांहीं अगदींच घालविणारें नाहीं. कारण येथें हिंवाळ्यांत तर बर्फ पडतेंच, पण ऐन उन्हाळ्यांत देखील येथून जवळच बर्फाच्छादित शिखरें दिसतात. हल्लीं सिमल्यास हवा फारशी गार नाहीं. सिंहगड किंवा महाबळेश्वर येथली हवा देखील कदाचित् थोडी अधिक गार ठरेल. पण आठपंधरा दिवसांपूर्वींच येथें थंडीचा कडाका पडून लिंबाएवढ्या गारांचा पाऊस कोसळला होता असें आमच्यापूर्वीं येऊन राहिलेले लोक सांगतात. उंच दर्जाच्या माणसाच्या स्वभावाप्रमाणेंच उंच जागेचें हवामान लहरी नसेल तरच आश्चर्य!

हिमालय पर्वतांत एकाहून एक उंच अशा शिखरांच्या रांगा एकामागें एक लागलेल्या असतात असें म्हणतात. त्याचा मासला सिमल्यास येतांना पाहावयास सांपडला. कालका येथें चढण्यास प्रारंभ केला, तेव्हां वाटे हा डोंगर चढून गेलों म्हणजे सिमला दिसेल. पण सिमला नुसता दिसण्याला देखील त्याच्या सात हजार फूट उंचींतले सहा हजार फूट खर्चीं घालावे लागले; आणि हें करतांना आगगाडीला वळसे इतके घ्यावे लागले कीं, आम्ही जिच्याकडे तोंड करून चाललों नव्हतों अशी एकहि दिशा उरली नाहीं. खुद्द सिमलाच पाठीशीं घालून पुढें चाललों कीं काय असाहि कित्येक ठिकाणीं भास झाला! वळणें घेण्याला सापाच्या गतीची उपमा देतात; पण आमच्या पूर्णचक्राकार गतीनें ही म्हण साफ खोटी पाडली! वळणांची एक

रांग संपली कीं, पहिली दरी बुजून नवी दरी व नवें खोरें दिसूं लागे, यामुळें जमिनीपासून डोळ्याला उंची फारशी भासत नसे; पण नवीं संकटें उद्भवलीं म्हणजे जुन्यांचा विसर पडावा त्यांतलेंच हें आहे! अगणित दऱ्या-खोऱ्यांचीं पुडांत पुडें बसवून हिमालयाची बनावट एखाद्या गेंदेदार दीप-माळेप्रमाणें किंवा पाकळीदार फुलाच्या माळेप्रमाणें केलेली आहे. सिमल्याचा पर्वत हें या एकंदर माळेंतील शेंकडों फुलांपैकीं फक्त एक फूल आहे. या प्रत्येक फुलाच्या वांट्याला एकेक उंच गिरिशिखर आलेलें आहे. प्रायः हीं सर्व शिखरें श्रीशंकराच्या नांवानें पवित्र झालेलीं असावीं. आमच्या समोर दिसतें त्या शिखराला 'चुडेश्वर' म्हणतात; व या 'जटाधारी' योगी-श्वराच्या विरागी ऐश्वर्याची आठवण करून देणारा पवित्र भस्मराशीच कीं काय असा तो त्या शिखरावरील बर्फाचा विसकटलेला ढीग दिसतो. येथून केदार, कैलास, कांचनगंगा, धवलगिरि वगैरे शंकरजींच्या इतर आवडत्या निवासस्थानांची आठवण सहजच होते. आणि 'एवरेस्ट' वर चढण्याच्या 'प्रयत्नां' ची हकीकत आजच्याच वर्तमानपत्रांत वाचली त्यावरून अजून 'साहेब शिवला नाहीं' अशी देवतानिवासाची एक तरी जागा शिल्लक उरली आहे या विचारानें खरोखरच जरा बरें वाटलें!

हिमालय हा महादेवाच्या सहवासाला शोभण्यासारखा म्हणजे 'महा' या नांवाला योग्य असाच एक पर्वत आहे. पण महादेवाच्या स्वभावाचेंहि त्यानें थोडेंसें अनुकरण केलेलें आहे असें म्हणतां येईल. कारण हा पर्वत अजस्र व भयप्रद तर खराच; पण त्याच्या स्वभावरचनेंत भोळेपणाचें थोडें मार्दवहि आहे. सह्य पर्वताच्या काळ्याकभिन्न शिळांकडे पाहिलें म्हणजे निर्दयतेशिवाय दुसरी कल्पनाच येत नाहीं. हिमालय देखील टणक आहे. पर्वतच तो! पण त्याच्या अंगावरील माती केवळ कोपरानेंच नव्हे पण खोऱ्याकुदळीच्या युक्तीनें तरी अगदींच काढतां येणार नाहीं असें नाहीं, असें पाहणाराला वाटतें. तसेंच, सह्याद्रीपेक्षां याच्यावर वृक्षसंपत्ति कांहीं कमी नाहीं; पण सह्याद्रीच्या अंगाला चिकटून बसणाऱ्या व अतएव त्यावरील प्रवेश दुर्गम करणाऱ्या खुरट्या झाडोऱ्यांची ती दाटी नव्हे. हिमालयाच्या अंगावरचे वृक्ष पन्नास पाऊणशें फूट सहज उंच असतात; पण जमिनीपासून

दहा-वीस हातांवर त्यांच्या खांद्या फुटल्यानें या झाडींतून मनुष्याला सुखानें वावरतां येतें. सह्याद्रीवरील झाडी पाहिली म्हणजे उन्हाळ्यांत उघड्या अंगानें बसलेल्या एखाद्या केसाळ मनुष्याची आठवण होते. तीच हिमालयावरील झाडी पाहतां, अवचित पाऊस आल्यानें डोक्यावर छत्र्या उघडून धरलेल्या प्रेक्षकांच्या जाहीर सभेची आठवण होते. हिमालयावरचा एकेकटा वृक्ष घेतला तरी त्याची उंची व त्याचा सरळ ताठपणा पाहून त्याच्याविषयीं आदरच प्रगटतो; आणि कालिदासानें देवदाराचें वर्णन 'अमुं पुरः पश्यसि देवदारुं पुत्रीकृतोऽसौ वृषभध्वजेन' असें जें केलें तें शोभण्यासारखें आहे असें वाटतें.

हिमालयांत अनेक जातींचे पहाडी लोक आहेत. त्यांचीं पूर्वीं लहान लहान संस्थानें होतीं. १८०३ सालीं दिल्ली हस्तगत झाल्यावर इंग्रजांचा प्रवेश पंजाबच्या या कोपऱ्याकडे झाला. पहाडी संस्थानिकांना लढवय्ये व निर्दय गुरखे लोकांचा त्रास होऊं लागला. तो टाळावा म्हणून त्यांनीं इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांनीं नेपाळच्या युद्धांत गुरख्यांना आपल्या हद्दींत पिटाळून लावलें. हें कार्य झाल्यावर इंग्रजांनीं पहाडी संस्थानिकांना त्यांचा बहुतेक मुलूख परत दिला; पण लष्करी दृष्टीनें कांहीं नाक्याच्या जागा म्हणून आपल्या ताब्यांत ठेवल्या. तात्पर्य, इसापनीतींतील 'मनुष्य आणि घोडा' या गोष्टीची येथें पुनरावृत्ति होऊन साहेब जो एकदां सिमल्याच्या पहाडावर चढला तो कांहीं केल्या खालीं उतरलाच नाहीं! परत दिलेल्या जागांत देखील उंच उंच हवेशीर पठारें पाहून तेथें दुखणाईत लोकांकरितां झोंपड्या व घरें बांधण्याची परवानगी त्यानें मिळविली; व अखेर हीं लष्करी ठाणीं व हीं पठारें मिळून सिमल्याची वस्ती बनली. सिमल्याच्या सात टेकड्यांवर मिळून आज सुमारें नव्वद हजार वस्ती आहे व सगळ्या हिंदुस्थानचा कारभार बारांपैकीं सात महिने या पहाडावरून चालतो!

हल्लीं सिमल्यावर चढून येण्याला मोटारी चालण्यासारखा रस्ता व प्रत्यक्ष आगगाडीहि झाल्यामुळें दळणवळणाची कांहीं अडचण वाटत नाहीं; पण पहिले जे इंग्रज येथें आले त्यांना अमेरिकन वसाहतवाल्यांप्रमाणें धैर्य, काटकपणा व स्वावलंबन या गुणांचा फार उपयोग करावा लागला. १८१९ सालीं

सिमल्यावर साहेबांची पहिली झोपडी बांधली गेली. तेथपासून पुढें उन्हाळ्यांत चार दिवस व्हाइसरॉय व सेनापति यांनीं नुसतें हवेखातर येथें येऊन राहावें असा प्रघात पडला. १८२७ मध्यें लॉर्ड आमहर्स्ट हे आपली खास कचेरी घेऊन सर्व उन्हाळाभर येथें राहिले. अखेर १८६४ सालीं ग. ज. लॉर्ड लॉरेन्स यांनीं सिमला ही कायमची राजधानी बनविली. या शंभर वर्षांत सरकारी रीत्या या ठिकाणावर किती कोटि रुपये खर्च झाले असतील याची कोणासहि सहज कल्पना करतां येईल. या राजधानींत सरकारच्या सर्व खात्यांच्या कचेऱ्या, दप्तर, छापखाना, लष्करी छावणी, बिनतारी व साधीं तारायंत्रें, लष्करी विमानें वगैरे सर्व कारखाने एप्रिलच्या प्रारंभापासून नोव्हेंबरच्या प्रारंभापर्यंत जोरांत चालू असतात. उरल्या पांच महिन्यांत सिमला योगनिद्रा घेतो.

एवढ्या सगळ्या हिंदुस्थानची राजधानी व ती एखाद्या पर्वतशिखरासारख्या अडचणीच्या जागेंत कां असा प्रश्न सहजच सुचतो. पण त्याचें उत्तर पूर्वींच्या इतिहासांत व परंपरेंत आहे. कंपनी–सरकारचा राज्यसंपादनाचा उद्योग प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत झाला; व कलकत्त्याहून राजधानी बदलून दिल्लीस आली तरी वरील कारणांत कांहीं फरक झाला नाहीं. उलट कलकत्त्यापेक्षां दिल्लीला सिमला फारच जवळ. यामुळें ही सकारणता बळावली. नव्या दिल्लीची रचना व इमारती झाल्यापासून मात्र सिमल्याचें महत्त्व सरकारच्या मनांतून थोडें कमी झालें आहे. सर्व कचेऱ्या सात महिने येथें असतात त्या उठून बाराहि महिने दिल्लीस राहाव्या, व मुख्य मुलकी–लष्करी अधिकारी यांनींच वाटेल तर आपले खास नोकर व हस्तक बरोबर घेऊन उन्हाळ्यांत सिमल्यास राहावें अशी नवी योजनाहि पुढेंमागें होण्याचा संभव आहे, नाहीं असें नाहीं. पण आज तरी सात हजार मैल समुद्रापलीकडचा साहेब हिंदुस्थानांत येऊन सात हजार फूट उंचीच्या पहाडावर बसून राज्य करतो अशी विपरीत वस्तुस्थिति आहे खरी ! हवाखोरीची आवड, एकतंत्री राज्यसत्ता, परक्या लोकांचा मुबलक पैसा, इतके गुणदोष एकत्र झाल्यावर पर्वतावर तर पर्वतावर, पण सुखाला लागेल अशी राजधानी इंग्रजांनीं कां न करावी ?

मैदानांतून उठून पर्वतावर जाऊन राहण्याची कल्पना आपल्याकडेहि नाहीं असें नाहीं. राजधानीचें ठिकाण ही उत्तम बचावाची जागा असावी अशी गरज पूर्वींच्या काळीं फार होती. याकरितां डोंगर नसेल तेथें भुईकोट किंवा गढी बांधीत व डोंगर मिळाल्यास अर्थात् त्यावर राजधानी वसवीत. शिवाजीमहाराजांनीं आपली राजधानी करण्याकरितां रायगडाची जागा पसंत केली ती किती उंच व बिकट आहे हें ज्यांनीं ती प्रत्यक्ष पाहिली असेल त्यांच्या लक्षांत येईल. पण तो काळच तसा होता. उत्तरहिंदुस्थानांत रजपुतांनीं देखील सांपडेल तेथें डोंगराचा आश्रय करूनच राजधान्या बांधल्या आहेत. आपल्या देवस्थानांची गोष्ट देखील अशीच आहे. मैदानापेक्षां डोंगर–पर्वतांवरच अधिक देव बसविलेले आढळतात. देवतानिवास हा एकान्तात असला म्हणजे मुद्दाम उठून जाणाऱ्या भाविक यात्रेकरूंखेरीज इतरांकडून त्याच्या पावित्र्याला उपसर्ग पोंचत नाहीं. देवपूजा, जपजाप्य, योगसाधन करणारांना उंच व एकान्तांतील जागा फार अनुकूल असते. शिवाय, देवानें सगुण रूप घेऊन संसार मांडला व दागदागिने केले कीं त्यालाहि शत्रूची भीति उत्पन्न झालीच; याहिमुळें देव पर्वतांचा आश्रय करतात. दक्षिणेंत त्र्यंबकोबा, बालाजी व उत्तरेकडे अबू, गिरिनार, विंध्यवासिनी येथील देवस्थानें लक्षांत घेतलीं, म्हणजे देवांनाहि पर्वतावरील प्रसन्नतेइतकीच त्यांजपासून मिळणाऱ्या सुरक्षिततेची गरज होती असें सहज सिद्ध होतें.

पण इंग्रजांनीं सिमल्यास राजधानी केली तिला वरच्यापैकीं कोणतेंच कारण लागू पडत नाहीं. सुरक्षितपणा म्हणावा तर सिमल्यास तटबंदी कोठेंच नाहीं; उलट बिकट जागांतून वर सहज जातां यावें म्हणून वाटासडका किती तरी केल्या आहेत. एकान्तप्रियता म्हणावी तर कलकत्ता-मुंबई येथील सरकारी बंगल्यांना जितकी गर्दी दूर तितकी येथें नाहीं. मुख्य सडक अशी एकच म्हणजे मॉलरोड; आणि संध्याकाळीं किंवा दुपारीं पाहावें तों रावां-बरोबर रंकहि येथें खांद्याला खांदा लावून हिंडलेले दिसतात. मुंबई, कलकत्ता येथें गाड्या–मोटारी असल्यामुळें गर्दींत देखील श्रीमंताला संपर्क लागत नाहीं. येथें पाहावें तों सगळ्या सिमल्यावर मुलकी लाट ( व्हाइसरॉय ), जंगी लाट ( सेनापति ), पतियाळचे महाराज व भोपाळच्या बेगमसाहेबा

या चौघांखेरीज इतर कोणालाहि मोटार किंवा घोडागाडी वापरण्याची परवानगी नाहीं! यामुळें मॉलवरील अरुंद रस्त्यांत सगळ्या बड्या अधिकाऱ्यांना पायानेंच चालावें लागतें. एखाद दुसरा घोड्यावरून जातो. कांहीं थोडे रिक्शांमधून जातात, पण बहुतेक पायीं जातात; यामुळें खांद्याला खांदा सहजच भिडतो. बरें, पवित्रपणा म्हणावा तर इंग्रजांनीं येथें देव-देवळांची भानगड फारशी ठेवलेली नाहीं; आणि सामाजिक व्यवहारांत पाहावें तर शहरापेक्षांहि येथें ख्यालीखुशाली व तदनुषंगिक गोंधळ अधिक माजतो म्हणतात.

सिमल्याचा विस्तार सात टेकड्यांमिळून सहा मैल लांबीचा आहे. त्यामानानें रुंदी फारच कमी भरेल. कोठें कोठें पर्वताच्या माथ्याचा सपाट भाग शंभर फूट देखील रुंद नाहीं. या सहा टेकड्यांना आधारभूत असलेला मुख्य पर्वत घोडनालाच्या आकाराचा आहे. त्याच्या मध्यभागीं दाट वस्ती असून इतर वस्ती टेकड्यांवर पसरलेली आहे. मुख्य वस्ती एकाच्या माथ्यावर एक, म्हणजे एकानें आपल्या पडवींत बसून दुसऱ्याच्या धुराड्यांतून खालीं पाहावें अशी वसल्यासारखी दिसते. काळ्या लोकांची वस्ती ही बाजारपेठ व त्याखालीं लागलेली वीस मजली घरांची उतरंड यांत सांठविलेली असून, सरकारी व युरोपियन लोकांचे खासगी मालकीचे बंगले बाजूच्या टेकड्यांवर पसरले आहेत. तथापि, बाजूस झालें तरी महाबळेधुराप्रमाणें येथें बंगल्यांना विस्तीर्ण कंपाउंड किंवा आवार नसतें. याचें कारण माथ्यावर सपाटी अशी फार कमी. स्वाभाविक मैदानी जागा नसल्यानें घर, बंगला बांधणाराला प्रत्येक ठिकाणीं झाडें तोडून डोंगराची कड खोदून जागा साफ करून घ्यावी लागली आहे. कोणत्याहि एका घरांतून दुसऱ्या घरांत जावयाचें असल्यास चढलें तरी पाहिजे किंवा उतरलें तरी पाहिजे. अशा स्थितींत दळणवळण किती अवघड होत असेल याची कल्पना सहजच करतां येईल. लांब पल्ल्याला चौघांच्या खांद्यावरून जावें लागतें! पण मोठे गाडीरस्ते नसले तरी लहान सडका व पाऊलवाटा यांचा जणूं कांहीं नागमोडी मोक्षपटच पर्वताच्या सर्व अंगभर आंखल्यासारखा दिसतो. सिमल्याची इतकी वस्ती, पण कोणीहि कोणाजवळ असा राहात नाहीं असें यथार्थतेनें म्हणतां येईल. कोणत्याहि वस्तीला पाण्याची सोय मुख्य लागते. ती सिमल्यास

असावी तितकी नाहीं. या पहाडांत पाण्याचा सांठा फार होत नसावा असें वाटतें. कारण डोंगरकपारींतून निघालेला जिवंत वाहता झरा असा येथें सहसा दिसत नाहीं. येथील म्युनिसिपालिटीनें दुरून पाण्याचे नळ आणले आहेत. पण कित्येक बंगल्यांना पाणी बरेंच लांबून आणावें लागतें.

विजेची रोषणाई मात्र सिमल्याला भरपूर आहे. दुरून रात्रीं बड्या सिमल्याकडे पाहिलें म्हणजे हिरेमोत्यांचीं तार्टेच्या ताटें भरून तीं लीलेनें वर उधळून द्यावीं असा दाट विखुरलेल्या विजेच्या दिव्यांचा लखलखाट दिसतो. आणि दूर बाजूच्या टेकड्यांवर पसरलेले तुरळक दिवे पाहिले, म्हणजे आपण एखाद्या मोठ्या बंदरांत उभे असून, समोर रात्रींच्या वेळीं समुद्रांत नांगरलेल्या शेंकडों आगबोटींचा काफिला पाहात आहों असा भास होतो. तारायंत्री ताराच्या जाळ्यांचा विस्तार पाहिला म्हणजे बिनवापराच्या जागेंत कोळ्यांनीं केलेल्या विणकामाची आठवण होते. एखादे वेळीं एखादें लष्करी विमानहि पहाडावर घिरट्या घालतें; तेव्हां खालच्या दरींतील चीड, देवदार वगैरे वृक्षांच्या झाडींत नव्या फुलांवर मधाकरितां घोंगावणाऱ्या भुंग्यांच्या गुंजारवाचा प्रतिध्वनीच आपण आकाशांत ऐकत आहों कीं काय असें वाटतें. तथापि अजूनहि सिमला सगळाच कांहीं नवाळला नाहीं ! त्याच्या जुनाट परंपरेचा धागा अजूनहि शिल्लक आहे. कारण पहाटेच्या वेळीं ‘ कार्टरोड ’ वरून लमाणी खेचरांचे तांडे वर घाट चढून येतात तेव्हां त्यांच्या गळ्यांतील घंटा, आपल्या गोड आवाजानें जुनी परिचित रागदारी गाऊन, साखरझोंप घेणाऱ्या आळशी मनुष्याला जागें करून उषःकालाची वर्दी देत असतात. अजूनहि माल देऊन माल विकत घेणारे म्हणजे अडाणी तिबेटी लोक हिमालयांतून येऊन आश्चर्यचकित मुद्रेनें सिमल्याच्या बाजाराकडे पाहात उभे राहतात. अजूनहि आपलें सगळें अंग नखशिखान्त झांकून घेणाऱ्या पहाडी स्त्रिया, अर्धे वक्षस्थळ उघडें टाकून फिरणाऱ्या गोऱ्या युरोपियन बायांकडे भिऱ्या दृष्टीनें पण तिरस्कारयुक्त मुद्रेनें पाहात जात असतात. अजूनहि एखादा जंगली गुराखी पहाडाच्या माथ्यावर बसून जुन्या पद्धतीनें अलगुज वाजवून खालचें दरीखोरें मधुर आवाजानें भारून टाकतो.

सिमल्यास सुमारें नव्वद हजार वस्ती आहे म्हणून सांगितलें. पण ती उन्हाळी वस्ती होय. ऐन हिंवाळ्यांत जेव्हां सरकारी कचेऱ्या येथून खालीं जातात व चोहोंकडे बर्फ पडतें, तेव्हां ही वस्ती चौथ्या हिस्स्याची राहते; बाकीची खालीं निघून जाते. घरधन्यापेक्षां पाहुण्यांचीच गर्दी अधिक, अशांतला तेथील कायम वस्तीचा प्रकार आहे; आणि उन्हाळी वस्तींत देखील उद्योगी मधमाशांपेक्षां गुलहौशी फुलपांखरेंच अधिक! सरकारी पेट्या, कागदाचीं पुडकीं, पट्टेवाल्यांची गर्दी हें सर्व पाहून येथें चालणाऱ्या कामकाजाची कल्पना येते ती कांहीं अगदींच खोटी नसते. पण रस्त्यांत भेटणाऱ्यांपैकीं खऱ्या कामांत गढलेल्या अशा एका माणसागणिक दोन माणसें ख्यालीखुशालीच्या ढंगांत असतात असें म्हटल्यास फारशी चूक होणार नाहीं. सरकारी कचेऱ्या येथून हलल्या म्हणजे मग येथील कायम रहिवासी पहाडी लोक व नेपाळ–तिबेटाकडून येणारे फेरीवाले यांच्या स्वाधीन सगळा सिमला होतो. या दोन जातींचे लोक पाहतांच वेगळे म्हणून ओळखता येतात. पहाडी मनुष्य हा अर्धशुभ्र, नाकाडोळ्यांनीं तरतरीत व ठेवणीनें किंचित् छलकाटा असा असतो; आणि तिबेटी वगैरे प्रायः नकटे, खुजे, कुरूप, घाणेरडे पण मोठे बळकट असे असतात. हातगाड्या वगैरे ओढण्याचें काम पहाडी लोक करतात, पण पल्लेदार मजलीवरचें किंवा ओझें वाहण्याचें काम हे दुसऱ्या प्रकारचे लोक करतात. आमचे घाटी लोक खंबीर खरे, पण हे तिबेटी मोठीं ओझीं पाठीवर घेऊन उंचवट्यावरून खुशाल चढून गेलेले पाहिले म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. या कायम रहिवाश्यांच्या यादींत सिमल्यावरील माकडांचाहि समावेश केल्यास चूक होणार नाहीं! कारण त्यांची वस्ती. तशीच जुनाट व कायम आहे. माणसा-बरोबर माकडांचा उल्लेख केल्यास मनुष्यजातीचा अपमान केलासा वाटेल; पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. किपलिंगनें आपल्या कवितेंत सिमल्यावरील माकडांना विशिष्ट प्रकारच्या युरोपियन लोकांपेक्षां अधिक मान दिला आहे. या कवितेचे दोन चरण असे आहेत :

"Artful Bunder, who, never in his life,
Flirted at Peliti's with another's wife."

या कवितेमध्यें ‘ पोलिटी ’ सारख्या श्रीमंती थाटाच्या हॉटेलांत फॅशनेबल व स्वैर लोकांकडून घातल्या जाणाऱ्या गोंधळावर कवीनें कोरडा उडविला आहे.

सिमल्यावर सरकारनें हिंदी प्रजेचे कोट्यवधि रुपये पाण्यासारखे नासले व वर्षांतून सात महिने सगळया सरकारी कारभाराचा आखाडा सिमल्यावर ठेवला, यामुळें दरवर्षी लक्षावधि रुपयांचा व्यर्थ चुराडा होतो हें तर झालेंच; पण इंग्रज लोकांच्या दृष्टीनेंहि पाहतां त्यांना सिमल्याची कीर्ति फारशी प्रिय नाहीं. येथील समाजरचनेला असेंच कांहीं फाजील कृत्रिम स्वरूप आलेलें आहे कीं, तें सुजाण इंग्रजांना फारसें पसंत पडत नाहीं. ‘ रोग्यांना प्रकृति सुधारण्याची जागा ’ असें जोंपर्यंत सिमल्यास स्वरूप होतें, तोंपर्यंत सर्वांना पसंत होतें. पण सगळा कारभाराच्या कारभारच उचलून पर्वतावर नेण्यांत आला, तेव्हां खुद्द इंग्रजांनींहि त्याबद्दल तक्रार केली. १८५१ सालच्या ‘ दिल्ली स्केचबुक ’ नामक विनोदी पत्रांत या विषयावर फार चुरचुरीत टीका आलेली आढळली, ती अशी–
“ पंजाबचा अंतस्थ मुलूख पाहण्याकरितां मुलकी लाट सिमल्याला गेला. मुलकी लाट गेल्यावर त्याच्या संरक्षणाला जंगी लाटला जाणेंच आलें ! येवढे वरिष्ठ गेल्यावर कनिष्ठाचें कर्तव्य म्हणून लेफ्टनंट गव्हर्नर गेला. कमिशनर म्हणाला, पर्वतावर जायचें म्हणजे कोण त्रास ? पण कर्तव्य हें केलेंच पाहिजे, म्हणून तो गेला. इतके अधिकारी वर गेल्यावर त्यांच्या टपालाची व्यवस्था करण्यास पोस्टमास्तर जनरलला जावेंच लागलें. मग कोणी या सर्वांचा बंदोबस्त ठेवण्याला म्हणून गेले. कोणी सरकारी काम उकरून काढून गेले. कोणी बढती मागण्याला म्हणून गेले. कोणी रजेचा रिकामपणा म्हणून गेले. कोणी आजाराचें निमित्त करून गेले. कोणी पुढचा आजार वांचवावा म्हणून गेले. कोणी स्वतःच्या करमणुकीला गेले. कोणी दुसऱ्याच्या करमणुकीला गेले. कोणी सुंदर बायका लग्नाला मिळवावयाला गेले. कोणी आपल्या सुंदर बायका लोकांना दिमाखानें दाखवायला गेले. मुलें असलेल्या बायका मुलांच्या प्रकृतीकरितां गेल्या. मुलें नसलेल्या बायका रिकाम्या म्हणून गेल्या. आणि कित्येक आपल्या नवऱ्यांच्या बढतीच्या किंवा बदलीच्या खटपटीकरितां

म्हणून गेल्या. मिळून सगळे गेले. ज्यांना यांपैकीं कांहींच निमित्त मिळेना, तेवढे मात्र राहिले!"

लंडन टाइम्सचा बातमीदार डॉ. रसेल सिमल्यास १८५८ त आला होता. तो लिहितो, 'मला आजारांत बरीच करमणूक आहे. येथें माकडें-वानरें पुष्कळ आहेत. त्यांच्याकडे पाहून कंटाळा आला म्हणजे सहल करण्यास जाणाऱ्या इंग्रज स्त्रीपुरुषांकडे पाहतो. दोघांच्याहि चेष्टा पाहण्यासारख्या असतात; आणि करमणूक सारखीच होते.' इतर कित्येकांनीं येथें चालणाऱ्या बेसुमार जुगारीचें वर्णन केलेलें आढळतें. 'येथें मुलकी अधिकाऱ्यांना कांहीं तरी काम असतें. पण लष्करी अधिकारी रिकामटेकडे असून फारच गोंधळ घालतात. नाच, वनभोजनें, शर्यती यांची मारे गर्दी उडते.' १८७३ सालीं अँड्र्यू विल्सन नामक ग्रंथकार लिहितो, "सिमल्याचें नांव इतकें बदनाम झालें आहे कीं, एखादा स्टेटसेक्रेटरी हें ठाणें येथून हलवील तर फार बरें." जागा लहान, लोक पुष्कळ जमतात, बरेचसे रिकामे असतात, आणि वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध करण्याला येथें सामाजिक ख्यालीखुशालीशिवाय दुसरें फारसें कांहीं नसतें. यामुळें हें बदनाम होतें हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं. लॉर्ड लिटन यांच्या वेळीं सिमल्याच्या या अपकीर्तीचा कळस झाला होता असें म्हणतात. साम्राज्याभिमानी लेखक रडयार्ड किपलिंग यानें 'Plain tales from the hills' नामक पुस्तकांत या अपकीर्तीला पोषक असेंच सिमल्याचें चित्र काढलें आहे. पण या गोष्टी जुन्याच नसून सिमल्यास इंग्रजांचा सामाजिक क्रम आहे तसाच चालू आहे. एक विनोदी रहिवासी परवां 'जाक्को' नामक टेकडीसंबंधानें बोलतांना म्हणाला, "जाक्को हा शब्द 'यक्ष' शब्दाचा अपभ्रंश आहे. जुन्या काळीं खरेखुरे यक्षगंधर्व या पर्वतावर उतरून क्रीडा करीत असतील ही समजूत खरी असो वा खोटी असो, पण आधुनिक युगांतले हे गोरे 'सुपरमन' यक्षगंधर्वच होत; कारण त्यांच्या क्रीडा येथें पूर्वीसारख्या हल्लींहि चालतात." या 'जाक्को' पर्वतावर मारुतीचें एक जुनाट देवालय आहे. हा मारुति श्रीरामदासांनीं येथें स्थापला अशी कांहीं हिंदु रहिवाश्यांची समजूत आहे. या मारुतीला उद्देशून हा विनोदी रहिवासी म्हणाला, "हा मारुति मात्र नवसाला पावतो असा इंग्रजांनीं लिहिलेल्या

ग्रंथांतरींहि आधार आहे." मी म्हणालों, "नवसाला पावतो कशावरून?" तो म्हणाला, "जाक्को पर्वताभोंवतीं अल्प परिचित अशाहि अविवाहित इंग्रज युवयुवतींनीं एकदां प्रदक्षिणा पुरी घातली कीं प्रायः लगेच त्यांचे विवाह होतात! आमच्या 'यक्षपर्वता' वरील मारुति स्वत: ब्रह्मचारी आहे खरा; पण त्याला गौरकाय यक्षयक्षिणींचीं लग्नें लावण्याची फार हौस वाटते." सारांश, सिमला हें जसें हिंदुस्थानांतल्या राज्यकारभाराचें केंद्र आहे, तसेंच तें हिंदुस्थानांतल्या इंग्रज समाजासाठीं लग्नाच्या सौद्यांची मुख्य बाजारपेठ आहे असें म्हणणेंहि वावगें होणार नाहीं.

• • •

## १३ : वाङ्मय म्हणजे काय?

'वाङ्मय' या शब्दाची व्याख्या आजवर अनेकांनीं अनेक रीतींनीं केली आहे, पण त्यापासून स्वतः व्याख्या करणारांनाच जें समाधान लाभलें नाहीं तें इतरांना कोठून लाभणार? व्याख्या करण्याला निश्चित अर्थाच्या शब्दांनीं बोलावें लागतें. पण केवळ वाच्यार्थानें बोलूं असें म्हटल्यास वाङ्मयाच्या व्याख्येची मजल गांठतां येणें शक्यच नाहीं. वाच्यार्थाच्या रुक्ष मार्गानें किंचित् प्रवास करतांच थकून, शेजारीं पसरलेल्या आलंकारिक भाषेच्या ताटव्यांत शिरून तेथील छायासुख अनुभविण्याचा व करमणूक करण्याचा मोह प्रवाश्याला अनावर होतो; व त्याहून मौज ही कीं, जे त्याला हमरस्त्यावर मिळालें नाहीं तें आडमार्गांत लाभतें. अमेरिकन प्रोफेसर डन (Dr. Waldo H. Dunn, M. A., LLD.) लिहितो कीं, "The word Literature is not only difficult; it is well nigh impossible to define. There is a distinct border-land where 'expression' of thought merges into the pure gold of literature." याचा अर्थ, "विचार व्यक्त करण्याच्या वाटेनें जात असतां मध्येंच अशी एक यक्षभूमि लागते कीं, तेथें

एकदम शब्दार्थांचें सुवर्ण बनतें." अर्थात् प्रतिभासंपन्न अशा प्रवाश्यांच्या वाट्यालाच हा दिव्य अनुभव यावयाचा ! इतर लोक या मार्गावरून नित्य येरझारा घालीत असले तरी त्यांना ही यक्षभूमि आढळावयाची नाहीं, व त्यांच्या मनांतील अर्थाला सुवर्णाचें स्वरूप कधीं यावयाचें नाहीं.

अल्पसंतुष्ट किंवा घाईत असणाऱ्या मनुष्याला वाङ्मयाची कल्पना अवघ्या दोन शब्दांत देतां येईल. पण खनपटीस बसणाऱ्या संशयखोर पृच्छकाचें समाधान करावयाचें तर दोनशें शब्दहि त्या कामाला पुरणार नाहींत. सांगणारा–ऐकणारा भेटेल तसा वेदान्त श्लोकार्धांत सांगतां येतो, किंवा हजारों ग्रंथ लिहिले तरी पुरे पडत नाहींत. तीच गोष्ट वाङ्मयाचीहि आहे. एका इंग्रज ग्रंथकारानें तर वाङ्मयाची व्याख्या Memorable words अशी केली आहे. मीं पाहिलेली सर्वांत लहान व्याख्या हीच होय.

तर्कशास्त्रांतील व्याख्येच्या पद्धतीप्रमाणें अव्याप्ति, अतिव्याप्ति यांचा घोळ आपण घालीत बसलों तर या व्याख्येची टर तेव्हांच उडवितां येईल. कारण संसारी मनुष्याला वाङ्मयाव्यतिरिक्त लक्षांत राहणारे शब्द इतर पुष्कळ असतात; पण मार्मिक मनुष्याला या दोन शब्दांनीं पुरेशी कल्पना येईल. दुसऱ्या एका इंग्रज ग्रंथकारानेंहि व्याख्येची अडचण खालील वाक्यानें व्यक्त केली आहे—I will tell you what literature is, No. I only wish I could. But I can't. No one can. Gleams can be thrown on the secret. Inklings given, but no more. इतकें बोलून हताश होऊन तो नाद सोडून दिल्याचा आविर्भावच त्यानें केला आहे !

वाङ्मय हें शब्दात्मक असलें तरी त्याला अनेक प्रकारची कसोटी लावितां येते. त्याला वजन, माप, प्रमाण, शरीर, स्वरूप, रंग, तेज, मन, आत्मा, इतिहास, यशापयश, ईश्वरी कृपा इत्यादि अनेक अंगें व गुण असतात. प्रथम वाङ्मयाचा शरीरदृष्ट्या विचार करूं. वाङ्मय याचा वाच्यार्थ 'यच्चयावत् जें वाचेनें वदलें गेलें तें' असाच करावा लागेल, पण हा जगड्व्याळ अर्थ कोणासहि अभिप्रेत नसणार हें उघड आहे. वेडा बोलतो तोहि वाङ्मयव्यवहार म्हणूं लागलों तर स्वतःलाच वेडे म्हणवून घ्यावें लागेल; पण प्रतिभावान् नाटककार नाटकांत वेड्याचें पात्र

घालून त्याजकडून असें बोलवून दाखवूं शकतो कीं, तें वाङ्मय होऊं शकेल. वाङ्मयाची व्याप्ति संकुचित करितांना हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पुस्तकांतून, त्यांतल्या त्यांत रक्षणीय अशाच विचारांचा संग्रह होत असला तरी सर्वच्या सर्व पुस्तकें हें कांहीं खरें वाङ्मय नव्हे; त्यांतहि निवड करणें प्राप्त आहे. छापण्याची कला निघाली यामुळें टाकाऊ अशीं पुष्कळ पुस्तकें छापून बाहेर पडतात हें खरें; तथापि हातानें पुस्तकें लिहावीं लागत. तेव्हांहि टाकाऊ पुस्तकें लिहिलीं जात नसत असें नाहीं. छापलेला म्हणून कोणताहि मजकूर जसा खरा असतोच असें नाहीं, तसाच तो संग्राह्य किंवा संस्मरणीय असतोच असेंहि नाहीं. प्रत्येक पिढीची अभिरुचि व स्मरणशक्ति या दोन चाळणीच होत. या जोडचाळणींतून प्रत्येक पिढींत कांहीं कांहीं लेख सरस्वतीच्या गंगाजळींत पडतात व हे सर्व गाळींव लेख मिळून जो संग्रह होतो त्याचेंच नांव वाङ्मय. अखिल पुस्तकसंग्रह हा जसा वाङ्मय होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें एखादुसरा शब्द अत्यंत सुंदर असला तरी त्याला वाङ्मय मानतां येत नाहीं. पण असे जितके अधिक शब्द एकत्र सूत्रबद्ध होतील तितकी त्याची किंमत श्रेढीनें वाढत जाईल. बावनकशी सोनें झालें म्हणून एका कणाची किंमत एका चिपेच्या किंवा लगडीच्या किंमतीबरोबर होऊं शकत नाहीं. तेजाच्या दृष्टीनें दोन मोत्यांची बरोबरी झाली तरी त्यांतल्या त्यांत जें मोतीं वजनानें अधिक चव भरेल तें किंमतीलाहि अधिक भरणार ! कोहिनूरच्या तोंडांत मारील अशा तेजाची एखादी हिरकणी असूं शकेल. पण तुझें वजन किती कॅरेट व कोहिनूरचें किती असें विचारल्यास हिरकणीच्या गालावर लाजेची गुलाबी चमकलीच पाहिजे. शुक्राच्या चांदणीचें आपण कौतुक करितों त्या मानानें सूर्यचंद्रांचेंहि करीत नाहीं. पण एखादा पाणीदार लहान मुलगा पाहिला म्हणजे त्याचें कौतुक आपण करितों त्यांतलाच हा प्रकार आहे. शुक्राची टिकली व हाताच्या तळव्याएवढा तळपणारा पौर्णिमेचा चंद्र हे दोन डोळ्यांपुढें आणून त्यांची तुलना केल्यास चंद्रालाच कोणीहि अधिक किंमत देईल. तुटक सुभाषितें वाङ्मयाच्या जातीचीं खरीं, पण समग्र ग्रंथ किंवा काव्य किंवा महाकाव्य यांच्या मानानें त्यांची किंमत क्षुद्रच ठरणार !

वाङ्मय या नांवाला पात्र होणारा शब्दसमूह शरीरानें भव्यच नसला तरी निदान भरदार असला पाहिजे. त्याला एखाद्या ग्रंथाचें स्वरूप नसलें तरी त्यांत कांहीं तरी विषय प्रतिपाद्य असला पाहिजे. यालाहि अपवाद असूं शकतो. उदाहरणार्थ, Autocrat of the Breakfast Table या Oliver Wendell Holmes च्या ग्रंथांत किंवा माधवराव मोडकांच्या ' खडे तात्त्विक बोल ' या ग्रंथांत एकच विषय प्रतिपाद्य नसून अनेक फुटकळ विषयांचें तुटक प्रतिपादन आहे. पण ग्रंथकाराची तात्त्विक विचारसरणी हें त्या सर्वांतून गोवलेलें एकच सूत्र असून भाषापद्धतीनेंहि त्यांत एकीकरण साधलें आहे.

वाङ्मय हें शब्द व अर्थ मिळून होतें. यामुळें तें साभिप्राय गुणमंडित व दोषरहित असावें लागतें. काव्य व वाङ्मय हे शब्द क्षणभर समानार्थक मानिले तर शब्द व अर्थ यांच्या गुणदोषांविषयीं मम्मटप्रभृति साहित्यशास्त्रकारांनीं जी चर्चा केली आहे ती सर्व वाङ्मयाला ग्राह्य धरण्यास हरकत नाहीं. पण शब्द व अर्थ हे स्वतः सगुण व दोषरहित असले तरी त्यांच्या संबंधांत युक्तायुक्तता म्हणून पाहण्याची एक वेगळी बाब असते. त्याला औचित्य हें नांव आहे. ' औचित्यविचारचर्चा ' नामक आपल्या अवघ्या एकेचाळीस कारिकांच्या सूत्रग्रंथांत क्षेमेंद्रानें या औचित्याचा पूर्ण विचार केला आहे. औचित्य नसेल तर अलंकार हे केवळ जड अलंकार व गुण हे केवळ निरर्थक गुण ठरतात. पण औचित्य हेंच काव्याचें जीवित किंवा आत्मा होय असें क्षेमेंद्राचें म्हणणें आहे. त्याच्या मतें काव्यांत किंवा वाङ्मयांत औचित्य हें निरनिराळ्या पंचवीस-तीस बाबतींत संभाळावें लागतें. पद, वाक्य, प्रबंध, अर्थ, गुण, अलंकार, रस, क्रिया, कारक, लिंग, वचन, विशेषण, उपसर्ग, निपात, काल, देश, कुल, व्रत, तत्त्व, सत्त्व, अभिप्राय, स्वभाव, सारसंग्रह, प्रतिभा, अवस्था, विचार, न्याय आणि आशीर्वाद इतक्या बाबतींत औचित्य तावून सुलाखून घेतलें पाहिजे. ही परीक्षा फारच कडक असल्यामुळें तींत कोणाहि कवीला किंवा वाङ्मय-लेखकाला उत्तीर्ण होणें बहुधा कठीण, व यांपैकीं एकाना एका गोष्टीविषयीं ज्यांत प्रमाद घडला नाहीं असें वाङ्मय मिळणें बहुधा अशक्य. तथापि वरील औचित्यप्रपंच सांगण्याचें कारण इतकेंच कीं,

आपल्याकडील साहित्याचार्योंनीं वाङ्मयाच्या स्वरूपांत किती सूक्ष्मपणें लक्ष घातलें आहे हें कळावें. वाङ्मयाला रस व अलंकार यांचा काय उपयोग आहे याची कल्पना मी पुढें सांगणारच आहे. पण हे दोनहि वाङ्मयास अवश्य आहेत एवढेंच येथें सांगून पुढें जातों.

यानंतर विचारांत घेण्याचा मुद्दा हा कीं, वाङ्मयाचा हेतु काय असावा? कोणत्या हेतूनें लिहिलें गेलेलें वाङ्मय तें खरें वाङ्मय? या बाबतींत थोडा मतभेद होऊं शकतो. कित्येकांची मजल मनोरंजनापलीकडे जातच नाहीं; तर कित्येक नैतिक शिक्षण हाच वाङ्मयाचा हेतु असा आग्रह धरून बसतात. जातां जातां केवळ शाब्दिक कोट्या करणारे लोक कृतीनें पहिल्या हेतूचें समर्थन करितात. उलट जॉन मोर्ले यांनीं वाङ्मयाची व्याख्या केली आहे तींत त्यांनीं नैतिक सत्य हा वाङ्मयाचा आत्मा मानिलेला असून, लिहिणें चित्ताकर्षक असावें ही एक अट पण ती गौण बाब म्हणून दिली आहे. पण त्या व्याख्येनें वाङ्मयाचा फारच संकोच होतो. ज्या अर्थीं वाङ्मय हें मनुष्याच्या सद्भावनांनाच आलंकारिक स्वरूप देण्यानें निर्माण होतें, त्या अर्थीं नीतिबोध हा वाङ्मयाचा अप्रत्यक्ष परिणाम होऊं शकेल. परंतु जें नीतिबोध करण्याच्या प्रत्यक्ष हेतूनें लिहिलें नाहीं तें वाङ्मयच नव्हे असा जर आग्रह कोणीं धरला तर अनवस्थाप्रसंग होईल असें वाटतें.

" Great art ignores the frailties of men, while mediocre art focusses its attention upon them. A great Italian critic gave this famous advice to a young poet anxious to know how he could best serve the higher morals in poetry. ' Don't think about morals; that is the best way of serving them in art. "

— Creative Criticism by Spingan, p. 83.

शेक्सपिअर किंवा कालिदास यांचा आपलें प्रत्येक नाटक लिहिण्यांत नीतिबोध करण्याचा हेतु होता, कीं प्रतिभेचा उच्च दर्जाचा खेळ खेळण्याचा हेतु होता? शाकुंतल नाटक हें नीतिबोधाच्या दृष्टीनें पाहिलें तर कालिदासानें शाकुंतल प्रौढ विवाहाचें खंडन करण्याकरितां लिहिलें, कीं मंडन करण्याकरितां लिहिलें म्हणावें? उत्तररामचरित लिहिण्याचा

हेतु तेजस्वी सीतेची स्तुति करण्याचा, कीं आत्मविश्वासशून्य रामचंद्राची निंदा करण्याचा मानावा ? उत्कृष्ट वाङ्मयात्मक शेंकडों ग्रंथांसंबंधानें असेच प्रश्न विचारतां येतील, व एकावरहि ऐकमत्य होणार नाहीं. कला-विलासाच्या मागें हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला तर अनर्थ-कारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत. वाङ्मयाला नैतिक प्रबंध म्हणणें आणि साखरभाताला नुसत्या साखरेचा केलेला भात म्हणणें हीं दोनहि सारख्याच समंजसपणाचीं होत. शिल्पशास्त्रांत कलेच्या दृष्टीनें निरनिराळे आकार बनविणें यांत प्रतिभाकौशल्य दिसून येतें. पण देवळाचें उंच शिखरच सुंदर कां तर तें आकाशांत ईश्वर आहे असें उंच बोट करून दाखवितें म्हणून, अथवा तीन तीन कमानींची जोडीच कां शोभते तर तिजवरून त्रिमूर्ति ब्रह्माविष्णुमहेश्वराची आठवण होते म्हणून, असें म्हणणें बरोबर होईल काय ? ताजमहालाच्या पांढऱ्या शुभ्र दगडांत जी रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतु शोधून काढणारानें ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेलेच बरे. चित्रकार पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रें रंगवितो तेव्हां त्याचा हेतु कलेच्या दृष्टीनें सुंदर चित्रें रंगविण्याचा असतो, कीं नीतिबोध करण्याचा असतो ? पोहावयास पडणारा मनुष्य जलक्रीडा करतो ती स्नानाच्या हेतूनें नव्हे. शिकारी क्षत्रिय अरण्यांत मृगयाविलास करतो तो एक दिवस चांगलें मांस खावयास मिळावें म्हणून करीत नाहीं ! गवई दीपराग आळवितो तो अर्थशास्त्रदृष्ट्या मशा-लीचा खर्च वांचविण्याकरितां नव्हे. तात्पर्य, ‘ अधिकस्याधिकं फलं ’ या न्यायानें, कलेच्या दृष्टीनें वाङ्मय सुंदर असून त्यांतूनच नीतिबोध निघण्या-सारखा असल्यास दुधांत साखर पडेल; पण ज्याचा मूळ हेतु नीतिबोध नाहीं तें वाङ्मय नव्हें हें म्हणणें यथार्थ नाहीं. अशीं कांहीं स्थलें असलींच पाहिजेत कीं, त्यापलीकडे जाऊन हेतूची पृच्छा करितांच येत नाहीं. हा रस्ता कोठें जातो तर अमुक गांवाला असें सांगतां येतें; पण थेट गांवाशीं गेल्यावर हा गांव कोठें जातो असें विचारणाराला काय सांगावें ? अध्यात्म-ज्ञानाचा किंवा ईश्वरभजनाचा हेतु काय तर मोक्ष मिळविणें असें म्हणतां येईल; पण फिरून मोक्षाचा हेतु काय असें विचारल्यास त्याला काय सांगावें ?

उत्कृष्ट वाङ्मयाची देखील अशी गोष्ट आहे कीं, प्रायः तिचा हेतु व तिचें फल हीं एकच असतात, दोन नसतात.

वाङ्मयालाहि सत्याची चाड आहे; पण कलाविलासाच्या द्वारानें जें सत्य प्रतीत होण्यास कबूल होईल त्या सत्याचीच. अडेलतट्टू सत्याकरितां वाङ्मय थांबून राहणार नाहीं, तर स्वतःचें सत्य निर्माण करून कार्यभाग करून घेईल. यजमान विद्वान् असला तरी रीतीप्रमाणें यथासांग धर्मविधि करण्यास तो प्रायः उपाध्यायाला बोलावून त्याला नमस्कार करील; पण उपाध्याय जर लहरी भेटला तर सुशिक्षित यजमान स्वतःच्या हातांत पोथी घेऊन तो धर्मविधि स्वतःच यथासांग करूं शकतो! वाङ्मयकलेच्या मदतीचा धिक्कार करून सत्य हें जर स्वतःच कारभार करूं म्हणेल तर तें निभणार नाहीं. शास्त्रज्ञान नुसतें समजावून द्यावयाला अलंकारादिकांची गरज नसते. पण नुसतें समजावून देणें वेगळें व मनावर बिंबविणें वेगळें. तें मनावर बिंबण्यास नुसत्या बुद्धींत प्रवेश करून चालत नाहीं, तर कल्पनाशक्तीचीहि मदत घ्यावी लागते. वाङ्मयाचा जन्म भौतिक शास्त्राच्या आधीं झाला असून सर्व शास्त्रांना पुरून अखेरहि उरणारें तेंच आहे. शास्त्रांचें वाङ्मयाच्या मदतीशिवाय चालणार नाहीं. वाङ्मयाचें मात्र शास्त्रांच्या मदतीशिवाय निभूं शकतें. ज्या वेळीं भौतिक शास्त्र जन्माला आलें नव्हतें, त्या वेळींहि कवि काव्यें लिहीत होते. बरें, पुढें शास्त्रें जन्माला आलीं म्हणून काव्य कांहीं थांबलें नाहीं; उलट शास्त्राची मदत घेऊन काव्य वाढीसच लागलें. कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, भौतिक ज्ञानाची वाढ ही काव्यकल्पनेला विघातक होते. मेकॉले यानें Poetry declines as civilisation advances हा सिद्धान्त ठोकून दिला आहे; व विष्णुशास्त्री चिपळूणकरांनींहि त्याचा अनुवाद केलेला आहे. माझ्या अल्पमतीला असें वाटतें कीं, हा सिद्धान्त खरा नाहीं. अज्ञान आणि प्रतिभा हीं समानार्थक होत ही समजूतच बहुधा या सिद्धान्ताच्या मुळाशीं असावी. पण ती खरी नाहीं. उदाहरणार्थ, मनुष्य-जातीच्या अज्ञान–स्थितींत त्याला पंचमहाभूतें हीं जिवंत भुतें किंवा राक्षस अशीं वाटत असल्यामुळें तो त्यांची पूजा–अर्चा व त्यांना नवस करी; पण त्यांना उद्देशून तो ज्या प्रार्थना करी त्या हल्लीं आपणांस काव्यमय वाटत

असल्या तरी त्या तेव्हां खऱ्याखुऱ्याच सरळ मनाच्या प्रार्थना होत्या. त्यांत लाक्षणिक किंवा रूपकगर्भ असें कांहींच नव्हतें. पुढें भौतिक ज्ञानाची प्रगति होऊन या पंचमहाभूतांविषयींची कल्पना बदलली, व त्यांत देवतांश किंवा मनुष्यांश नाहीं असें त्यांच्या प्रचीतीस आलें. पण त्यामुळें प्रतिभेची हानि झाली नाहीं. जुन्या पांचव्या मराठी पुस्तकांत तीन राक्षसांच्या गोष्टीच्या रूपानें ज्यानें सुंदर वाङ्मय लिहिलें त्याला पाणी, वारा, वाफ यांचें यथार्थ ज्ञान नव्हतें असें म्हणतां येणार नाहीं; पण त्या ज्ञानानें त्याच्या प्रतिभेचा बिघाड न होतां उलट त्या ज्ञानाचा फायदा घेऊन त्यानें एक नवीन कल्पनालंकार बनविला. जुन्या कवींना जें भौतिक ज्ञान होतें, त्याचा उपयोग त्यांना आपली प्रतिभा चालविण्यांत जसा करतां येत होता, तसाच आजच्या कवींनाहि वाढलेल्या ज्ञानाचा उपयोग करून घेतां येतो. ही पात्रता पूर्वीं अधिक व हल्लीं कमी असण्याचें कांहीं कारण नाहीं. टेनिसननें आपल्या प्रतिभापाशांत दैविक कल्पना जशा ओढल्या तशा भौतिक शास्त्राच्या अगदीं ताज्या कल्पनाहि ओढल्या आहेत. अरेबियन नाइट्सवर लिहितांना कल्पनेनें जुन्या बगदादी बादशहांचा दरबारी थाट जसा त्यानें वर्णन केला, तसाच Princess काव्याच्या आरंभीं एका शास्त्रीय प्रदर्शनाचें वर्णनहि त्यानें काव्यमय केलें आहे. In Memoriam मध्यें Evolution, Survival of the fittest, तसेंच भूगर्भशास्त्रानें सुचविलेलीं उदात्त प्रमेयें या सर्वांचा उपयोग त्यानें वाङ्मयरीत्या केला आहे. आज कालिदास किंवा ज्ञानेश्वर यांच्या प्रतिभेचा मनुष्य असूं शकणार नाहीं, असें म्हणून हा वाद मुळांतच कोणीं खुंटविला तर गोष्ट वेगळी. पण ते हल्लींच्या युगांत असते तर त्यांच्याहि काव्यांत आधुनिक शास्त्रज्ञानाचा उपयोग, उपमा, दृष्टान्त, उत्प्रेक्षा, रूपक वगैरेंकरितां केला गेला असता हें सांगावयाला कशाला पाहिजे ? इंद्रियांपेक्षां मन हें केव्हांहि मोठें असणार. म्हणूनच वाङ्मय हें भौतिक शास्त्रापेक्षां केव्हांहि श्रेष्ठ ठरेल. एका हिंदी दोहऱ्यांत मनाची श्रेष्ठता खालीलप्रमाणें वर्णिली आहे—

पृथ्वी काहे की बडी । वो तो शेष माथेपर खडी ।
शेष काहे का बडा । वो तो शंकरहात का कडा ॥

इत्यादि. याचा अर्थ असा कीं, पृथ्वी सर्वांत मोठी म्हणतात खरी, पण

तिला शेषाचा आधार म्हणून शेष मोठा. शेष मोठा म्हणावा, तर श्रीशंकरानें त्याचें वळें करून आपल्या हातांत घातलें. शंकर तरी कसला मोठा ? कारण तो बसतो कैलासाच्या माथ्यावर ! पण कैलास हा कांहीं मोठा नाहीं; कारण रावणानें सगळा हिमालय तीन वेळां बाहुबलानें गदगदां हालविला. पण काय हो, याच रावणाला वालीनें एक वेळ खाकेंत धरून चिरडला म्हणतात ! तथापि वाली सर्वश्रेष्ठ असेंच कांहीं ठरत नाहीं; कारण श्रीरामचंद्रानें एका बाणानें त्याचा वध केला. तेव्हां राम सर्वांत श्रेष्ठ असें ठरतें. पण कवि लगेच म्हणतो, अहो, तेंहि खोटें. कारण एवढा मोठा पराक्रमी रामचंद्र भक्तजनाच्या अणुमात्र मनांत सबंध सांठविला जातो ना ! मनाचा मोठेपणा ठरविण्याची ही प्रमाणमालिका विचित्र दिसली तरी त्यांतील प्रमेय मात्र अगदीं सत्य आहे; कारण असें कोणतेंहि ज्ञान जगांत नाहीं कीं ज्याचें मनाला आकलन होत नाहीं, व जें आपल्या प्रतिभेच्या कुंचल्यानें मनुष्य हवें तसें रंगवूं शकत नाहीं, किंवा त्याला कल्पनेचीं हवीं तशीं वस्त्रें नेसवूं शकत नाहीं.

असो. मन कोणत्याहि विषयाला वाङ्मयाचें रूप देतें तें मुख्यतः प्रतिभेच्या म्हणजे कल्पनेच्या मदतीनें कल्पनाशक्ति ही मुख्यतः रस व अलंकार यांच्या द्वारानें प्रगट होते; व बहुधा वाङ्मय या नांवास शोभणारा असा कोणताहि शब्दसमूह सांपडणार नाहीं कीं ज्यांत रस किंवा अलंकार यांचा विलास नाहीं. पण याहूनहि पुढचा असा एक प्रश्न सुचतो व त्याचें उत्तर देण्याचा प्रयत्न करून मी हा निबंध पुरा करितों.

प्रश्न किंचित् तात्त्विक स्वरूपाचा आहे. तो असा कीं, वाङ्मय हें उचित रसालंकारात्मक मानलें तरी तें वाचल्यापासून मनाला आनंद होतो तो कां व कसा होतो ? त्याला माझें उत्तर खालीलप्रमाणें आहेः—जीवात्मा व परमात्मा हीं अंतिम स्थितींत एक असोत वा दोन असोत—आत्म्याला सर्व जगाशीं एकरूप व्हावें, एकाच क्षणीं सर्व जगाचें आकलन करावें, अशी महत्त्वाकांक्षा असते. यामुळें ती जितक्या प्रमाणानें सफल होईल तितक्या प्रमाणानें त्याचा आनंदहि वाढतो. इंद्रियांचें बंधन नसतें तर जगत्स्वरूप होण्याची आत्म्याची आकांक्षा अर्थात् सफळ होऊं शकती. पण हीं बंधनें असतांहि तो अतींद्रिय

अशा प्रतिभामायेच्या साहाय्यानें जगभर पसरण्याचा प्रयत्न करितो. आपली तर भूमिका सोडावयाची नाहीं, पण बसल्या बैठकींत इतर भूमिकांचाहि अनुभवानंद सेवावयाचा, ही गोष्ट प्रतिभाच घडवूं शकते. आपण नवरसांचेंच उदाहरण घेऊं. रणपूर्ण असें काव्य वाचतांना जो आनंद होतो तो आत्मौपम्यबुद्धीमुळेंच. कोणत्याहि रसाचा स्थायिभाव क्षणभर दुसऱ्याचा घेऊन आपलासा केल्याशिवाय रसप्रतीति होत नाहीं. प्रत्यक्ष आपली मुलगी सासरीं चालली असतां डोळ्यांतून पाणी गाळीत जे शब्द आपण बोलतों ते आपणाला काव्य नव्हे. तो आत्मभूमिकेवरचा एकेरी अनुभव. पण तेंच शाकुंतलाच्या चौथ्या अंकांतील कण्वावरचा कन्याविरहप्रसंग वाचीत असतां डोळ्यांतून पाणी गाळीत जे शब्द आपण वाचतों तें मात्र आपणाला काव्य किंवा वाङ्मय. कारण, येथें एकाऐवजीं दोन भूमिका होतात. वाचक आपली भूमिका न सोडतां मनानें दुसऱ्या भूमिकेवर संक्रमण करितो व प्रतिभेनें अनुभव घेतो, म्हणून तें दुःख नसून रसास्वादाचा आनंदच होय. यापुढें जाऊन अशी कल्पना केली कीं, दुसऱ्या एकच भूमिकेचा अनुभव प्रतीत करण्याऐवजीं एकदम दोन किंवा तीन भूमिकांचा अनुभव जर प्रतीत करितां आला, तर तेथें तो आनंद द्विगुणित किंवा त्रिगुणित झाला पाहिजे. उचित रससंकरानें ही गोष्ट प्रत्ययासहि येते. उदाहरणार्थ, वीर व शृंगार यांचा संकर उचित मानला जातो. रघुवंशाच्या अकराव्या सर्गांत ताटकावधाचा खालील श्लोक आहे—

रामन्मथशरेण ताडिता ।
दुःसहेन हृदये निशाचरी ॥
गंधवद्रुधिरचंदनोक्षिता ।
जीवितेशवसतिं जगाम सा ॥

यांत रामाचा ताटकावधाचा वीररसोत्पादक भीषण प्रसंग व मदनविव्हळ अभिसारिकेचें अभिसारवेशानें दयितगृहीं गमन हे दोन अनुभव एकाच श्लिष्ट शब्दप्रबंधाच्या साहाय्यानें आणून दिले आहेत. सकृद्दर्शनीं असें वाटतें कीं, हा कल्पनांचा गोंधळ होतो. पण तें खरें नाहीं. किंबहुना तीन-तीन, चार–चार अर्थ असणारे श्लेषात्मक शब्द सुसंगत जुळवितां येतील तर

तीन-तीन, चार-चार काल्पनिक प्रसंगांचा अनुभव एकदम घेतां येणें शक्य आहे. मुक्तेश्वराच्या भारतीय रसवर्णनांतील,

पांडवप्रताप पुरुष तरणा । नववधू कौरवसेना
शृंगारिली परि संघट्टना । युद्ध सुरता न थारवे
... .... ... ... ...
ते गदा घेऊनि मांडीवरी । रणमंचकीं निद्रा करी
प्राणपारिखे दवडुनि दुरी । मग मग एकांतीं पहुडिजे

या वर्णनांत अश्लीलपणाचा दोष आहे, व रघुवंशांतील

'सदयं बुभुजे महाभुजः ।'

वगैरे जें अजराजाच्या सुराज्यव्यवस्थेचें वर्णन शृंगारिक भाषेंत केलें आहे तेंहि थोडें सदोषच आहे; तथापि औचित्यदृष्टि क्षणभर बाजूला ठेविल्यास अनेक भूमिकांचा अनुभव मनाला एकसमयावच्छेदेंकरून कसा घेतां येतो हें त्यावरून दिसून येईल.

अलंकाराची गोष्ट घेतली तरी हाच सिद्धान्त सिद्ध होतो. बहुतेक अलंकार हे उपमा व रूपक यांच्या निरनिराळ्या परीच आहेत. उपमा व रूपक या दोहोंत पूर्ण किंवा ईषत्‌तादात्म्य असा फरक असला तरी एक-रूपताप्रतिपादन हाच दोहोंचा मुख्य उपयोग आहे. या तादात्म्यानें तरी आनंद कां होतो असें विचारलें तर त्याचेंहि उत्तर रसाविषयीं दिलें तेंच होय. रस व अलंकार यांच्या स्वरूपांत वास्तविक इतकाच फरक कीं, रसाचे स्थायिभाव जीवसृष्टीच्या भावनावर अधिष्ठित असतात; व अलंकाराचे विभाव अचेतन सृष्टीवरहि अधिष्ठित होऊं शकतात. स्त्रीला लतेची उपमा दिली असतां आनंद होण्याचें कारण हेंच कीं, समगुण अशा दोन पदार्थांचा अनुभव मनाला एकदम घेतां येतो; व हीच गोष्ट समगुण अशा जितक्या आधिक पदार्थांविषयीं एकदम घडेल तितका तो आनंद वाढेल. या आनंदानें एक प्रकारची तल्लीनता येते व तो आनंद फारच उत्कट झाला तर त्यापासून समाधीहि लागूं शकेल. या दृष्टीनें पाहतां 'खरी सविकल्प समाधि उत्पन्न करूं शकते, तें वाङ्मय' अशी नवीन व्याख्या मीं बनविली आहे. वाङ्मयाची कोणतीच व्याख्या समर्पक होऊं शकत नाहीं हें मी जाणतों,

तरी ही माझी व्याख्या आपल्या विचाराकरितां मी सादर करीत आहें. लक्षांत घेण्याचा मुद्दा हा कीं, नेहमीं समाधि असा शब्द आपण उच्चारितों तेव्हां ती योगशास्त्रांतील ' निर्विकल्प ' समाधि हाच अर्थ मनांत येतो. पण मी म्हणतों ही समाधि 'सविकल्प' म्हणून या दुसऱ्या समाधीच्या अगदीं उलट आहे. निर्विकल्प समाधींत बाहेरच्या जगाची किंबहुना आपल्या देहाचीहि कांहीं एक जाणीव शिल्लक उरत नाहीं व उरता कामाहि नये. पण वाङ्मय-सेवनानें निर्माण होणाऱ्या समाधींत स्वतःच्या मनोभूमिकेची जाणीव तर उरतेच; पण वर दर्शविलेल्या रीतीनें इतर भूमिकाहि तींत समाविष्ट होऊं शकतात. एवढेंच नव्हे तर तेंच वाङ्मय अधिक उत्कृष्ट कीं, ज्याच्या सेवनानें अधिकांत अधिक कल्पना मनांत एकदम उठतील व अधिकांत अधिक भूमिकांचा मनाला अनुभव घडेल. या दृष्टीनें पाहतां सुंदरकल्पनाकल्लोळ ही वाङ्मयप्रेमी मनुष्याला इष्टापत्तीच होय. निवांत पाण्यांत खडा टाकला असतां एकाच मध्यबिंदूपासून एकामागून एक व एकाहून एक मोठीं अशीं तरंग-वर्तुळें निघतात हें आपण पाहतों. उत्कृष्ट प्रतिभेच्या धक्क्यानेंहि मनःसरोवरांत अशाच प्रकारचीं तरंगवर्तुळें उठतात. पण तीं इतकीं जलद उठतात कीं त्यांतील अंतर मनश्चक्षूंना दिसूं शकत नाहीं व त्या वर्तुलांच्या कक्षा विश्वव्यापीहि असतात. साहित्यदर्पणकारांनीं रसाला ' ब्रह्मास्वादसहोदर ' असें विशेषण दिलें आहे तें यथार्थच आहे.

असो. माझें हें वाङ्मयपुराण अदमासाबाहेर लांबलें, पण आपण सर्व वाङ्मयप्रेमी असल्यामुळें त्याचा कंटाळा मानला नसेल. स्वतः वाङ्मयाप्रमाणें वाङ्मयवर्णनाचीहि गोडी अवीट आहे. वाङ्मयदेवतेचा भक्तसंप्रदाय सर्वकाळ सर्व देशांच्या समाजांतून पसरलेला असतो. देशाभिमानाला येथें नमावें लागतें. येथें जातगोत कांहीं नाहीं. जात असलीच तर ती वाङ्मयप्रेमी लोकांची मिळून बनते. वाङ्मय–ग्रंथकार हे तर स्वतः स्वयंभूच असतात. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं,

Literary men have neither ancestors nor posterity; they alone compose their whole race.

वाङ्मय-ग्रंथांना कुलपरंपरा किंवा वतन नसलें तरी निःस्वार्थ बुद्धीनें

परोपकारच त्यांच्या हातून घडत असतो. त्यांनीं मुद्दाम वाङ्मयाची उपासना नित्य चालू ठेवली पाहिजे. साहित्यसंमेलन हें या उपासनेंतील एक वार्षिक व्रत आहे. गेल्या सोळा वर्षांत निदान दहा संमेलनें तरी आपण भरविलीं; व यापुढें या व्रतानुष्ठानांत एक वेळहि खंड न पडूं देण्याचा आपला निश्चय असल्यास तो फारसा धाडसी नसल्यानें तडीस जाणें कठीण नाहीं. बरें, तो तसा असला तरी समर्थांनीं श्रीशारदेचें वर्णन 'जे धारिष्ठाची कृतबुद्धि' असें केलें आहे, व 'कर्तृत्व जितुकें झालें। तें शारदा गुणें' असें आश्वासन दिलें आहे, म्हणून त्या शारदेची प्रार्थना केल्यास सर्व मनोरथ सिद्धीस जातील असें विनवून पुरें करितों.

• • •

## १४ : नाट्यवस्तुविचार

नाटकाचा विषय काय असावा हा एक नेहमीं उत्पन्न होणारा प्रश्न आहे; व त्यासंबंधानें एका विवक्षित दृष्टीनें विचार करण्याचें मीं आज योजिलें आहे. साधारणतः नाटकविषयांचें ( १ ) दैविक किंवा अद्भुत व ( २ ) मानवी किंवा स्वाभाविक असे दोन स्थूल विभाग करितां येतील; व यांपैकीं वाटेल त्या प्रकारचा विषय घेऊन मनोरंजक असें नाटक चतुर नाटककारास रचितां येईल. परंतु या बाबतींत केवळ शक्याशक्यतेपेक्षां रूढि व सदभिरुचि यांच्या दृष्टीनें पाहतां मानवी व स्वाभाविक असे विषयच लोकांस आजकाल अधिक पसंत पडतील असें वाटतें. वर जे नाट्यविषयाचे दोन स्थूल भेद सांगितले आहेत ते मुख्यतः रचनापद्धतीसंबंधाचे आहेत; केवळ कथाप्रसंगाचें स्थल, त्याचा काल व त्यांतील पात्रें यांस अनुलक्षून तो भेद केलेला नाहीं. विषय पौराणिक, दैविक किंवा अद्भुत असा घेऊनहि जेथें प्रतिपादन व रचना या सर्वस्वीं मानवी पद्धतीनें केल्या आहेत, तेथें अशा नाटकास दैविक किंवा अद्भुत या वर्गांत न घालतां मानवी किंवा स्वाभाविक या वर्गांतच घालणें अधिक योग्य होईल. देव-दानवांची कथा अगर यक्षकिन्नर यांची

गोष्ट, अथवा भुतें-खेतें, वेताळ व मांत्रिक यांचा प्रसंग–असा विषय घेऊनहि जरी नाटकांतील भाषणांत व क्रियेंत मनुष्यस्वभावामध्यें सांपडणारेच गुण-दोष, मानवी दृष्टींचीच शक्याशक्यता मानवी तर्कशास्त्रानुरूप अशीच अनुमानपद्धति व व्यावहारिक कार्यकारणभाव अशाच मासल्याची रचना झालेली असेल तर तें नाटक अद्‌भुत म्हणतां येणार नाहीं. उलटपक्षीं; विषय मात्र घेतला आहे व्यावहारिक; व आंतील रचना व योजना पाहावी तर मात्र असें दिसून येतें कीं, कार्यकारणभावाचा सर्वस्वीं फराळ केलेला, शक्याशक्यता वाटून तोंडीं लावण्यास घेतलेली व पावलोंपावलीं 'God in the Machine' शीं गांठ–असल्या ठिकाणीं फक्त नाटकपात्रांचीं नांवें आधुनिक आहेत किंवा स्थल व काल हे तुमच्या–आमच्या परिचयाचे आहेत, एवढ्या-वरूनच तें नाटक अद्‌भुत नाहीं असें म्हणणें चूक होईल. नाटकांचा तिसरा एक प्रकार असा आहे कीं, त्यांत नाटककर्त्यांच्या अंगीं अवश्य तें रचना-चातुर्य नसल्यानें अद्‌भुत व स्वाभाविक यांची उगीच विनाकारण गुंतागुंत व व्यर्थ घोंटाळा झालेला असतो; आणि धड अद्‌भुत किंवा स्वाभाविक यांपैकीं एकाहि प्रकारचें चित्र चांगलें वठत नाहीं. हा तिसरा प्रकार सर्वथा टाकाऊ होय. एक निव्वळ अद्‌भुत (Romantic) तरी खपेल आणि मग त्यांत अद्‌भुतत्व जितकें अधिक भरेल तितकी गोडीहि जास्त येईल; किंवा दुसरें निव्वळ स्वाभाविक तरी खपेल, व तें जितकें अधिक Realistic असेल तितकें चालेल; परंतु ज्यांत दोहोंची भेसळ झालेली असून दोन्हींच्या स्वरू-पांचा लोप झालेला आहे असा हा धेडगुजरी तिसरा प्रकार मात्र सर्वस्वीं अयुक्त होय.

अद्‌भुत प्रकारच्या नाटकविषयापेक्षां स्वाभाविक असेच विषय सदभि-रुचीस पसंत पडतील असें मीं वर दर्शविलें आहे व याचें कारण असें आहे कीं, मनुष्याच्या मनावर कार्यकारणभावाचा परिणाम जितका ठसतो, तितका अद्‌भुत व अतर्कित अशा घटनांचा परिणाम ठसत नाहीं. मनुष्यानें आपल्या कल्पनाशक्तीस जरी कितीहि भरारी मारूं दिली तरी तिची मजल कांहीं मर्यादेपलीकडे जाऊं शकत नाहीं. यामुळें एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें मनुष्यास जरी देव व देवदूत यांच्यामधील काल्पनिक संवाद वदवावयाचा

झाला तरी तो मानवी प्रमाण-प्रमेयाला अनुसरूनच वदवील. दुर्बिणीच्या तोंडीं ज्या प्रमाणाचें भिंग असेल त्या प्रमाणानेंच त्यांतून लांबचें दिसणार; उजेड घ्यावयाची जेवढी खिडकी असेल तितक्या बेताचाच उजेड आंत येणार, मग बाहेर उजेड किती कां पडेना ? मनुष्याला स्वतःच्या शक्तीबाहेरच्या अशा भौतिक चमत्कारांची कदाचित् कल्पना करितां येईल. आज त्यास इकडचा डोंगर तिकडे करितां येत नाहीं, किंवा विमानांत बसून आकाशांत प्रत्यक्ष प्रवास करितां येत नाहीं. असें असतांहि एखादें अद्‌भुत नाटक लिहून तो असल्या पात्रांकडून याहि गोष्टी घडवून आणील; परंतु आध्यात्मिक बाबतींत मानवी मानसशास्त्र सोडून पलीकडे त्याच्यानें धाव घेववणार नाहीं. दुसरें असेंहि म्हणतां येईल कीं, ज्याला आपण खरोखरच अद्‌भुत म्हणूं असें सृष्टींत फारच थोडें असतें. सृष्टींत सर्वत्र कार्यकारणभावाचाच अम्मल व प्रभाव पावलोंपावलीं दिसून येतो; यामुळें 'नैसर्गिकाचा उत्कर्ष व अद्‌भुताचें नित्यस्वरूप, यांची बहुधा समव्याप्तिच आहे असें आढळून येईल. तात्पर्य, शब्दार्थ न समजून ज्याला आपण अद्‌भुत म्हणतों असेंच ' अद्‌भुत ' फार व म्हणून हें अद्‌भुत सुद्धां स्वाभाविकाप्रमाणेंच सदभिरुचीच्या अमलांतून पार जाण्यासारखें नाहीं.

असो; तर मग सदभिरुचि हेंच मुख्य प्रमाण मानलें तर नाटकविषय कसा असावा ? म्हणजे स्थळ, काळ, रचना यांसंबंधानें त्याला असे कांहीं नियम आहेत कीं नाहींत कीं जे सदभिरुचीच्या कांट्यानें तोलले असतां त्यांच्या गुणदोषांच्या न्यूनाधिक्याचा सप्रमाण निर्देश करितां येईल ? आतां सदभिरुचि हीच गोष्ट मुळीं युगान्तरानें बदलणारी आहे असें कोणी म्हणतील व ही गोष्ट कांहीं अंशीं खरीहि आहे. तथापि आपणांस सर्व युगांतील निरनिराळ्या सदभिरुचींची एकवाक्यता आज करीत बसण्याचें नसून फक्त आजच्या प्रचलित युगांतील सदभिरुचीच्या दृष्टीनें या नियमां-बद्दल कांहीं म्हणतां येण्यासारखें आहे कीं नाहीं येवढेंच पाहावयाचें आहे. प्रत्येक देशांतील वाङ्मयांत नाटकशास्त्रासंबंधाचे ग्रंथ आहेत; व नाटकवस्तूचे स्थल, काल वगैरे संबंधानें कांहीं नियम असावे अशी बुद्धि त्या त्या वाङ्मयांतील ग्रंथकारांमध्यें सर्वसाधारणपणें दिसून येते. नाटक ही कांहीं तरी

बेताल बेतंत्र गोष्ट आहे अगर असावी असें कोणासच वाटलेलें दिसत नाहीं. निरंकुश अशा काव्यवन–मतंगांनींहि शिष्टसंमत नियमांचे तीक्ष्ण अकुंश आपल्या गंडस्थलावर रोवलेले असल्यास तें भूषणास्पदच आहे अशी कबुली दिलेली आहे. या नियमांपैकीं एक मुख्य नियम असा आहे कीं, नाट्यवस्तुगत काल, स्थल व कथानक या प्रत्येकाच्या घटकांमध्यें द्वैत किंवा अनेकत्व दिसून येऊं नये, तर अद्वैत दिसून यावें. या नियमालाच The Law of Unities असें इंग्रजींत म्हणतात; तर हें अद्वैत म्हणजे खरोखरच काय व तें कितपत साधतां येणें शक्य आहे याबद्दलच आज मला दोन शब्द लिहावयाचे आहेत.

जेव्हां नाटकविषय ‘ अद्भुत किंवा दैविक ’ या वर्गाखालीं येणारा नसेल तेव्हां नाटकास संसाराचें चित्र असें म्हणतां येईल. परंतु एका विवक्षित नाटकांत सदभिरुचीस न सोडतां संसाराचा तरी केवढा भाग दाखवितां येणें शक्य आहे ? ‘ संसार ’ याचा विस्तृत अर्थ घेतला असतां जगाच्या उत्पत्तीपासून लयापर्यंत सर्व अवधीचा व जगाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचा समावेश त्या शब्दांत करितां येईल. परंतु या येवढया अवधीचें अगर विस्ताराचें नाटक कसें दाखवावयाचें ? आपल्या जुन्या नाटक-मंडळ्या दशावतारी खेळ करून दाखवीत असत; व अर्थात् दशावतारांमध्यें सर्व सृष्टीचा साद्यंत इतिहास आला आहे हें कबूल आहे; परंतु हे दशावतार कसे दाखवीत हें ज्यांस माहीत आहे त्यांस हे नाटकप्रयोग पसंत पडतील, निदान ते परिणत अशा सदभिरुचीस धरून आहेत असें ते म्हणतील, असें वाटत नाहीं. हे दशावतार दाखवावायचे म्हणजे दहांदां पुढचा पडदा सोडून व उचलून निरनिराळे दहा देखावे दाखवावयाचे इतकेंच काय तें. सर्व सृष्टि सोडली तरी एखाद्या देशाचा, शहराचा, कुटुंबाचा, किंबहुना एका मनुष्याचा साद्यंत इतिहास एका नाटकांत दाखवितां येणें शक्य नाहीं. तसेंच, सृष्टीपैकीं अमुक एका इयत्तेच्या भागाचा व अमुक एका इयत्तेइतक्या कालावधीचा इतिहास एका नाट्य ‘ वस्तूंत ’ ग्रथित करावा असाहि नियम करितां येणार नाहीं. परंतु इतकें सांगतां येतें कीं, नाटकांत मुख्यतः मानव चारित्र दाखवावयाचें असून एक अगर अनेक मनुष्यांच्या चारित्रांतील

कांहीं विवक्षित भागांत जेवढ्या सृष्टीचा समावेश होणें शक्य असेल तितका भाग नाटकवस्तुविषय होण्यास हरकत नाहीं. या एक अगर अनेक मनुष्यांच्या चरित्राच्या अनुषंगानें स्थल व काल यांच्या वैचित्र्याची ' प्राप्ति ' होते; व या वैचित्र्याचें नियमन सदभिरुचीस अनुसरून करण्याच्या इच्छेनें Unities चा वाद उत्पन्न होतो. या बाबतींत निरनिराळ्या वाङ्मयांतील नियमांची एकवाक्यता होत नाहीं. परंतु त्याहूनहि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, ज्या वाङ्मयांतील नियम त्याच वाङ्मयांतील ग्रंथकारांनीं ते प्रायः झुगारून दिलेले आढळतात. भरत–नाट्यशास्त्रांत एक स्थूल नियम असा दिला आहे कीं, नाटकवस्तुगतकाल सूर्याचे एका परिभ्रमणाहून म्हणजे एक वर्षाहून अधिक असूं नये. परंतु या नियमाचे परिपालनापेक्षां त्याचें उल्लंघन अधिक वेळां झालेलें आढळून येतें; व सदर एक वर्षाचा नियम अगदींच स्वैरबुद्धीनें घालून दिलेला असल्यामुळें तो पाळला जाणें शक्य नाहीं; व जी गोष्ट कालासंबंधानें तीच स्थलासंबंधानेंहि समजावी.

नाटकांतील काल एकच असावा, म्हणजे नाटकांतील कथानकाचा आरंभ व शेवट यांमध्यें अमुक एक मर्यादेपर्यंत अल्पकाल जावा हें कांहीं तरी स्वैरबुद्धीनें ठरविणें अप्रयोजकपणाचें आहे; तसेंच निरनिराळ्या नाटकांमधील कथानकाच्या आद्यंतामध्यें किती काल गेलेला सांपडतो हें पाहूनहि या बाबतींत एखादा संख्यात्मक नियम ठरविणेंहि कठीण आहे. या दृष्टीनें आम्हीं बऱ्याच नाटकांचीं संविधानकें लक्षांत घेऊन पाहिलीं तों खालील-प्रमाणें वैचित्र्य दिसून आलें. या वैचित्र्यपटाचे दोन टोंकांस दोन प्रकारचे ग्रंथकार असलेले आढळतात. एका बाजूस मोलिअर, लेसिंग व लेसिंगचे मतानुयायी व दुसऱ्या टोंकास बाणभट्ट वगैरे. कालगत व स्थलगत अद्वैत किंवा ऐक्य या तत्त्वासंबंधीं लेसिंग वगैरेंनीं इतकें बंड माजविलेलें आहे कीं, त्यांच्या व त्यांच्या अनुयायांच्या कित्येक नाटकांतील कथाभाग फक्त एक-दोन प्रहरांत व एकाच घरच्या एका दिवाणखान्यांत घडून आलेलाहि दाखविला असतो. नाटककारांचा हा वर्ग वैचित्र्याचा शत्रु म्हटला तरी चालेल. दुसऱ्या टोंकास बाणाची कादंबरी ( शापसंभ्रम नाटक ) यांत तीन जन्मांचें चरित्र एका सात अंकी नाटकांत गोंवलेलें दिसून येतें. याहि अंकां-

पैकीं पहिल्या चार अंकांत एका जन्माचें चरित्र असून पुढील तीन अंकांत दोन जन्म दाखविले आहेत. या दोन टोंकांच्या दरम्यान बरेंच वैचित्र्य दिसून येतें. She stoops to Conquer (' विजयजिगीषा ') या प्रहसनांत एका रात्रीचा कथाभाग आहे. कीचकवध नाटकांत चार दिवसांची हकीगत आहे. Romeo aud Juliet मध्यें चार दिवसांचाच सारा खेळ आहे. ' मृच्छकटिकां 'तील कालावधि सुमारें १ महिन्याचा असावा. ' वीरतनयां 'त वस्तुकाल १०।१५ दिवसांचा असावा. ' सौभद्रां 'त वाटेल तर हा १० दिवसांचा म्हणावा किंवा चार महिने म्हणावा. ' मतिविकारां 'त सुमारें एक महिना, ' प्रणयमुद्रें 'त व ' त्राटिकें 'त जवळ जवळ तितकाच, ' भीनदेव ' ( Pizarro ) मध्यें सुमारें एक महिना, ' मुद्राराक्षसां 'त सुमारें ४।६ महिने, ' हरिश्चंद्र ' नाटकांत दोन महिने—तात्पर्य, नाट्यवस्तुकाल एक वर्षाच्या आंत असलेल्या नाटकांचीं हीं उदाहरणें होत. याहून अधिक मर्यादेचीं उदाहरणेंहि पुष्कळ आहेत. ' शाकुंतलां 'तील कथाभाग ६ वर्षांचा, ' विक्रमोर्वशीया '-मधील आठ वर्षांचा, ' संभाजी ' नाटकांत आठ वर्षांचा, ' उत्तररामचरितां 'तें तेरा वर्षांचा, ' चंद्रहास ' नाटकांत वीस वर्षांचा, व ' विकल्पविमोचन ' ( Winter's Tale ) मध्यें २२।२५ वर्षांचा आहे. ही कालगणना अर्थातच स्थूलमानानें आहे हें उघड आहे; व ती साधारणतः त्या त्या नाटकांतील गोष्टींच्या धोरणानें केलेली आहे. परंतु यांपैकीं प्रत्येक नाटकांतच असा अंतर्गत पुरावा सांपडण्याचा संभव आहे कीं, त्यामुळें या कालगणनेस कदाचित् अपवाद येईल. कारण सर्वच नाटककर्ते आपल्या कथानकांत बरोबर किती कालावधि जावयाचा हें ठरवून व नाटकाचे कथानकास आरंभ कोठें होत आहे, त्याचा मध्य कोठें व शेवट कोठें हें लक्षांत घेऊन लिहिते, तर मग या कालगणनेंत फरक पडण्याचा संभव नव्हता. परंतु या गोष्टीकडे नाटककर्त्यांचें पुष्कळ वेळां अगदीं दुर्लक्ष असतें. ते आपल्या रंगांत आले म्हणजे मग वाटेल तशीं वर्णनें करितील व वाटेल तसा कालदर्शक गोष्टींचा उल्लेख करितील. त्यांस पूर्वापार संदर्भाची आठवणहि राहात नाहीं; आणि असें झालें म्हणजे मग परस्परविरुद्ध अशा गोष्टीस मुळींच वाण नाहीं.

असो. तर मग नाटकांतून जर ' नाट्यवस्तुकाला 'चा अवधि इतका

बदलूं शकतो, तर मग सदभिरुचीस अनुसरून प्रमाणभूत असा नियम यासंबंधानें बांधतां येईल काय? व 'वस्तु'–गत कालासंबंधीं अद्वैत असावें असा जो नियम आहे त्याचा अर्थ तरी काय करावयाचा? असा प्रश्न उद्‌भवतो व तोच प्रश्न स्थल वगैरेसंबंधानें विचारतां येण्यासारखा आहे.

नाट्यवस्तुगत स्थल, काल अगर कथा यांपैकीं प्रत्येक अमुक एकच प्रमाणाचें अगर प्रकारचें असावें असा निर्बंध करणें अयुक्त होईल; तथापि Unities बद्दल जो वाद आहे, त्यासंबंधानें खालील नियम सदभिरुचीस धरून आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१. नाट्यवस्तुगत विषय निवळ दैविक अथवा निवळ स्वाभाविक असा असावा.

२. तो स्वाभाविक असेल तेव्हां मानवी चारित्र्यासंबंधीं असावा.

३. मनुष्यजातिव्यतिरिक्त इतर प्राण्यांच्या चारित्र्याचा संबंध, उल्लेख वगैरे असणें तो केवळ गौणरूपानें असावा.

४. Unity of action म्हणजे कार्यगत अद्वैत नाटकांत असावें. तें नसेल तर नाटक एक असें म्हणतां येणार नाहीं. अनेक नाटकांची खिचडी असेंच म्हणावें लागेल. मग त्या अनेकांमध्यें कांहीं तरी कथाभागाचा दोरा गोवून तीं अनुस्यूत केलीं तरी त्यापासून द्वैतप्रतीतिच होणार व अशा द्वैत प्रतीतीपासून सहृदय मनुष्यास कधींहि गम्मत वाटणार नाहीं,

५. स्थलांचें अद्वैत शब्दशः असण्याचें कारण नाहीं. एकाहून अधिक स्थलांचा निर्देश नाटकांत रसभंग न होता करणें शक्य आहे. स्थल एक असावें अगर अनेक असलीं तरी चालतील हें कथानकाच्या जरूरीप्रमाणें ठरेल.

६. Unity of time याचा शब्दशः अर्थ केला तर मुळीं असंबद्धता-निष्पत्तिच होते, कारण एका क्षणांत घडून आलेला कथाभाग नाटकांत दाखविणें शक्य नाहीं; व नाट्यवस्तुगत कालाची कमींत कमी मर्यादा सांगावयाची म्हटली तर प्रत्यक्ष रंगभूमीवर नाटक होण्यास जितका वेळ लागेल, तितका अवधि तरी नाट्यवस्तुगत कालाचा असलाच पाहिजे; कमी असणें शक्य नाहीं. यापुढें या कालावधीची मजल कोठपर्यंत नेतां येईल हें नाट्यवस्तुगत कथानकावर अवलंबून राहील. परंतु केव्हांहि कथानकांतील

मुख्य रसाचा परिपाक होण्यास कालावधींचे जें प्रमाण साधारणतः लागेल असें आपण स्वाभाविक व्यवहारांत पाहतों त्याहून तें जास्त असतां कामा नये.

७. नाट्यवस्तुगत कथाभाग हा नायक अगर नायिकास्थानीं कल्पिलेल्या मानव-विभूतीच्या चारित्र्यांतील विशेष ठळक किंवा प्रसिद्ध, व तसा नसेल तर प्रसिद्ध अशा तद्गत गुणावगुणांच्या वर्णनास उपयुक्त असा एखादा प्रसंग असावा.

८. हा प्रसंग आपल्यापुरता पूर्ण असावा, म्हणजे त्यामध्यें वर्णित विषयाचे आदि, अंत व मध्य हे तीनहि पृथक्पणें येऊन, सर्वांस मिळून संपूर्णतेचें रूप असावें.

९. या कथानकांत जिच्यावर लक्ष वेधून राहील अशी एकच व्यक्ति असावी कीं, जीस नायक अगर नायिका हें गांव बिनतोड कोणींहि दिलेंच पाहिजे.

१०. कथानकांत मुख्य असा एकच रस असून, इतर रस फक्त त्याशीं उपकारी परंतु गौण असे असावे, व Unities संबंधानें जर कांहीं खरोखर नियम आहे अगर असावा असें म्हटलें तर 'रसाचें अद्वैत' हाच तो नियम असें म्हणतां येईल; व हें रसाचें अद्वैत न बिघडूं देतां जितकें वैचित्र्य तत्परिपोषक अशा स्वरूपानें आणितां येईल तितकें नाटककाराचें चातुर्य अधिक ठरेल. रसाचें अद्वैत हीच काय ती मुख्य गोष्ट. तिला सर्वस्वीं सांभाळून मग स्थळ, काळ, उपरस, पात्रें, नेपथ्य, अभिनय, नृत्य, संगीत वगैरे गोष्टींचा समावेश नाटकांत होण्याचा आहे. हें रसाचें अद्वैत साधेल तरच ग्रंथ वाचतांना अगर नाटकप्रयोग पाहतांना मनाची एकाग्रता, एकान्तता व तल्लीनता राहील; व ही एकाग्रता वगैरे ज्या कोणत्या गोष्टीनें यत्किंचित्‌हि बिघडेल तिला सहृदय मनुष्याची कधींहि पसंती मिळणार नाहीं. हा मुख्य नियम वरील प्रत्येक बाबीसंबंधानें विशेष स्पष्ट करीत बसलों असतां विस्तार होईल यास्तव कांहीं कांहीं बाबीसंबंधानें फार थोडक्यांत विचार आपण करूं.

**रसः**—नाटकांत रसवैचित्र्य असणें हें इष्ट खरें; परंतु योजिलेल्या सर्व रसांचा मिलाफ होईल अशी व्यवस्था पाहिजे. कित्येक नाटककारांस या

नियमाचें महत्त्व बरोबर न कळल्यामुळें त्यांच्या हातून विलक्षण प्रमाद घडतात. हास्यरसाची योजना सयुक्तिकपणें झाली असतां तो जितका उपकारी होतो, तितकीच ती अयुक्तिकपणें झाली असतां तो जितका होतो. हरिश्चंद्र नाटक हें करुणरसपूर्ण असावें असें कोणीहि म्हणेल; परंतु नुकतीच परवां या नाटकाची एक जाहिरात वाचण्यांत आली. तिजमध्यें 'संगीत हरिश्चंद्र, अत्युत्कृष्ट हास्यकारक नाटक' असें त्याचें वर्णन दिलेलें होतें; व हें विपरीतत्व जाहिरातींच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें उगाच कांहीं असंबद्ध लिहून कोणीकडून तरी वाचकांचें लक्ष वेधावें, अशा हेतूनें योजिलेलें नाहीं. कारण हें संगीत हरिश्चंद्र ज्याच्यावरून तयार केलेलें आहे, तें मूळ नाटक पारशी नाटक मंडळ्या करीत असतात; व विश्वामित्राचा शिष्य म्हणून एक भूमिका मुद्दाम आणिली असून तिजकडून सर्व नाटकभर वेळीं अवेळीं, व हरिश्चंद्र-तारामती वगैरे शोक करीत असतांहि, विदूषकी प्रकार व फाजील-पणा करवून हास्यरसाचें वेडें पीक खरोखरींच पिकविलें जातें. पूर्वींच्या आपल्या इकडील नाटकांतील विदूषक हा विश्वामित्राच्या या शिष्याचा सख्खा पूर्वज होता म्हटलें तरी चालेल. कारण त्यांतूनहि विदूषकाचें हेंच काम म्हणजे वेळीं अवेळीं फाजीलपणा करून रंगाचा बेरंग करण्याचें होतें. हास्यरसाप्रमाणेंच इतर रसांचा वेळीं अवेळीं मुख्य रसास सोडून परिपोष केला असतां रसभंग होतो. परंतु तो तितका लक्षांत येत नाहीं. रसद्वैताचा हा दोष चांगल्या चांगल्या सुशिक्षित नाटककारांच्या कृतींतहि घडून आलेला दाखवितां येईल. रा. कोल्हटकरांच्या गुप्तमंजूषांतील वंचक कित्येक ठिकाणीं निःसंशय असाच रसभंग करणारा आहे. शारदेमध्यें म्हाताऱ्या श्रीमंताच्या फजितीनें उत्पन्न होणारा हास्यरस हा करुणरसास पोषक झालेला आहे; तथापि शेवटीं कोदंडाकडून शारदेचें पाणिग्रहण करण्याचा जो प्रकार दाखविला आहे त्याच्या योगानें तोंपर्यंत कायम राहिलेल्या रसाच्या अद्वैताचें द्वैत होतें, व नाटकांतील पहिल्या भागाचा ठसा दुसऱ्या भागानें नाहींसा होतो असें मला वाटतें.

**कालः**–कालासंबंधानें बोलतांना द्वैत व अद्वैत हे शब्द चांगलेसे लागू पडत नाहींत हें खरें आहे; तथापि योग्य व अयोग्य कालावधि यांमध्यें सहज

फरक करितां येतो. नाटक पाहणें म्हणजे अर्थात् पाहणाऱ्याजवळ कल्पनाशक्तीची थोडीबहुत सामग्री असली पाहिजे हें उघड आहे. तथापि या कल्पनाशक्तीवर कांहीं विवक्षित मर्यादेपलीकडे ताण बसला असतां सहृदय मनुष्यास खपत नाहीं. दोन अंकांमध्यें फक्त पांच मिनिटें पडदा पडला असतां तेवढ्या अवधींत कथानकांतील पांच–चार महिने गेले असें समजा म्हणून सहृदय प्रेक्षकांस सांगितलें तर तें त्यांस कदाचित् मान्य करितां येईल; परंतु चंद्रहास नाटकाप्रमाणें एका अंकाच्या शेवटीं तोंडांतील बाळकृष्ण काढून पूजा करणारा, रानावनांतील देखाव्याला सोबत नसल्यामुळें भिणारा, सात-आठ वर्षांचा चंद्रहास पाहिलेला असून, लगेच पुढच्या अंकांत, आपल्या तारुण्याच्या मदतीनें आपल्या स्वरूपाकडून विषयेला प्रेमपाश घालणारा 'उपवधू' (हा शब्द उपवर या शब्दाचा सख्खा भाऊ आहे) व राजकारण करण्यास पात्र झालेला असा तो दिसूं लागला असतां, या बदललेल्या देखाव्यामुळें नाटककाराच्या शार्दूलप्लुतीचें कौतुक न वाटतां कदाचित् नाटककाराइतकी कल्पनेची देणगी आपणांस दिली नाहीं याबद्दल त्यास वाईट वाटेल. परंतु या ठिकाणीं कोणाकडे दोष असेल तर मानवी प्रेक्षकांकडे नसून, नाटककाराकडेच आहे असें मला वाटतें. प्रयोगांत एखादें पात्र आपण पाहिलें असतां पुढें त्या पात्रामध्यें आकार, रंग, वय वगैरेसंबंधानें फरक झालेला दृष्टोत्पत्तीस आला असतां तो कितपत सुसह्य होईल हा एक प्रश्नच आहे. वास्तविक हा फरक फारसा होणें शक्य नाहीं; केवळ वेषांतरानें व रंगाच्या साहाय्यानें साधारणतः जितका फरक एखाद्या चेहऱ्यामध्यें प्रत्यक्ष दाखवितां येईल, तितका फरक चेहऱ्याची ओळख कायम राहात असतां सुसह्य होईल, असें साधारणतः आपण म्हणूं. परंतु कित्येक स्थित्यंतरें दाखवितां येणें शक्य नसतें व कित्येक दाखविण्याचा प्रयत्न केला असतांहि तीं मनास पटत नाहींत. शाकुंतलामध्यें पहिल्या अंकांतील धष्टपुष्ट राजा पुढील एका अंकांतहि प्रत्यक्ष आपणांस तसाच दिसतो; परंतु त्याचें वर्णन पाहावें तों शोकानें कृश झालेला व हातांतील रत्नजडित कडें गळूं लागलेला असें आहे. हें स्थित्यंतर खरोखरीच दाखवितां आलें तर बहारीचें होईल; परंतु प्रत्यक्ष दाखविण्यास अशक्य अशा स्थित्यंतराचें हें एक उदाहरण आहे. त्याचप्रमाणें लहानाचा मोठा

झालेला चंद्रहास त्याच चेहऱ्याचा जर खरोखर कदाचित् दाखवितां आला असता तर प्रत्यक्ष प्रयोगांत गेलेल्या एका घटकेंत कथाभागाचीं दहाबारा वर्षे लोटलीं याबद्दल आपण कदाचित् तक्रार केली नसती. परंतु आठ वर्षांच्या मुलास मिशा लावून तो एकदम वीस वर्षांचा दाखवितां येण्यास मूळचा आठ वर्षांचा तरुण चंद्रहास तरी बालराक्षस पाहिजे, किंवा वीस वर्षांचा तरुण चंद्रहास तरी एखाद्या सर्कशींत प्रदर्शन करण्यासारखा ठेंगू होता अशी कल्पना केली पाहिजे. परंतु यांपैकीं एकहि असल्याबद्दल ग्रंथकारानें कोठें सांगितलें नाहीं.

प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीवर कालगणनेसंबंधानें अमर्याद ताण पडण्याचें एक मसालेवाईक उदाहरण आम्हीं एकदां पौराणिक नाट्यप्रयोगांत पाहिलेलें आठवतें. नाटक लहु-कुश आख्यानाचें होतें. पहिले कांहीं प्रवेश झाले, नंतर वाल्मीकि ऋषि व त्याचा शिष्य हे पडद्यापुढें येऊन बसले. विदूषकाची शेंडी धरून संहितेच्या संथेंतील स्वर बसविण्याचा फार्स झाल्या-नंतर पडद्याच्या आंतून करुणस्वर ऐकूं आला. तेव्हां वाल्मीकीनें शिष्यास हें काय आहे म्हणून विचारिलें. शिष्यानें पडद्याच्या आंतून जाऊन येऊन सांगितलें कीं, सीता प्रसूत होत आहे व या वेदनेमुळें होणारा हा तिचा विलाप आहे. परंतु यापुढें झालेल्या प्रश्नोत्तरांत विदूषकानें पडद्यांतून जाऊन येण्याचे श्रमहि घेतले नाहींत. तो प्रकार खालीलप्रमाणें:--

( पडद्यांत लहान मुलाचें रडणें ऐकूं येतें. )

वाल्मीकिः—अरे, हें काय चाललें आहे ?

विदूषकः—गुरुमहाराज, सीतादेवी प्रसूत झाली असून तिचा मुलगा रडत आहे.

( फिरून रडण्याचा आवाज. )

वा.—अरे, हा वेगळा आवाज दिसतो.

वि.—गुरुमहाराज, सीतेला जुळीं मुलें झालीं त्यांपैकीं दुसऱ्या मुलाचा हा आवाज आहे.

( पडद्यांत गलबला होतो. )

वा.—अरे, हा गलबला कसला ?

वि.--गुरुमहाराज, सीतादेवींचे दोघे मुलगे लहु-कुश हे बाललीला करीत असून आपल्या मातोश्रींपाशीं आभाळांतील चांद मागत आहेत त्याबद्दलचा हा वादविवाद चालू आहे.

( पडद्यांत आवाज होतो. )

वा.—अरे, हा धनुष्याची प्रत्यंचा झाडलेला आवाज कसला ?

वि.—गुरुमहाराज, लहु व कुश हे सात-आठ वर्षांच्या वयांतच धनुर्विद्यापारंगत झाले असून ते अलीकडे धनुष्यबाणाचाच सगळा खेळ खेळूं लागले आहेत.

( पडद्यांत गलबला होतो. )

वा.—अरे, हा गलबला कसला ?

वि.—गुरुमहाराज, धनुर्विद्या शिकून परिसमाप्त झालेले दहाबारा वर्षांचे लहु-कुश आपल्यास वंदन करावयास येत आहेत.

( दहा-बारा वर्षांचे दोन मुलगे धनुष्यबाण घेतलेले
येऊन वाल्मीकीस वंदन करितात. )

बसल्या बैठकीस अवघ्या एक-दोन मिनिटांत लहु-कुशांच्या जन्मापासून तों ते समाप्तविद्या होऊन तारुण्यामध्यें प्रवेश करूं लागणारे असे दाखविणें याहून कल्पनेचा अधिक अद्भुत खेळ दुसरा एखादा असेल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु कोणीहि सहृदय मनुष्य असल्या या प्रयोगदर्शनास मान डोलवील असेंहि पण आम्हांस वाटत नाहीं. अशाच रीतीनें इतर कांहीं नाटकांचीहि गोष्ट आहे. शाकुंतलांतील पहिल्या अंकांत यौवनावस्थेचें ज्ञानहि नसणारी मुग्ध कुमारिका जी व जेवढी पाहतों, ती तेवढीच सातव्या अंकांत पाहात असतां, तिच्या बरोबर तिचा मुलगा म्हणविणारा असा एक सहा-सात वर्षांचा मुलगा असतो. वास्तविक हें मनास खरोखर कसें पटणार ? कल्पनाशक्ति कितीहि प्रबळ म्हटली तरी इंद्रियांच्या योगानें होणाऱ्या प्रत्यक्ष ज्ञानास तिला इतका आळा कसा घालतां येईल ? या ग्रंथकाराच्या अडचणींत नाटकमंडळ्यांच्या अडचणींची भर पडली म्हणजे मग तर पाहावयासच

नको. एखाद्या नाटकांतील शकुंतलेची भूमिका घेणारा मुलगा जर पोक्त असेल तर सातव्या अंकांत बरोबर सात-आठ वर्षांचा मुलगा घेऊन येण्याच्या प्रवेशांत तो चांगला शोभेल; परंतु पहिल्या अंकांतील मुग्ध नायिकेचीं कवीचीं वर्णनें दुष्यंताचे वगैरे तोंडून चाललीं असतां शकुंतलेच्या ठिकाणीं सांसारिक अनुभवांत मोरावळ्याप्रमाणें मुरलेली प्रौढ स्त्री प्रेक्षकांच्या नजरेपुढें उभी राहणार! अर्थात् रसभंग झालाच पाहिजे. उलटपक्षीं, ही भूमिका घेणारा मुलगा लहान असेल, तर रसभंग पहिल्या अंकाच्या ऐवजीं सातव्या अंकांत होईल, इतकाच काय तो फरक.

अशीच इतर कित्येक उदाहरणेंहि घेऊन याच वादाचें समर्थन करितां येईल. रा. कोल्हटकरांच्या गुप्तमंजूषांत सहा वर्षांचा अवधि लोटला आहे. हा अवधि सहाच वर्षें असण्यांत काय मुद्दा आहे, हें कळत नाहीं. मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत शिक्षण पुरें होण्यास पांच वर्षें लागतात हें खरें, तरी सौदामिनी ज्या विद्यालयांत शिकावयास गेली तेथील कोर्स कदाचित् लवकर पुरा करितां आला असता, परंतु त्यामुळें प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं रसभंग होण्यास मदत होते; कारण सौदामिनी पतीचा त्याग करून जात असतां नंदिनी लहान व अल्लड होती असें दाखविलें आहे, व नाटकाच्या शेवटीं अर्थात् सहा वर्षांनीं मोठी झालेली दिसली पाहिजे. परंतु तसें होणें शक्य नाहीं. दुसऱ्या एका दृष्टीनें या सहा वर्षांच्या अवधीस आक्षेप घेतां येण्याजोगा आहे. नंदिनी–विलास यांच्या प्रेमाची परिणति हा कथानकांतील एक घटक आहे; परंतु या सहा वर्षांत या नायकनायिकेच्याकडून या परिणतीस अनुकूल असें कोणतेंच कार्य झालेलें दाखविलें नाहीं. या सहा वर्षांपूर्वीं विलास हा नंदिनीबद्दल वंचकास ठराविक प्रश्न विचारीत असलेला जसा दिसतो, तसा तो फिरून सहा वर्षांनींहि दृष्टीपुढें येतो. या अवधींत प्रत्यक्ष भेटीचा प्रयत्न, प्रयत्नाची चिथावणी, अगर चिथावणीचा विचार यांपैकीं कांहींहि घडून आल्याचें प्रेक्षकांच्या नजरेस येत नाहीं; व या एकंदर पुराव्यावरून विलास व नंदिनी हीं सहा वर्षेंपर्यंत काय करीत होतीं असा प्रश्न विचारला तर त्याचें उत्तर असेंच द्यावें लागेल कीं, “ विरहदुःखामुळें होणाऱ्या जागरणांमुळें हीं दोघेंहि सकाळीं उशीरां उठत होतीं, दोन प्रहरीं जेवीत होतीं व मधल्या

वेळीं एकमेकांबद्दल आठवण काढून रडत होतीं." ही कष्टमय स्थिति कशी व कधीं संपणार याची त्यांना कल्पनाहि नव्हती; कारण राजा अमुक वेळेस मरावयास टेकणार व मरण्यापूर्वी सौदामिनीस दिलेल्या वचनाप्रमाणें तो नंदिनीचें स्वयंवर पण लावून करण्यास सिद्ध होणार. अशा वेळीं, अवचित सौदामिनी परत येऊन स्वयंवराच्या बिकट व्यूहांतून मार्ग काढून, नंदिनीस विलास मिळवून देणार, ही ग्रंथकर्त्यांच्या डोक्यांतील अद्भुत रचना त्या बिचाऱ्यांस काय माहीत? त्यांच्या प्रणयाच्या या एकंदर इतिहासावरून हीं नायकनायिका कोणी शेणामेणाचे लिबलिबीत निर्जीव असे प्राणी होते कीं काय असेंहि वाटूं लागतें. सांगण्याचा मुख्य मुद्दा असा कीं, तरुण नायक-नायिकेच्या प्रेमासारख्या प्रबळ विकाराची परिणति दाखवावयाची असतां अशा प्रसंगीं निष्कार्य व निरर्थक असा सहा वर्षांचा अवधि घालवावयास लावणें, हें सर्वस्वीं रसभंगकारक आहे असें मला वाटतें. तसेंच या नाटकांत कथानकास सुरुवात सौदामिनीच्या पतित्यागापासून न करितां ती सहा वर्षांनंतर समाप्तविद्य होऊन परत आल्यापासून दाखविली असती तर कल्पनाशक्तीवर हल्लीं पडणारा बेसुमार ताण पडला नसता.

**स्थल:**—यासंबंधानें द्वैताद्वैताची भानगड फारशी उरत नाहीं हें वर दर्शविलेंच आहे. कालावधि हा जसा मुख्य कथाभागावर अवलंबून व त्याशीं सप्रमाण असा असावा लागतो, त्याचप्रमाणें नाटकांतील स्थलवैचित्र्यहि कालावधीवर अवलंबून आहे असें म्हणतां येईल. खुद्द स्थलवैचित्र्य हें दोषास्पद नाहीं; परंतु नाट्यवस्तुगत काल समजा एक–दोन महिन्यांचा दाखविला असेल, परंतु त्या अवधींत होणारीं निरनिराळीं कार्यें अति दूरदूर ठिकाणीं होणारीं अशीं दाखविलीं असलीं तर तें मात्र बरोबर दिसणार नाहीं. काल्पनिक कथानकांत, स्थलांचीं नांवें काल्पनिक दिलीं असलीं तर कांहींच भानगड उरत नाहीं. परंतु ठाऊक असलेल्या अशा स्थलांचा निर्देश केला असला तर त्यांतील सापेक्ष अंतर काय आहे, हें अंतर लक्षांत घेऊन परस्पर-संबद्ध अशीं कार्यें तेवढ्या कालावधींत घडून येणें शक्य आहे किंवा नाहीं, याचा सूक्ष्म विचार नाटककारास करावा लागेल. याहून स्थलासंबंधानें जास्ती सांगण्याचें कारण नाहीं. असंबद्धता उत्पन्न न होतां स्थलवैचित्र्य दाखवितां

आलें तर तें Lessing Cornelli वगैरे नाटककारांनीं स्थलाद्वैताची खोटी कल्पना करून एका घरांत अगर घराच्या भागांत सर्व कथाभाग घडवून आणण्याची जी पद्धत स्वीकारली आहे तीपेक्षां अधिक सरस वाटेल.

**कार्य** ( Action ) :—या बाबतींत अद्वैत असणें जरूर आहे. मुख्य नाट्यवस्तु एक असून तदंगभूत इतर अनेक गोष्टी असणें स्वाभाविक आहे. नायक व उपनायक, नायिका व उपनायिका या जोड्या नाटकांतून नेहमीं आढळतात. Shakespeare मध्यें तर बहुधा प्रत्येक नाटकांत एक मुख्य कथाभाग व एक उपकथाभाग असतोच. मात्र या द्वैतामधून अद्वैत निघावयाचें असेल तर, त्या दोन अगर अनेक कथानकांत कार्यकारण अवलंब–अवलंबी अशा तऱ्हेचा नित्य व निकट संबंध असला पाहिजे.

**किरकोळ** :—नाट्यवस्तूंमध्यें अद्वैतनिष्पत्ति होण्यास इतर कित्येक गोष्टीहि साधाव्या लागतात; परंतु त्या ' किरकोळ ' या सदराखालीं पडतील. ( १ ) कथानकांत जें स्थळ व जो काल निर्दिष्ट असेल त्याला अनुकूल अशी नेपथ्यरचना पाहिजे. जुन्यापुराण्या पोषाखांच्या रीतीभातींच्या वगैरे कल्पना, कल्पनाशक्ति व युक्तिवाद हे चालवतील तितके चालवून नटवर्गांनीं ठरविल्या पाहिजेत. इंद्र किरीट घालीत होता किंवा फेटा बांधीत होता हें कोणीं सांगावें ? परंतु नाना फडणवीस जरी आजच्या पिढींपैकीं कोणीं पाहिला नाहीं तरी तसबिरा वगैरेंच्या साहाय्यानें त्याचा रंग, रूप, पोषाख, पेहराव, याजबद्दल कांहींशी कल्पना करितां येण्यासारखी आहे. म्हणून त्या कल्पनेबरहुकूम नाना फडणवीस जर रंगभूमिवर आला नाहीं, तर कथाभाग १५० वर्षांपूर्वींचा व पोषाख आजचा, अशा रीतीनें द्वैत उत्पन्न होईल. ' सवाई माधवराव ' नाटकांतील नाना हल्लींच्या सुधारकाप्रमाणें डोकें राखलेले व दाढी केलेली असा जेव्हां पुढें येतो, तेव्हां व त्याच्या डोक्यावर पेशवाई पागोटें नसून बुधवार पेठेंतील लोखंड्यांच्या कारखान्यांतील पगडी आपण पाहतों, तेव्हां तें पाहिल्यावर एकदम बेरंग होतो; आणि मग त्यानें तत्कालीन अशा गोष्टींच्या उल्लेखाचा पाऊस पाडला तरी झालेली रसहानि भरून येत नाहीं. तुकाराम नाटकांतील तुकारामाच्या पात्रानें हल्लींच्या तऱ्हेनें डोकें राखलेलें पाहूनहि हाच प्रकार होतो.

( २ ) नाटकांतील पात्रांच्या भाषणांत Anachronism ( कालनिर्देशप्रमाद किंवा असंबद्धकालनिर्देश ) झाला असतांहि रसभंग होतो. हे प्रमाद सूक्ष्मच असले तर नजरेस येत नाहींत; परंतु ते फार ढोबळ असूं नयेत. शेक्सपीअरनें बोहेमियाचे किनाऱ्यावर जहाज उतरविल्याचें व हेक्टरच्या तोंडीं ॲरिस्टॉटल्चे शब्द घातल्याचें प्रसिद्ध आहे. एका आधुनिक नाटककारानें एका पांडवकालीन भिक्षुकाच्या तोंडांत "राजापुरी लोटा" हे शब्द घातले आहेत. अर्थात् प्रेक्षकांचें मन जितकें अधिक सुसंस्कृत असेल तितका अधिक रसभंग होईल.

( ३ ) नाटकपात्रांनीं खाजगी नात्यानें नाटकाबाहेरील संवाद प्रेक्षकांस कळेल असा करणें; प्रेक्षकांकडे अगर ग्यालरीमध्यें खाजगी नात्यानें पाहणें; प्रॉम्पटरनें प्रेक्षकांस ऐकूं येईल अशा रीतीनें पात्रास भाषण सुचविणें; पडदा वर गेला असतां नाटकाव्यतिरिक्त मनुष्य अगर पदार्थ वगैरे रंगभूमीवर दिसून येणें; गाणाऱ्या पात्रानें पेटीवाल्यास अगर तबलजीस उघड सूचना करणें; पात्रास अनुकूल असा रंग वगैरे नसणें, इत्यादि अनेक गोष्टी रसभंगास कारण होतात. फार काय पण ज्यानें कांहीं थोड्या वेळापूर्वीं सोंग घेऊन रंगभूमीवर काम केलें होतें, असा मनुष्य आपलें सोंग उतरून प्रयोग चालला असतां जर प्रेक्षकांत येऊन बसेल, अगर एक सोंग टाकून दुसरें सोंग घेऊन रंगभूमीवर येईल, तरीहि रसभंग होतो. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष अनुभवसिद्धच आहेत व या सर्वांस साधारण असें एकच कारण आहे, तें हें कीं, नाटकप्रयोग मनावर ठसण्यास प्रेक्षकांचें तादात्म्य, तल्लीनता व्हावी लागते; व रंगभूमीवरील देखावा, भाषणें वगैरेंनीं जो एक प्रकारचा भ्रम उत्पन्न होतो, तो भ्रम जितका परिपूर्ण व निर्दोष असेल, तितकें तादात्म्य अधिक होईल. आणि वरील गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट मुद्दाम उत्पन्न केलेल्या व गोड अशा या भ्रमाचा निरास करणारी आहे. बेकननें " Deception of the senses is a pleasure " म्हणजे ज्ञानेंद्रियांस जाणून बुजून भ्रम उत्पन्न करून त्यांची फसवणूक करणें हें एक प्रकारचें बुद्धिविषयक सुख आहे, असें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे; व या वरील सर्व गोष्टींनीं या सुखास व्यत्यय येतो.

आतां कोणी असें म्हणेल कीं, हा भ्रम बोलूनचालून मुद्दाम उत्पन्न केलेला जर आहे, तर नाटक पाहावयास जातांना प्रेक्षकानें वाटेल तितक्या गोष्टी गृहीत घेऊन चालण्याची तयारीच करून गेलें पाहिजे; व एक गोष्ट जर गृहीत घेतां येते, तर दुसरी वाटेल ती तशीच कां घेतां येऊं नये? पुणें मुक्कामीं सन १९०७ च्या सप्टेंबर महिन्याच्या तिसाव्या तारखेस गणेश पेठेंतील परांजपे यांच्या इमारतींत आपण बसलों असतां आपल्या समोरील जोत्यावर घातलेल्या हिरव्या पालपट्टीवर, ठराविक सोम्या गोम्या ही मंडळी येऊन अवघ्या दोन–चार तासांच्या अवधींत बोलतां येईल तितकें पुणेंशाही मराठी भाषेंत शुद्धाशुद्धरीतीनें बोलत आहे, असें पक्कें माहीत असतांहि जर त्या ठिकाणीं त्याच वेळीं १५० वर्षांपूर्वींचे पेशवाई प्रसंग, अगर अमर्याद कालापूर्वींचे पौराणिक प्रसंग घडून येत असलेले आपण पाहात आहों असें गृहीत घेऊन चालण्याची प्रेक्षकवर्गाच्या मनाची तयारी करितां येते, तर मग वर सांगितलेले सर्व जरी दोष घडून आले, तरी काय हरकत आहे? परंतु खरा सहृदय मनुष्य अशा तऱ्हेचा युक्तिवाद करणार नाहीं असें आम्हांस वाटतें. वर सांगितल्याप्रमाणें स्थल, काल, भाषा, वगैरेंचे कांहीं निर्बंध सर्वस्वीं दुस्तर आहेत यांत शंका नाहीं; परंतु वर जे दोष म्हणून दाखविले ते तसे दुस्तर नव्हेत, ते टाळतां येण्यासारखे आहेत, म्हणून ते न टाळलेले सरस मनास सोसत नाहींत. रविवर्म्याचें उत्तम चित्र झालें तरी तें खडबडीत गोणपाटावर व तेलाच्या रंगांनीं केसाच्या ब्रशांनीं काढिलेलें असतें असें जर माहीत आहे, तर अशा रीतीनें काढिलेल्या चित्रांतील कृष्णाचें नाक कापलेलें असलें, किंवा सुभद्रेच्या तोंडावर थोडीशी मिसूर दिसत असली तरी काय हरकत आहे? हा व वरील युक्तिवाद सारख्याच किंमतीचे होत. दुस्तर बंधनें असूनहि इतर रीतीनें निर्दोष कृति जर करितां आली तर अलबत ती करण्याची महत्त्वाकांक्षा प्रत्येक नाटककारानें व नटवर्गानें धरिली पाहिजे. कसेंहि नाटक असलें तरी चार घटका करमणूक होते ही गोष्ट एका अर्थीं खरी आहे. तथापि असें म्हणून भागविणें हें खऱ्या सहृदयतेचें लक्षण नव्हे.

• • •

## १५ : चंद्रगुप्त

### अंक २ – प्रवेश ४.

**स्थळः**—आनंदभुवनाजवळचा बगीचा.

[ स्त्री–वेषधारी हरनंद प्रवेश करतो. ]

**हरनंद**—हा लज्जास्पद स्त्री-वेष घेऊन अज्ञातवासांत राहण्याचा प्रथम प्रथम मला मोठा वीट आला खरा. पण आतां तोच वेष मला फार आवडूं लागला आहे आणि हा अज्ञातवास जितका अधिक लांबेल तितका अधिक बरा असंहि मला वाटतं. मी पुरुषवेषांत असतों तर तारिणीच्या इतक्या जवळ माझा प्रवेश कसा झाला असता? पण तेंच आतां पहा, तिचा हस्तस्पर्शहि मला एखादे वेळीं चुकून होतो; आणि तिच्या सुगंधी उच्छ्वासाचा आस्वादहि मला कित्येक वेळां घडला आहे! अहाहा! काय तें सुख! तरी मी आपला आपणाकडून जपून लांब लांब राहतों. फारशी लगट म्हणून करीत नाहीं. कारण न जाणों, अतिशय जवळ गेल्यानें चुकून एखादे वेळीं माझा तिला संशय आला तर फजिती व्हावयाची. माझं खरं स्वरूप तिला कळलं तरी तिच्याकडून म्हणजे मला कसली भीति आहे असं नाहीं. कारण या राजनिष्ठ कुटुंबाच्या सहवासांत येऊन पडल्यापासून, मी एखाद्या अभेद्य किल्ल्याच्या आंत केवळ वज्रमय कवचांत गुरफटून राहिलों आहे कीं काय, असा मला सुरक्षितपणा वाटतो. पण माझा कपटवेष प्रगट झाल्यानं तारिणीच्या सान्निध्यसुखाला मी अंतरेन इतकीच काय ती भीति वाटते! सुवर्णकेतकीच्या जाळींत सर्प दिवसभर वेटाळं घालून बसतो तो केतकीच्या बचावाकारितां नव्हे किंवा स्वतःच्या बचावाकरितांहि नव्हे; तर त्या केतकीच्या सुगंधी आस्वादाला मोहून, हेंच खरं. मी आज बागेंत फिरायला जाण्याची इच्छा प्रदर्शित केली ती तारिणीनें तेव्हांच मान्य केली. माझ्या सुखासमाधानाकरितां ती किती तरी जपत असते आपणाकडून! आणि मी जितका अधिक उदास आणि

दुःखी दिसतें, तितका ती माझं मन रिझविण्याचा प्रयत्न अधिक करते. म्हणून लवंगीशीं वागतांना मी जरी हसूनखेळून वागतों, तरी तारिणीशीं बोलतांचालतांना, मला उदासपणा अधिक उपयोगीं पडतो. मी स्वतः अबोला धरणं हें तारिणीला पुष्कळसं बोलायला लावायला एक बिनचूक साधनच सांपडलं आहे मला. आणि ती बोलूं लागली कीं तिचं ते मंजूळ भाषण ऐकतां ऐकतां, मला स्वतःला बोलतां येतं हेंहि मी विसरून जातो. तारिणीचं माझ्याशीं वर्तन अत्यंत ममतेचं आहे, पण त्या ममतेंत प्रेम किती आहे हें आज पाहण्याचा मीं निश्चय केला आहे; आणि तें कळायला मला दुःखीच बनलं पाहिजे. प्रेमाची मूर्ति विराजमान करून बसवायला दुःखभावनेची बैठक चांगलीच शोभते. पण ही तारिणीच आली.

[ तारिणी प्रवेश करते. ]

तारिणी०--माधवीबाई, मला यायला उशीर नाहीं ना झाला फारसा ?

हर०--( उदासपणानें ) उशीर झाला कीं नाहीं हें मला कळलंच नाहीं ! मी आपली इकडं आल्यापासून आभाळाकडं पाहात बसलें होतें, तों इतक्यांत तुमची हांक ऐकली.

तारि०—खरंच, तुमचं लक्ष आभाळाकडं इतकं वेधलं त्यांत कांहीं नवल नाहीं. हा पाहिलांत का सूर्य अस्ताला चालला आहे ! त्याची शोभा या झाडांतून किती उत्तम दिसते ती !

हर०--ताईसाहेब, अस्ताला जाणाऱ्या सूर्याची शोभा आपण कोणत्या अर्थानं म्हटलीत ?

तारि०--हें काय ? त्या बिचाऱ्याला मी लावून कशाला बोलूं ? मी उपरोधिक बोलत नाहीं. खरंच, मावळत्या सूर्याचा हा देखावा सुंदर दिसत नाहीं काय ?

हर०--मी तर म्हणतें कीं हा देखावा फारच भेसूर, भयंकर दिसतो.

तारि०--विकास पावलेलं हें सूर्यबिंब तुम्हांला गोड वाटत नाहीं काय ?

हर०--( सुस्कारा टाकून ) दिवा सुद्धां मालवतांना असाच मोठा होतो. विकास होणं हें कांहीं ऐश्वर्याचं सुचिन्ह असंच कांहीं म्हणतां येत नाहीं. छेः छेः ! मला तर हें सूर्यबिंब पाहून भयच वाटतं. शिरच्छेद केल्यामुळं

आपल्याच रक्तानं माखलेल्या एखाद्या राजपुत्राच्या मुंडक्यासारखं तें मला भासतं.

तारि०——बरं, तें सूर्यबिंब राहिलं. पण हा संध्याप्रकाश पश्चिम दिशेला कसा काय शोभतो ?

हर०——अगदीं एखाद्या रणभूमीवरच्या रक्ताच्या सड्याप्रमाणं !

तारि०——पण हीं नक्षत्रं पाहिलींत का कशीं ठिकठिकाणीं उगवून लखलखताहेत तीं !

हर०——होय. ताईसाहेब, मला वाटतं कीं, हाडांचं पीठ करून त्यानं घातलेली आकाशांगणांतली ती उदंड रांगोळीच जशी कांहीं !

तारि०——किती ही शांत वेळ !

हर०——दिवसभर आकाशांत स्वच्छंदानं विहार केलेल्या पशुपक्षिगणांवर रात्रीनं प्राणसंकट आणलं, तेव्हां हे बिचारे भयानं जागा सांपडेल तिथं दडून लपून माना खालीं घालून बसले. म्हणून शांतता अवतरली आहे खरी ! स्मशानांत सुद्धां सर्वकाळ शांतताच नांदत असते. पण ताईसाहेब, या अशा शांततेंत सुख किंवा समाधान का आहे ?

तारि०——पण सर्व प्राणिमात्रावर अमृतवर्षाव करणारी निद्रा त्यांना सूर्यास्तामुळंच मिळते ना ?

हर०——त्यांना निद्रा सूर्यास्तानंतर मिळते खरी, पण त्यामुळं सूर्य हा जर त्यांच्या निद्रेचा वैरी म्हणावा तर तो मावळतांना तें मौन कां धरतात ? आणि दुःखविलाप कां करतात ? पण तेच, सूर्य उगवतांना आनंदानं किलबिल करून नाचूं बागडूं कां लागतात ? प्राणिमात्रांचं सुखदुःख लोकांनीं आपल्या मनावरून ठरविण्यापेक्षां प्राणिमात्रांच्या कृतीवरूनच ठरवावं हें बरं नाहीं काय ?

तारि०——( स्वगत ) कोणत्याच देखाव्यानं यांना समाधान वाटत नाहीं, काय करावं ? ( उघड ) खरं म्हणतां माधवीबाई तुम्ही ! दुःख आणि सुख हें सहसा ज्याच्या त्याच्या मनोभावनेप्रमाणंच असतं. पण पूर्वेकडं हें चंद्रबिंब उगवलं आहे नुकतंच, तें पाहिलंत का ? मला वाटतं कीं, वाटेल त्या मनःस्थितींतल्या मनुष्याचं मन रमण्याकरतांच परमेश्वरानं चंद्र हा उत्पन्न

केला असावा. चंद्रबिंब पाहून आनंद होणार नाहीं असा एक तरी जीव मिळेल काय?

हर०—ताईसाहेब, हा आपणाला भ्रम आहे. चंद्र उगवलेला पाहून सुख होतं, कीं दुःख होतं तें त्या पलीकडच्या तळ्यांतल्या कमलिनींना विचारा. त्या सांगतील त्याचं उत्तर आपणाला. पण मी, हो चुकलें. त्यांचं तोंड दुःखावेगानं मिटललें, त्या तुमच्याशीं आपलं मनोगत कसं बोलणार?

तारि०—त्या आपलं मनोगत बोलल्या नाहींत तरी मला तें कळणार का नाहीं! त्यांचंच कशाला? पण माधवीबाई, तुमचंहि बोलणं स्पष्ट नसलं तरी तुमच्या मनांत कोणते विचार घोळत आहेत, हें मला नाहीं का कळत?

हर०—(स्वगत) माझ्या मनांत घोळणारे विचार इनं ओळखले असं ही म्हणते, यांत तिचा काय हेतु असावा बरं? (उघड) काय म्हणतां ताईसाहेब? माझ्या मनांतले विचार तुम्हीं ओळखले? सांगा! सांगा पाहूं माझ्या मनांतले विचार! ते तुमच्या तोंडून ऐकायला मिळाले तर त्या गोड प्रतिध्वनीनं मनाला किती तरी समाधान होईल!

तारि०—सांगूंच का? नंदराजघराण्याच्या संहाराचं दुःख तुमच्या मनांतून अजून जात नाहीं! आणि म्हणूनच शुभदर्शन असे देखावे पाहून तुम्हाला अशुभ गोष्टींची आठवण होते.

हर०—(सुस्कारा टाकून) होय ताईसाहेब. पण तें दुःख आठवून तरी काय उपयोग? किती झालं तरी मी पडलें स्त्री. माझ्या हातून रडण्यापेक्षां अधिक तें काय होणार? त्या दुष्ट चाणक्याचा आणि चंद्रगुप्ताचा सूड उगविणं माझ्या हातून कसं होणार? सूड घेण्याचं सुख पुरुषांनाच लाभतं!

तारि०—खरंच माधवीबाई, ईश्वरानं तुम्हांला स्त्री न करतां पुरुषच केलं असतं तर फार चांगलं झालं असतं.

हर०—(उत्सुकतेनें) तें कसं बरं ताईसाहेब?

तारि०—म्हणजे नंदमहाराजांच्या बाजूनं लढणाऱ्या शूर वीरांच्या संख्येंत आणखी एकाची भर पडली असती; आणि सुदैवानं वांचलेल्या कुमार हरनंदाच्या बचावाला आणखी एक सहाय्यकर्ता मिळालाच असता!

हर०—अहाहा, ताईसाहेब! तुमच्या भाषणांत खरोखरच कांहीं जादू

असली पाहिजे. कारण मला स्त्री न करितां पुरुष केलं असतं तर बरं झालं असतं, हो तुमची इच्छा ईश्वरानं खरोखरच मान्य केली असावी असं मला वाटतं !

तारि०—या जगांत मनुष्याच्या सर्व इच्छा तोंडांतून शब्द निघाल्या-बरोबर जर अशा सफळ होऊं लागल्या, तर मग भूलोक आणि स्वर्ग यांत अंतर तें काय राहिलं ? कल्पवृक्षाचं बीज पृथ्वीवर रुजल्याचं आजवर मीं कधीं ऐकलं नाहीं.

हर०--आजवर ऐकलं नसेल, पण प्रत्यक्षच पाहायला सांपडलं तर मग काय म्हणाल ? ताईसाहेब, तें पाहिलं का तिकडे कोण आहे तें ?

( तारिणी वळून पाहते तोंच हरनंद झटकन् स्त्री-वेष टाकून देऊन पुरुषवेष घेतो. )

तारि०--( दुसरीकडे पाहात ) तिकडे कुणीच नाहीं. इथं तुम्ही आणि मी दोघचं आहों.

हर०--होय तारिणी, तुझ्यामाझ्यामध्यें तिसरं कधींच कोणी येऊं नये अशा माझी ईश्वराला प्रार्थना आहे !

तारि०--( परत वळून आश्चर्यानें ) काय ? हें काय मी पाहतें आहे !

हर०—तारिणी, तुझ्याच इच्छेप्रमाणें ईश्वरानं मला स्त्रीचा पुरुष केला. खरोखरच कल्पवृक्षाचं बीज पृथ्वीवर आज उगवलं. सुंदरी ! खचित हा तुझ्या प्रेमाचाच प्रभाव !

तारि०--( दूर होऊन ) खचित या ठिकाणीं कांहीं तरी कपट असलं पाहिजे. बोला, बोला, माधवीबाई कुणीकडं गेल्या ? आणि तुम्ही कोण ? या ठिकाणीं अवाचित कुठून आलां ?

हर०--तारिणी, रागानं असा चित्तक्षोभ होऊं देऊं नकोस. माझ्याकडं नीट बघ. माझ्याकडं डोळे भरून पाहा, म्हणजे ज्याप्रमाणं तुझा संशय फिटेल त्याप्रमाणं मलाहि धन्यता वाटेल.

तारि०--छेः छेः ! मला कांहींच कल्पना करवत नाहीं.

हर०—तारिणी, तुला कल्पना होत नसली तर मी सांगतों. ज्याला तूं आजवर ‘ माधवी ’ अशा गोड नांवानं हांक मारीत होतीस तोच मी. स्त्री-

वेषाचं लांछन मला कांहीं कारणानं लागलं होतं खरं; पण तो वेष मला अलीकडं फार दुःसह झाला होता. तुझ्या सहवाससुखामुळंच मीं तो सोसला. शेवटीं तो टाकून देण्याची सूचना तुझ्या तोंडून मला आली. हे तुझे माझ्यावर केवढे तरी उपकार आहेत !

तारि०—( भिऊन ) अगबाई, खचित आपण कांहीं तरी कपटाचा लपंडाव खेळतां आहां माझ्याशीं !

हर०—होय, आजवर कपटाचा लपंडाव खेळलों खरा. पण त्याची क्षमा कर. तो लपंडाव आजपासून मात्र संपला ! आणि मीं हा जो माझा पुरुषवेष फिरून धारण केला, तो झाला तरी हा लपंडाव संपावा म्हणून ! तारिणी, प्रेमाचा उदय ज्या हृदयांत झाला, त्यांत त्यापुढं कपटाला थारा कसा मिळणार ? यापुढं माझे तुझ्याविषयींचे मनोभाव मी गुप्त ठेवीन तर मात्र निःसंशय तें कपट होईल. म्हणून मला तें बोलून दाखविण्याची परवानगी दे.

तारि०—( त्रासून ) बोला ! बोला ! काय असेल तें लवकर बोला. माझ्या मनाची फारच चमत्कारिक स्थिति झाली आहे.

हर०—तारिणी, माझा वेष बदललेला पाहून तुझ्या मनाची स्थिति या घटकेला चमत्कारिक झाली असेल. पण सुंदरी, मी स्त्रीवेषानं माधवी म्हणून या आनंदभुवनांत तुझ्या जवळ येऊन राहिल्यापासून, आज इतके दिवस माझ्या मनाची स्थिति किती चमत्कारिक झाली असेल याचा तूंच विचार कर. लोहचुंबकाशेजारीं राहून आपलं आकर्षण झालं नाहीं, असं दाखविणं ही गोष्ट लोहाला किती परिश्रमाची असेल बरें ! तारिणी, तुझा मुखचंद्र नित्य जवळ असतां माझ्या हृदयसमुद्राला आलेली भरती मला आंतल्या आंत दाबून ठेवावी लागली. त्यामुळं मला किती कष्ट पडले असतील याची कल्पना तरी आहे काय ?

तारि०—असलं हें तुमचं अलंकारिक भाषण मला समजत नाहीं व आवडतहि नाहीं. बोला, तुम्ही कोण ? आणि तुमचा खरा वेष तरी कोणता ? स्त्रीचा कीं पुरुषाचा ?

हर०—तारिणी, तुला यांपैकीं माझा जो वेष आवडेल तोच माझा खरा

वेष. मीं फिरून पुरुषवेष घेतला आहे खरा. पण माझा स्त्री-वेषच तुला पसंत असेल तर मी तोहि घेण्याला तयार आहें.

तारि०--दुष्टा, तुझ्या निर्लज्जपणाची आतां मात्र सीमा झाली. पुरुषासारखा पुरुष होऊन स्त्री-वेष धारण करण्यांत तुला भूषण वाटतं! धिक्कार तुझ्या चारित्र्याला! पण तूं आपलें चारित्र्य मातींत लोळवायला तयार झालास म्हणून तूं माझा अपमान केलास तो मुळींच कमी होणार नाहीं! (त्वेषानें) अरेरे! माझा माधवदादा या ठिकाणी नाहीं. नाहीं तर तुझ्या अपराधाचं इथल्या इथं योग्य प्रायश्चित्त मीं दिलं असतं.

हर०--तारिणी, हा तुझा भ्रम आहे. माधवानंच मला आपल्या बरोबर आणून तुझ्या स्वाधीन केलं हें विसरलीस वाटतं?

तारि०--मग काय, तुम्ही त्याच्यावरहि आपलं कपटजाल पसरलंत कीं काय?

हर०--नाहीं. मीं त्याच्यावर कपटजाल पसरलं नाहीं. इतकंच नव्हे तर त्याच्याच आग्रहावरून हा स्त्री-वेष मीं घेतला. पण जाऊं दे. तारिणी, तुला मी भ्रमांत कशाला ठेवूं? मी कोण, आणि हा स्त्री-वेष धारण करण्याचं कारण मला कां पडलं हें तुला एका शब्दांत सांगतों. म्हणजे तुला माझं हें कपट वाटणार नाहीं! ऐक तारिणी! तुझ्यापुढं उभा आहे तो नंदवंशापैकीं सुदैवानं वांचलेला एकटा एक राजपुत्र मीच हरनंद!

[ आपली नाममुद्रा दाखवितो. ]

तारि०—(आश्चर्यानें) काय महाराज, आपण हरनंद? अहाहा! आनंदभुवन आज धन्य झालं! जाऊं दे, बाबांना ही बातमी जाऊन सांगूं देच!

हर०—(तिला अडवून) पण तारिणी, मला तूं असं म्हणून धन्य केल्याशिवाय मी तुला जाऊं देणार नाहीं. [ तिचा हात धरतो. ] तारिणी, माझ्या प्रेमाचा तूं अव्हेर करूं नको. त्याचा तुला पश्चात्ताप होईल. राजे लोक प्रजाजनांजवळ याचना करीत नाहींत. पण हा याचना करण्याचा कधींहि न मिळणारा मान आज तुला मी उदार मनानं देतों. तो स्वीकारण्यांत तुला भूषणच आहे!

तारि०—( रागानें ) अरेरे ! राजभक्तीच्या भरांत मी माझा अपमान विसरून गेलें होतें. त्याची आठवण, महाराज, आपणच करून दिलीत. नंदवंशांतल्या राजपुत्राला असलं आचरण शोभत नाहीं !

हर०—मी तुझ्यावर प्रेम करतों यांत वावगं तें काय करतों ? मी क्षत्रिय कुळांतच राजपुत्र झालों म्हणून कुलीन, सद्गुणी, उपवर सुंदरीवर प्रेम करण्याचा माझा हक्क कसा नाहींसा होतो ? राजा या नात्यानं प्रजाजनांचं करग्रहण करणं हें माझं कर्तव्यच आहे. तुझा राजा आणि तुझा वल्लभ या दोन्ही नात्यानं मी–

तारि०—पण प्रजेपासून कर घेण्याबद्दल राजांनीं प्रजेचं अन्यायापासून रक्षण करणं हेंहि त्यांचं कर्तव्य आहे नव्हे काय ?

हर०—अलबत ! तारिणी, बोल तुला कोण अन्यायानं त्रास देत आहे ? त्याचं मी आतां पारिपत्य करतों.

तारि०—महाराज, आपणच. दुसरा कोण ?

हर०—तें कसं सांग पाहूं ?

तारि०—महाराज, माझं मन–माझं प्रेम–माझ्या स्वाधीन राहिलेलं नाहीं. त्याचं आधींच दान होऊन चुकलं आहे. म्हणून आपण अभिलाषबुद्धीनं माझ्या अंगाला स्पर्श करून अनेकांचा अनेक परीनं अपराध करीत आहां !

हर०—काय ? तुझ्या प्रेमाचं दान आधींच होऊन चुकलं आहे ? हं ! समजलों. पण तारिणी, तुझी चूक मी दुरुस्त करून देतों. कारण, राजाला दुरुस्त करितां येत नाहीं, अशी चूकच कोणती नसते. ईश्वराच्या खालोखाल सर्वशक्तिमत्त्व असेल तर तें राजालाच !

तारि०—राजेलोकांनीं सर्व शक्तिमत्तेवर वाटेल तर हक्क सांगावा. तो योग्य कीं अयोग्य हें मला अज्ञान बायकोमाणसाला काय सांगतां येणार ? पण मला एक गोष्ट कळते, ती ही कीं, स्त्रीच्या प्रेमावर मात्र राजाचीहि सत्ता नाहीं खास. स्वच्छंदानं क्रीडा करणारा वारा, सृष्टिनियमाप्रमाणं वाढणाऱ्या व फलपुष्प धारण करणाऱ्या वृक्षवेली, उताराकडं वाहणारा

जलप्रवाह, यांच्यावर राजाचाहि हुकूम चालूं शकत नाहीं. तीच गोष्ट स्त्रीच्या प्रेमाची.

**हर०**--राजेलोक हे ईश्वराचाच अंश आहेत हें तूं विसरलीस वाटतं! ईश्वराची जशी पंचमहाभूतांवर सत्ता चालते, तशीच राजांची प्रजाजनांच्या प्रेमावर चाललीच पाहिजे. तशी न चालली तर मग ते राजे कसले?

**तारि०**--पण आजपर्यंत कोणाहि चांगल्या राजांनीं अशी सत्ता गाजविल्याचं मीं ऐकलं नाहीं. आणि ज्या अधम राजांनीं ती गाजविण्याचा प्रयत्न केला त्याच्या राज्यमंदिरावर ईश्वरी कोपाचा विद्युत्पात झाल्याशिवाय राहिला नाहीं हें मात्र मीं ऐकलं आहे. चला, दूर व्हा.

**हर०**--तूं वेडी आहेत. ईश्वरानं पृथ्वीवरच्या कारभाराचं सर्व काम राजेलोकांकडं सोपविलेलं असतं. आपल्या प्रतिनिधींच्या कामांत तो अशी ढवळाढवळ कशाला करील?

[ तिचा हात धरण्याचा प्रयत्न करतो, इतक्यांत बळिराम प्रवेश करतो. ]

**बळि०**--(रागानें) हे कामांध राजपुत्रा! ईश्वर राजेलोकांच्या कारभारांत ढवळाढवळ करतो कीं नाहीं, याची प्रचीति तुला अजून आली नाहीं काय? खचित तुझे ज्ञानचक्षूच काय पण चर्मचक्षूहि फुटले असले पाहिजेत! एरवीं तुझ्या स्थितीचा तुला विसर पडला नसता! हरनंदा, तुझा बाप आणि त्याचं सर्व कूळ एका क्षणांत नष्ट झालं! ऐश्वर्यपर्वताच्या शिखरावरून अधःपात होऊन दुःख-समुद्राच्या तळाला जाऊन मिळालं! तें काय ईश्वरी कोपाशिवाय? राजेलोकांच्या कारभारांत ईश्वरानं ढवळाढवळ करण्याची आणखी शक्ति ती काय उरली! असं असतां अजून तूं शुद्धीवर येत नाहींस? तेव्हां धिक्कार असो तुला! तुझ्या वाडवडिलांचे दुर्गुण तुझ्या अंगीं चांगलेच उतरले आहेत! त्यांच्याच बरोबर तुझाहि संहार व्हायचा, पण केवळ ईश्वराच्या कृपेमुळं तूं वांचलास आणि या थोर मनुष्यांच्या आश्रयाला आलास. पण अजून तुझी पापवासना जात नाहीं, तस्मात् धिक्कार असो तुला!

**हर०**--अरे हा कोण?

**तारि०**-- बळिदादा! [ त्याच्याजवळ जाते. ]

बळि०--तारिणी, भर राजसभेंत चाणक्याच्या आज्ञेवरून राजा चंद्रगुप्त हरनंदाला मारण्याची प्रतिज्ञा करीत होता, त्याला मीं आपणांकडून प्रतिबंध केला. पण हरनंदाचे हे पापविषयक चाळे पाहून असं वाटतं कीं, चंद्रगुप्ताला मीं व्यर्थ प्रतिबंध केला. पण अजूनहि कांहीं बिघडलं नाहीं. चंद्रगुप्त इकडंच यायला निघाला आहे, असं मला समजलं आहे. ईश्वराची इच्छाच असेल तर राजधानींत जें संहाराचं काम थांबलं तें अजून इथंहि पुरं होईल.

तारि०—नको, नको. बळिदादा, असं बोलूं नको! मला तें ऐकवत नाहीं. महाराज, झालं तें झालं. तें आपण विसरा. मीहि विसरून जातें. चला, आपलं रक्षण करण्याच्या पवित्र कर्तव्याची मला फिरून आठवण झाली. आपण आतां आनंदभुवनांतच जाऊं या. आपणांला इथं कुणी एखादा ओळखतील कदाचित्!

हर०—तारिणी, माझ्या डोळ्यांत अंजन घालण्यालाच ईश्वरानं या ब्रह्मचारीबुवाला इथं पाठविला असावा. तारिणी, याच क्षणापासून माझी दृष्टि निवळली. चल, आपण आनंदभुवनाकडे जाऊं.

[ सर्व जातात. ]

• • •

## १६ : संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन

इंग्रजी भाषा व पाश्चात्य विद्या यांचें महत्त्व खरोखर कमी न होतां संस्कृत विद्येचें योग्य महत्त्व ओळखलें जाण्याचा काळ हल्लीं आपोआप कसा आला आहे हें मागील लेखावरून दिसून आलेंच असेल. परंतु या विद्येचें अधिष्ठान जे जुने पंडित त्यांच्याविषयीं नव्या विद्वानांच्या मनांतहि आदरबुद्धि किती वसत आहे, हें खुद्द सिमला-कॉन्फरन्सचा रिपोर्ट वाचल्याशिवाय कोणासहि कळणार नाहीं. त्या रिपोर्टांत सामील केलेली पाश्चात्य विद्वानांचीं ‘ मिनिटें ’ वाचणारांस, जुन्या संस्कृत पंडिताविषयीं त्यांना सप्रेम आदर

वाटता. आणि या पंडितागिरीची परंपरा नष्ट झाल्यास फार मोठी हानि होईल अशी त्यांना भीति वाटते, याविषयीं संशय राहात नाहीं. खुद्द आपल्या समाजांत पंडितांचें जनें ऐश्वर्य अस्तंगत झाल्यासारखें दिसत असतां पाश्चात्य पंडितांच्या मनांत त्यांच्याविषयीं आदरबुद्धि कशी राहावी हें सकृद्दर्शनीं आश्चर्यकारक वाटण्यासारखें आहे. परंतु हें कोडें उलगडणें फारसें कठीण नाहीं. आधीं खुद्द आमच्या समाजाच्या मनांत जुन्या पंडितांविषयीं आदरबुद्धि सर्वस्वींच नाहींशी झाली आहे असें नाहीं. पंडितवर्गाचें जुनें ऐश्वर्य गेलें यामुळें आमची आदरबुद्धिहि सर्वस्वीं लोपली असा भास होतो, पण तो खरा नाहीं. आमच्या समाजांतील विद्वानांना नव्या पाश्चात्य पंडितगिरीचें वळण जरी लागलें आहे, तरी त्यालाहि जुन्या पंडितांची किंमत चांगली कळते, हेंहि सिमला कॉन्फरन्सच्या रिपोर्टावरून दिसून येतें व पाश्चात्य पंडितांसंबंधानें तर विशेष गोष्ट अशी आहे कीं, त्यांना संस्कृत विद्या ही सर्वच नवी, अर्थात् तिजमध्यें असलेलें ज्ञानभांडार व तें जतन करून ठेवणारा पंडितवर्ग या दोन्ही गोष्टी त्यांच्या अपेक्षेबाहेरच्या असल्यामुळें त्यांना आश्चर्य वाटणें व आश्चर्यानें आदर द्विगुणित होणें हें साहजिक आहे. पण या आश्चर्यापेक्षांहि वेगळें असें दुसरें एक कारण आहे, तें हें कीं, ज्या पद्धतीनें संस्कृत पंडित तयार होतात तिजमध्यें विद्येच्या खऱ्या भक्तांस पटण्यासारखे असेच विशेष कांहीं गुण आहेत. ही पद्धत म्हणजे एकांगी शिक्षणाची पद्धत होय. सबब एकांगी शिक्षणपद्धति व अनेकांगी शिक्षणपद्धति यांच्या सापेक्ष गुणांसंबंधानें प्रथम थोडेंसें विवेचन केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें.

निवळ एकांगी शिक्षणापेक्षां खरें अनेकांगी शिक्षण अधिक चांगलें हें कोणीहि कबूल करील. पण एकांगी शिक्षणाचेहि कांहीं फायदे असतात; व गेल्या शतकांतील शिक्षणपद्धतीच्या तुलनेनें त्यांतील कांहीं कांहीं फायदे पाश्चात्यांच्या नजरेस आले आहेत. एकाग्रता ही शरसंधानाप्रमाणें विद्याभ्यासासहि उपयोगी आहे. द्रोणाचार्य हे बालकौरव वीरांस धनुर्विद्या शिकवीत असतां, त्यांनीं प्रत्येक विद्यार्थ्याला धनुष्यास बाण जोडल्यावर व नेम धरल्यावर “ तुला काय काय दिसतें तें सांग ! ” म्हणून विचारलें;

आणि एकट्या अर्जुनास मात्र बाणाचें टोंक व वेध करण्याची वस्तु याशिवाय दुसरें–तिसरें कांहीं दिसत नाहीं असें त्याजकडून उत्तर आल्यावर ‘ हाच खरा धनुर्धर होईल ’ असें त्यांनीं मनाशीं ठरविलें. या गोष्टीचें तात्पर्य उघडच आहे. मानवी मनाच्या समीकरणांत, एका गोष्टीला जें लक्ष दिलें तें दुसऱ्या गोष्टीवरून कमी झालें कीं हें व्हावयाचेंच. मानवी शक्तीस मर्यादा आहे; व ‘ पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ’ असला अमर्याद वस्तूंचा गणितशास्त्रांतील सिद्धान्त त्यांस लागू पडत नाहीं. जुन्या पद्धतीच्या शिक्षणांत ही एकाग्रता असे आणि यामुळें त्या पद्धतीनें शिकणारा विद्यार्थी आपल्या विषयांत खरा निष्णात होत असे. जुन्या काळचा उत्तम वैय्याकरण किंवा नैय्यायिक घेतला तर, व्याकरण किंवा न्याय या विषयांत त्याला अगोचर असा कोणताहि ग्रंथ-उपग्रंथ किंवा वादाचा मुद्दा सहसा राहात नसे. आतां या एकांगी अध्ययनामुळें त्या विषयाबाहेरचा कांहीं मुद्दा निघाल्यास, जुन्या पंडितास पाण्यांतून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणें चुकल्या-चुकल्यासारखें होणें स्वाभाविक असे. पण तो जोंपर्यंत पाण्यांत राही तोंपर्यंत त्याची शक्ति इतकी अचाट असे कीं, त्याला विद्यासमुद्राच्या थेट तळापर्यंत बुडी मारून तेथील गूढ मुक्ताफळें वर आणतां येत असत. जुन्या पद्धतीचा दुसरा एक विशेष गुण म्हटला म्हणजे स्मृतिसामर्थ्य. हातांत पुस्तक धरून अध्यापन करणें हा पूर्वीं एक प्रकारें कमीपणा मानला जाई; व अध्ययन करण्याच्या वेळीं विद्यार्थ्यांस जरी ग्रंथाचा आश्रय करावा लागे, तरी अध्ययन संपून तो स्वत: अध्यापकाच्या पदवीस येण्याच्या सुमारास त्याचे सर्व अध्ययनग्रंथ प्राय: तोंडपाठ होऊन जात; आणि केवळ या अर्थानेंच पण तो पुस्तकास सोडचिठ्ठी देत असे. शिष्यांकडून अध्ययन करवितांना गुरुजींच्या हातास चाळा हवाच असला तरी तो ग्रंथाचीं पानें चाळण्याचा नसे; तर पत्रावळी लावणें, तपकीर ओढणें, सुपारी कातरणें, असला असे. डेक्कन कॉलेजांतील जुने प्रसिद्ध पंडित अनंतशास्त्री पेंढारकर यांना विद्यार्थ्यांस पाठ सांगतांना, लहान मुलाच्या हातीं खेळण्याकरितां देण्याच्या चाबकाच्या दोऱ्या वळीत बसण्याचा चाळा असे, असें सांगतात. असो. अशा रीतीनें जुने पंडित हे खरोखरच चालते बोलते ग्रंथ असत. त्यांचें

विषयनिष्णातत्व व पाठान्तर हीं पाहून अलीकडच्या काळांतील मनुष्य थक्कच होऊन जावयाचा ! पण या एकांगी शिक्षणामुळें जुन्या पंडितांच्या बुद्धीस एककल्लीपणा येत असे. व्यवहारचातुर्य अंगीं नसल्यामुळें त्यांची क्वचित् थट्टाहि होई. समाजांतील अष्टपैलू व्यवहारांत शहाणपणाच्या चलनी नाण्यांची मोड पुष्कळशी लागते; तेथें चवल्या-पावल्याच काय, पण पैसा, पै व कवड्याहि लागावयाच्या. जसा पदार्थ भेटेल तशा योग्यतेचें नाणें दुकानदाराच्या अंगावर टाकायला लागतें. जुन्या एकदेशीय पंडितांच्या पदरीं शहाणपण पुष्कळ असें खरें, पण तें सगळें मोहोरापुतळ्या किंवा बंदे रुपये यांच्या रूपानें; त्यांच्याजवळ परचुरण नाहीं; आणि दुकानदारास तर त्यांची मोहोर घेऊन खपायची नाहीं व पचायची नाहीं. यामुळें पदरीं द्रव्य व व्यवहाराच्या बाजारांत पदार्थ मांडलेले असतां भाजीहि घेतल्याशिवाय त्यांना हात हलवीत परत यावें लागणार ! बरें, भाजी मिळालीच तर अंगापासून केव्हांहि दूर न होणाऱ्या जरीकांठी शालजोडीच्या पदरांत बांधून शास्त्रीबुवा ती घरीं आणणार !

अनेकांगी अशी जी आधुनिक शिक्षणपद्धति तिचेंहि नफे–तोटे असेच आहेत. नव्या युगांत ग्रंथसंग्रह विपुल. कोणताहि विषय घेतला तरी त्याच्यावर प्रत्यंतराच्या तोफखान्याचा सडकून मारा करितां येईल, इतकी चोहोंकडे ऐसपैस मोकळी जागा व उंचवट्याचीं ठिकाणें. तसेंच त्या त्या विषयाच्या अभिमान्यांनीं वेशींचीं कवाडें लावून घेतलीं तर आंत प्रवेश करण्यास शेंकडों गुप्त मार्ग. यामुळें हल्लींच्या काळांत कोणताहि विषय कोणालाहि सुलभ. गुरुमुखाच्या गंगोत्रीचा प्रवास जुन्या काळाइतका दुःखद नाहीं. किंबहुना कोणालाहि स्वावलंबनानें व गुरुमुखाशिवाय एखादी विद्या सांगोपांग शिकणें कठीण नाहीं. उद्योग मात्र हवा; साधनांची कमतरता नसते. पूर्वकाळीं नैय्यायिक, वैय्याकरण, मीमांसक अथवा द्वैतवादी, अद्वैतवादी अशीं विशेष गुणदर्शक–पण त्याच कारणामुळें अल्पमर्यादासूचक–विशेषणें पंडितास लागत; पण हल्लीं अशा विशेषणांचें कारण उरलें नाहीं. कां कीं, साधारणतः उद्योगशील असा विद्यार्थी घेतला तर त्याला अमुक एक विषयांतलें थोडेंबहुत तरी माहीत नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहीं. गुलाबदाणीच्या कारंजांतून निघाल्याप्रमाणें,

आधुनिक विद्वानांच्या मुखांतून प्रसंगोपात्त विद्येच्या सहस्र धारा एकाच वेळेस स्रवत असून, शिवाय प्रत्येक धारेस निरनिराळ्या शास्त्राचा निरनिराळाच सुगंध येत आहे, हा अजब चमत्कार पाहून जुन्या काळचा पंडित आज आश्चर्यानें थक्कच होऊन जावयाचा ! आणि विद्येचें हें असलें सुवर्णयुग अवतरलें असतांहि जुन्या विद्यापीठांचें काम अजून चालू आहे व आणखी नवीं विद्यापीठें काढण्याचा हव्यास सुरूच आहे याचें त्यांस गूढ वाटेल. दुष्यंत राजा मारीच ऋषीच्या आश्रमांत आला तेव्हां चहूंकडे कल्पतरूच कल्पतरु उगवलेले असतांहि हे ऋषि अजून तपश्चर्या कां करीत बसले आहेत याचें त्याला क्षणभर आश्चर्य वाटलें ! " यत्कांक्षति तपोभिरन्यमुनयः तस्मिंस्तपस्यंत्यमी ! " त्याचप्रमाणें सर्व विद्या सकृद्दर्शनीं हातीं आल्या असतांहि आधुनिक विद्वान् लोक शिक्षणपद्धति सदोषच आहे म्हणून दुःखी-कष्टी होत आहेत, याचें जुन्या विद्वानांस कोडेंच पडेल. पण या अनेकांगी शिक्षणाचा मोहकपणा कांहीं अंशीं केवळ दिखाऊ आहे हें त्या बिचाऱ्यांस काय माहीत ? आधुनिक विद्वानांच्या ज्ञानाची लांबी-रुंदी फार विस्तृत, पण त्याची खोली फार थोडी असते. वादाचा विषय बदलला असतां जुन्या पंडिताप्रमाणें त्याला पाण्याबाहेर काढून टाकलेल्या मत्स्यासारखें चुकल्याचुकल्यासारखें होऊन तो तडफडणार नाहीं. कारण तो जलचर व स्थलचर म्हणजे उभयचर आहे खरा. बकाप्रमाणें तो जमीन असेल तेथपर्यंत चालेल व पाणी भेटतांच पोहूं लागेल. पण त्याची गति खोल पाण्यांत मात्र होणार नाहीं. यामुळें विद्यासमुद्राच्या तळाशीं बुडी मारून मोतीं वर आणणें हें त्याला दुष्कर होय. फार तर त्यानें सरस्वतीदेवीच्या क्रीडासरोवरांतील कमळांबरोबर उथळ पाण्यांत खेळावें. कोणताहि विषय तळहातावरील आवळ्याप्रमाणें त्याला चोहोंकडून दिसेल; पण आवळ्याच्या पोटांतल्या बीची कल्पना मात्र त्याला होणार नाहीं !

नव्या शिक्षणपद्धतींत पाठान्तरास महत्त्व नसतें. यामुळें विद्यार्थ्यांची स्मरणशक्ति कमकुवत राहते. डोक्यांत ज्ञान असतांहि डोळ्यांपुढें पुस्तक असेल तेव्हांच त्याची जीभ किंवा हात चालावयाचा. जुन्या पंडिताच्या स्मरणशक्तीचा ' अक्षय भाता ' नेहमीं भरलेला असे; यामुळें झोंपेंतून जागें

केलें तरी तो वादास सिद्ध व्हावयाचा. नव्या पंडिताचा भाता वरचेवर दुसऱ्यानें भरून द्यावा लागतो. पुस्तकें हातीं येईपर्यंत त्याला धर्मयुद्धाच्या नियमांचा आश्रय करून मुदत मागून घ्यावी लागते व सुदैवानें आधुनिक काळचे वाद लेखद्वारां होत असल्यामुळें ती मुदत त्यास मिळतेहि ! जुन्या काळच्या युद्धाप्रमाणेंच जुन्या काळचे वाद. म्हणजे प्रतिपक्षाची गांठ समक्ष पडून तरवारीनें युद्ध व्हावयाचें; तरवार फिरविण्यास लागेल इतकाच स्थलावकाश व तरवार उगारून मारण्यास लागेल इतकाच कालावकाश. जुन्या सभेंतलि वाद तोंडानें व्हावयाचा, तेथें ग्रंथ उघडून दाखविण्याची व पाहण्याची अपेक्षा नसे. प्रतिपक्षांस व न्यायाधीशांस प्रायः ग्रंथ पाठच असावयाचे. कोट्या व प्रति-कोट्या, उत्तरें-प्रत्युत्तरें सर्व जिभेवर असावयाचीं; व केवळ बुद्धीच्या तरळपणावर व तत्परतेवर विजय मिळावयाचा. प्रतिपक्षी-क्षणभर का होईना-निरुत्तर झाला म्हणजे वाद जिंकला गेला असें ठरे. शंकराचार्य व मंडनमिश्र यांचा वाद चाळीस दिवस चालला होता; पण वादाचा निकाल लागला तो मंडनमिश्राच्या गळ्यांतील पुष्पहार कोमेजल्यावरून सिद्ध झाला ! जुन्या पंडित-लोकांच्या वादाची गोष्टहि एकंदरीनें अशीच होती.एखाद्या कोटीवर त्यांचा निर्णय अवलंबून असावयाचा व निरुत्तर केलेल्या किंवा गोंधळलेल्या प्रतिपक्षाच्या म्लान झालेल्या मुखश्रीवरून तो सिद्ध व्हावयाचा ! आधुनिक विद्वानांच्या वादाची गोष्ट बरीच निराळी आहे. ज्या प्रतिपक्षांनीं एकमेकांचीं तोंडें कधींहि पाहिलीं नाहींत अशांचे वाद निरनिराळ्या खंडांतूनहि चालू असतात. यास्तव क्षणभर निरुत्तर झाल्यामुळें मुखश्री म्लान होऊन फड जिंकला अगर हरला जाण्याचा संभव नाहीं. वादांतील युक्तिवाद व फारच तर कांहीं अंशीं भाषेची ओजस्विता यावरूनच जग निकाल लावतें. या आधुनिक वादांना कालाचाहि निर्बंध नसतो. एका देशांत पूर्वपक्षकार व दुसऱ्या देशांत सिद्धान्ती हें जसें चालतें, तसेंच यंदाच्या पावसाळ्यांत पूर्वपक्ष होऊन भिजत पडलेल्या वादास पुढल्या वर्षीच्या उन्हाळ्यांतहि पालवी फुटण्यास हरकत नाहीं ! वादाचीं साधनेंहि तशींच निराळीं. आधुनिक युद्धाच्या सरंजामाप्रमाणें आधुनिक वादाचा सरंजामहि निराळा. आधुनिक पंडितांना मोठमोठ्या ग्रंथसंग्रहालयाच्या

पहाडी ‘बातेऱ्या’ बांधतां येतात व त्यांच्या साहाय्यानें त्यांचा मारा चालावयाचा. शत्रुपक्षाच्या किल्ल्यांतील मर्में सांगण्यास सूचिपत्ररूपी गुप्त हेर शेंकडों तयार असतातच ! प्राणांतररूपी स्नेही, सल्लागार व योद्धे यांची कुमक दोन्ही पक्षांस मुबलक; व अखेर जय व्हावयाचा तो शक्याशक्यतेच्या सूक्ष्म विचारावर अवलंबून असल्यामुळें कालांतरानें विवक्षित मतांची परंपरा जेव्हां सर्रास चालू होईल तेव्हांच वादाचा अखेर निर्णय झाल्याची खबर यावयाची. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, जुन्या व नव्या पंडितांचें उद्दिष्ट, साधनें व परिस्थिति हीं बहुतेक वेगवेगळीं आहेत. जुन्या पंडितांच्या शिक्षणाचें एकांगित्व व नव्या पंडितांच्या शिक्षणाचें अनेकांगित्व हे सर्वस्वीं त्यांच्या निरनिराळ्या परिस्थितीचे परिणाम होत.

वर दिलेलें वर्णन हें एकांगी व अनेकांगी शिक्षणाच्या अतिरेकाचेंच वर्णन अर्थात् होय. कारण जुन्या काळींहि एकांगी शिक्षणाचाच प्रकार मुख्यत्वें-करून असतां अनेकांगी शिक्षण मिळविलेले पंडित मुळींच नसत असें मात्र नाहीं. बुद्धिमान् पुरुषाला कोणत्याच काळांत अध्ययनाचे विषय मुद्दाम मर्यादित करून घेण्याचें कारण असत नाहीं. बेकनसंबंधानें त्याचे अभिमानी असें म्हणतातच कीं, तत्कालीन ज्ञान-विज्ञानाचे सर्व विषय-रूपी प्रांत त्यानें खालसा करून आपल्या मनाच्या राज्यास जोडले होते. (Bacon had taken all knowledge for his Province.) आपल्या इकडेहि अध्ययनाचा कोणताहि विषय म्हणून न सोडणाऱ्या अने-कांगी पंडितांचीं उदाहरणें नाहींत असें नाहीं. सायणाचार्य, माधवाचार्य, क्षेमेंद्र वगैरे पंडितांचीं उदाहरणें असल्या प्रकारचीं होत. तसेंच जे जे प्रसिद्ध टीका-ग्रंथकार म्हणून होऊन गेले त्यांच्या टीकांकडे पाहिलें तर प्रायः असें दिसून येतें कीं, जेथें जेथें म्हणून दुसऱ्या शास्त्राचा मुद्दा आला तेथें तेथें त्यांनीं त्या त्या शास्त्रांत निष्णात असणाऱ्या पंडितांप्रमाणें विवेचन केलेलें आहे. म्हणजे एकांगी शिक्षणाच्या कालांतहि अनेकांगी शिक्षणाची किंमत लोकांस कळत नव्हती असें नाहीं. त्याच्याच उलट हल्लींची स्थिति आहे. कारण हल्लीं अनेकांगी शिक्षण हा नियम व एकांगी शिक्षण हा अपवाद होऊन बसला आहे, व यामुळें अनेकांगी शिक्षणापासून होणारे तोटे—म्हणजे

विशेषतः ज्ञानाचा उथळपणा–नजरेस आल्यामुळें एकांगी शिक्षण हवें असें लोकांस वाटूं लागलें आहे.

सिमला–कॉन्फरन्सच्या रिपोर्टांत मोठमोठ्या जाडया आधुनिक विद्वानांनीं जुन्या पंडितांची स्तुति करून तो वर्ग लोपत चालला असे दुःखोद्गार काढले आहेत त्याचें कारण हेंच होय. कोणत्याहि एका पद्धतीची अतिशयोक्ति झाली म्हणजे तिजविरुद्ध प्रतिक्रिया होणें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें जुन्या पंडितांचा एक वेळीं अनादर होऊन हल्लीं मात्र त्याजविषयीं आदर उत्पन्न झाला आहे. अतिशयोक्तीचीं दोन्हीं टोकें चुकवून कोणत्याहि गोष्टीच्या बरोबर मध्यबिंदूचा वेध होणें हें कठीण असतें; शिवाय मध्यवेधाची स्थिति आली तरी ती फार वेळ टिकत नाहीं. मनूची गति ही घड्याळांतील लंबकांच्या आंदोलनासारखी असते. चालत्या घड्याळाचा लंबक प्रत्येक आंदोलनांत मध्यबिंदूस स्पर्श करून जातो; पण मध्यबिंदूवर तो कधींहि स्थिर राहात नाहीं. चालत्या म्हणजे सजीव समाजांतील मतमतांतराचा मनूहि इष्ट मध्यबिंदूवर स्थिर असा राहूं शकत नाहीं; व तो आंदोलनें घेत एकदां या टोंकास तर एकदां त्या टोंकास जात असतो. यामुळें ज्या काळांत जें आहे तें तर हवेंच असतें; पण जें नाहीं त्याचे गुण आठ–आठवून त्याची इच्छा मनुष्य करूं लागतो. इंग्रजींत 'Something of everything and everything of something' असें जें वाक्य आहे त्यांतच ज्ञानविज्ञानाच्या इष्ट मर्यादेचा मध्यबिंदु आहे. एखादा विषय सर्वस्वीं माहीत असणें हें हवेंच. पण तेवढाच माहीत असणें हें जसें अपूर्णत्वाचें लक्षण आहे, तसेंच सर्वच विषय थोडथोडे माहीत असणें हें इष्ट खरें. तथापि, एखादाहि विषय सर्वस्वीं अवगत नसणें हेंहि अपूर्णत्वाचेंच लक्षण होय. अर्थात् एकांगित्व व अनेकांगित्व यांचा जर मेळ पडेल, म्हणजे प्रत्येक विषयाचें थोडथोडें ज्ञान असून शिवाय एखाद्या विषयाचें तरी सांगोपांग उत्कृष्ट ज्ञान असावें ही स्थिति सर्वांत उत्तम. त्याच्या अभावीं जुन्या पंडितांनीं नव्यांना उथळ म्हणून हंसावें व नव्यांनीं जुन्यांना एककल्ली म्हणून हंसावें, असेंच होणार. पण कोणत्याहि समाजांत एकांगी व अनेकांगी शिक्षण पावलेले लोक एकसमयावच्छेदेंकरून असतील तर, व्यक्तीचें जें अपूर्णत्व व दूषण

तेंच, सर्व समाज म्हणून एक पुरुष धरला तर त्या पुरुषाचें पूर्णत्व व भूषण होईल हें उघड आहे व या दृष्टीनें अनेकांगी शिक्षण–प्रधान अशा हल्लींच्या कालांत जुन्या पंडितपरंपरेचें युरोपियन लोकांसहि कौतुक वाटावें आणि पंडितवर्गाला उत्तेजन मिळून त्याची परंपरा पुढेंहि चालावी अशी इच्छा उत्पन्न होऊन तत्प्राप्त्यर्थ उद्योग व्हावा हें योग्यच आहे.

## जुन्या व नव्या पद्धतीचें साहचर्य

एकांगी व अनेकांगी शिक्षणाचे गुण परस्पर कांहीं अंशीं विरोधी असल्यामुळें त्या दोन शिक्षणपद्धतींचा मिलाफ करतां येईल किंवा नाहीं हा एक विचाराचाच प्रश्न आहे. दोन्ही पद्धती आपापल्या परीनें उपयोगीच आहेत; व त्यांतील अमुक एक हटकून चांगली व अमुक एक सर्वथा त्याज्य असें म्हणतां यावयाचें नाहीं. दोन्हीहि पाहिजे आहेत. पण त्या साध्य व्हाव्या कशा? मनुष्यमात्रांत जसे स्वभाव भिन्न असतात. एकाचा स्वभाव दुसऱ्यास येत नाहीं; व एकाच व्यक्तींत दोन परस्पर विरोधी स्वभावधर्म कायमचे नांदूं शकत नाहींतच नाहींत. तसेंच या दोन शिक्षणपद्धतींचें आहे. एकींत स्मरण-शक्तीची मेहनत व करामत, तर दुसरींत चौकसपणा अधिक; एकींत शब्द-प्रामाण्यावर भिस्त जास्त, तर दुसरींत आत्मप्रत्ययाचा व विचारस्वातंत्र्याचा जोर जास्त; एकींत गहनावगाहनशीलता, तर दुसरींत बुद्धीचा व्यापकपणा व विस्तारविशेष. अशा निरनिराळ्या गुणांच्या पद्धतींचा मिलाफ व्हावा कसा? एकाच मनुष्याला जसे धूर्त व प्रांजल, धाडसी व सावध, प्रेमळ व विवेकी, न्यायी व उदार असे एकाच काळीं होतां येत नाहीं, तसेंच एकांगी व अनेकांगी शिक्षणपद्धतीनें मिळविलेल्या विद्येचे गुण एकाच व्यक्तींत एकवटतां येणें शक्य नाहीं. एकाच लेखकास दोन निरनिराळ्या वळणांचीं अक्षरें काढतां येणें कठीण, किंवा एकाच ग्रंथकारास अनेक निरनिराळ्या भाषापद्धति लिहितां येणें कठीण; त्याचप्रमाणें कांहीं अंशीं जुन्या पढिक पंडितास नव्या पद्धतीचा शोधक व बहुश्रुत पंडित होणें, किंवा नव्या पद्धतीच्या शोधक व बहुश्रुत पंडितास जुन्या पद्धतीचा पढिक व उपस्थितिवश पंडित होणें कठीण आहे. पण परस्परविरोधी असे मनुष्यस्वभावगुण एकाच व्यक्तींत जरी एकाच वेळीं सांपडणें शक्य नसलें तरी, निरनिराळे गुण अंगीं असलेल्या

निरनिराळ्या व्यक्ती एकाच काळीं एकाच समाजांत सांपडणें मुळींच कठीण नाहीं. जगांत इतर बाबींत आजवर कितीहि फरक झाले असले तरी समष्टिरूप मनुष्यस्वभाववैचित्र्य हें मात्र सनातन—जें हजारों वर्षांपूर्वींचें तेंच—आज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मनुष्यस्वभावाची गोष्ट व शिक्षणपद्धतीची गोष्ट थोडीशी वेगवेगळी आहे खरी. प्रकृतिपिंडाची वैचित्र्यशीलता निसर्ग-निर्मित असून मानवी प्रयत्नापेक्षां बलवत्तर आहे; पण शिक्षणपद्धति ही मनुष्यनिर्मित असून बहुधा अनुकरणात्मक असते. यामुळें एकाच काळीं एकाच समाजांत शिक्षणपद्धतीचें वळण एकच असतें; निदान एकमेकांस फारसें सोडून नसतें, असेंच आढळेल. स्वभावांत अनुकरण शक्य नाहीं, शिक्षणपद्धतींत तें अनिर्वाह्य आहे; एवढेंच नव्हे तर स्वभावांत समान स्वरूप असणें हें जितकें कठीण, तितकेंच शिक्षणपद्धतींत वैचित्र्य आणणें कठीण आहे. पण प्रयत्न केला असतां तें असाध्य आहे असें मात्र नाहीं. पाठशाळा, तोळ, मद्रेसा या शिक्षणसंस्था जुन्या शिक्षणपद्धतींच्या निदर्शक आहेत खऱ्या; पण त्या अद्यापि सर्वस्वीं बुडाल्या नाहींत. अगदीं नव्यांतल्या नव्या पद्धतीचें युनिव्हर्सिटीचें शिक्षण इकडे दिलें जात असतां, दुसरीकडे आमच्या पाठ-शाळांमधून पूर्वपीठिकानुरूप पठणपाठणाचा ध्वनि निघतच आहे; तो कांहीं सर्वस्वीं थांबला आहे असें नाहीं. आंग्लसरस्वतीच्या सांप्रदायाच्या निदर्शक अशा रंगीबेरंगी फिती व काळ्या विदेशी झुली आज देशांत दिसूं लागल्या आहेत खऱ्या; तथापि, आर्यसरस्वतीच्या निशाणादाखल मानल्या जाणाऱ्या जरीकांठी शालजोड्या खांद्यांवर घेणारे, फार पण डोकीस बांधणारे लोकहि सर्वस्वीं दिसेनासे झाले आहेत असें नाहीं !

या गोष्टीचा अर्थ असा आहे कीं, परिस्थितीमुळें निरनिराळ्या व्यक्तींच्या अधिष्ठानानें निरनिराळ्या शिक्षणपद्धति एकाच समाजांत एकाच वेळीं आढळणें अगदींच अशक्य आहे असें नाहीं. नदीच्या पात्रांत मुख्य प्रवाह एकाच दिशेनें वाहात असतां एखादा उपप्रवाह दुसऱ्या दिशेनें वाहात आहे असा चमत्कार सकृत्‌दर्शनीं दिसणें कल्पनातीत नाहीं; पात्रांतील उच्चनीच स्थळांमुळें तें सर्वथा संभवनीयच आहे. याच रीतीनें, शिक्षणाचा मुख्य प्रवाह आधुनिक कल्पनांनीं आंखलेल्या पात्रांतून वाहात असतां प्राचीन

परंपरेनुसार मद्रेसा-पाठशाळांच्या पात्रांतून फार्शी-संस्कृत विद्येचा लहानसा प्रवाह दुसऱ्या दिशेनें वाहात आहे, त्याचीहि उपयुक्तता आहे असें आधुनिक पंडितांस वाटूं लागलें आहे; आणि तो कायम वाहता राहावा, आटून जाऊं नये, अशा हेतूनें ते उद्युक्त झालेले आहेत ही गोष्ट सिमला कॉन्फरन्सच्या पुराव्यानें शाबीत होत आहे. मात्र हा हेतु कायमचा सिद्ध होण्यास एकच गोष्ट करणें जरूर आहे ती ही कीं, कॉलेजांच्या शिक्षणक्रमाप्रमाणेंच पाठशाळांचाहि शिक्षणक्रम स्वतंत्र चालूं राहिला पाहिजे; व तसें झालें असतां पाठशाळांतून शिकून पंडितगिरीची परंपरा चालू ठेवण्यास लोकांस अडचण पडणार नाहीं. कॉलेजें व पाठशाळा एकाच स्थळमर्यादेंत असल्या तरी एकामुळें दुसरें ओस पडलें असें पूर्वी झालेलें नाहीं व यापुढेंहि सहसा घडून येणार नाहीं असें आम्हांस वाटतें. पुष्कळसे विद्यार्थी कॉलेजांत जातील खरे; पण पाठशाळांचे भक्तहि सांपडणार नाहींत असें नाहीं; थोडे तरी सांपडतीलच. कॉलेजांत कोण जाईल व पाठशाळेंत कोण जाईल ही गोष्ट यदृच्छेनें ठरणारी आहे. अमुकच अमकीकडे जाईल हें कोणी निश्चयानें सांगूं शकणार नाहीं. हे सर्व परिस्थितीचे खेळ आहेत.

या गोष्टीचीं एक-दोन उदाहरणेंहि मनावर ठसण्यासारखीं देतां येतील. इंग्रजी शिकून पदवी मिळवून प्रोफेसरीचें काम करणाऱ्या गृहस्थाचें मोडी अक्षर कित्ता घालण्यासारखें वळणदार व थेट जुन्या डौलाचें सांपडणें सहसा कठीण, हें कोणीहि कबूल करील कीं नाहीं ? असें असतां कै. प्रो. काथवटे यांचें मोडी हस्ताक्षर अगदीं वर वर्णिलेल्या नमुन्याचें होतें हें पुष्कळ लोकांस माहीत असेलच. या गोष्टीचें कारण प्रस्तुत लेखकानें खुद्द प्रो. काथवटे यांस एकदां सहज विचारलें असतां ते म्हणाले कीं, बंडाच्या सालीं मी इंग्रजी शिकत होतों पण बंडवाले लोक विजयी होणार आणि फिरून पेशवाई स्थापिली जाणार असा त्या वेळीं आमचा दृढ भरंवसा होता; व यामुळें इंग्रजी विद्येचा उपयोग होणें नाहीं असें समजून आम्हीं जुन्या शिक्षण-पद्धतीप्रमाणें अक्षर व गणित हेंच फिरून हातीं घेतलें. पण पुढें पाहतों तों बंडवाल्यांचा मोड होऊन इंग्रजी राज्यसत्ताच पुनः स्थापित झाली; तेव्हां फिरून नव्या पद्धतीप्रमाणें आम्ही इंग्रजी शिकूं लागलों ! अशा रीतीनें

जुन्या व नव्या शिक्षणपद्धतीचे दोन्ही फायदे आमच्या पदरांत पडले. अर्थात् हा यदृच्छेचा परिणाम. दुसरें उदाहरण आपले रँगलर प्रि. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचें. यांचें घराणें वैदिकांचें असून खुद्द त्यांचे वडील कोंकणपट्टींत उत्कृष्ट दशग्रंथी ब्राह्मणांत मोडत असत; आणि या चिरंजीवांची अल्प वयांत दिसून येणारी बुद्धिमत्ता पाहून त्यांनींहि दशग्रंथी ब्राह्मण व्हावें अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती असें म्हणतात. पण दैवाचा संकल्प कांहीं वेगळाच होता. कोंकणांत राहून वेदाभ्यासाकडेच ते लागते—त्यांच्या पायांना देशाची वाट न सांपडती किंवा त्यांना हातीं धरण्यास धोंडोपंत कर्व्यांसारखा आधुनिक विद्वान् न मिळता—तर ' रघुनाथा ' स पंत ही पदवी न लाभतां भट्ट ही पदवी लाभली असती. इंग्लंडांत कॅम नदीकांठच्या कॉलेजांत बोर्डिंगांत ' साईन थीटा कॉस थीटा ' या शब्दाचा पाठ तोंडांतून निघण्याऐवजीं, मुर्डी गांवामधील एका लहानशा घराच्या परिसरांतील आवारांत नारळी-पोफळींना रहाटगाडग्याचें पाणी लावीत लावीत वेदांतील ऋचांच्या जटा—पाठांचीं व घन—पाठांचीं त्यांचीं आवर्तनें चालतीं; लुसलुशीत सुगंधी पिअर्स सोपाऐवजीं, नित्य समिध शेकलेल्या अग्निकुंडांतील भरड भस्मच ते अंगास चर्चित बसते; केंब्रिजच्या पदवीधराच्या काळ्या-निळ्या शिपतरी टोपीऐवजीं हिरवी फीत लावलेली तांबड्या बनातीची टोपीच त्यांच्या डोक्यावर राहती; लॉर्ड कर्झन यांनीं प्रौढीनें वर्णिलेल्या ' ब्ल्यू रिबन ' ऐवजीं, दगडी चातीनें कांतलेल्या व बोजड ब्रह्मगांठ मारलेल्या गळ्यांतील यज्ञोपवीताचाच अभिमान ते बाळगते; किंबहुना फक्त कोंकणांतच विपुल असलेल्या भुतांखेतांचें दर्शन झालें असतां, फक्त कोंकणांतच लागू पडणाऱ्या समजुतीप्रमाणें जानव्याची ब्रह्मगांठ दाखवून त्या महद्भयाचें त्यांनीं निवारण केलें असतें. घनपाठी दशग्रंथी वैदिक ' रघुनाथभट्ट ' परांजपे व धर्मशिक्षणाविरुद्ध कसून लिहिणारे ' रँगलर ' परांजपे यांच्यांतील भेद खरोखर जमीनअस्मानाचाच नव्हे काय ? आणि हा फरकहि दोन विषम शिक्षणपद्धति समान सुलभ असतां, एखाद्या व्यक्तीला लीलेनें अमुक एका पद्धतीस मुकवून दुसऱ्या एका पद्धतीच्या कक्षेंत नेऊन सोडणाऱ्या यदृच्छेचेंच फळ नव्हे काय ?

बाह्य परिस्थितीप्रमाणेंच मानसिक स्थितीमुळेंहि निरनिराळ्या व्यक्ति निरनिराळ्या शिक्षणपद्धतीचें अवलंबन करणार हें उघड आहे. वेदनिंदक चार्वाक हा कांहीं विसाव्या शतकांतील एखाद्या अस्सल मिशनरी कॉलेजांत शिकलेला नव्हता. उलटपक्षीं, अस्सल मिशनरी कॉलेजांत शिकून तयार झालेल्या बी. ए., एम्. ए. मध्यें, वेद ही अक्षरशः प्रत्यक्ष ईश्वराचीच वाणी आहे असें म्हणणारे व मानणारे श्रद्धाळू लोक आज सांपडणार नाहींत असें नाहीं. चार्वाकाच्या वेळीं एखादें मिशनरी कॉलेज असतें तर त्याला जसा निदान एक तरी योग्य विद्यार्थी मिळता; तसेंच आज हिंदुस्थानांत, जुन्या पद्धतीच्या पाठशाळा शिल्लक राहतील तर, त्यांनाहि योग्य असे विद्यार्थी मिळतील. तात्पर्य, जी चूक आहे ती इतकीच कीं, स्वभावभेद, परिस्थितिमूलक विपरीतत्व, व यदृच्छाविलास कायम असतां निरनिराळ्या पद्धतींचें शिक्षण देणाऱ्या संस्था मात्र असाव्या तितक्या आज या देशांत नाहींत. एकांगी शिक्षण व अनेकांगी शिक्षण हीं एकाच व्यक्तीमध्यें संभवनीय नसलीं तरी, एका समाजांत एकत्र सहज संभवतात; त्यांच्या योगानें प्रत्येक व्यक्तिपिंडाला यथायोग्य शिक्षण मिळतें; व सर्व समाजाला श्रमविभागाचा फायदा मिळतो. इंग्लंडांत एकराष्ट्रीयत्व सर्वस्वीं सिद्ध झालें असल्यामुळें तेथें सर्व शिक्षण एकाच नमुन्याचें असणें ठीक असेल; पण हिंदुस्थानांतील स्थिति तशी नाहीं. येथें जुन्या व नव्या परंपरेचा विरोध चांगला जागृत आहे व कदाचित् पुढेंहि कधीं तो सर्वस्वीं मिटणार नाहीं. याकरितां हिंदुस्थानांत शिक्षणाचे नमुने उपराष्ट्रानुरूप वेगवेगळे असणें अगदीं जरूर आहे. ही गोष्ट कितीहि जोरानें आम्हीं पुनः पुनः सांगितली तरी ती थोडीच होणार आहे ! या देशांत, वरील विवेचनावरून, आजच्या स्थितींतहि पाठशाळा चालविण्याची गरज आहे हें दिसून येईल व जी गोष्ट इकडील पाटशाळांची तीच बंगाल्याकडील ‘ तोळां ’ ची. मुसलमानी विद्येचीहि अशीच गोष्ट आहे. सुदैवानें या जुन्या विद्येच्या भांड्याला नव्या विद्येची कल्हई देणें इष्ट व शक्य आहे असें म्हणणारा नवीन वर्ग आज निर्माण होत आहे; व या वर्गाच्या विचारसरणींत संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनास पोषक असें बरेंच द्रव्य सांपडतें. हें उभयविध शिक्षण देऊन संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनास मदत कशी करावी या

गोष्टीचा सिमला-कॉन्फरन्समध्यें विचार झाला. पण 'ओरिएंटल इन्स्टिटयूट' या नांवाची नवीन संस्था काढण्यापलीकडे या गोष्टीच्या विचाराची तपशीलवार मांडणी कोठें झालेली त्या रिपोर्टांत दिसून येत नाहीं. आणि मुख्य हेतु इष्ट असतां साधनें सुचविण्याच्या बाबतींत बरेच सभासद गोंधळून गेले, असें त्यांनीं पाठविलेल्या लेखी मिनिटांवरून दिसून येतें.

जुन्या परंपरेचें जें शिक्षण आज देशांत चालू आहे तें पाठशाळा, तोळा, मद्रेसा वगैरे जुन्या पद्धतीच्या शाळांतून चालू आहे. संस्कृत, पर्शियन, आरबी वगैरे भाषांत संग्रहित असलेल्या विद्येचें जुन्या पद्धतीचें असें शिक्षण याच संस्थांतून मिळण्याचें असल्यामुळें, अशा शाळा व त्यांत शिकणारे विद्यार्थी यांचें अल्प प्रमाण पाहून कोणासहि बरें वाटणार नाहीं; व हें प्रमाण किती अल्प आहे हें खालीं लिहिलेल्या आंकड्यांच्या माहितीवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. वरिष्ठ शिक्षणाच्या दृष्टीनें पाहतां सर्व हिंदुस्थानांत मिळून १४ शाळांमधून सुमारें १३०० विद्यार्थी संस्कृत, फार्शी व आरबी विद्या जुन्या पद्धतीनें आज शिकत आहेत. सन १९०० सालीं या संस्थांची संख्या अवघी पांच असून त्यांत सुमारें ५५० विद्यार्थी शिकत होते. गेल्या दहा-बारा वर्षांत संस्था व विद्यार्थी यांच्या संख्येंत वाढ झालेली आहे; तथापि, सर्व हिंदुस्थानांत मिळून युनिव्हर्सिटीशीं संबंध असलेल्या वरिष्ठ इंग्रजी शिक्षणाच्या संस्थांची संख्या १८५ व त्यांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारें ३० हजार असतां, जुन्या पौर्वात्य पद्धतीनें उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या अवघी १४।१५ असावी. यावरून जुनी विद्या किती मागासलेली आहे हें दिसून येईल. इंग्रजी विद्या देणारीं नुसतीं 'आर्ट्स कॉलेजें' च हिंदुस्थानांत १२५ आहेत. असें असतां पौर्वात्य इतकीं थोडीं कां असावीं ? कायदा, वैद्यक, शिल्प, वास्तुविज्ञान, कृषिकर्म वगैरे बाबतींत तर जुन्या विद्येचा सर्वस्वीं लोपच झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणसंस्थांतून पौर्वात्य तत्त्वज्ञान व काव्य यांच्या पलीकडे सहसा कांहीं शिकविलें जात नाहीं. जुनी विद्या शिकविणाऱ्या प्राथमिक पाठशाळा वगैरे आहेत; परंतु त्यांची वाढ होण्याऐवजीं ऱ्हासच झालेला आढळतो. उदाहरणार्थ, आरबी व फार्शी शिक्षण देणाऱ्या पाठशाळा

सन १९०० ते १९१० या दहा सालांत २४३८ वरून १५०५ व आल्या व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ३७॥ हजारांवरून ३० हजारां आली ! तसेंच संस्कृत पाठशाळा वगैरेंची संख्या १९२९ वरून १४२९ व आली; म्हणजे दहा वर्षांत पांचशें पाठशाळा कमी झाल्या. विद्यार्थ्यांच संख्याहि २३ हजारांवरून २२ हजारांवर आली. पाठशाळांच्या संख्येच्य मानानें विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली दिसत नाहीं; याचें कारण असें असावें कीं, जुन्या पद्धतीनें विद्या संपादन करण्याची लोकांची इच्छा विशेष कमी होत नसतां, ती विद्या देणारे शिक्षक व त्या शिक्षकांचा स्वतंत्र रीतीनें चरितार्थ चालण्याचें साधन हीं दिवसेंदिवस कमी होत चाललीं आहेत. सिमला–कॉन्फरन्सनें 'ओरिएंटल इन्स्टिटयूट' सारखी संस्था काढण्याचें ठरविलें आहे हें तर ठीकच आहे; परंतु जुन्या पंडितगिरीची परंपरा कायम राहावी व वाढावी अशी सरकारची इच्छा असेल, तर संस्कृत पाठशाळा अधिक स्थापन व्हाव्या अशी खटपट धरून त्या संस्थांना योग्य तें द्रव्यसाह करण्यासहि सरकारनें कंबर बांधली पाहिजे.

## मॉडर्न बुकडेपोची संग्राह्य प्रकाशने

**मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास**
(प्रा. कृ पां. कुलकर्णी) पांचवी आवृत्ति रु. १६-००

**मराठे आणि इंग्रज**
(न. चिं. केळकर) चौथी आवृत्ति १०-००

**संस्कृत साहित्याचा इतिहास**
(डॉ. वि. वा. करंबेळकर) ७-००

**अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका**
(प्रा. गं. बा. सरदार) तिसरी आवृत्ति १२-००

**सुदाम्याचे पोहे**
(श्री. कृ. कोल्हटकर) सातवी आवृत्ति १२-००

**कोल्हटकरांचें आत्मवृत्त**
(श्री. कृ. कोल्हटकर) दुसरी आवृत्ति १०-००

**आगरकर दर्शन**
(संपादक : रा. प्र. कानिटकर) दुसरी आवृत्ति ३-००

**तुकाराम दर्शन**
(संपादक : प्रा. गं. बा. सरदार) ६-००

**मातृकर्तव्यें**
(प्रा. सौ. अलका इनामदार) दुसरी आवृत्ति ६ ५०

**महानुभाव संत**
(डॉ. वसंत स. जोशी) ७-५०

**महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास**
(प्रा. नलिनी पंडित) दुसरी आवृत्ति १२-००

**रामदास दर्शन**
(संपादक : प्रा. गं.. बा. सरदार) ८-००

मॉडर्न बुकडेपो, बाजीराव रस्ता, पुणें ३०